सुभा किले सातारा—४; मजमूदार १, नामजाद १, हवालदार १ व आणखी एक मजमूदार व नामजाद 'परभु' असून नांवें वेगळ्या अक्षरांत व शाईत आहेत.

कारकून—८ ताा उंबरज, ताा पाली, व तपे तारळे मिळून; तारळ्याच्या व पालीच्या हवालदाराचे शिके आहेत.

हकजवार समस्त गोतानी एकूण सुमारे २११ (२०९ गांववतनदार + २ कारकून) व्यक्ती (मध्येंच २ कारकून काा नाणेघोल खाली आलेत)

किले सातारा—(७):— देशकानी या शीर्षकाखाली देशमूख देशकुाा यांचीं नांवें नंतर " गांवगना मोकदम " असें सदर असून पुढें सुमारें दोन विती कोरी जागा सोडली आहे; **किले परळी** (२)—देशकांची नांवें व नंतर " मोकदमानी गांवगना " हें सदर व पुढें सुमारें पांच बोटें कोरी जागा; **किले पनाळा विलातीचें गांव** (८):—देसाई, पटेल, कुलकर्णी गांववार नांवें; **परगणें दंतागीर पाटण** (५):—देशमूख देशकुाा; **पाा वाई** (१)—देशमुखाचें नांव सिक्का, पांच बोटें कोरी जागा; **पाा कन्हाड** (४):—देशकानी २ व सरगुरो (मुसलमान) १ व नाईकवाडी १; **कसबे कन्हाड** (१०):—सेटे महाजन मोकदम मिळून १०; **गांवगना पाा कन्हाड** (५५):—भोंवर १६ गांवचे मोकदम,

पटेल कुलकर्णी व चौगुला यांचीं नांवें. बहुतेक त्या सर्व गांवास चौगुला आहे. याशिवाय अखेरीस ३० गांवांचीं नुसतीं नांवें आहेत. त्या गांवच्या व्यक्ती हजर होत्या काय हे न कळे; **काा नाणेघोल** (११):—कारकून दोन, देशक ३, गावगना ६; **तपे तारळे** (३८):—देशक ५, नाईकवाडी, १ मोकदमानी कसबा व भोंवर ७ गांव मिळून ३२ व्यक्ती, **मौजे (पाली) मजकूर** (७०):—मुंजेरी २५; मोहतर्फ २८; यांत बकाल फुलाई, दर्जी, पेंडारी, तेली, कासार, सोनार, जिनगर, तुतारी, मोमीन, खाटिक यांचा समावेश आहे; बलुते १७; जोसी, चांभार, घडसी, कोळी, सुतार, कुंभार, महार वगैरे.

एकूण २३८ व्यक्ती हजर आहेत. त्यांत २०९ गांवकीचे वतनदार आहेत, व बाकीचे २९ सरकारी अधिकारी आहेत.

[ई] (१) न्याय प्रक्रियेच्या दृष्टीनें महजर उपयुक्त आहे. छत्रपतींनीं स्वतःच धर्मसभा बोलाविली आहे. दिव्याचें वर्णन महत्त्वाचें आहे. (२) 'गोत' व 'देशक' या शब्दांचा अर्थ व्यासीच्या दृष्टीनें महजरांची सभा उपयुक्त आहे. 'हकजबार समस्त गोतांनीं' या शीर्षकाखालीं अनेक मंडळीचा अंतर्भाव करण्यांत आला आहे. त्यांत बरेच 'देशक'हि आहेत. ही गोष्ट विचारार्ह आहे. (३) समेतील मौजे पाली या सदराखालील सभासदांचा उल्लेख तत्कालीन ग्रामरचनेच्या दृष्टीनें लक्ष्य आहे. (४) परगणे कऱ्हाड, काा नाणेघोल व तपें तारळें या तीन गांवांस नाईकवाडी आहे. परगणे कऱ्हाडास एक सरगुन्होहि आहे.

—९१—

[अ] **शि. च. सा. खं. २, ले. २८१**

सु. १०७६ रजब ३०; श. १५९७ का. शु. २ रविवार; इ. १६७५ आक्टो १०.

म. इ. खं. १८ मध्यें, ले. २१ हाच महजर छापला आहे. ती नक्कल अपूर्ण आहे.

[आ] शिवाजीमहाराजांनीं आपलें पाटिलकीचें वतन मौजे खामगांव काा मावळ हे बकाजी फर्जंद भोसले यास त्याच्या एकनिष्ठ सेवेबद्दल बहाल केलें त्याबद्दलचा हा गोताचा महजर आहे.

[इ] हाजीर मजालसीं बितपसील.

महादजी सामराज सुभेदार ताा मावळ	सरमजमुदार ताा मावळ
—हवालदार काा मावळ	मजुमदार काा मावळ
—करंजवणे देशमुख काा मावळ	देशकुा काा मावळ

व कर्यात मावळ पैकीं निरनिराळ्या गांवचे सुमारे ३२ मोकदम पाटील इत्यादि हजर आहेत.

[ई] (१) हुजूरच्या खुर्दखताप्रमाणें हा महजर गोतांनीं दिला आहे. (२) शिवाजीराजे यांनीं स पटें. १३ स वतनाचें खुर्दखत भोसल्यास दिलें. (ले. २७५) व १० आक्टो.

त्याच्या पत्रापमाणें हा महजर झाला आहे. (३) हुजुरचें खुर्दखत व गोताचा महजर दोन्ही कागद झाल्याशिवाय वतन सिद्ध होत नसे हें यावरून स्पष्ट होते.

– ९२ –

[अ] **शि. च. सा, खं. ४, ले. ६९२**; महजरनामा मिरासी पत्र.

श. १५९८ अधिक श्रावण व. ५ बुधवार; इ. १६७६ जुलै १९.

फारसी मजकूर; व सिका.

[आ] आंताजी व रायाजी त्रिमाळ सबनीस पा॥ संगमनेर वस्ती मौजे हिंगणगाऊ पा॥ मार यास मोदकम व पाटील व **समस्त दाहीजण लहान थोर मौजे देहुणें पा॥ नीवासे यानी १२५ रुपये** घेऊन सदरहु आंताजी यास मौजे देहुणेचे कुलकर्ण मिरासी करून दिलें आहे. कूलकर्णी नव्हता म्हणून नवीन आणला आहे. त्याचा महजर.

[इ] हाजीर मजालसी पा॥ मौजे धिवरी पा॥ सेवगाऊ **बिहुजूर गोत.**

मोकदम मौजे धिवरी; मोकदम मौजे मोहज बु॥; मोकदम व पाटील मौजे ढोरचांदेगाऊ पा॥ २ मौजे धिवरी; खाटारी सा॥ औरंगाबाद; मोकदम हिंगणगाऊ.

"दा॥ नरहरी गोविंद मुगटराऊ कुलकर्णी मौजे धीवरी वगैरा, याविदमान·····महजरनामा मिरासी पत्र लेहोन दिधले यैसेजे·····महजरनामा सही येकून चालीस रास.

मोकदम २ (नांगर)

गोही

मौजे हिंगणगाऊकर	मायेवत मौजे मजकूर
४	(कोरी जागा)
बलुते मौजे मार; गुरव १ (कोरी जागा)	महार २ निा॥ विळादोर."

– ९३ –

[अ] **शि. च. सा. खं. ७, ले. ५७.**

श. १५९८ भा. शु. १३ आदित्वार; इ. १६७६ सप्टें. १०.

[आ] दस पाटील बिन येल पाटील व याचे पुतणे जानोजी व खंडोजी बिन येस पाटील मालवदकर मोकदम मौजे जेजूरी पा॥ पुणे बिा॥ सूर्याजी बिन आदोजी मालवदकर. मौजे मजकूरच्या मोकदमीचे वडिलपण व नांगर याविषयींचा वाद दस पाटील व त्याचे पुतणे खरे झाले.

[इ] श्री सके·····ते दिसी हाजीर मजालसी मुकाम पेठ नारायणपूर किले पुरंदर

×काजी महमद बिन काजी इभराईम	राघोबलाल सुभेदार माहालानिहाये
×हकीमशारा व काजी कासीम बिन	व मजमूदार सुभे मजकूर

काजी सिलेमान नेब काजी पाा पुणे (फा. सि.)
सरहवालदार व मजमूदार पाा पुणे
(सरहवालदार म. वा. सि.)
हवालदार व कारकून ताा कन्हेपठार पाा पुणे
(अ. म. शि. अ. को.)
हवालदार व कारकून कर्हाती सासवड
(अ. म. शि. कु.)
लस्केरी लोक जमातीदार ४
देशमूख पाा पुणे २; देशकुाा पुणे ३,
देशकुाा पाा सुपे १
चंद्रचूड गुमास्ते देशपांडे साा जुन्नर १
देशमूख देशकुाा काा सासवड २
सेटे व महाजन पेठ नारायणपूर २
—
२२

(सुभेदाराचा म. वा. शि.)
हवालदार व कारकून ताा निरथडी पाा पुणे
हवालदार व कारकून ताा पाटस पाा पुणे
हवालदार व कारकून काा ? पाा पुणे
सरनोबत किले पुरंदर (अ. म. शि.)
भोंवर १४ गांवचे सुमारे १६ मोकदम;
माळी, कोळी, माहार, हजाम, कुंभार
घडसी इत्यादी मिळून सुमारें १२
—
३४

एकूण ५६ मंडळी हजर.

[ई] (१) गोतांच्या गोहीनें वादाचा निर्णय केला आहे.

– ९४ –

[अ] **शि. च. सा. खं. ७, ले. ६०.**

सु. १०७९ जमादिलावल १७; श. १६०१ ज्येष्ठ व. ३ सोमवार; इ. १६७९ जून १६.

[आ] वेट पाटील याचे प्राा चेऊल पैकीं मौजे भंगारे व खारी व कोट व मौजा इत्यादिचे पाटिलकी वतनाचे "कागदपत्र हरपले" परंपरा चालली पाहिजे म्हणून समस्त जमीदार प्राा मारच्या रुजू मोड्यानें हा महजर करून दिला आहे.

[इ] "महजरपणे मुकादमी पातशाई सन.....काजीव जमासुदील व काजी निजामुदील व वाघोराम देशमूख व लक्ष्मण ठाकूर आदिकारी व समस्त जमीदार प्राा चेऊल ऊर्फ मूर्तजाबाद....." महजराच्या अखेरीस एकूण ७ साक्षी आहेत. त्यांत एक मुसलमान आहे. ते बहुतेक सर्वजण पाटील आहेत. महजराचा प्रारंभ वरीलप्रमाणे आहे. मजलस स्वतंत्र दिलेली नाहीं.

[ई] (१) चेऊलच्या भागांतील पाटिलकेचे दिवाण दस्ताचे दृष्टीनें महजर महत्त्वाचा आहे.

-९५-

[अ] म. इ. सा. खं. २०, ले. ५४; यांत दोन महजर आहेत, पैकीं दुसरा महजर. श. १६०२ मार्ग. व. ८ शुक्रवार; इ. १६८० डिसेंबर ३.

[आ] अपाजी बिन मलजी निगडे देशमूख बिा विठोजी बिन गोरखोजी निगडे देशमूख. पा सिरवळच्या देशमुखीचें वडीलपण.

[इ] हाजीर मजालस स्थळ कसबे हरणस ता वेलवंडखोरे.

पुरोहित जोसी ता मार ३	अढळराऊ देशमूख ता मार
देशुक्ा ता वेलवंडखोरे	देशमूख ता गुंजणमावळ २
खोत मौजे म्हलवडी	मोकदम मौजे बाबुर्डी ता पारनेर
कुलकर्णी प्रा पुणे	प्रांत जुन्नर

[ई] (१) "देशमूखानी उभयतांस पुरसीस केली कीं तुम्ही दिवाणांत जावे ऐसे नाहीं. आम्ही व गोत बसोन हे स्थळी तुमची समजावीत करून त्यास रजावंद असिलेस तरी राजिनामे लेहून देणे." उभयतांचा विचार रायगडास थोरले स्वामी यांच्याकडे जावें असा होता; परंतु ता गुंजणामवळच्या देशमूखांनी वरीलप्रमाणें विचार काढला म्हणून पुढें मौजे हरणस येथें गोतांत निवाडा झाला.

-९६-

[अ] शि. च. सा. खं. ५, ले. ७९८.

फसली १०९० मोहरम १५; श. १६०२ माघ व. ३ बुधवार; ई. १६८१ जाने. २६.

प्रारंभास फारसी १० सिके, व फा. मजकूर. महजर लिहिण्याची पद्धत महत्त्वाची आहे. अखेरीस ५ मोहरा आहेत.

[आ] मौजे कोले कानडी पा आंबेजोगाई हा गांव दासोपंत गोसावी का आंबेजोगाई यास इनाम होता. त्याच्या भोगवट्याबिषयींचा महजर.

[इ] महजर हाजीर मज्यालस बीहुजूर,

देशमुख व देशपांडिये राघोजी सिवदेऊ कारकून दो पा मार

देशमूख	×आबदुल्ला देशमूख
देशपांडे	रामाजी बलाल देशपांडे

मोकद्दम व महाजन व कुलकर्णी का मार

महाजन	मुकदम २
प्रल्हादजी व्येकोजी कोनेरू	मोहर.
निशान तराजु	कुलकर्णी १

[ई] (१) "फकीर मजकुरे तमाम सनदा नेऊन पातशाहाजीचे खिदमतीस जाहीर केल्या त्यावरून पातशहा मेहरबान होऊन गांव इनाम देऊन फर्मान करून दिधला आहे तो फर्मान मदारूलमहामी अमानतखानजी दिवाण त्यास दाखऊन तेही नजरेस पाहून बरहुकूम फर्मान आपला परवाना करून दिधला त्यावरून गोसावी मजकूर मौजे कोलेकानडी पा॥ माार बा॥ **निजामशाहा तागाईत पातशाही अलमगीरे देह इनाम काबिज मुतसरफ आहेत तेरीख १५ माहे मोहरम**".

—९७—

[अ] **संकीर्ण.**

श. १६०३ ज्येष्ठ; इ. १६८१ जून, जुलै.

[आ] माणकोजी बिन नांवपाटील चिंचवडे मोकदम मौजे चिंचवड प्रा॥ पुणें विा॥ केरोजी पाटील.

मौजे चिंचवडच्या मोकदमीचा वाद. माणकोजी खरा ठरला

[इ] श्रीसके·····**गोत** जमा पांढरी मौजे चिंचवड ता॥ हवेली प्रा॥ पुणें····· हाजीर मजालसी वि तपसील.

अजहत सितोळे देशमूख प्रा॥ पुणें २	देशपांडे प्रा॥ पुणे
मोकदम हडपसर	जोसी कुलकर्णी मौजे भोरीभ्याल ता॥ पाटस
,, पिंपरी ता॥ हवेली	मौजे ताथवडे, आकूर्डी,
,, पिंपले ,,	जांबे या गांवचे मोकदम.
,, थोरगांब ,,	

[ई] (१) देशमूख व देशुक्ा॥ पा॥ पुणे यांस नीलकंठ मोरेश्वर प्रधान व रामचंद्र नीलकंठ सचीव यांचें सदरहु वादा बा॥ आज्ञापत्र सादर झालें कीं गोताच्या साह्यानें निवाडा करणें. तदनुरूप गोतांनीं हा निर्णय केला आहे. (२) गावीचे चौगुले व थळकरी व वाराबलुते यांची गोही घेतली आहे. व तीवरून गोतांनीं निर्णय केला. साक्षीदारांचीं वर्ये दिलेली आहेत. (३) तत्कालीन कार्यपद्धतीच्या दृष्टीनें महजर महत्त्वाचा आहे.

—९८—

[अ] **म. इ. सा. खं. लेखांक १०½**; क्रयपत्राचा महजर.

सु. १०८३; श. १६०४; इ. १६८२.

पहिल्या ओळी गहाळ.

[आ] संताजी बिन भिवजी चव्हाण यानें महादजी बिन सुलतानजी जगदाळे यास दुष्काळच्या आपत्तीमुळें आपली मौजे कोणेगाऊची पाटिलकी तकसीम अन्न मिळेना म्हणून २० होनांस विकली, त्याचा महजर.

[इ] राजमुद्रा देशक व गोत.

भोंवर गांवपैकी पांचसहा गांवच्या मोकदम कुलकर्ण्यांचीं नावें आहेत.

[ई] (१) "यांचें क्रयपत्रक देसक व आपले बापभावांचे साक्षीनें करून दिल्हे असे व ठाणा राजमुद्रा व देशक व गोत यांचा महजर करून द्यावयाची शर्त आहे म्हणोन साहेब व सदर व देसक पाा मार व गोत या पाशीं आलो (पृ. ३८)" असें संताजी म्हणतो. यावरून अशा प्रकारच्या महजराचें स्वरूप लक्षांत येईल. या महजराबद्दल जगदाळे यास पुढील खर्च पडला–' सरसुभेदार यास हरकी बाा होन १००;' देशमूख व सरदेशमूख होनु ५०'; 'देशकुलकर्णी होन २५'; "याखेरीज गांवकरी यास व परगणियाच्या पाटिलास तश्रिफा दिल्या होन सेंभर येणें प्रमाणें महजर जहाला (चव्हाणाकडून राहिलेला एक चावरहि ३० होनास घेतला), 'याखेरीज त्याचा पोट खर्च जहाला असे एणेप्रमाणें महाजर जाहाला सही."

–९९–

[अ] **कारी व आंबवडे जेधे देशमूख**, ले. २२.

श. १६०४ श्रा शु. १० शुक्रवार; इ. १६८२ ऑगस्ट २.

नकल मोडी.

[आ] सूर्याजी व कृष्णाजी मांडरें मौजे आबेपुरी विा दुरगोजी व इतर मांडरे वन्होलीकर. मौजे आमेपुरी संमत् मुन्हे प्रा माार या गांवच्या पाटिलकीच्या तकसिमीविषयीं व बापभाऊकीबद्दलचा वाद. दुरगोजी खरा ठरला.

[इ] हाजीर मजालसी **राजमुद्रा गोत** प्रा वाई.

हलीकमावीस सुभा ताा जाऊली.

राजमुद्रा (६):—नेताजी राजे पालकर (सिका)

मजमदार, हवालदार ताा जोर व जांबुळखोरे, कासी रंगनाथ सुभेदार, फडणीस सुभा माार, मजमदार ताा जोर व जांबुलखोरे.

देसाई व देशकुा पा माार (२):—देसाई १ (सिका); देशकुा १-

मोकदमानी गावगना (२४):—मोकदम व पाटील १४, कुलकर्णी ६, सेटिये ४. एकूण ३२ सभासद.

[ई] (१) "निवाडियाबद्दल देशमुखाच्या घरास आले. देशमुखांनीं गोत बसवून हरदोजणाचा आहाबाल तमाम मनास आणून·····पुसिले कीं गोत करतील त्यास राजी असाल तरी श्री कृष्णेची आंघोळ करून येऊन **'इमान'** देणे कीं गोत करतील तेणेप्रमाणे वर्तावे." (२) "सेरणीबदल नाणे होन २५ जमा सुभा जाऊली ते सदरहू तीन ठायीं वाटून घ्यावे.', (३) पाा वाईचा मोकदम मुसलमान आहे.

-१००-

[अ] शि. च. सा. खं. ९, ले. ६६.

सु. १०८६; श. १६०७-०८; इ. १६८५-८६.

महजरनामा नकल १.

[आ] सूर्याजी विसाजी प्रभु वस्ती तपे अस्टमी विा जिवाजी प्रभु व निलाजी प्रभु व गोजोबा प्रभू. तपे अस्टमी येथील वाडीविषयीं वाद. सूर्याजी प्रभूनें वाडी खरेदी केली होती हें खरें ठरलें.

[इ] महजरनामा हाजिर मजालिस बी हुजुर.

राजश्री बजाजी महाले दिमत म्यानबंक हुजरी लोक
अंताजी सिवराव कवस **राजमंडळ**
प्रा येसाजीराव दरेकर सुभेदार हाशमपावलोक
मा बहिरजी पवार सुभेदार हशमपावलोक
दताजी विठल प्रभू सितावराव पनवेलकर
कारकून इमारती खांदेरी व कुलाबा व सरसगड:-
मजमदार १ हवालदार तट २
देसाई मामले चेऊल १ अधिकारी १
देशमूख तपे अस्टमी:-
देसाई १ अधिकारी १
नाईक व सेकीन २ वस्ती आगर चेऊल
बकाल:-
चौधरी १ बकाल २
—
१८

एकूण सुमारे ४४.

सुभा महाल निहाये मामले चेऊल:-
सुभेदार चेऊल मजमदार चेऊल
प्रभु हवालदार चेऊल
सुभेदार हाशमपावलोक २
मजमदार जंजिरे राजकोट
देसाई व देशकुा मामले चेऊल व अधिकारी तपे शिराड व अस्टागर.
याशिवाय ८ व्यक्ती इतर.
—
१६

[ई] (१) राजश्री पंत न्यायाधीश रायगड यांच्याकडे तक्रार सादर केल्याचा उल्लेख या महजरांत प्रथम पहावयास मिळतो. पुढें राजीक सुरू झाल्यानें मामले चेऊल येथें सुभेदारानें मनसुफीकरितां नेमलेल्या बजाजी महाले यासमोर निर्णय झाला आहे. (२) सुभेदाराकडे मनसुभी सांगितली त्यांनीं बजाबा माहाले दिा म्यानबंक हुजरी लोक यास फडशा करावयास सांगितला त्यांनीं हाजीर मजालिसी बैसऊन मनसुबी आरंभिली. (३) 'राज-मंडळाचा' उल्लेख लक्ष्य आहे.

-१०१-

[अ] शि. च. सा. खं. ५, ले. ८००.

श. १६०८; इ. १६८६.

श्री. आसल बमोजीब नकल.

[आ] देवराव लोमटे व रविराव मुकादम कसबे आंबे जोगाई यामध्यें भावकीचा कजिया लागला. महजर अपूर्ण आहे. तारखेची निश्चिती नाहीं.

[इ] "बमोहर सिकंदर बातशाह ताा सुमे दारुलज्याफर विजापूर दरबार गौदरगा महजर हजर मजालीस बनाम खुदा दावदीयान व कारकुनान व कानगोयान व देशमुखान व देशपांडियान व पाटलान व पटवारियान बाा देवराव लोमटे....." याप्रमाणें प्रारंभ आहे. मजलस नाहीं.

-१०२-

[अ] म. इ. सा. खं. १८, ले. ३१.

फसली १०९७ रविलाखर ५; श. १६०९ माघ शु. ७ रविवार; इ. १६८८; जाने. २९.

प्रथम मजकूर व नंतर भोंवरगांवच्या १८ मोकदमांच्या सह्या; कागदाच्या उजव्या बाजूस ९ व डाव्या बाजूस ९. कागदाचा कांहीं भाग फाटला असल्यानें मोकदमीचा गांब कोणता हें समजत नाहीं.

[आ] गवरोजी बिन बाबजी लोहकरा विरुद्ध बनाम बकाजी फर्जंद. गवरोजी यास दिवाण दक्षण यांनीं मोकदमी चा महजर करून दिला आहे. राजीकाचा फायदा घेऊन व काजीनें मोकदमी बळकाविली होती.

[इ] महजरनामा.....बहजूर शर .....देशमूख व देशपांडिये ताा.....पुणा हालीमवाली मुाा तुलापूर लस्कर.

[ई] (१) औरंगजेब बादशहा याच्या लष्करांतून हा महजर दिवाण दक्षण यानें दिला आहे.

-१०३-

[अ] शि. च. सा. खं. ५, ले. ९५८; येजीतपत्राचा महजरनामा.

सु. १०८९ मोहरम १२; श. १६१० कार्तिक शु. १२।१३ भृगुवासरे; इ. १६८८ आक्टों. २६.

प्रारंभी फारसी शिका आहे. लेखनपद्धतीच्या दृष्टीनें हा महजर फारच महत्त्वाचा आहे.

[आ] गंगाजी शंकर व गिरमाजी झुंगो देशकुलकर्णी यास समस्त थिटे पा वाई यानी लिहून दिले येजितपत्र जे, परगणे वाईचे देशकुलकर्ण व गांव कुलकर्ण कसबा देखील खुम व बावधण व संमत मुन्हे व वाजे कुलकर्ण यासी आपला संबध नाहीं वतन तुमचे खरें असें.

[इ] **महजरनामा.....हाजीर मजालसी पा वाई.**

हाकीम ६:--Xनाहारखान गोरी फौजदार पा मार माहाये
हरकारा पा मार; शेरीफ गुमास्ते; Xजान महंमद गोरी शेखदार; कारकून
(फा. सि.) (फा. सि.)
Xबुऱ्हान खान गोरी वहालदार मा सेरी कसबा व विलाती पा मार
एकूण ३ हिंदू व ३ मुसलमान आहेत.

देशमूखानी पा मार व मानिहाये ३८:--वाई–पिसाळ १ (मु.); हिरडस-मावळ–बांदल २ (मु.); कुडाळ–शिंदे २ (मु.); मेढे–चिमकणे व भणगे ४ (मु. २); शिरवळ–'यशवंतराऊ' निगडे २ (मु.); उत्रोली-खोपडे ३ (मु.२ ; रोहिडखोरे–जेधे १ (मु.); रायगड–गायकवाड५ (मु); सातारा–घोरपडे व गाढवे ५ (मु.२); वंदन अंगापूरकर ३; फलटण–निंबाळकर ५ (मु.) यांच्या वतीनें यांच्या दोन गुमास्त्यांच्या सह्या आहेत; परेली–गुजर ५ (मु.) सहा '**हाकीम**' व वाईचे देशमूख यांची नोंद एकाच हस्ताक्षरांत आहे. बाकीच्या देशमुखांची नोंद वेगवेगळ्या १४ हस्ताक्षरांत आहे. बहुधा देशमुखांचीं नांवें देशपांडे लिहितात. देशमुखाच्या खालीं अथवा समोर कागदाच्या डाव्या बाजूस देशपांड्याचे नांव येतें. या कागदांत कांहीं देशमुखांनीं आपणास देसाई संबोधलें आहे व तसेंच देश-पांड्यांनीं देशकुलकर्णी असें लावलें आहे. कर्नाटकांत व कोंकणांत देसाई देशकुा ही जोडी प्रामुख्यानें दिसून येते. बहुधा प्रत्येक देशमुखाच्या मुद्रेचें, स्वतंत्र वैशिष्ट्य दिसून येतें. शिरवळच्या देशमुखांच्या मुद्रेंत नांगर दाखविला आहे. जेथें दोन मुद्रा आहेत त्या तरफेस दोन देशमूख आहेत असें समजावें. देशमुखांचीं उपनांवें दिलीत. तशीं देशकुलकर्ण्यांचीं दिलीं नाहींत. परळीतर्फच्या देशकुाचे नांवापुढें मात्र 'घारराऊ' असा उल्लेख आहे व तसेच नेहमी-प्रमाणें तो उल्लेख देशमुखाच्या डाव्या बाजूस नसून उजव्या बाजूस आला आहे. वाईच्या देशकुलकर्ण्यांचा उल्लेख नाहीं. कारण ते कजियांतील वादी आहेत आणि वादी प्रतिवादी यांचा उल्लेख मजलसींत कधींहि येत नाहीं.

मोकदमानी व सेटिये महाजन पा मार ६४:—एकूण २३ गांवचे मोकदम कुलकर्णी हजर आहेत. त्यांत संमत मुन्हेपैकीं ३ गांव व संमत निंबपैकीं एक आहे, बाकी सर्व गांवें समत हवेली पा वाईपैकीं आहेत; तीं पुढीलप्रों:–का, वाई, का बावधन, सेंदुरजने, भोरवळ, परवंदी, लोहारे, चांदक, गुलंब, वेलू; कॅंजळ, सिदनाथवाडी, कविटे, सोनगीरवाडी, धावडी मुन्हे, पसर्णी, येसकर व कुसगांव सा मुन्हे, मांढरदेऊ, पांडिये, सुरूर, बोपगाऊ, निंब, गोवें सा निंब. याच सदरांत का बावधनच्या खालीं 'दफाते' करून दोन सेटे व एका चौगुल्याचा

उल्लेख आहे. तसेंच 'पांडिये' गांवाखालींहि एका चौगुल्याचा उल्लेख आहे. बाकी सर्व मोकदम व कुलकर्णी आहेत. देशमुख देशपांड्याच्या जोडीप्रमाणेंच हीं मोकदम पाटील, कुलकर्णी यांचीं नावें लिहिल्याचें दिसतें. मोकदमाचें चिन्ह नांगर आहे. वाईचे पाटील मुसलमान आहेत; त्यांच्या नांवापुढें नांगर नाहीं व मुद्राहि नाहीं. हें महत्त्वाचें आहे. मौजे लोहारेचे निमे मोकदम हजीर नाहींत त्यांचा तसा उल्लेख आहे. कित्येक गांवीं दोन पाटील आहेत. तसेंच दोन गांवचें कुलकर्णहि एकाच घराण्याकडे असल्याचें दिसून येतें. मौजे गुलंब व वेलू पहा. उभय गांवाच्या पाटिलाच्या नांवाखालीं त्यानें आपलें बिकलम केलें आहे. एकदोन ठिकाणीं कुलकर्ण्यांच्या जागीं त्यांच्या मुतालिकांची नोंद आहे. कांहीं ठिकाणीं कुलकर्ण्यांच्या नांवापुढें "बिा ॐ" असें लिहिलें आहें.

यानंतर पुढें बरीच मोकळी जागा आहे व १७ गृहस्थांचीं नांवें आहेत त्यांत कांहीं सराफ आहेत. त्यापुढें **'वैदिक अद्यारी'** या सदरांत एकूण ५६ ब्राह्मणांचीं व ४ गुरवांचीं नांवें आहेत. याप्रमाणें सुमारें १८५ मंडळी हजर आहेत.

[ई] (१) लेखनपद्धतीच्या दृष्टीनेंहि हा महजर महत्त्वाचा आहे. यांत एकंदर ९७ हस्ताक्षरें आलीं आहेत. एकूण ६२ ब्राह्मण 'ब्राह्मण मंडळी'त आहेत. त्यांत ६० हस्ताक्षरें आहेत. म्हणजे दोघांनीं; धर्माधिकारी व रामभट थिटे यांचीं नांवें लिहिली आहेत. यजितखत लिहिणारा १; हाकिम व वाईचे देशमूख (=७) हस्ताक्षर १, इतर देशमूख वगैरे (=३७) यात हस्ताक्षरें १४; एकूण पाटिल कुलकर्णी मिळून ६४ त्यांत हस्ताक्षरें २०; ४ गुरवांचें हस्ताक्षर १; =९७ हस्ताक्षरें व हजर व्यक्ती एकूण १८५. मजलसीचे अखेरीस थिटे मंडळींतील दोघांनीं "मुक्काम मौजे चांदक, लेखन मौजे माभलेश्वर" असें सहीच्या पुढें लिहिले आहे. यावरून मजहर करते वेळीं हजर असलेल्या परंतु मजहर लेखनसमयीं दूर गांवीं गेलेल्यांच्या सह्या मागून आणीत असें दिसतें. महजराचा कच्चा खर्डा सभेचे वेळीं करीत असतील असें वाटतें. (२) "दिवाणचा गुन्हेगार व ब्रह्मसभेचा अन्याई" हें अवतरण ब्रह्मसभेच्या दृष्टीनें विचाराई आहे.

१०४

[अ] **शि. च. सा. सं. ३ ले. ४०३.**

फसली १०९८ रविलावल ९; श. १६१७ पौष शु. ११, रविवार; इ. १६८८ डिसें. २३.

नकल.

शि. च. सा. खं. १, ले. ९१ मध्येंहि हा महजर असाच छापला आहे. तो असल आहे. प्रथम पांच फारसी शिके व २० ओळी फार्सी मजकूर आहे. नंतर "दा देसपाडिये पा मार," "दा नाहरखान देशमूख पा मार," (फा. शि. अक्षरें नाहरखान गोरी. नांगराचें चित्र; १०९८.....) माहादजी जानदेऊ **हारकारें नामजाद हुजूर ठाणें वाई,**

हीं तिन्ही नांवें फारसी मजकुराच्या उजव्या अंगास आडवीं लिहिलीं आहेत. वरील नकलेंत हीं नांवें महजरच्या अखेरीस दिलीं आहेत.

(आ) मनाजी शंकर नीलकंठ राऊ याचा इनाम व अंबराई गांवगना परगणे खालीं होती. त्याविषयीं हा महजर राजीकानंतर नाहरखान गोरी यानें नफर मजकूर त्याच्याकडे आला तेव्हां त्यास दिला आहे. राजीकांत पूर्वील कागदपत्रें लुटलीं म्हणून हा महजर दिला आहे.

[इ] महजरनामा बी हुजूर हाजर मजालसी प्रांत वाई.

" विलायती सुभे दारुजफर महजरनामा केला जे·····सदरहू इनाम व आंबराई आहे. कारकीर्द निज्यामन मुलूख····· सिवाजी भोसले·····यांच्या सनदा होत्या तेणें प्रो ····· खात होता···ऐसियास नफर माार गनिमाकडे होता त्यावेली·····नाहारखान गोरी ईही कौल देऊन आणिला तो सिरवलास आला·····वाटेस येतांजास्वलीचे घाटी गनिमानें कुल· बिसाती लुटुन नेली नफर (माार) जाहीर केलें कीं त्या बिसातीमधें सनदा होत्या त्या गनिमानें लुटून नेल्या यैसियास याचे भोगवटीयाचें गोही " गांवगना मोकदम व बाजे लोक या नजीक मनास आणिता गोही दिल्ही ती बी ता।"—तर्फ नीर थडीपैकीं गांव हरगूडे, परींचे, किकवी, चांबली ता। कन्हे पठार; या चार गांवचे ७ मोकदमानी , " आपणांस दाखल असें सदरहू सनदाही माार मनाजीला होत्या हें आपल्या वडिलांचे जबानी ऐकले होते म्हणऊन सदरहू पाटील व कुलकर्णो याही गोही दिल्ही हा मजर सही " अखेरीस नाहर खान गोरी देशमूख प्रा। माार ठाणें वाई व देशपांडे हरकारे यांचीं ३ नांवें आहेत.

—१०५—

[अ] **श्री सांप्रदायाचीं पत्रें विभाग २, ले. ४२३**; महजरनामा.
श. १६१० माघ शु. ५ बुधवार इ. १६८९ जाने. १६.

[आ] मौजे सेवरे पा। माार टेंभूर्णी गांवची कीर्दी अबादानी व्हावी म्हणून परगणे टेंभूर्णी सुभा परांडा येथील देशमूख व देशपांडे यांनीं मौजे नालगाऊ पा। हवेली येथील सुभानजी कलारे यास हा महजर दिला आहे. पूर्वीचा मोकदम मिरीसादार परांगदा जाहला होता, तरी त्याची अर्धी मिरासी राखून अर्धी कलारे यास दिली आहे.

[इ]

कागदाच्या प्रारंभास
उजव्या बाजूस
गोही
देशमूख मामले परांडे
(नि. ना.) दोन देशमुखांची नांवें.

कागदाच्या प्रारंभास
डाव्या बाजूस
ठेखदार (फा. सि.) अमीन (फा. सि.),
अमीन (फा. सि.) दिवाण (फा. सि.)

नंतर महजरांतील मजकूर व अखेरीस सीका व गोही आहे.

त्यांत एक देशमूख देशपांडे यांची जोडी व भोंवर ६ गांवचे ६ मोकदम आहेत.

[ई] (१) देशमूख व देशपांडे पाा टेंभूर्णी या उभयतांनीं हा महजर वतन आबादानी करतां पूर्वील मिरासदाराचे हक राखून दिला आहे. (२) देशमूख व देशपांडे उभयतांची मालकी परगण्यांतील बुडीत मोकदमीवर चालते काय तें न कळे.

१०६

[अ] **सनदापत्रें प्रकरण ४ थें, लें. २६** महजरनामा.

जुलूस ३२, रजब १५; फसली १०९८ रजब १५ (?); श. १६११ वैशा. व. २ शुक्रवार; इ. १६८९ एप्रि. २६.

[आ] मौजे लव्हाले तर्फ कर्यांती मावळ परगणे मार हा गांव नरसिंगराऊ व गोविंदराऊ सितोळे देशमूख यास कदीम इनाम असल्याविषयीं हा महजर दिला आहे.

[इ] "महजरनामा आज करार.....३२ जुलूस.....बहुजूर शरा शरीफ परमहकमे कसबे पुणे.....सुमे खुजस्तेबुनियाद सबब आंकी.....या प्रमाणें आरंभ.

[ई] (१) सदरहू गांव हजूरच्या शिरस्तीयांमध्यें दसरी कांहीं काळ लागत नव्हता त्याचे कारण या महजराद्वारा देण्यांत आलें असून शरा शरीफनें महजर दिला आहे. (२) मजलस नाहीं.

१०७

[अ] **पेशवा दप्तर विभाग ३१ नं. १८५**; सुरत महजर.

जुलूस ३३ जिल्हेज २५; श. १६११ अश्विन व. १२ सोमवार; इ. १६८९ सप्टें. ३०.

आरंभीं तीन बंद मजकूर फारसी. नं. ४७ मध्येंहि हा महजर असाच छापला आहे परंतु तेथें शिवाजीचें निर्णयपत्र गाळलें आहे. त्या महजराचा प्रारंभः—

फारसी मजकूर; फारसी सहा शिके

—पायगुडे देशमूख काा मावल

—करंजवणे देशमूख काा मावल

—देशपांडे पाा खेडेबारे

—देशमूख पाा खेडेबारे (फा. शि.)

पुढें तीन बंद फारसी मजकूर व नंतर नं. १८६ प्रमाणें महजराचा प्रारंभ (जोडावर करंजवणे व पायगुडे देशमुखाचे शिके)

[आ] मोरो विठ्ठल व बाबाजीराम होनप देशपांडे पाा पुणे बिाा आपाजी बिन

नामाजी लांडे (गुमास्ते). ताा कर्यात मावळच्या देशकुलकर्णाचा वाद. होनप मजकूर खरे झाले.

[इ] मराठी तर्जुम्यांत मजलीस दिलेली नाहीं.

"सुरत मजलसी अजकरार व तारीख·····मुकाम लस्कर जफर असर मौजे तुलापूर दरकिनारे लबी आब भिवरा वाके अस्त बहुजूर शरयेत·····काजी महमद पाा पुर्णे व जमीनदार व रया आ व पटवारीयानीं ताा कर्याती मावळ मुतालीके पाा माार इ जाहीर साख्त की देसपांडेगिरी·····"याप्रमाणें आरंभ आहे. अखेरीस "सुरत मजलसी व महजर सही" असें आहे.

[ई] (१)"आपाजी हाजीर होता त्यास कर्याती मावलचे देशमूख व मोकदम व पटवारी म्हणो लागले की येसर जमिनेत पातशाहा ये जिल्हे येऊन मुक्काम जाला दक्षण प्रांतीचे जमीदार जमा जाले आहेत. गरीब व बख्तावर बरोबरी आहेत·····कोण्हावरी मुलुक जाजती होत नाहीं होनपासी वाद सांगोन·····खाणे" (२) शाहादीनाम्यानुरूप दरबारांतून हा देशपांडेपणाचा महजर करून दिला आहे. (३) याच महजरांत, शिवाजी-राजे यांचे पुढें सदरहू वादाचा निर्णय झाला त्याचेंही पत्र आले आहे. तें अनेक दृष्टीनें महत्त्वाचें आहे.

-१०८-

[अ] **शि. च. सा. ख. ५, ले. ८२४ (२)**; सुरत महजर.

फसली १०९९ रबिलोवल ५; श. १६११ पौष शु. ६ रविवार. इ. १६८९ डिसें. ८.

महजरच्या प्रारंभीं वा. फा. शि. व मजकूर आहे.

आरंभ—' सुरत महजर अज करार '

[आ] मुरारी खंडेराऊ जुनारदार सेकिन मौजे जेजुरी ताा कन्हेपठार यास मौजे माार येथें एक चावर जमीन इनाम होती. गाजदीखान यानें गनिमावर मौजे मजकुरास हाला केला असता माार निलेच्या सनदा कागदपत्रें भोगवट्याची गहाळ झालीं म्हणून काजी व देशमूख देशपांडे व हालीमवाली पाा पुर्णे यांनीं हा महजर दिला आहे.

[इ] महजराचा शेवट—' ये गोष्टीस कोणी शाहिदी असतील ते अपलिया मोहरा व दसकते करतील हा सुरत महजर बयान वाके असे '

शितोळे देशमूख पाा पुणे २. देशपांडे पाा पुर्णे २

दोन सिके मराठी.

[ई] महजराची भाषा पूर्णपणें फार्सी आहे.

–१०९–

[अ] **पुणें नगर संशोधन खं. २ रा, ले. ९४**

फसली ११०२ सवाल १४; श. १६१४ आषाढ व. २; इ. १६९२ जून २०. श्री. महजर अपूर्ण आहे.

[आ] मात काली दरवडा आणि कान माली यामध्यें काा पुणें येथील कांहीं मिरासी हक्काविषयीं वाद लागला.

[इ] " महजर अजकरार व तारीख.....

.....विहुजूर.....मःमद काजी काा पुणे.....सैद महमद जाफर नायेब खान वालाशान ज्याहाबाज खान फौजदार पाा पुणे व हुकुमतपन्हा हदुखान नायब सेख अहमद करवडी.....बालाजी बाजी जागीदार व मालोजी नरसिंगराऊ व गोविंदराऊ सितोळे देशमूख व होनप देशाडिये पाामा व हाली मवाली काामा या हुजूर"

[ई] (१) फार्सी मिश्रित भाषा.

–११०–

[अ] **आठल्ये घराण्याचा इतिहास, प्रथम खंड, पृ. २२, ले. ९.**

सु. १०९३ मोहरम ६; श. १६१४ भाद्रपद शु. ८ गुरुवार; इ. १६९२ सप्टंबर ८. श्री; ईभराईम अदलशाह; हे येकून पांच बंदरास.

[आ] पांडुरंगभट बिन त्रिमलभट व इतर आठल्ये बंधु उपाध्ये काा देवळे ताा माा. कसबेचें व तर्फ मजकूरचें उपाध्येपण इनामती शेत व गावगन्नालारी १४० याविषयींचा महजर आहे. पूर्वील कागदपत्रें भालेरावींत जळालीं म्हणून माहालाहून हा महजर करून दिला आहे.

[इ] महाजर.....मुकाम कसबा देवले तर्फ मजकूर.

मुजाफती किले विशालगड बेहुजूर हाजीर मजालसीयानीं हदी आसामी.

रायाजी मुरार हवालदार ताा माा (म.शि.) सरदेसाई किले विशालगड १
व तपे मजकूर (फा. सि.)
सरदेसाई किले विशालगड ताा माा १

—
७

बीा सरदेशकुाा १ पोतदार किले खिलणे १
कुलकर्णी तपे माार १ खांडेकर सरखोत १

याशिवाय मौजे भडकंबे, भौडे व देवडे या गांवचे ३ सेट आहेत. किले विशाळगडचा नाईकवाडी १, व तपे मजकूरचा ज्योतिषी १ व पुढील १८ भोंवरगांवपैकीं १८

व्यक्ती हजर आहेत; तिवरकर (तिवऱ्याचे ?); कोंडगाऊ, घाटिवले, मुर्सी, हंसोले, कोदले व वडगाऊ; चोरवण, दाभोळे, साकरपें, कुरचंब, पुरीये, दरवीण; तळवडे, वाडीकोलो, मेघी, सालपे, कनकाडकर (कनकवलीचे ?). याप्रमाणें **एकूण ३० मंडळी हजर आहेत.** एकूण ३० व्यक्तींपैकीं १६ जणांनीं आपल्या सह्या मोडींत केल्या आहेत. ७ ही कारकून मंडळीच्या सह्या मोडींत आहेत. बाकीच्या १४ सह्या बालबोधींत आहेत.

[ई] "आबाजी पाटोळे याची स्वारी आली.....घरास आग लाविली तेव्हा ते घर जळाले त्यामध्यें पुस्तकांचे पेटारे व वृत्तीपत्रे होती ते जळाली यैसे यास पुढें वृत्तीसी आधार पाहिजे त्यासी तुम्हास आमची आवधी वृत्तीपत्रें होती ते ठावकी होती व पूर्वापार चालत आले आहे तेहि ठावके होते त्याप्रमाणें आम्हास येक माहाजर करून दिधला पाहिजे....."

—१११—

[अ] **ऐ. सं. सा. खं. ६, ले. ९**; महजरनामा.

सु. १०९४ साबान २६; श. १६१६ चैत्र व. १३ गुरुवार; इ. १६९४ एप्रील १२

हू. बाबा शाहा बदरीदन निज्यामशाहा, अदि (ल) शहा सिवाजी.

[आ] दरगाह पीर मौजे साकसे ताा पेण याच्या मुजावरास हा महजर दिला आहे. शंकराजी नारायण सचीव यांनीं पेणवर स्वारी केली असता सदरहू मुजावराचें घर लुटलें गेलें व त्यांत पीराविषयींचीं कागदपत्रेंहि लुटलीं गेलीं म्हणून हा महजर दिला आहे.

[इ] हाजीर मजालसी मुकाम राजमाची.

दामाजी नारायण हसहजारी लस्कर	महादाजी बाबाजी सभासद
(लंब व. दोन ओळी आडवी मु.)	रंगोराम सभासद दिाा सभुमा बहिरोत्रिमल
केशो बाजी सभासद	अधिकारी ताा संदीव ताा तुगरातन
(पांच ओळींची उभट व. मु.)	
×देठखान व ×दाऊदखान बुवेर अधिकारी	
(मुद्रा)	
अधिकारी ताा नसरापूर	बावा सैदअली, बावा फैतअली, बावा इसुफ-
(मु.)	अली, बाबा खिजमतअली, बावा इस्माईल-
	अली, बावा अबदुलअली

एकूण १४ व्यक्ती हजर, त्यांत ८ मुसलमान आहेत.

[ई] 'सभासदांचे' उल्लेख लक्ष्य आहेत

-११२-

[अ] **म. इ. सा. खं. १५, ले. ३३.**

श. १६१६ श्रावण शु. ९ शुक्रवार; इ. १६९४ जुलै २०.

[आ] महादाजी बिन सुलतानजी जगदाळे विा यादव. मसूरपरगण्यापैकीं ५७ गांवचें देशमुखी वतन जगदाळे यांचें. त्यापैकीं २० गांवांचे वतनाविषयीं वाद.

[इ] थळ मौजे किवळ ताा मसूर हाजीर मजालसी बेहुजूर गो.

मौजे किवळचे गोत १९:—पटेल ३, कुलकर्णी २, चौगुला १, जोतिषी १, रया २, सुतार (तासणी) १, महार (बिळादोर) २, गुरव (धुपारीती) १, परीट (बगणी) १, चांभार (रापी) १, इतर ३, कुलकर्णी निा रुद्राजी चंदो १.

[इ] "जगदाळे देसमूख.....याची देशमुखी.....बुनादी होती ऐसे आपणास ठावके आहे व आपले वडिलांनीं सांगितले आहे.....यादवानी जगदाळी यासी कथळा करावया गरज नाहीं..." (२) जबानीसारखा महजर आहे.

-११३-

[अ] **बावडा दप्तर विभाग १ ला, अनुक्रमांक ३५.**

सु. १०९४ जमादिलावल २१; श. १६१६ माघ शु. ४ मंगळवार; इ. १६९५ जाने. ८.

[आ] रामचंद्र नीलकंठ भारद्वाज गोत्री उपनांव भिवडीकर यास तर्फ आजीरें पैकीं ९७ गांवचें कुलकर्ण वतन पूर्वील मिरासदार निपुत्रिक झाल्यानें उघडें पडलें होतें तें राजपत्र सनद करून दिलें त्याचा हा गोताचा महजर आहे.

[इ] माहाजर...बीहुजूर हजीर मजालिस थान घर जागा काा जाबोटी ताा खानापूर.

राजमुद्रा ५:—सुभा महालानिहाय प्राा कोल्हापुर (सिका) १, सुभेदार प्राा अजिरे (शि.) १, सुभेदार महाला हाये प्रांत तारळे (शि.) १, सुभेदार प्राा कोल्हापूर (शि.) १, सुभेदार प्राा बेलगाऊ (शि.) १.

सभा नाईक हजीर मजालीस बीाा—देशमूख.

अजहती देशमूख पाा हुकेरी (सि. म.) १

परगणे हुकेरी ८:—देसाई देशकुलकर्णी व भोंवर ६ गांवचे पटेल; **ताा रुद्रगड ७:**—देसाई ४, देशकुाा १, माहाजन १, सरनाडगौडा १; **काा नूली ३:**—सेटी देसाई १, चौंडो; वेंकटाद्री देशकुाा १, नाडगौडा १, कानडी नांवें; **काा कापसी २:**-देसाई व देशकुाा; **किले रांगणे ताा खानापूर १२:**—सरदेसाई २, देसाई ४, पटेल ५, व देशकुाा १; **देशक पाा वाई ६:**—देसाई देशकुाा व कुलकर्णी ४ यांत 'परशराम त्र्यंबकांचा' उल्लेख आहे; **परगणे कागल २:**—**देसाई देशकुाा; तपे आजिरे ६६:**—सरदेसाई १, सरमोकदम देसाई १

देसाई ३, त्यांतील एक 'हजीर नव्हता' असें लिहा आहे; नाडगौडा १, देशचौगुला १, नाकुल्या १ यानंतर तपे आजिरेपैकीं ३२ गांवच्या ३२ पटेलांचीं नावें आहेत. 'मोकदम' असे संबोधिलेलें नाहीं. कुलकर्णी ३, जोसी ४, सेटे महाजन ४, सरनायकवाडी १, नायकडी ४, नाईक २, मठपति १, राजे मलिक मूक १, तेली १, कुंभार १, गुरव १, गावकर (महार?) ३.

बहुतेक सर्वत्र देसाई, सरदेसाई यांच्या नांवापुढें सिके आहेत.

एकूण सुमारें ११२ मंडळी आहेत.

[ई] (१) सदरहू देह ९७ चें कुलकर्ण पूर्वी सिधाचें होते. त्यानें तें विठ सेणवी यास दिलें. पुढें त्याचें नकल झालें. महजरांत 'निपुत्रिकाचें मिरास ते दिवाणीचें' असें म्हटलें आहे. (२) महजराच्या अखेरीस 'शके १६१५ श्रीमुखनामसवछरे' असा उल्लेख आहे. मुसलमानी तारीख वर दिलीच आहे. दोन्ही तारखा वेगळाल्या आहेत.

-११४-

[अ] **म. इ. सा. खं. २०, ले. २१६.**

सन हजार ११०६ मोहरम १६; श. १६१८ श्रावण व. ३ बुध.; इ. १६९६ ऑगस्ट ५.

श्री विठल प्रसन.

[आ] बाळकृष्ण भट विा कोवेरीबाई भाऊपणाचा वाद.

[इ] माहाजर·····क्षेत्र पंढरपूर पा कासेगाऊ विा हाजीर मजालसी विा

राघोजी गोपिनाथ सेखदार व शंकराजी जाखदेऊ कारकून क्षेत्र माार

नारोपंत अमीन क्षेत्र मार सिका राघोजी महाजनानी क्षेत्र माार

महजराच्या अखेरीस गोही आहे त्यांत वडवे ५, ताटे, थिटे, आराधे, पुजारा ४.

एकूण ९ मंडळी आहेत.

[ई] (१) महजर थिटे कुलकर्णी क्षेत्र माार यानें लिहिला आहे. (२) देवाच्या तुळसीचे क्रियेचा उल्लेख आला आहे.

-११५-

[अ] **म. इ. सा. खं. २०, ले. ३०,** महजरनामा.

श. १६१९; इ. १६९७.

फा. दोन शिके, नंतर अठरा ओळी फारसी मजकूर, महजर अपूर्ण छापला आहे.

[आ] काकोजी बिन हिरोजी वाटोळे विा माणकोजी बिन मेऊजी. उभयतामध्यें पाटिलकीच्या वडिलपणाविषयीं वाद लागला.

[इ] महजरनामा अज थाने सुपे सा जुनर सुबे खुजस्तेबुनियाद ·····बिहुजूर आहालीमवाली बिता;

हजरत काजी शरा	माहाराज राजश्री दिवाण दलसिंगजी फौज
—देशमूख पा॥ मार	दार पा॥ मार
(शिका)	देशपांडे प्रा॥ सुपे.

कुतवल व खंडोजी चानगुडे व मल्हारजी खैरे व काळोजी भोडवे मोकदम व महाजन सेटे का॥ सुपे (नांगर)

[ई] "गोत महास्थळ मौजे पिंपरी गुरोथळ" (२) गावींची सडी घेतांना घातलेलीं पातकें व दोष नमूद करण्यासारखे आहेत.

-११६-

[अ] **म. इ. सा. खं. २१, ले. ८.**

मु. १०९७ जिल्काद ५; श. १६१९ ज्येष्ठ शु. ६ रविवार, इ. १६९७ मे १६.

[आ] बकाजी घाटोरा व मानाजी घाटोरा वस्ती मौजे दलवठणें ता॥ मार हाली वस्ती मौजे सिंपी ता॥ मलवडी वि॥ दादजी बिन तुकोजी सावलकर व बाजी सावलकर वस्ती आंधली ता॥ मलवडी. ता॥ मार येथील पेटेच्या गावडेपणाच्या वडिलकीचा वाद लागला.

[इ] महजर·····अज मुक्काम कसबे चिपुळीण मामले हमजाबाद अमाल बंदर मैमून मुस्तफाबाद बिहुजूर हाजीर मजालसी.

कागदाच्या उजव्या बाजूस:—वेदमूर्ती कसबे मजकूर—५, धर्माधिकारिणी २, जोसी १, भट २; बालाजी विश्वनाथ देशमूख मामले दंडाराजपूर प्रा॥ सीवर्धन १, याशिवाय इतर ६ मंडळी त्यांत एक रणनोवरा व एक पटेल आहे. मौजे आलगाऊ ता॥ वरेडे ३; मौजे मणरबड ता॥ वाई ७; मुकासाई एकूण २६:—मोकासदार १९ व ७ का॥ मारचे बलुते वगैरे.—मेहतरसिंपी १, परीट २, माहाला हजाम २, सालवी कुंभार १, गुरव १.

कागदाच्या डाव्या बाजूस:—गणेश महादेव हवालदार ता॥ चिपुळीण १; मजमूदार ता॥ मार १; देसक मामले मार ३:—सरदेसाई १, जानीब खंडोबलाल देशमूख सुभा मामले—मार १, इतर १; देसककर्यात चिपुळीण १०:—देसाई देशकु॥ २, शेटे महाजन २, पतकी २, निघावन का॥ मार १, जानीब देशकु॥ १ व इतर २; उदीम कसबे मजकूर—६; बकाल का॥ मार—४; ताफे जमाती—२; ताफे कासार—३; ताफे गौवली—२; ताफे साली—३; ताफे साटे—२; ठाणगे ता॥ मार-२; डांग्ये जमाती चवधरी मार ५:—डांगे २, डावरी १, गुरव १, महार १.

एकूण ९२ व्यक्ती हजर आहेत.

[ई] (१) जुमामसीद का॥ चिपुळीण येथें घाटोरानें रवा दिव्य केलें. दिव्य लागलें

सावलकर खरा झाला. (२) छ २० रज्यबला तकरीरा घेतल्या छ. १३ माहे शौवलला रविवारीं दिव्य झालें 'बाळाजी विश्वनाथ समासद' हे दिव्य प्रसंगी हजर आहेत. (३) हरकी गुन्हेगारी घेऊन ती सुभास दाखल केली आहे.

-११७-

[अ] **म. इ. सा. खं. १५, ले. ५०.**

फसली ११०९ जमादिलोवल १५; श. १६२१ का. व. १ रविवार इ. १६९९ आक्टो. २९.

फा. शिका.

[आ] होननाक बिन आबनाक मांग मौजे खोडसी पा। कन्हाड, महादाजी जगदाळे देशमुख पा। मसूर यास मारण्याकरतां म्हणून सदरहू मांगास एक हजार रुपये व दोन चावर जमीन देण्याचे ठरवून गिरजोगी यादवानें रोख २०० रुपये दिले. ही गोष्ट जगदाळ्यास समजली त्यानें मांगास पकडून आदबखानां ठेविले. एकंदर प्रकार गोतापुढें मांगानें या महजरांत सांगितला आहे व फक्त दोनसे रुपये घेतल्याचें कबूल केलें आहे. व "आपण ए गोष्टीस मन घालून तरी दिवाणचा गुन्हेगार असे ब सदरहू दोनीसे रुपयाखेरीज कांहीं घेतलें नाहीं हा केला माहाजर सही वली सुमार ३४ चवतीस रास" या प्रो शेवट.

[इ] थळ कसबे मसूर·····हजीर मजालस राजमुद्रा.

देशपांडे ता। तारळेरुजू, एकूण भोंवरगांवचे पटेल, कुलकर्णी, शेटे मिळून १९ मंडळी आहेत. त्यांत ५ मांग आहेत, का। मसूरचा Xमुल्ला आहे व अलीखान म्हणून एक आहे, इतर मंडळी पटेल व कुलकर्णी आहेत.

[ई] (१) महजरांतून गुन्ह्यांची चौकशी सहसा पहावयास सांपडत नाहीं. त्या दृष्टीनें हा महजर महत्त्वाचा आहे.

-११८-

[अ] **रामदास रामदासी वर्ष २१, अं. २४१;** नक्कल मोडी.

श. १६२३ भाद्र. व. १४ शनिवार; इ. १७०१ सप्टं. २०

नक्कल.

[आ] मौजे सांजणी का। मांजरी प्रो कागल या गांवच्या कुलकर्णाची एकंदर माहिती (कारिणा) थल मौजे बोरलें येथें मजलसीपुढें मोटाजी बिन भानजी पटेल व पटेल बिरादर मौजे सांजणी का। मांजरी प्रो कामल यांनीं या महजराद्वारें सादर केली आहे.

[इ] माहजर·····हाजीर मजालसी थल **मौजे बोरले का। वांग** किले पन्हाळा बिहुजूर हाजीरानी

—देसाई काा वागी

—देसाई काा तऱ्हीड काा वांगी

काा वांगी—चौगुल, पारसनीस, व इतर ३.

काा वडगांव—देसाई, पटेल, चौगुला व इतर ३.

मौजे बोरले—पटेल, कुलकर्णी व इतर ३.

किले पनाला—देशकुा, मौजे नरदे व काा अष्टेचे कुलकर्णी २, सेटिये-अष्टे.

एकूण १६.

[ई] (१) "आम्हा तिघा भावासी बोरलेचे थलास नेले तेथें सभा नाईकी बैसोन जाहाला करिणा लिहोण देणे म्हणो लागला मग आपण हें पत्र लिहून दिल्हे असे."

-११९-

[अ] **पे. सं. सा. खं. १ पृ. १६६.**

श. १६२४. इ. १७०२.

[आ] गिरमाजी लक्षुमण यजुर्वेदी गोतमगोत्री पुजारी उत्तरा लक्ष्मी क्षेत्र पाा कऱ्हाड यामध्ये व महादजी रायाजी यजुर्वेदी सांडिल गोत्री पसारी मौजे वडूज पाा माार हाली वस्ती मौजे कडेगाऊ पाा आउंध या उभयतांमध्यें नवरीचा कथला लागला.

[इ] कागद फाटल्यानें सभा अपूर्ण आहे, एकूण ८ व्यक्ती हजर आहेत पाा आउंद पाा बालाघाट वगैरेचे पाटील कुलकर्णी व देशमूख देशपांडे यांचीं नांवें आहेत.

[ई] (१) "उभये वर्ग भांडित पाा खटाऊ स्थलास आले तेथे महाराज साहेबु व गोत ब्रह्मसभा यापुढे उभे राहिले. उभे वर्गापासी जमान घेऊन हकीकत मनास आणली हरदोजणांचे निवाडा वाा पाा कऱ्हाड तेथें पत्र पाठविले" पृ. १६७. (२) गिजरे, क्षिरसागर वैद्य इत्यादि "समस्त ब्राह्मण क्षेत्र पाा कऱ्हाड याने लिाा जे शास्त्री निबंध पाहून निर्णय केलाजे वधू पित्र्याने (वधूच्या चुलत्यानें विवाह लावला) विवाह केला चार दिवस संपादिले, गोत्र निर्णये तरी वर मातुलगोत्र कास्यप सत्य पुनरुक्त विवाह करणें आशाकश्र आहे हे सही" पृ. १६८. (३) वधूचा चुलता येस पाठक यानी कन्यादान केले पाणी ग्रहण सप्तपदी ग्रहप्रवेश सांग्य विवाह झाला. वर मातुल गोत्र कास्यप पुरोहित लेहून दिल्हे सही" पृ. १६८. (४) "समस्तपत्रें मनास आणून व आपण शास्त्र व निर्णये व निबंध पाहून गिरमाजी लक्षुमण पुजारी श्री भवानी क्षेत्र कऱ्हाड यास वधू दिल्ही असे.....पसारी.....यास वधूस..... समंध नाहीं यास कोणी इस्केल करील तो **दिवाणीचे गुन्हेगार व गोताचा खोटा ब्राह्मण-सभेचा अन्याइ** आसे हे लिहून दिल्हा महजर सही छ. २५ जिल्हेज" पृ. १६८.

—१२०—

[अ] **सनदापत्रें प्रकरण ५ वें, ले. ३४.**

सु. ११०२ जिल्हेज ९; श. १६२४ वैशाख शु. १० रविवार, इ. १७०२ एप्रील, २६.

भा. इ. सं. मं., सप्तम सम्मेलन-वृत्त. पृ. ५५ पहा. सदरहू वतनपत्रांत या महजरचा उल्लेख आहे.

[आ] शेटी बिन नागनाक महार मौजे नागेवाडी समंत मुन्हे पाा वाई विाा धांडे-घरकर व गोडोलीकर गुरव. महाराच्या वडिलांनीं सदरहू गुरवास देवाच्या पुजेकरितां म्हणून गांवास आणलें. पुढें रहिवास होताच गुरवानें महाराच्या वडिलास मारेचुरे करून त्याची पाटिलकी बळकविण्याचा प्रयत्न केला. वाद चालूं असतां गुरव हाजीर होत ना तेव्हां गुरव गैर मिरासी असें दिसलें. गोतानीहि कदीम पाटिलकी महाराची म्हणून दखल दिल्ही तेव्हां मौजे नागेवाडीचे पाटील शेटी महार खरे झाले.

[इ] हजीर मजालस गोत परगणे वाई सरकार परनाळा सुभे विजापूर.

देशमूख देशपांडे प्रांत मजकूर	देशपांडे पाा माार २
पिसाळ देशमूख २	बावधनकर
जमाल पाटील मोकदम कसबे माार १, कसबे-वाईचे शेटे ३ (चि. तागडी) व चौधरी १ मोकदम काा माार	मोकदम १ पाटील २ चौगुला १ मोकदम-पसरणी १

एकूण १४

[ई] (१) महाराकडे पाटिलकीचें वतन आहे (२) "त्याणी रहिवास होताच आपल्या वडिलांचे मोरचुरे करून मिरासी घेतली. आपण महार दूर उभा राहून असो. गुरव जवळी सुस पत्र देऊन मिरासीस जडला. आपण कदीम बुनादी आहे·····सिवधडे मोकदम·····त्याणी सांगितले कीं मौजे मजकूरची पाटिलकी कदीम महाराची मिरास ऐसे आम्हांस दखल आहे. आमचे वडील सांगत आले आहेत ऐसी साक्ष दिल्ही·····" पृ. १८४.

—१२१—

[अ] **पेशवा दप्तर विभाग ३१ नं. १११; सुरत महजर.**

सनहजार १११२ जिल्हेज २५; श. १६२५ वैशाख व. १२ शनिवार; इ. १७०३ मे, १.

[आ] रामाजी विठल व मोरो विठल होनप देशपांडे पुणे हेच कर्यात मावळचेहि देशपांडे होत म्हणून करंजवणे व पायगुडे देशमुखांनीं हा महजर दिला आहे. यादो नामदेव लांडे यानें राजिकामध्यें उभय देशमुखांस कैद केले त्याचाहि उल्लेख आहे.

[इ] महजराचे अखेरीस निरनिराळ्या १४ मोकदमांच्या सह्या आहेत. शिवाय उभय देशमुखांचींहि नांवें आहेत.

-१२२-

[अ] **शि. च. सा. खं. २, ले. २६३.**

सन हजार (फसली) १११३ रविलाखर ११; श. १६२५ श्रावण व. ७, रविवार; इ. १७०३ ऑग. २२.

[आ] मातूश्री मकूबाई भोसले मोकदम काा जिंती वगैरे यास म्हलोजी पा मो व **समस्त दाहीजन** मौजे पिंपलगौ पिसा पा पारनेर सा जुन्नर यांनीं मौजे मजकूरच्या निमे मोकदमीचा हा महजर दिला आहे. मूळ वतन शिवाजी महाराजांचें. त्यांनीं आपला सेवक बाळाजी कोनेर यास चाकरीस दिलें. पुढें धामधूम झाली तेव्हां बाळाजी कोनेर निघून गेला. माारनिले म्हलोजी निमे मोकदम मौजे माार यांनीं वतन संरक्षिलें व नंतर या महजरानें मकूबाईस पुनः वतन महाराजाचें म्हणून दिलें आहे. मकूबाईनें आपली निमी तकसीम बाळाजी कोनेरास दिली त्यासहि गोतांनीं या महजरानें संमति दिली आहे.

[इ] महजराच्या अखेरीस सुमारें १० गोही घातल्या आहेत.

[ई] (१) " मौजे मजकूरची निमे मोकदमी बाळाजी कोनेर महाराजांचा चाकर करीत होते व निमे आपली आहे. यैसियासी बाळाजी कोनेर वरसे चाळीस गेले ते पुन्हां दुसरीयानें गांवावरी आले नाहींत यैसीयासी गनिमाची धामधूम फार व कितेक साले पांढरीचे काम व आपला हाल व गावचा हाल कांहीं राहिला नाहीं जैसे तैसे करून आपण आजी तागाईत वतण राखिले व वतण राखिले तें कांहीं बाळाजी कोनेरचे वतन म्हणऊन राखिले नाहीं. बाळाजी कोनेरचे. महाराजांचा चाकर त्याचे वतन ते महाराजांचे वतन याबद्दल आपणांमध्यें कांहीं ताकती रहिली नाहीं. अनीक कोन्हाप्त वतण लेहोन देऊन आपणास भाऊ करून वतन चालवावे तरी वतन महाराजांचे. याकरितां महाराजांचे वतन. महाराजांच्या हवाला केले असे तुम्ही निमे मोकदमी व मानपत्र हकलाजिमे बाळाजी कोनेर यासी दिधला आहे तेणेप्रमाणे खाऊन वतन महाराजे लेकराचे लेकरी खात गेले पाहिजे " पृ. २६०.

-१२३-

[अ] **सनदपत्रें प्रकरण २ रें, ले. ३६**; महजर सनदेचा.

सु. ११०४ साबान ९; श. १६२५ मार्ग. शु. १२ बुधवार; इ. १७०३ डिसेंबर ८.

[आ] सोमापा देसाई परगणे चिमलगा सुभा विजापूर यास बादशहानें पांच गांव नूतन दिलें त्याविषयींचा महजर बादशहानें दिला आहे.

[इ] " महजरपत्र.....दर जागा चिमलगा सरकार पादशहा अवरंगशहा पादशहा

सुभे निसबत मोमदफजील नायब फौजदार, काजी, कोतवाल, त्रिवर्ग जमीनदार साठी किले सोळा सरकार, बत्तीस महाल, अठरा परगणे, नवठाणी देशमूख देशपाडे, नाडगौडा, पाटील, पटवारी कुलकर्णी समस्त भोरगांव दारूल विजापूर हलीमवाली गुजरात सनद लिहून दिल्ही ऐसीजे."

महजराचे अखेरीस सभोवरगावचे साक्षीदार व नंतर थोडा मजकूर आहे.

[ई] (१) देसाई मारचे परगण्याचे देशगतीचे हक्क मोकासदारानें दिक्कत केले. देसायानें गांव मारिला सबब मोकासदार व सावनूरकर नबाबानें देसायास बेडी घातली. भिमनगौडा पटेलानें देसायाचा खंड भरून त्यास सोडविलें व उभयतांनीं मिळून बादशहाकडे भेटीस जाऊन वृत्त निवेदिलें. बादशहानें देशगतीचे हक्क मोकळे केले. व नूतन गांवें दिलीं त्याचा महजर आहे. (२) "पादशहानें नबाबास.....बोलावून पारिपात्य केलें. देशगतीचे जाबते बेहुकूम करणेस तुमचे हाती पादशाही आलें कीं काय म्हणोन अवघे देशगतीचे हकदक्क सोडवून दिल्हे" (३) पादशहास भेटेदाखल ७००० रुो दिले आहेत.

-१२४-

[आ] **ऐ. स. सा. खं. २०, ले. १३८**; सुरत महजर.

सन हजार (फसली) १११५ मोहरम ५; श. १६२८ वैशाख शु. ७, सोमवार; इ. १७०६ एप्रील ८.

फारसी २२ ओळी मजकूर. उजव्या बाजूस समासांत आडव्या सह्या. यामुळें तपशीलाच्या मजकुरानेंच महजराचा प्रारंभ होतो.

[आ] देशमूख व देशपांडे पाा वणी यानीं सरदहू महजराद्वारें परगण्याची एकंदर परिस्थिती जाहीर केली आहे. बाळाजी विश्वनाथाच्या स्वारीमुळें झालेली एकंदर परिस्थिती वर्णन केली आहे.

[इ] प्रारंभास उजव्या बाजूस समासांत सह्या दिल्या आहेत. स्वतंत्र मजलस नाहीं.

[ई] (१) सुरत म्हणजे हकिकत. हकीकतीचा म्हणजे सुरत महजर होय. या दृष्टीनें महजर विचाराई आहे. सुरत महजर फारच थोडे उपलब्ध झाले आहेत.

-१२५-

[अ] **म. इ. सा. खं. २०, ले. २८३**; सुरत महजर.

फसली १११७ रविलोबल २१; श. १६२९ ज्येष्ठ व. ७ बुधवार; इ. १७०७; जून, ११.

कागदाचे प्रारंभीं ठाणेदार पाा. खटाऊचा शिका.

[आ] राघो सुखदेऊ व मलारबुलगो देशपांडे पाा खटाव विाा विसाजी कासी व विठल बापोजी अथर्वेदी. पाा खटावच्या देशपांडे वतनाचा वाद.

[इ] ठाणेदार पाा खटाव हाजीर मज्यालसील विाा तपसील. सुभानजी घाटगे देशमूख काा लावगुण (सिका). माणाजी फडतरे देशमूख पाा खटाव (सिका).

[ई] (१) दिवाणांतून गोतास निवडावयास सांगितलें व श्री सिवनाथ देऊ काा रहिमतपूर येथें दसरति पंचरातीची क्रिया नेमून पाठविलें. अथर्वेदीस क्रिया लागली तिचा तपशील पहाण्यासारखा आहे. क्रियेच्या दृष्टीनें कागद महत्त्वाचा. (२) "एणेप्रमाणें क्रिया लागली ते मनास आणून रुगवेदी यास व अथर्वणास रांगाणियास रवाना केले असें हा सुरत महजर लिहून दिल्हा सही." (मोर्तब. फा.).

-१२६-

[अ] **शि. च. सा. खं. ५, ले. ९५९.**

श. १६३१ फा. शु.; इ. १७१० फेब्रु.

फा. वा. शि.

[आ] रवलोजी वलद माणकोजी फडतरे देशमूख व पाटील मौजे कुरोली विाा लाखोजी वलद गंगाजी फडतरे देशमूख व पाटील मौजे कुरोली पाा खटाऊ. देशमूखीची व पाटिलकीची वडिलतक्षिम याविषयीं वाद.

[इ] **स्थल पाा खटाऊ···हजीर ··मजालसी.**

राजमुद्रा

सेखदार पाा खटाऊ (फा. अ. सि.)	मजमूदार पाा.
तरफदार ताा वडूज	तरफदार ताा
,, ताा नेर	हुद्देदार

देसकानी महालानिहाये—देशमूख पाा खटाऊ २, अजहती देशमूख १, पोतदार १, देशपांडे पाा मार २, नाईकवाडी यांनीं ४; मोकदमानी देहाये खटाऊ–भोंवर २० गांवचे पाटील व कुलकर्णी मिळून सुमारें ५० व्यक्ती हजर आहेत. चौगुले फक्त दोनच आहेत.

सेटे महाजन महानाड काा खटाऊ—सेटे ७, महाजन १, गोसावी २, याशिवाय म्हेतरे वगैरे १० आहेत. बेगारीयानी–या सदरांत ४ नाईक आहेत.

सुमारें ८६ मंडळी.

[ई] (१) मळेवाडी येथें यापूर्वी राहूजी घाटगे यांनीं या वादाचा निवाडा केला. त्यांतील कांहीं भाग अग्रवादीनें आपल्या तक्रीरींत दिला आहे; तो अनेक दृष्टीनें महत्त्वाचा आहे.—"···खटाऊस आले त्यांनीं मलेवाडी स्थळ देऊन वेऱ्हारास पाठविले. तेथें राजश्री राहुजी घाटगे त्यापासी जाऊन उभे राहिले. त्यांनीं निवाडा पाठिराखोन केला·····अपले

आजे रवलोजी बाजी बोलिले जे तुम्ही गोत थोरलोक होऊन निवाडा कैसा केला त्या (वर) राहूजी घाटगे बोलिले की **जे वेल खाली पडला तो वेळ मांडव चढविला आहे बलावलियावरी आपणच फेल करील** बाजी हा निवाडा मंजूर (?) होणारे नाहीं तुम्हास पांढरीवरी जगावयासी बद+चार रोज दरगुदर केली आहे. **राखेवरी ईमारती शास्वत ना (हीं) तैसा हा निवाडा रुजू नाहीं तुम्हांस देवानें व पांढरीने हाती+धरीलियावरी निवडून घेणे** अजी रास्ती दोठाई निवडून देतो जैसा तुमचा गुमास्ता जिवे मारिला गेला तैसे मारले जाल मग तुमचे वतन कोणे खावे. कालावरी नजर देऊन च्यार रोज जगणे म्हणौन निवाडा केला....." पृ. २३२. (२) वडिलकीचे हक सारखे विभागले आहेत. व त्याचें कारण धाकट्यानें अनेक वर्षे वडिलकीचा भोगवटा केला असें दिलें आहे.

–१२७–

[अ] **म. इ. सा. खं. २०, ले. ६१**; महजरावर पुढील तारीख आहे.

सु. इसने अशर मया व अलफ जिल्हेज ५; श. १६३३ पौष शु. ६ गुरुवार; इ. १७१२. जानें. ३.

महजर मजकुराच्या प्रारंभीची तारीख—१६३३ श्रावण वा। १३ सोमवार (ख. ज. बुधवार); १७११ ऑगस्ट १. मजकुरांत याप्रमाणें शक दिला आहे.

महजर अपूर्ण.

[आ] खंडोजी व जोगोजी बिन बहीरजी ईबिन बाबाजी माहाणेवार चौगुला मौजे पिंपरे खुर्द.

साखराई कोम रंभाजी बिन कान्होजी व सुभानजी बिन कान्होजी लोणारे मौ मौजे रुवी. महजर अपूर्ण असल्यानें व्यवहाराचें स्वरूप समजत नाहीं परंतु एकंदर मजकुराच्या प्रारंभावरून पाटीलकी वतन विक्रीचा हा महजर असावा.

[इ] **हाजीर मजालसी गोत पा। सिखल.**

हकीमशरा काजीसैद महमजाफर वलद काजीसैद

अजीज काजी पा। मार फा. सि.

देसक पा। मार

देशमूख	देशपांडे	मोकदम मौजे अहिरे व हराली २
म. सि.		×येसवंतखान सरनाईक नाईकवाडी पा। मार

वाजी बयाजी गुमस्ते कारभारी

आ। देशमूख पा। मार

—सेटी १, मोकदम मौजे नाहावी.

– १२८ –

[अ] **नरसीपूर सावंत, लेखांक २.**

सु. १११३ सवाल ४; श. १६३४ का. शु. ५ बुधवार, (ख. ज. = गुरुवार इ. १७१२ आक्टों. २२.

(१) कागद एक वेटोळें असून प्रत्येक जोडावर ' राजते लेखनावधि' असे शिक्के आहेत. (२) महजराचा शेवट—"सुमार ११५·····रास."

[आ] तुळजाई कोम विठोजी पाटलीण सावंत मौजे नरसीपूर पा॥ सिराळे; संताजी वलद लखमोजी सावंत पाटील मौजे कोळ याचा मूळ (वय ६) जोत्याजी यास वोटियांत घेते. बाईचें कर्ज संताजीनें फेडावें असें ठरतें. महजरानें दत्तविधान जाहीर होतें.

[इ] बीहुजूर हाजीर मजालस पा॥ सिराळे.

राजमुद्रा—श्रीनिवास परशुराम प्रतिनिधी (मु.)—कदम नाईकवाडी पा॥ शिराळे.

देशक व मोकदम पा॥ शिराळे—

देशपांडे पा॥ मा॥र, पुढील भोंवर ९ गांवचे १४ पाटील व ५ कुलकर्णी हजर आहेत. मौजे—सुरळी, बाहेगाऊ, बोरगाऊ, कापुसखडी, बांबवडे, रेटरे, वोझरडे, बाहे, तांबवे.

मौजे नरसीपूर—

कुलकर्णी ३	ज्योतिषी व बलुते	
	ज्योतिषी व भट मिळून ३ (बा. सह्या)	
	परीट १	न्हावी १
	चांभार १	महार १
		मांग १

एकूण सुमारें ३४

[ई] (१) महजराचा प्रारंभ—"या हुजूर जाहला महजर·····समस्त गोत पा॥ मा॥र व हकजवार याजपासी जाहीर केले." (२) महजरांत देशमुखाचा उल्लेख नाहीं.

– १२९ –

[अ] **सनदापत्रें, प्रकरण २, ले. ४१, पृ. ४८**; महजरनामा.

श. १६३८ श्रावण शु. ५ बुधवार (ख. ज. गुरुवार); इ. १७१६ जुलै १२. वतनपत्रांत महजर दिला आहे.

[आ] दामाजी खंडेराऊ व गोविंद खंडेराऊ लिंगरस यास 'समस्त मोकदम व चोगुले व दाहीजण बलुते' मौजे चन्होली ता॥ हवेली पुणें यानीं राजीनामा समापत्र करून मौजे मजकूरचें कुलकर्ण (पूर्वील कुलकर्णी, गोविंद खंडेरावाचा सासरा गणेश जनार्दन याची अवलाद बुडाली व सदरहू गोविंद लिंगरसानें, गणेशपंतास वृत्तीविषयीं समय पडला म्हणून

कर्ज दिले होते ते देतांना वतन लिंगरसानें गहाण लिहून घेतले होते). मिरासी करून दिलें त्याचा देशमूख देशपांडे पा॥ पुणे यानीं हा महजर दिला आहे. समापत्र श. १६१८ मध्यें झालें होतें.

[इ] महजरनामा·····कदम नायब फौजदार·····व शेखदार नायब व निंबाळकर जहागीरदार व जिल्हेदार फौजदार व हालीमवाली व देशमूख देशपांडे पा॥ पुणे [illegible] प्रारंभ. महजराचे अखेरीस गोही जोडली आहे.

[ई] या लेखांकांत पुढील पत्रें आहेत.

श. १६०७ मार्ग. १३ चन्होली पा॥ पुणेचें कुलकर्ण वतन **गहाणखत** लिहून देऊन गणेश जनार्दन कुलकर्णी मौजे मार यानें उभयता लिंगरस बधूंकडून कर्ज घेतलें. त्याचा पुत्र व तो उभयता मृत्यु पावले. अवलाद बुडाली तेव्हां पांढरीकडे लिंगरस बंधूंनीं पैशाबद्दल तगादा केला व **कर्जखत** दाखविलें. तदनुरूप गोतानीं राजीनामा **समापत्र** करून 'अवलाद बुडाली तरी अफलादीनें वतन खावे हे चालत आले आहे' असें ठरवून वतन लिंगरसास दिलें. तो राजीनामा समापत्र श. १६१८ भा॥ शु॥ ९ स झाला. नंतर शाहूराजे यांचेकडे वतनपत्र मागावयास जाण्यापूर्वी मल्हार गोविंदानें हा महजर देशमूख देशपांड्याकडून करून घेतला असें दिसतें. तदनुरूप महाराजानीं **वतनपत्र** दिलें आहे.

— १३० —

[अ] **पेशवा दप्तर वि. ३१, नं. १८७.**

श. १६३९ ज्ये. व. ८ भृगुवासर; इ. १७१७ जून २१.

श्री; वडजाई नकल ½.

[आ] मौजे नांदेडे का॥ मावळ प्रा॥ पुणे येथील पेठेचे शेल्केपण व महाजनकीचे हक्क वतन पिलाजी जाधवाचा भाऊ संबाजी बिन चांगोजी जाधव यास हा महजर करून गोतांनीं दिले आहे.

[इ] मौजे नांदेडे ता॥ का॥ मावळ बिहुजूर हाजीर मजालसी.

राजमुद्रा

हवालदार कर्यात मावळ व खेडेबारे

देशमुख व देशपांडे ता॥ मार (८)

पायगुडे देशमूख ४, करंजवणें देशमूख २,

लांडे देशकु॥ २.

कसबे पुणे व परगणेकरी (२९)

देवजी मागल सोमवार पेठ पुणे, वेल्हारे जोसी व उपाध्ये व महाजन का॥ पुणें; पुढील भोंवरगांवचे ता॥ कन्हेपठार, खडकवासलें, कूडिजें, पिंपळनिलख, ता॥ कडें (१); कोंढें

कोथरूड, भूकम, बागेरे, काा सिकरापूर, आगलंबे; बावधण खुा व बुा, कारेगांव, धायेरी, किरकटवाडी, काा सासवड, मांडवी, बुा, अळंदी, प्रां चाकण मिळून, २० मोकदम पाटील व बिरादर, ३ कुलकर्णी, १ चौगुला, २ सेटे व १ इतर अशा सुमारें २७ व्यक्ती दिल्या आहेत.

एकूण सभासद सुमारें ३७

[इ] (१) या कागदावरून वृत्तीपत्र, दुमालेपत्र, दिवाणचें पत्र, गोताचा महजर या सर्व पत्रांचा अर्थ स्पष्ट समजून येतो (२) यापूर्वी १७११ मध्यें पिलाजी जाधवानें मौजे नांदेडची निमी मोकदमी संकराजी बिन बकाजी फर्जंद मोकदम मौजे खामगांव याजकडून विकत घेतली तिचा महजर गोतांनीं पिलाजीस दिला होता. सांप्रत पिलाजीचा भाऊ संबाजी यास मौजे माार येथील पेठेच्या शेटे महाजनकी वतनाचा हा महजर, शाहूमहाराजाचें वृत्तीपत्र सचिवाचें दुमालें पत्र पाहून देशमूख देशपांडे व गोतांनीं दिला आहे.

-१३१-

[अ] **वतनपत्रें निवाडपत्रें**; ले. १७; महजरनामा

सु. ११११ जिल्काद २२; श. १६४० आश्वि. व. ८ सोमवार; इ. १७१८ आक्टो. ६.

(अशरीन बदल अशर वाचणें जरूर आहे.)

[आ] शिकें बंधूंमधील मामले रायरी व मामले दाभोळच्या देशमुखीविषयीं वाद.

[इ] **हजीर मजालसी मुकाम किले सातारा**;

मुद्रलभट पंडितराव मिका.—फत्तेसिंग भोसले (सि.)

सरकारकून; उजवी बाजू—प्रतिनिधि(सि.) अमात्य, सरखेल (सि.),छंदोगामात्य, वाकनीस, गोविंदरायाजी, पंताजी शिवदेव बक्षी, चिटणीस.

डावी बाजू—प्रधान (शि.), सचीव, डबीर, न्यायाधीश, यादोगोपाळ, सेनाकर्ते, आनंदराव रघुनाथ, शंकराजी मल्हार (फा. सि. मध्यावर).

सरदार—एकूण २५; त्यांत ४ मुसलमान; दाभाडे, निंबाळकर, कदम, पवार, बंकटराव, सोमवंशी, यांचे शिके आहेत. घायभर यांची फारसी निशाणी आहे, मुसलमानांपैकीं दोघांची मोहर व एकाचा शिका आहे.

गोतहामशाई—पाा वाई, शाहजी देशमूख, (शि.) देशमूख व देशकुा पाा माार, सेटे काा वाई, व भोंवरगांवचे पाटील ३.

एकूण ५० मंडळी.

-१३२-

[अ] **म. इ. सा. खं. ३, ले. १३५.**

महजर श. १६४१ ज्ये. शु. १ शनिवार; इ. १७१९ मे. ९

[आ] संताजी बिन बहिरोजी घारगे विा सिदोजी बिन बहिरोजी घारगे. काा निमसोडच्या देशमुखी वतनाचा वाद.

[इ] महजर बहुजूर मजालस मुा सातारा.

राजमुद्रा सरकारः—

प्रतिनिधि (शि.)	प्रधान (शि.)
बाळकृष्ण वासुदेव अमात्य (शि.)	सचीव (शि.)
मंत्री, सुमंत	न्यायाधीश (शि.)
शि. शि.	नामजाद कारकून
रघुनाथ उमाजी किल्लेहाय (शि.)	महाल निहाये सुभाप्रांत
	खटाव मायेणी (शि.)

श्री शाहूजी राजे भोसले सरदेशमूख सुभेहाय (शि.); देशमूख व देशपांडे व मोकदम व शेटे महाजनः—

शाहूराजे भोसले देशमूख पााावाई (शि.)	देशकुाा पाा माार.
३ सेटे, १ चौधरी–काावाई,	रुस्तुमराऊ जाधवराऊ (शि.)
	अजमशेख मिराजी (शि.)

गोत हकजवारी महाल निहायेः—

काा वाई—पाटील २ (एक मुसलमान चि. तांगड) व संमत निंब व संमत कोरेगांव पाौ गांवचे सुमारें ९ पाटील.

[ई] (१) "राजसभा म्हणजे इंद्रसभा, धर्मपरायण सिद्धि प्रमाण मर्यादा रक्षणार" (२) "मजालसी यांनीं उत्तर दिल्हे कीं महाराजसाहेब म्हणजे हिंदुपती बादशाही ईश्वराचे आर्थी ध्यान आहेत. जे इनसाफ कराल त्यांत कुसूर ठेवूं नये म्हणजे चंद्रसूर्य आहेत तोपर्यंत कीर्त राहील." (३) न्यायपद्धतीच्या दृष्टीनेंहि महजर महत्त्वाचा आहे. (४) प्रतिवादीचा भोगवटा बरेच दिवसांचा असल्यानें वतन विभागलें आहे. (५) "ईदलशाई दिवाणांत हक्क चौथाई इनाम तिजाईच नव्हती व गोताचेहि साक्षीनें जालें कीं इनाम तिजाई व हक्क चौथाई पडली नाही." पृ. ११७

– १३३ –

[अ] **श्रीसांप्रदायाचीं कागदपत्रें. ले. ४३८**

श. १६४७; इ. १७२५.

प्रारंभ व शेवट फाटला आहे.

[आ] रायाजी वाा भुतोजी मेढा विरुद्ध सूर्याजी, मामले परांड्यापैकीं एका गांवांतील एका मिराशी शेताबद्दल वाद रायाजी खरा ठरला.

5 *ASS* 1, 200, 190, 193, *PD* 8.1125, *SCS* 2.315. Appendix-B, IV. 130.

vi *Degradation through Marriage, Adultery etc.*—(8,1745-93 A.D.)[6]

The property of a person, refusing to undergo Prayascitta was attached. In another case penance of 'Prithivi-Pradaksana' or the globe circumambulation was ordered.

vii *Miscellaneous*—(6, 1729-1808 A.D.)[7]

For giving lessons in reciting 'Rudra' to a Jangam, 98 Godanas (or gift of a cow) were ordained.

6 *BIMS* 3, pp., 96, 97. *ASS* 1, 198, 192, *MIS* 21, 223, *PD* 8, 1139. *SPD* 43, 29, 111.

7 *SPD* 43, 110. *ASS* 1.83, 184, 187, 196. Appendix-B, IV. 129.

APPENDIX-B, ORIGINAL SOURCES

(SECTIONS I, II, III, IV & V)

Selections from the Peshwa Daftar, Poona and other Historical Records

INTRODUCTORY

(*Unpublished documents*)

The original documents included in this Appendix are selected chiefly from the Peshwa Daftar, Poona. The present writer has spent over six months in ransacking both Marathi (Modi) and English documents, preserved in the Daftar. A large number of judicial documents of the 17th century have hitherto been brought to light, but those of the 18th century are rare. The present selection therefore consists of the decisions of the Shahu and Peshwa period mainly. An attempt is made to make this selection illustrative and therefore while copying the originals of the lengthy decisions, only important extracts are taken down from the originals verbatim.

These documents are divided into five groups as under—

Section I—Contains about 29 documents covering a period of about 100 years from about 1650-1750 A.D. It includes a large number of the decision of Shahu and his ministers. These Nivāḍpatras and Watanpatras are intended to throw light on the development of the Panchayat system during the regime of Shahu and the later Peshwas. They are also important from the point of judicial procedure.

Section II—Contains extracts from the Nivāḍpatras (decisions), issued from the Secretariat of the Peshwa, *i.e.* of the decisions of disputes decided by the Huzur Panchayat from 1750-1818 A.D. They are about 25.

Section III is devoted to the letters of Ramashastri, the Chief Justice of the Peshwa. They are 9 in number and bring us in close contact with his personality.

Section IV—Contains orders issued by the Peshwa regarding crimes and punishments. They are 136, and most of them belong to the latter part of the 18th century. They help us to know the nature of Crime and Punishment in those days.

Section V—Includes a report on the administration of justice under the Peshwas by Lumsden and an extract from the report of Robertson, the first Collector of Poona, about the village communities in the Poona division, dated 10th October, 1821.

Section—I

Mahazars, Nivādpatras, Watanpatras, etc.

क्रमांक—१ सु. १०१९
मा. इ. सं. मं. दप्तर पुणें. इ. १६१८ जून ५
ग. ह. खरे-संग्रह

फार्सी सिका १।२

महजर बाा तेरीख २१ माहे जमादिलाखर पाा माण दहीगाऊ सुाा सन तिसा आशर आलफ × × जर आपाजी पंडित हवालदार वा कारकुनानी –

कृष्णाजी पंडित मजमदार
(रा) याजी दामोदर निधावन
पाा मो।
रखमाजी पंडित
(म) हमदजी माहालदार पो मो।
रंगो पंडित मुाा
.....
(शे) टे महाजन व समस्त पेट पिलूब
+ + जीवे रामाजी फर्जेद
+ पेट माा सबेजी सेट्या
मलसेटी पाा पिंडाजी
पडिया महाजनु कुडोकल
+ नारसेटी···काा रवलो
महेत रीतेली.

सेख ईभराईम सरसमत काा स+
नारो तिमाजी निधावन जकाती
असनारा
बाबाजी नागनाथ देस कुलकर्णी
पाा मजकूर
बुकाजी फर्जेद देऊजी येसबंतराऊ सरगर.

सोमाजी मेटकरी
मोकदमानी मौजे मिलुब
सीदगौडा मोकदम
मौजे गोमेवाडी का।। आटपाडी
हिरोजी मेटकरी
काा सांगुलबे.

बाकाजी मोकदम मौजे महामदापूर
काा कासे गाऊ.

या विदमाने जाहाला माहाजर येसाजे बो। रेमसेटी सेट्या बा मग सेटी बिन लंगसेटी भिंगे हे दोघेवर्ग कसबे आटपाडीचे सेटेपणाबद्दल हुजूर हायाल जाहाले मंगसेटी मजकूर हाली

सेटेपणा चालवीत असता रेमसेटी मचकूर बोलिला जे आपण रवा घेईन मग दोघावर्गामधे समसेटी मा रवा घेवा यैसे नेम केला मग हक जवारी मो पेट पिलूमधे रवा नेमिला जे काला चणा गोरा चणा आणून मेणामध्यें घालुनु दोनी गोळ्या केल्या नवी घागरी थंडपाणी भरून येथाविद पूजा करूनु नेम केला जे काला चणा निघला म्हणिजे खोटा गोरा चणा निघाला म्हणिजे खरा यैसा नेम केला जो खरा निघेल त्याने होन ५०० दिवाणास सेणीं द्यावी खोटा निघेल म्हणिजे होन १० दाहा ताजील माल द्यावा यैसे शेतीं करुनु रेमसेटी मा घागरींत हात घालुनु गोराचणा काढिला रेमसेटी मजकूर खरा निघाला मंगसेटीं मजकूर खोटा जाहाला मग रेमसेटी मा चे (अपूर्ण).

क्रमांक—२
पे. द. सं. नि. कागद
रु. नं. ५३.

श. १५४७ फाल्गु. शु. ११
इ. १६२६ फेब्रु. २६

श्री.

महजर बी तेरीख छ ११ माहे जमादिलाखर बेहुजूर हाजीर मजालसी कर्यात सासवड व बाजे माहाल.

सुा शीत ईशरीन अलफ शके १५४७ क्रोधन संवछरे सिमगा सुध येकादसी अदीतवार महजर यैसाजे अग्रवादी सूर्याजी बिन माहादाजी पोवार व पश्चमवादी दाद पाटील बिन चाहू पाटील बडधा या हरदो जणासी मौजे कोंढीत बुा कर्याती मजकूर तेथील मोकदमीचा करकरया होता...

यावरी दाद पाटील मजकुरे अर्ज केला जे अपले व पवाराचे निवाडे होऊन आपणापासी पेसजीचे व हाली साहेबाचे महजर आहेत लायेणी सूर्याजी बिन माहादाजी पवार कुसूर करून डरडाफर करून गला पाळेला आहे तरी साहेबी अरीर्फदल ईनसाफीचे अहीर आहेत यावर सूर्याजी बिन महादाजी पवार मजकुरे अर्ज केला जे दाद पाटील म्हणतो जे लाइणी गला पडिला आहे तर मोकदमी आपले वडिली खादली आहे व आपला चुलता सोनजीहि मोकदमी करीत होता यास दाद पाटील बीन चाद पाटील बडधा मजकुरे आपल्या वडिलान मारा केला याजवरी मागु ते आपले बाप माहादजी ही मोकदमी करीत होता आता आपण पाढरी बरी रवा काढीन खरा जाहालो तरी मोकदमी खाईन खोटा जाहालो तरी मोकदमीस समंध नाहीं...

याजवर दाद पाटील मजकुरास रजा फर्माविले जे तुझा मुदा कैसा आहे तो बोलणे याजवर दाद पाटील मजकुरेही दिव्यास राजी जाहाली यावरी छ १ रोज जुमा माहे जमादिलाखर ते रोजी अग्रवादी सूर्याजी बिन महादाजी पवार मजकुराचे हाती खलिति घालुन लाखोटा केला हरदो वादी नफरास दरवाजा मना करून अदबखाना ठेविले तीसरे रोजी छ ९

रोज येकसंबेचे रोज माहे मीनहू हारदो वादी नफरास मौजे मजकूरचे पांढरीवरी नेले सूर्याजी पवार मजकुराचे हाताची खलीती काढून हाताची नखे काढली निंब लाऊन हात धुऊन पाख केला हातची किन्ही लिहिली दिव्य मांडले ते वख्ती हारदोवादी यानी दिव्य करावयाची नेम उतरे तकरीरा केलीया बिा तपसील...

सदरहू नेम उतर तकरीर प्रमाण ताड पत्रावर पत्र भाषा लिहिले यावर हरदो जणासी आंघोलीस पाठविले हरदो नदी सुस्नात होऊन आले यावरी सवाशेर तूप ८८१। वं सवाशेर तेल ८८१। ऐसे थालीमधे घालून भाते लाऊन तते केल हारदो जणाचे नावाची नागवेली पाने घातली तूप तेल तते जाहाले मग सात मडले काढून ताम्हण देव नवखंडीया बहिरवा सन्मुख ठेविले.....तूप तेल आणि आत रवा टाकिला अग्रवादी.....पवार मजकुरे ताडपत्र मास लिहिली होती ते सीरी बांधले आणि सात मंडले उलांडून ताम्हणानजीक उभा राहिला पश्चिमवादी दाद पाटील बिन चाहु पाटील बडधा मजकुरे साउली केली ते वख्ती हाजीर मजालसी बैसले होते त्यानी हारदोजणवादी यास बोलिले जे दिव्य करू नका. हारदोजण समजा यावर हारदोवादी अर्ज केला जे रवीया वेगळा निवाडा नव्हे मग.....पवार मजकुरे पाढरीवर रवा काढिला यावरी ताम्हणात तूप तेल होते त्यावर भात टाकिले त्याचे फुटाणे लाहिया जाहालीया मग सूर्याजी मजकूर हाती खलिती घालून लाखोटा करून हारदोवादी यासी ठाणे कर्यातीं मजकुरास आणून हरदो जणासी आदबला ठेविले तिसरा रोज छ ११ सिसबे माहे मीनहू हाजीर मजालसी हाकीमसारा व देशमुख व मोकदम व सेटीये व माहाजन व वाजे खुम-खलक कुल बैसोन सूर्याजी मजकुराचे हात पाहिले सूर्याजी मजकूर खरा जाहाला दाद पाटील बडधा खोटा जाला अता मौजे कोठीत कपीत मजकूर तेथील मोकदमी निमे सूर्याजी बिन माहादाजी पवाराचे दुमाले करून महजर जाला असे.....यासी शेरणी होन ६० साट घेतले दाद पाटील बडधा मोकदम खोटा जाहाला यापासून ताजील माल होन येकशेवीस १२० घेतले असे.

(या महजराचें अक्षर पेशवेकालीन आहे. बंदाच्या जोडांत बंद चिकटवतांना अक्षर गेलें आहे. यामुळें बंद स्वतंत्र लिहिले असावे व मग एकत्र चिकटवले असावे. महत्त्वाचा तेवढा दिव्याचा भाग घेतला आहे.)

क्रमांक ३—

भा. इ. सं. मं. दप्तर पुणें सु. १०३३

ग. ह. खरे संग्रह इ. १६३२–३३

माहाजर ब (तेरीख) (छ) ११ माहे मोहरम काा आटपाडी पाा माणदहिंगाऊ सुाा सलास (सलासीन) आलफ बी हुजूर–

नरहरी भास्कर
हवालदार
तिमाजी संगम
मुजमदार
(प) दमाजी त्रिमल
हुद्देदार मौजे निंबोडे
देसक

बालाजी वैजनाथ ठाणदार
पदाजी बिन बालोजी
मोकदम.....सेटफल.

नामाजी बोपाजी सुाा सरदेसाई
काा माा
अपाजी खंडेराऊ
देसकुलकर्णी
कालोजी नाईकवाडी काा माा
सेहाजी सेटीया सेटिया कामा.

मलोजी बिन.....जीवा
सोनाजी देसाई.
परसोजी पाटील वा सालो पाटील
वा सोनजी चोगला वा तुकोबा
कुलकर्णी कसबे मा.
बसवलीक सरसेटीया
कसबेमा.

विठोजी माळी मोकदम
मौजे निंबोडे
माया पाटील व देवराऊ
पाटील गोमाजी ढोलो
मौजे दिगंची

ताबोजी पेट मोकदम
मौजे आवलावी
फगोजी पटेल मोकदम मौजे
नेलकरजे.

विरोजी मोकदम
मौजे पळसखेल.
निंबाजी ब जाखोजी मोकदम मौजे
सेटफल
गोमाजी मोकदम मौजे तडवले
रामोजी मोकहम मौजे घाणद
खंडोजी पाटील वा धर्माजी वा
सुयाजी मौजे धरणिकी (?)
खडो मेहतरी तेली कसबे माा
सदु पोतदार काा माा

विरोजी व मुदकणा मोकधम वा
भानजी चौगुला मौजे देवलारवु
मुदकाणा मोकदम मौज ब्रह्मपुरी.
विठोजी मोकदम मौजे का
लिंग नाईक मेटकरी काा माा
सिदु व गणो मेहतरी माळी
काा माा
दादो कुंभार काा मजकूरे

हे मुख्य करून समस्त हाजीर मजालसी मोकाम काा माा या विदमाने लेहून दिल्हे माहाजर येसाजे हिरोजी बिन.....सरगर व विठोजी बिन हिरो पटल सरगर सीवा तानाजी बिन विठोजी व पोमाजी बिन बहीरजी वा समस्त गायेकवाड यासी मौजे पायरीचे पटेलगीबदल गरगशा करीत होते पैसजी कारकीर्दी मलीक आजम माा निजाम माजी मोकासाई हिरोजी बिन बोमाजी सरगर येऊन फिर्याद केली जे मौजे माा पटेलगी माहात कदम अपुले वडिलाचो मीरा (सि).....(यापुढें एक ओळ फाटण्यांत गेली असावी)...मलीक आजम...तफों जाहाली हाली कारकीर्द राजेश्री साहेबासी मोकासा अर्जीनी जाहालावरी हरदोनफर फिर्यादी जाहाले मग दोघासी जमानती करुन थलासी पाठविले तेथें निवडिलि प्रमाण नफर मजकूर थलासी राजी होऊन चालिले नाही गरगशा तुटेना मग साहेब व देसक व हकजवारी मिलोन दोघासी नेम उतर व जमानता करुन धर्मता निवडा.....(दोन ओळी फाटल्या) त्यावरी गायेकवाड येऊन दखल जाहाले साहेबी वरहक मुनसिफी करून निवाडा करणे म्हणोन त्यावरी साहेब वा देसक वा हकजवारी मिलोन तफवास केले तरी हकजवारी बोलिले जे बहुत कालाचे गरगशा आसे साहेबी हरदो नफरास जमान देऊन दिव देणे म्हणौऊन नेम उतर लेहून ठेविली त्यावरी साहेब वा देसक वा हकजवारी मीलोन मौजे माा पांढरीव (री) रवा दिल्हे हिरोजी बिन बोभाजीने रवा घेतला. रवा कादून तान्हाजीचे हाती दिल्हे मग हरदो नफरासी हातासी खलिती घालून तीन दिवस साहेब वा देसक बैसोनु हात पाहाता दोघासी रवा लागला त्यावरी हरदोघा नफरासी सांगोलेसी नेऊन अदबरवाना राहिले सेणीं दो ठाई बराबरी घेतली माहाजर करून द्यावा तो तानाजीचे व हिरोजी बाप भाऊ हाजीर बहूते.....(दोन ओळी फाटल्या) (पाटेलगी दो ठाई बराबरी करुनु दिल्हे हक लाजिमा मानपान दो ठाई खाऊन दिवाणीचे नफराई करून सुखी आसावे दिवाणासी सेणी खुशनुद हरदो नफरासी होन १४०० घेऊन माहाजर करुन दिल्हे आसे पेसजी थल कसबे मालवणी व सावरडाचे वेव्हारपत्रे रद करुन माहाजर करुन दिल्हा यावरी अवघे गायेकवाड पोमाजी + निंबाजी + + जीवा सिदो जीवा..... (दोन ओळी) गायेकवाड समास्ता मिलोन अपु (ला) ले खुसीने पटेलगी दोठाई करुन दिल्हे आसे यास जो कोण्ही हरकत करील तो गायेकवाडाचा वैसीचा नव्हे आथवा सरगर हिला हरकत करील तो सरगर नव्हे दिवाणीचे गुन्हेगार व गोताचे अन्याई हा माहाजर सही.

क्रमांक—४ श. १६०३ ज्येष्ठ
पै. द. सं. नि. कागद. इ. १६८१ जून
रु. नं. ५३ श्री

इनाम कमिशन सिका

श्री सके १६०३ दुर्मती संवत्सरे जेस्ट सुध गोत जमा पांढरी मौजे चिंचवड ताा हवेली प्राा पुणा छ १५ सफर सुा सन इहिदे समानीन अलफ कारणे राजेश्री पंतप्रधान व राजेश्री रामचंद्र नीलकंठ सचीव याचे आज्ञापत्र सादर जाले तेथे मजमन की.....

माा अनाम देशमुख व देश कुलकर्णी प्राा पुणे यास

नीलकंठ मोरेश्वर प्रधान व रामचंद्र नीलकंठ

... . (एक ओळ फाटली) ..... बिन जाहूजी चिंचवडा पाटील मौजे चिंचवड याने हुजूर येऊन विदीत केले की मौजे मजकूरजी पाटिलकी आपली मिरास पिढी दर पिढी चालली आहे अैसीयास आपला पणजा जाऊजी पाटील त्याचा लेक रामजी पाटील आपला आजा त्याचा लेक नावजी पाटील आपला बाप पाटीलकी करीत आले येसीयास आपला बाप थोडकीयाच दिवसामध्ये मरोन गेला आपण नेणता होतो ..... वरीस होऊन आपणाही काहीक दिवस पाटीलकी केली अैसी चार पिढेया अपली आपण खात होतो हाली केरोजी व कमलोजी चिंचवडा आहे त्यास पाटिलकीस निसबत नसता खलेल करून ईस्कील केली आहे तर हेविसी पत्र देविले पाहिजे म्हणोनु विदीत केले तरी खंडोजी मजकुरास पाठविले आहे केरोजी व कमलोजीस तुम्ही आपणाजवळ आणून हमशाही पाटील कुलकर्णी गावीचे मिरासदार बोलाऊन वर हक मनसुफी करणे कोणाचा मुलाहिजा न करणे हक हिसाब करून गोतमुखे ज्याची पाटिलकी होईल त्याचे दुमाले करोण नवी जिकीर होऊ न देणे. उजूर (?) असेल तरी याचा करिना.....हरदोजणा हुजूर पाठऊन देणे मनास आणून आज्ञापत्र पाळून वर्तणूक करणे छ २२ मोहरम.

.....(फाटले आहे)..... .....मौजे मजकुरी हाजीर मजालसी बिाा तपशील.

नारो कृष्ण व राघोकृष्ण अजहत सितोले देशमूख प्राा मजकूर गोरखोजीफा बिराजर मोकादम मौजे हडपसर
मोरो विठल देसपांडे प्राा (माार)
त्रिंबक मुदगल जोसी कुलकर्णी मौजे बोरीब्याळ
ताा पाटस दसमाजी पाटील मोकदम मौजे
मोकदम मौजे पिंपरी ताा हवेली.....
.....ताा हवेली मोकदम मौजे पिंपले
ताा हवेली मौजे थेरगाव ताा हवेली
ताथवडे मोकादम मौजे दकड (?) ताा हवेली मोकदम मौजे साकुर्डी मोकदम मौजे जांबे.

सदरहू प्रमाणें गीर्द नवाह मोकदम व पांढरीचे थलकरी व बारा बलुते या हुजूर माणकोजी व केरोजी चिंचवडे याणी तकरीर लेहोन दिल्या बिाा तपशील.

तकरीर ब ताा छ २५ माहे मोहरम (सुाा) इहिदे तकरीर कदे बोा माणकोजी बिन नाव पाटील चिंचवडे मोकदम मौजे चिंचवड ताा हवेली प्राा पुणा सुरु.....तकरीद लेहून दिधली येसीजे.....
(.....तकरीर).....
गोत निवाडा करील त्याप्रमाणे आपण वर्तोन हिला हरकत करील ते दिवाणाचा गुन्हेगार व

तकरीर (केरोजी पाटील मोकादम याची सदरील प्रो)

गोताचा खोटा गोतमुखे निवाड होईल त्याप्रमाणें आपण वतोनय हे आपली तकरीद सही यास जमान मोकदम मौजे रावेत ता। हवेली प्रा। पुणा गोतमुखे निवाडा होईल तेणेप्रमाणे माणकोजीस आपण वर्तऊन गोताचे केल माणकोजी वर्तेना ते नफर मजकुराचे निसबती (चा) जाब आपण करून हे आपला जमान क (त) बा सही.

(मोकदम चिखली जमान केरोजी यास सदरील प्रो) ...कतबा सही.

गोही
बापाजी नरसिंगराऊ व गोविंदराऊ सितोळे देशमूख.

गोही.
बापाजी नरसिंगराऊ व गोविंदराऊ सितोळे देशमूख.

येणेप्रमाणे तकरीरा लेहोन देऊन जमान दिल्हे त्यावरून गोताने राजिनामे लेहोन मागितले तेथे मजमून की—

.....हाजीर मजालसी मौजे चिंचवड ता। हवेली प्रा। पुणा सु। इहिदे समानीन अलफ मोकदम मौजे पिपरी मोकदम मौजे वाकड

(सदरील बरहुकूम केरोजीचा राजिनामा आहे)

	१		१
,, ,,	रावेत १	,, ,,	ताथवडे १
,, ,,	थेरगाऊ १	,, ,,	राहाटणी १
,, ,,	जांब १	,, ,,	साकुर्डी १

या विदमानें माणकोजी बिन नावजी पाटील चिंचवडे राजिनामा लेहोन दिल्हा येसाजे अपलीयामधे व केरोजी बिन साहसी चिंचवडे यामधे पाटिलकीचे भांडण आहे. येसीयास सदरहू मजालसी व गोत आपली पाढरी जैसे निवडील त्यास राजी आहे व बाराबलुते व हमशाही गोत व साठीप्रजा मिलोन निवडतील तेणेप्रमाणे राजी असे आपण तकरीदा केलीया आहेत तेणे प्रमाणे निवाडा केला पाहिजे यास हिला हरकत करून तरी दिवाणचे गुन्हेगार व गोताचा खोटा हा राजीनामा सही—

सदरहूप्रमाणें राजीनामे लेहून दिधलीया उपरी गावीचे चौ(गु)ले व थलकरी व बारा बलुते श्री चे देवळी बैसोन पं(चा)च्या...बेल आंगारा त्यांते सिरी घालून त्यांच्या (बे) तालीस पुर्वजांची सफत घालून नरककुंड चामारकुंड (का) ह्वन सदरहू जणाचा मोकदमीची बुनियाद व भोगवटा पुसता तकरीरा लेहोन दिधलीया बिा तपसील.

तकरीर कर्दे धावजी चौगुला मोख्तसर मारी प्रजा मौजे चिंचवड ताा हवेली प्राा पुणें सुा.....(तपसील दिला आहे.)

बिा चौगुला वरसे ४०
१
थलकरी उमरवसे १०
१

चांगोजी उमर वर्से ९०
१
गावडा उमर वरसे ४४
१

तकरीर कर्दे बारा बलुते मौजे चिंचवड ताा हवेती प्राा पुणे सुरु—

—जोशी कुलकर्णी—८० (वर्षे)
—कुंभार —२५ ,,
—माहाला —६० ,,
—सुतार ५० (वर्षे वय)
—गुरव ३५
—परीट ६०
—कोळी ६०
—चाभार सुतारा प्राा तकरीर
—२ माहार ५०।६० (वय अनुक्रमें)

येणेप्रमाणे चौगुले वथलकरी व बाराही बलुते यांणी तकरीस लिहून दिधली यावर गीर्दनवाही मोकदम त्यास सदरहू मोकदमीची बुनियाद पुसिता त्याणी तकरीर लेहून दिधली या बिा

तकरीर कर्दे—(एकूण ११ तकरीरा):—तकरीर मोकदम मौजे राहाटणी उमर वर्से १००; मौजे थेरगाऊ;—मौजे नेरे नेणे—मौजे पिंपरी;—मौजे ताथवडे;—वाकड;—साकुर्डी - रावेत;—पिंपळे—मौ. पुनवले—मौजे जांब;

सदरहू हाजीर मजालसीने पाढरी मुले व गीर्दनबाई शाहादीमुळे मनास आणिता...

.....माणकोजी याच्या दुमाला केली असे.....भोगभोगवटा करून सुखरुप नांदणे हा गोताचा निवाडा सही—

क्रमांक—५
भा. इ. सं. मं. दप्तर, पुणें.
स. ग. जोशी-संग्रह, रु. नं. ५/२०

सु. १०९९ जमादिलावल ४
श. १६२० कार्ति. शु. ५
इ. १६९८ आक्टो. २९

श्री

ताळीक.

(सीका)

मा॥ अनाम देसमुखानी व देसपांडे व सेटे महाजन य मोकदम प्रा॥ बाई यासी कान्हेर जगनाथ न्यायाधीस असीर्वाद सुहुर सन तिसा तिसेन अलफ विठल जोतीसी बीन रंग जातीसी येजुरवेदी अर्गवादी व अपदेभट बिन बालंभट अडकर रुगवेदी उतरवादी या उभयेता मधे मौजे धोम सा मुन्हे प्रा॥ मजकूर येथे श्री—

गंगातीर क्षेत्रीचे उपाधेपणा निमित्य गर्गशा लागली आहे याकरिता हरदुजणाचा निवाडी-याचा कज्या हुजूर पडिला आहे याची रास्ती मनसुफी करून जो खरा होईल त्यास उपाधेपणे द्यावे लागते राजे श्री स्वामी उगव येकाची वृत्ती येकास देत नाहीं पूर्वापार ज्याची वृत्ती खरी असेल त्याची त्यासच देतातीं याकरिता हरदू जणाचा करिणा व कागदपत्र हुजूर मनास आणिता त्यावरुन रास्ती निवाडा होत नाही तुम्हा देसकास हुजूर बोलाऊन पूर्वापार करिना मनास आणून निर्वाहा करावा तरी राजेश्री स्वामी कर्नाटक प्रांते स्वारीस चालिले आहेत समागमे आम्हास जावे लागते या निमित्य तुम्हा देसकावरी हरदु जणाची मनसुफी धर्मता रास्ती निवाडा करावयासी टाकिली आहे यैशास हरदूजणानी अपलाले करोने हुजूर लेहून दिल्हे आहे—

विठल जोतिसी अर्गवादी याणे आपला करिना लेहून दिल्हा आहे की मौजे माारचे देखील श्री गंगातीर क्षेत्र जोतीस व उपाधपण वृत्ती पूर्वापार अपली आहे यैशास श्री गंगातीर क्षेत्री भलेभलेब्राम्हण येताती त्यास रुगदेदी ब्राम्हण पाहिजे याज निमित्त आपला वडिल नागजोतीसी याणे आपदेभट अडकर याचा वडिल नरसी भट रुगूवेदी अगांतुक क्षेत्री आला होता भला देखोन त्यास क्षेत्री उपा धेपणावरी मुतालिक ठेविला त्याणे मुतालिक पणाचे आपले

अपदेभट अडकर उतरवादी याणे आपला करीना लेहून दिल्हा आहे की मौजे माारी गावीचे देखील श्री गंगातीर क्षेत्राचे उपाधे-पण पूर्वापार वडिल वडिलापासून वृत्ती आपली आहे व जोतीसपण विठल जोसी येजुर्वेदी याचे आहे उपाधेपणासी जोसी यासी समंध नाहीं व जोतीसपणासी आपणास समंध नाही यैसे असता आपला बाप बालंभट अडकर व विठल जोतिसी या उभयेतापासून क्षेत्रीचे उपाधेपणाचा कथला

वडिलासी वर्तणुक केली त्या आली-
कदे त्याचे संततीपासून क्षेत्रीचे
उपाधेपणानिमित्य कथला होत
आला परंतु मौजे मारी गावीचे
जोतीसी व उपाधेपण आपले वडिल
व आपण पूर्वापार अजीवरी अनभवीत
आहो व श्री गंगातीर क्षेत्री जोतीस
व गणेशपूजनही अजीवरी अनभवीत
आहो यात कोणाचा काही कथला
जाला नाही आपली वृती आपणच
अनभवीत आहो यैसे असता श्री
गंगातीर क्षेत्रीचे उपाधेपण पूर्वापार
आपलेच आहे अलीकडे क्षेत्रीचे उपाधे-
पणासी आमचा लोप करुन अडकर
नूतन अपले वृतीस जडिले आहेत.

लागला परंतु गावीचे देखील
उपाधेपण आपला बापच अनभवीत
होता परंतु परसपरे कलहो बहुत
वाढूला या निमित्य गोतानी
आपले बापाची व रंग जोसी याची
समजावीस करुन कथला तोडिला
की मौजे मारी गावात उपाध्ये
पण व जोतीसी हे वृती जोसी
यानी खावी व श्री गंगातीर क्षेत्री
उपाधेपण व गणेशपूजण हे वृती
आम्ही आडकरानी खावी
आणि परसपर समाधाने असावे
यैस निवाडा करुन दिल्हा त्या
प्रमाणें श्री गंगातीर क्षेत्री
उपाधेपण व गणेश पूजण हे वृती
आपण अनभवीत आहो आपले
वृतीसी जोसीयासी समंध नाही.

याप्रमाणें उभयेतानी आपला करीने तपसीले लेहून दिल्हे आहेत तरी तुम्ही गोत देसक व वैराट क्षेत्रीचे ब्राह्मण थोरथोर स्मार्थ वैशाव व बारा बलुते मौजे धोम प्रा मार यैसे श्री गंगातार क्षेत्री देवाचे देवलासनिध अवघे मिलोन गोत सभा करुन वीठल जोतीसी व अपदेभट अडकर या उभायेताचे राजीनामे व जमान घेऊन दोघाचे करिने तपसीले मनास आणून लेहून घेणे आणि कागद पत्र वृती समंधे उभयेता जवल जे असतील ते मनास आणून धर्मतारास्ती मनसुफी तुम्ही आपले बेतालीस स्मरोन कोणाची रयात न करीता गोही साक्ष व शफता घालून विचारणे आणि दोघाचा निवाडा करणे त्याप्रमाणे जो खरा होईल त्यास महजर करुन देऊन बैखर तपसीले हुजूर लेहून पाठवणे त्यावरून मनास आणून ज्याची वृती खरी होईल त्याची वृती त्यास देऊन तोवरी श्री गंगातीर क्षेत्रीचे उपाधेपणाची कमावीस अमानत दिवाण निसबतचा भट ठेऊन उपाधेपण चालवणे जोसी यास व अडकरास होऊन देणे व मौजे धोम येथील गावातील ही उपाधेपणाची कमावीस अमानती चालवणे जोसी यासी दखल होऊ न देणे रा छ ४ माहे जमा दिलावल—

क्रमांक–६ सु. ११२४ जिल्हेज १८
पे. द. शा. रो. रु. नं. १ श. १६४५ भाद्र व. ५ रविवार
पुडके १५. इ. १७२३ सप्टं. ८

गणोजी बिन सोनाजी सितोळे व मानाजी बिन नागोजी सितोळे या उभयतामध्यें मौजे न्हावी प्रा पुणे च्या मोकदमी विषयीं वाद लागला. वतन उभयतामध्यें विभागण्यांत आले. निवाडयातील पुढील उतार प्रक्रियेच्या दृष्टीनें महत्वाचा आहे––

.....त्यावरुन अनुचे घोमास गेलोमानाजी त्या स्थळास आला नाहीं. सा दिवस त्याची वाट पाहिली.....बलुते याणी थळकरी याजवळी पत्र मागितले त्यावरुन त्याणी थळपत्र करुन दिल्हे कीं मानाजी थळास हाजीर जाला नाहीं.....

क्रमांक – ७ सु. ११२४ रबिलाखर १४
पे. द. शा. रो. रु. नं. १ श. १६४५ पौष व. १ मंगळवार
पुडकें नं. १५ पृ. २१ इ. १७२४ डिसें. ३१

राजमंडल
रोज कीर्द
सुरु अर्बा (अशरीन मया व अलफ)
माहे रबिलाखर छ १४ रोज.

श्री.

किता वतनपत्र नागोजी वलद (संताजी) दलवी मोकदम व मल्हारी बिन रुपाजी गिरीमकर मोकदम मौजे अजनूज ताा पेडगांव प्रा कडीवलीत याणे हुजूर येऊन किले सातारियाचे मुकामी येऊन विनंति केली जे मौजे मजकूरचे वतन पुरात अपले आपण वंश-परंपरेनें अनभवीत अलो आहे येगीयासी सेट्याजी बिन रखमाजी व मुधोजी वलद मेखोजी (खीरसागर).....मौजे मजकूर याणे मौजे मजकूरचे मोकदक अपण म्हणून तक्लुफी निवाडपत्र शके १४९६ धाता संवत्सरेचे निवाडा मौजे येरंडोली पाा कडे सरकार जुनर ये जागा जाला आहे येसे निर्माण करुन कथला करु लागला येसीयास सेट्याजी व रखमाजी हणमंतराऊ निंबालकर सर लस्कर याकडे चाकर होते आपण ते समई अज नुजवे मुक्कासाबाबेचे खंडणी-बदल हणमत रायाकडे गेलो होतो तेथें त्याणी अपणासी + + + + + प्रसंग करावा तो न केला आम्ही खंडणी करून गावास गेल्यावरी खीरसागर आपण मोकदम (पृ. १ मागील बाजू) म्हणोन गावास कागद पाठऊ लागले त्यावरी मातुश्री मकाऊ मोसले जिंतकर यासीजाऊन उभे राहिले त्याही अपले वडिल अनुजी दलवी पाटील व बहिरजी गिरीमकर पाटील यास बोलाऊन नेले आणि मनसुफी करावयाबद्दल मौजे सीरसोफळ या गावी पंचाईत गोत दिल्हे त्यावरून आमचे वडिल व खीरसागर गोतात गेले याणी त्याणी राजिनामे व जामीन दिला हे वाईद्यास

अपले.....हजीर जाले खीरसागर गैरहजीर जाले तेव्हां सीरसोफळकर गोतानी दलवी व गिरीमकर खरे खीरसागर खोटे म्हणून आपले वडिलास पत्र करून दिल्हे ते घेऊन गावास आले त्या उपरी हणमंतराऊ निंबालकरचे + + + + + + + (येऊन) राहिले. तेथे मातुश्री मकाऊही आली ते जागा खीरसागर याणी अपली मनसुफी (करा) वी म्हणोन (पृ. २) त्याजवल प्रसंग केला त्याणी आपले वडिल अनुजी दलवी व हहीरजी गिरीमकर यास मसाले करुन अणून त्यास व खीरसागरास मौजे अर्वी मुधोळ थळ नेमून दिल्हे ते जागा सोला गावचे गोत जमा जाले त्याणी आपलें वडिलाजवळ जमान मागितला त्याणी पेशजी सिरसोफळी जामीन दिल्हा होता तोच खरा करून दिल्हा व खीरसागरास पेशजी जामीन दिल्हा होता तो देणे म्हणोन गोत बोलले तो जामीन पेशजीचा राहीना मौजे बबुर्डी पाा सुपे येथील पाटील जमान खीरसागर देऊ लागले त्यास बबुर्डी बेचिराखी बदल गोतानें कबूल केले नाहीं. दुसरा जामीन क्षीरसागरास नेमला तेव्हा गोताने अकरा रोज वाट पाहिली अखेर जामीन मिळाला नाहीं याबद्दल गोत उठोन अपलाले गावास गेले यावरी धामधुमीचा प्रसंग (मागील बाजू कोरी आहे. (पृ. ३) जाला अपली पांढर बेचिराख्व पडली आपण पडगावी जाऊन राहिलों नातवानही जालो या मध्यें धोडाजी देसपांडिये ताा मजकूर हे व खीरसागर एकत्र होऊन सखोजी व मालोजी निंबाळकर यास निमे मोकदमी विकत दिल्ही खरीदखत व महजर लिहून दिल्हा त्यात अधीनाव खीरसागर मोकदम त्या मागे अपण दलवी व गिरीमकर मोकदम येसे लिहून दिल्हे अलीकडे सन सलास अशरीन मया अलफ यासाली राजश्री सुलतानजीराऊ निंबाळकर सर लस्कर भूमचे मुकामी होते, तेथे खीरसागरानी त्यास सांगोन अपणास मसाला करून नेले देशमूख देशपांडिये यास कागद लेहून दिल्हा की मौजे अजून येथील मोकदमीचे वतन निमे आपण विकत घेतले आहे दलवी गिरीमकर खीरसागर तुम्हापासी पाठविले आहेती या त्रिवर्गाचा कजिया आहे याबदल यापासी जामीन घेऊन विल्हे लावणे म्हणोन कागद देऊन रवाना केले (पृ. ३ मागील बाजू) अम्ही त्याकडे गेलो त्याणी जमान मागितले यावरुन आपण मौजे वांघदरी येथील पाटील जमान दिल्हा खीरसागरानी दाहारोज जमान देतो म्हणोन वाईदा केला मुदती जमान दिल्हा नाही यास्तव ते वेळेस मनसुबी न जाली तो प्रसंग तसाच राहिला हाली खीरसागर हली हुजूर स्वामी सनिध हयाळ जाला त्यावरुन साहेबी मसला करुन हुजूर आणले येसीयास अपुला पूर्वापार भोगवटा मनासा अणावा व मौजे मजकूरची समाकुल पांढरी व बारा बलुते हुजूर आणून निवाडा केला पाहिजे म्हणोन विदीत केले त्यावरुन स्वामीनी राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान यास ईनसाफ करावयाशी आज्ञा केली त्याणी मौजे मजकूरची समाकुल पाढर व बाराबलुते यासी तलब करुन आणून तकरीरा लेहून घेतल्या त्यासी चौगुले व कुलकर्णी वगैरे बलुते याणी दलवी व गिरीमकर पुरातन वतनदार पाटीलकी करीत आले आहे ती साप्रत खीरसागर न्हावी कजिया करिताती, हे खरे अपणास श्री कृष्णेत उभे केले (पृ. ४) तरी आपण लिहिल्याप्रमाणें खरे करुन देऊन लिहून दिल्हे त्या उपरी खीरसागरास पुरसीस केली की तुमची हकीकत काय आहे ती जाहीर करणे त्यावरुन त्याणी तकरीत केली

की अजनूजची मोकदमी व नाहवकी व अवटकी व पांच चावर थळ पुरातन आपले त्यास आपण जातीचे नाहावी म्हणोन दलवी व गीरमकर आपल्या वडिलास रेटून मुकादमीचे वतन बळेच खातात नाहावकी आवटकी व पाच चावर थळ अनभवितो दीडशे वर्षाचे मौजे येरंडोली ता॥ कर्डे प्रा॥ जुनर या जागाचे वीथापयाचे बेदरचे पातशहाचे कारकीर्दीचे थलपत्र अपणाजवळ आहे ते मनास आणावे म्हणोन तकरीत केली आणि खीरसागर यानी येरडोलच्या थळपत्राची नकल आणून दाखविली ता॥.....बीत.....
निवाडपत्र शके १४९६.....(बनावट आहे म्हणून उतरले नाहीं.).....हे निवाडपत्र सही तरीख छ २९ माहे मोहरम. (पृ. ५ च्या अखेरीस पूर्ण होते.)

(पृ. ६)—सदरहू प्रमाणे थल येरंडोल येथील निवाडपत्राची नक्कल अणून दाखविली त्यावरी रा॥ प्रधानपंती पुरसीस केली की याचे असल कोठे आहे व हे निवाडपत्र जाल्यावरी तुम्ही वडिलानी हे निवाडपत्र दिवाणामध्यें दाखऊन दिवाणची सनद असनाद हे काय घेतली आहे आणि भोगवटा काय केला आहे तो सांगणे म्हणोन पुरसीन केली त्यावरी खीरसागर याणी तकरीर केली की दिवाणाची सनद असनाद व भोगवटा काही नाही सदरहू थळपत्रे आपले वडिल जाखोजी बिन काळोजी खीरसागर याणे बेदरच्या कारकीर्दीस पातशाहापासून हयाल होऊन येरंडोलीचे थल मागून घेऊन थली ईज्याणे याजबल देशमूख व जवारदार व मोकदम बैसोन निवाडा करून थलपत्र लिहिले त्यावरी थलपत्र अपला वडिल जाखोजी बिन कालोजी मागत असता पंचाईत व गोतानी अपल्या वडिलापासी मोतियाची जोडी उच होती ती मागितली आपले वडिलानी मोत्याची जोडी न दिली. थलपत्र टाकून गावास आले थलपत्र थलीच राहिली (मागील बाजू पृ. ६) यामुले दिवाणाची सनद होऊन भोगवटा करावा ते गोष्टी जाली नाही दीडसे वर्षे पावेतो भोगवटा जाला नाही हाली मौजे येरंडोली येथे ईथावे याचे वंशीचे आहेती त्याजवळ थलपत्र आहे ते वर्तमान आपणास कळले त्यावरुन येरंडोलीस जाऊन विथापे यांचे वंशीचे होते त्याजवल बजीद जालो आणि त्या निवाडपत्राची हे नकल घेऊन येथे दलवी व गिरीमकर याजवळ पाटिलकीचा कजिया करीत आलो आहे तरी आपले पूर्वोत्तर मनास आणून वरहक कजिया विल्हे लाविला पाहिजे म्हणोन तकरीर केली त्यावरी पंचाईतानी निवाडपत्राची नकल मनास आणिता निवाडपत्रात लिहिले आहे की जाखोजी बिन कालोजी दलवी मोकदम रखमाजी गिरीमकर खोटा यास वतनासी समंध नाहीं म्हणून लिहिले आहे परंतु पूर्वापार तकरीर व तकरीरात व भोग भोगवटा हे काही निवाडपत्राच्या नकलेत लिहिले नाही त्यावरुन फीरोन (पृ. ७)—पुरसीस केली की या नकलेची असल कोठे आहे ते आणून दाखवणें त्यावरी खीरसागर याणी सांगितले जे असल येरंडोलीच्या थली राहिली ती येत नाही म्हणून सांगितले त्यावरी पंचाईत मते आपले ठाई सदरहू निवाडपत्राचे नकलेचा शह नि शह करीता केला की या निवाडपत्रात मनसुबी सबबवार उगवली नाही देवराव हांडे देशमूख सरकार जुनर यांचे नाव पंचाईतीत लिहिले आहे तेथे सिका लिहिला नाही दस्तक म्हणून लिहिले आहे व

हुजूर बेदरच्या पातशाहापासी जाखोजी बिन कालोजी खीरसागर न्हावी फिर्याद जाला म्हणून लिहिले आहे त्यास बेदरची पातशाही बुडून तीनसें वरषें जाली देवराव हांडे देशमूख सरकार जुन (२) यासी मरुन वर्षे तीनसे जाली आणि महजरात शके व सन मनास आणिता दीडसे वर्षे जाली व मौजे अजनूज येथील थलकरी लिहिले आहेत त्यास अजनूजचे बारा बलुते हुजूर अणाले होते त्यास अजनूजचे बारा बलुते हुजूर आणले होते त्यास पुरसीस केला की खीरसागर याणी निवाडपत्राची नकल आणली आहे त्यात तुमचे कोणी वडिल पूर्वापार आहेत की नाहीं ते सांगणे त्यावरील थलकरी बोलिले बि तपसील

पृ. ७ मागील बाजू.... रामाजी गणेश कुलकर्णी अजनूज ..... शदेभाई वलव इस्माल मुला मौजे अज

नूज ..... भिकाजी महार मौजे अजनूज .....(यानंतर तकरीर घेण्यांत आल्या व त्यांत सर्वांनीं खीरसागराविरुद्ध साक्ष दिली) येणेप्रमाणे तकरीरा केल्या त्या तकरीरावरुन व बेदरची पातशाही बुडून तिनसे वर्षे जाली व देवराव हांडे मरुन तीनसे वर्षे जाली आणि महजरांत (पृ. ८) शक व सन आहे त्यास दीडसे वर्षे जाली त्यावरुन खीरसागर याणी महजराची नकल दाखविली ते तगल्पी येसे जाले व खीरसागर याणी तकरीर लेहून दिल्ही त्यात आपला भोगवटा दीडसे वर्षे नाही त्यास पाहता दीडसे वर्षापलीकडेहि दाखला नाही येरंडोलीच्या थळचे थलकरी गोत मोत्याची जोडी मागता होते काकरिता निवाडपत्र राहिले म्हनोन तकरीर केली तरी गोत पंचाईत मोतीयाची जोडीची लालूच करतील हें गोष्ट घडणार नाही हे पंचाईती मते जाले. दुसरी गोष्ट निंबाळकरानी निमे मोकदमी विकत घेतली ते समई खरीद खतात आधी नाव खीरसागर न्हावी मोकदम त्या मागे दलवी व गिरीमकर येसे लेहून दिल्हे त्याचाहि वंश अंदेशा पंचाईत करीता दीडसे वर्षा पलीकडे व अलीकडे मोकदमीचा खीरसागरास भोगभोगवटीयाचा कांहींच दाखला नस्ता दरम्यानें कजिया करीत होता कजिया विल्हेस लागला नव्हता आणि आपले नाव आधी लिहिले हे बारकल आहे येस्या दोनचार गोष्टीवरुन तहकीकात करिता खीरसागर खोटे जाले व तुम्ही दलवी व गिरीमकर खरे जालेत त्यावरी हे सविस्तर वर्तमान राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान याणी स्वामीस विदीत केले त्यावरुन स्वामीनें केला निवाडा मनास आणिला व पूर्वील महजर व कागदपत्र व बारावलुते यांच्या तकरीरा मनास आणता खीरसागर न्हावी खोटे लाईणी कथला करितात हे सत्य जाले.....

.....तुम्ही हरदोजण पुरातन वतनदार खरे जालेत याकरिता वतन समंधे तुमचे माथा सेरणी रुपये २५० करार केले असती याचा वसूल जिल्हेकडे देणे शके ५० शोभकृत संवछरे पौष बहुल प्रतिपदा भौमवासर छ १४ रबिलाखर येबिसीपत्रे....."

क्रमांक—८ सु. ११२५ रमजान २९
पे. द. शा. रो. रु. नं १ श. १६४६ ज्ये. व. ६ इंदुवासरे
पुडकें नं १६ पृ. नं. १२५ इ. १७२४ जून १

कुसाजी अनंत आस्वलायेन गोत्र गार्ग्य उपनाम प्रभुणे विरुद्ध आपाजी खंडो व रयाजी बाघोजी व जानो महादेव जोसी आणि अपाजी शामजी व अण्णाजी वेंकाजी आस्वालायेन गोत्र हारीत उपनाम अकलूजकर यामध्ये देशकुलकर्णी व गांव कुलकर्णी एकूण गांव ६३ प्रा॥ कुडाळ देखील बारा मुन्हे याविषयीं कजिया लागला जोश्यानी रवा दिव्य केले. (वतनपत्राचे एकंदर १० बंद आहेत. त्यांत पृ. ७ वर मागील बाजूस पुढील मजकूर आहे तो निबंधदृष्ट्या महत्त्वाचा आहे.)

.....येणेप्रमाणें करीना लेहून राजीनामे तिघानी लेहून दिल्हे या उपरी पाली ता॥ उंबरज येथे श्री. या स्थली दिव्य नेमून देऊन बराबरी जोत्याजी जाधव व देशाधिकारी यास पत्रे देऊन तुम्हास व तुमचे वादी यास पालीचे स्थलास पाठविले तेथे गेलीया उपरी दिव्यास मुहूर्त नाहीं याकरिता पंधरा दिवस अवधे तेथेच राहिले कृष्णाजी बलाल सुभेदार प्रा॥ सातारा यानी मुहुर्त पाहिला अपाजी खंडो व जानो महादेव याचे हात धोवायास बोलाविले ते समई बोलिले की अपाजीच्या हातास जालवात आहे जानोस चंद्रबल नाहीं तेव्हां तेथे अपाजी खंडोचा धाकटा भाऊ सीवाजी खंडो यास चंद्रबळ पाहून मजालस करून वैशाख वद्य पंचमी शनिवारी शिवाजीचा हात धोऊनु हाताची चिन्हे लेहून पिसव्या घालून लखाटा केला दुसरे दिवसी रविवारी शष्टी प्रातकाली मजालसी (पृ. ८)—स सुबेदार सातारा व येमाजी सिवदेव सुभेदार प्रा॥ व्याघ्रगड व शाहाजी सिंदे देशमूख प्रा॥ कुडाळ व बाजी चिकणे देशमूख ता॥ मेढे व स्थ(ल)करी समस्त गोत देखील मजालस करून तेलतूप कोलसे मोईन प्रा॥ व खेपात्र आणून येथारीतीने दिव्य सिथे करून सिवाजी खंडो याणे उचार केला की प्रभुण्या पूर्वी आपण देश कुलकर्ण व गाव कुलकर्णी वतनदार यैसे बोलोन दिव्य काढिले त्या उपरी तेच समई मागती हातास पिसवी घालून लखाटा करून सोमवारी सिवाजी खंडो व वरकड वादे यास बखैर लेहून देऊन सातारीयाचे मुकामी पंत प्रतिनिधी याजपासी पाठविले तिसरे दिवसी मंगलवारी प्रातःकाली मज्यालस करून पंत प्रतिनिधी याणी शिवाजीचा हात पहावयास आणिला लखोटा तोडून पिसवी काहाडिली हात पाहाता अनामिके बोटास नखासेजारील पीरास बाहीरल्या अंगे (पृ. ८ मागील बाजू) परा येवढा फोड आला वरकड च्यारही बोटे व नखाच्या भोवया देखील फुगल्या यैसे हाजीर मजालसीत देखोन रवा लागला खोटा जाला अकलूजकर तो मुतालिक त्यास तालुकाच नाही तेहि खोटे जाले तुम्ही खरे जालेत यैसे सर्वांचे मते जाले हे वर्तमान पंतप्रतिनिधी याणी स्वामीचे सेवेसी विदीत केले त्यावरुन सिवाजी खंडो यास आणून त्याचा हात पाहिला व अदवत तुमचा त्याचा करिता मनास आणिला आणि जोसी यास व अकलूजकरास आज्ञा केली की तुम्ही खोटे जाला देशकुलकर्णी व गांवकुलकर्णी वतनासी समंध नाही प्रभुणेयास येजीत खत लेहून देणे त्यावरुन जोशी यानी व अकलूजकरानी येजीत खते लेहून दिल्हे की .....
(विस्तृत माहिती आली आहे).....(पृ. ९) दिवाणाचा गुन्हेगार गोताचा

अन्याई येसी येजीतखते दिवाणच्या मुद्रा व हजीर मज्यालसीच्या साक्षीनसी लेहून दिल्हे ते तुमचे स्वाधीन केली.....”

(पृ. १०)—येकूण त्रेसष्ट गांव पैकी जोशी व अकलूजकर देश कुलकर्णी व गाव कुलकर्णी संवीस गाव चालवीत होते ते तुमचे तालुकातीचे सततीस गाऊ देखील तुमचे दुमाला करून हे वतन पत्र करुन दिल्हे असे.....वतन समंधे तुम्हापासुनु हरकी दुतर्फा देखील साहोत्रा बेरीज रुपये २००० बीाा.....करार केले असत.....

(या वतनपत्राची तारीख १ जून १७२४ ज्ये॥ व॥ ६ इंदुवासर श. १६४६ आहे.)

क्रमांक—९ सु. ११२५ सवाल २५
पे. द. शा. रो. रु. नं. १ श. १६४६ आषा. व १२
पुडकें नं. १६ पृ. नं. ७१ सोमवार
इ. १७२४ जुलै ६

१/४ रो रोजकीर्द
माहे सोवल छ २५ रोज सुरु खमस अशरीन
चिटणीसी पत्रे (मया व आलफ)
श्री

वतनपत्रे आषाढ बहुलनवमी भृगुवासरे गोविंद विठल व नारो कोंडदेऊ व .... उपनाम पोटे गोत्र विस्वामित्र सूत्र अस्वजलायेन देश कुलकर्णी व गावकुलकर्णी ज्योतिषी कर्यात नाणे घोल प्रा कऱ्हाड यास दिल्हे वतनतत्र ऐसे जे तुम्हामधे व सखो अनंत व गोविंद कालो उपनाम पोरे गोष्ट विस्वामित्र सूत्र अस्वलायेन यामध्यें काा मजकूरचे देशकुलकर्ण व गाव कुलकर्णाचा कजिया लागला होता म्हणोन हरदोजण वादी ये भांडत हुजूर स्वामी सनिध कील सातारी याचे मुकामी आलेत करिना सांगितला त्यावरीं स्वामीनी राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधी यासी मनसुबी करावयाविसी आज्ञा केली त्यावरून पंत प्रतिनिधी याणी हरदू यादी यास तकरीरा लेहून देणे म्हणोन सांगितले त्यावरून तुम्ही व सखो अनंत व गोविंद कालो (पृ. १ मागील बाजू) याणी तकरीरा केल्या वे तपसील.

तुम्ही तकरीर केली जे..... सखो अनंत व गोविंद कालो
.. .. याणी तकरीर केलीजे.....
....
(खुलासेवार माहिती दिली आहे)
....

(पृ. २)—येणेप्रमाणें तुम्ही हरदोजणानीं तकरीरा केल्या त्यावरुन समस्तगोत व हजीर मजालसीचे मते मनास आणिता हरदू वादी याचे पूर्वीला थले होऊन निवाडे जाहाले

आहेत दिवाणानी व गोतानी कागदपत्र करुन दिल्हे आहेत परंतु तुम्ही हरदू जणा निवाड्याप्रमा वर्तलेत नाही हाली निवाडा केला तरी सखो अनंत व गोविंद कालो हे यैकत नाही अतिशये करीतती या करिता दिव्य घ्यावे दिव्यामुळें इनसाफ होईल त्याप्रमाणें हरदूजणानी वर्तावे येसा निश्चय करुन गोतानी तुम्हा हरदोजणास पुसिले कीं दिव्य कोण घेतो त्यासी गोविंद कालो बोलिला जे आपण दिव्य करीन त्यावरी गोताचे मते येसे जाहाले कीं सखो अनंत व गोविंद कालो पश्चमवादी आहेत याणी दिव्य करावे यैसे नाही परंतु गोविंद विठल व नारी कोंडदेऊ येके वंशीचे असता गोविंद कालो म्हणतो कीं आपले वंशीचे नव्हत याचा आपला मूळ पुरुष येक नव्हे येसे म्हणतो खलवाद करीतो या करता गोविंद कालोनेच दिव्य करावे दिव्यामुले खरा होईल तो वतन खाईल यैसा निश्चय केला त्याप्रमाणें तुम्ही उभयेता वादी ये दिव्यास मान्य होऊन राजीनामे लेहून दिल्हे त्यावरी प्रतिनिधी पंती तुम्हा हारदूजणास का पाली ता उंबरज प्रा सातारा या स्थली श्री संनिध दिव्यास रवाना केले बराबरी मखदुम फरास जिल्हा ते पालीस गेलेत तेथे रा कृष्णाजी बलाल सुभेदार प्रा मजकूर व स्थळकरी गोत याणी जेस्ट शुद्ध द्वादशी शनीवारी गोविंद काळो यांचा हात धोऊन (पृ. ३ मागील बाजू, हतास पिशवी घालून दुसरे दिवसी त्रयोदसी रविवारी रव्याचीं सामुग्री मोईनप्रमाणे सीध करुन गोविंद कालो यास येथा विध दिव्य दिल्हे त्या उपरी हतास पिसवी घालून लखोटा केला तिसरे दिवसी सोमवारी तुम्हा हरदूजणास सातारियास पाठविले दुसरे दिवसी मंगलवारी पंत प्रतिनिधी याणी मज्यालसी करुन बाईचे व सातारियाचे देसक व वरकड मज्यालसी देखता गोविंद कालो याचे हातचा लखोटा तोडून पिसवी काढून हात पाहिला तो हाताचे बोटास येणेप्रमाणें फोड आले—

अनामिक बोटास पहिल्या पेरास मध्यमच्या संधीस पावट्या येवढा फोड आला

तर्जनी प्रथम रोस तुरी येवढा पुढें फोड आला १

अगुस्ट पहिल्या पेरास पुढें तुरी येवढा फोड आला १

१

मध्यम बोटास पहिल्या पेरास पुढें जौंधल्या येवढा फोड आला १

(पृ. ४) येणेप्रमाणे फोड अलेत हजीर मजालसीने पाहून सखो अनंत व गोविंद कालो यासी पुसिले की खोटे जाहालती की खरे जाहालती त्यावरी ते बोलिले की आपले हातास फोड आले आपण दिव्यास लागलो आपण खोटे आपणास देशकुलकर्णास व गांव कुलकर्णास समंध नाही देशकुलकर्ण व गावकुलकर्ण गोविंद विठल नारो कोंडदेऊ याणी खावे येसे बोलेन येजीजखत लेहून दिल्हे हेसविस्तर वर्तमान राजश्री पंत प्रतिनिधी याणी स्वामीस विदीत केले स्वामीनी गोविंद कालो याचा हात पाहिला तो खोटा जाहाला पूर्वा तर करीना मनास आणिता तुम्ही खरे येसे जाणून स्वामी तुम्हावरी (मागील बाजू पृ. ४) कृपालू होऊन .....वतनपत्र करुन दिल्हे आहे....."

क्रमांक—१०
पे. द. शा. रो. रु. नं. २
पुडकें नं. ३ पृ. २०

सु. १११७ मोहरम १५
श. १६४८ भाद्र. व. १ गुरुवार
इ. १७२६ सप्टंबर १

माहे मोहरम छ १५

वतनपत्र भाद्रपद शुध पूर्णिमा छ १४ रोज सुा सबा रखमाजी बिन विठोजी पाटील हवले आणि काशी जाधव यामध्यें मौजे रेठरे बु।। पा कऱ्हाड या गांवच्या पाटिलकी वतनाबद्दल वाद लागला शाहू छत्रपती यानी वादाचा निर्णय केला. कृष्णाजी विठल याने हरदू वादीस मौजे सीरसंगेपूर पा सुपे हे थळ नेमून दिले थलकरी यानी मौजे मजकूर येथील शिवधडे पाटील व बारावलुते याच्या सडीपत्राप्रमाणें निर्णय केला. थळीच्या निर्णयान्वये छत्रपतीनी हे वतनपत्र दिले आहे.

क्रमांक ११—
पे. द. शा. रो. रु. नं. २
पुडके नं. ३ पृ. १२२

सु. ११२७ रबिलावल २६
श. १६४८ आश्वि. व १३ बुधवार
इ. १७२६ आक्टो. १२

रो रोजकीर्द

छ २६ गावल चिटनिसी सुरु सबा (अशरीन मया व अलफ)

वतनपत्र अश्विन बहुल दशमी रविवासरे पराभव संवत्सरे विठोजी बिन जाखोजी नाग लोणारी मोकादम तिसरी तकसीम मौजे करजुणे पा परनेर मा हरिश्चंद्र यास दिल्हे वतनपत्र ऐसे जे तुम्ही बहीण कासाई गीती मौजे मलठणकर ईणे राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान याकडे सातारियाचे मुकामी येऊन विदित केले की आपला भाऊ विठोजी याचा व खडोजी सेलका पाटील मौजे मजकूर याचा वतन समंधे कजिया लागला त्यास + + येक दोन मनसुब +++ यावर ++ मनसुबीस कबूल न होता साहेबाजवळी अवरंगाबादेचे मुकामी उभा राहून विठोजीस व खंडोजीस मौजे जवळे येथील मुकामी त्र्यंबकसेटी मधरे याचे हाती देऊन इनसाफ करावयाची आज्ञा केली. त्याणी कसबे निघोज येथील मुकादिमासी मनसुबी दिल्ही तेव्हां निघोजकरानी पूर्वी वाजोलीस व आंबेगावी मनसुबी जाली तिचा दाखला पूर्ता न पाहाता पूर्वील हकीकत ध्यानांत न आणिता मौजे कान्हपूर पा मार या गावास कागद पाठविला तेथून पत्र आले त्याच्या लिहिलिया वरून पांढरीपासून श्री मलाई कसबा निघोज येथे क्रिया करविली त्याजवरी मनसुबी केली त्यास त्रिंबकजी सुतार मौजे करंजवणे याणे क्रिया केली यावरी तो बहु दिवसानी मृत्यु पावला तैसेच नावजी जाधव याचे बाइकोचे पोटातील मूल पडिले सखाजी निमसा याचा नातू अटवे दिवसी गोवराने मेला ऐसे असता खंडोजी सेलका खरा आणि विठोजी वाघ लटका करुन निघोजकरांनी अर्जदास्त साहेबास पाठविली आहे हाली आपला भाऊ वि(ठोजी) व वडिल बहीण कुसाई अटकेत ठेविली आहेत तरी साहेब धर्म परायेण रयतेचे मायेबाप आहेत या उपर आपला भाऊ

विठोजी व आपले आटकेत आहेत ते सोडून हुजुर आणावी व खंडोजी सेलका हुजुर आणावा तैसेच गावकरी यास हुजुर आणावे आण निघोजेस केला निवाडा चित्तांत आणून क्रिया केली त्याची कैसी जाली ते खरी खोटी मनास आणावी व पूर्वी मौजे वाजोली पा। नेवासे तेथे निवाडा जाली याचे निवाडपत्र व साडे.....मे रुपये खंडोजीन (पृ. २) गावकरी यासी देऊ केले त्याचे खत आपणाजवळी आहे ते मनास आणावे तैसेच जांब गांवचा बाज पाटील हुजुर आणऊन तेथील मनसुबीची हकिकत मनास आणावी आपला गर्दिचा इनसाक बरहक करुन निवाडा केला पाहिजे म्हणून विनंति केली त्याजवरून खंडोजी सेलका पाटील यास व तुझी बहीण कुसाई निघोजेस आटकेत होती तीस व गांवकरी यास हुजुर आणायाची आज्ञापत्रे सादर करुन हुजुर आणवले आण तुजला व खंडोजी सेलका यास जमानाविसी आज्ञा केली त्यास तूही हरदूजणानी अर्ज केला की निघोजेस जामिनी दिल्हा आहेत त्या खातर करून तेथील कतबे आणवावे तेव्हां तेथील जमान कतबे हुजुर आणून हरदू जणाचे जमाण करार केले बीाा.....

.....

..... येणेप्रमाणें हरदूजणाचे जमान खरे करुन हरदू जणास (मागील बाजू २) हकिकतीची पुरसीस केली त्याजवरून हरदूजणानी तकरीरा लेहून दिल्ह्या...

तकरीर विठोजी वाग लोणारी व त्याची बहीणी वडिल कुसाई ठेहरी (१) व दुसरी कासाई गिती मलठणकर

तकरीर खंडोजी सेलका १

हरदोजणानी तकरीरा दिल्या त्या घेऊन मौजे मजकूरचे थलकरी व बारा बलुते उभे करून पुरसीस केली त्याची तकरीरा लेहून दिल्या त्याजवरी बाजपाटील जांबगावकर पा। पारनेरी यास उभा करून बाजपुसी केली त्यास त्याणी तकरीर लेहून दिल्ही जे हरदूजण आपल्या थळास ईनसाफाबदल कैलासवासी बालाजी पंडित प्रधान याणी पाठविले ते आलियावरी भोवर गावीचे पाटील जमा केले व गोत बलुते मौजे मजकूरचे आणून ईनसाफास बैसले हकीकतीची बाबपुसी केली त्यास सर्वांचे मते बाजोलीचा निवाडा खरा करावा त्याजवरी इनसाफी जाले तो येकदोन गावीचे पटेल खंडोजी सेलका (पृ. ३) — याची पाठी राखोन च्यार गोष्टी बऱ्या वाईट बोलोन मजालसीतून उठोन गेले मग तैसेच राहिले म्हणोन तकरीर लेहून दिल्ही त्याजवरी हुजूर मजालसीस पाटील गाव गनाचे मनसुबीस बैसले होते त्याचे विचारे सदरहू तकरीरा वाचून बाजपुसी निराली निराली केली व पेशजी जांबगावी तकरीरा पांढरीने व बळीत्यानी लिहून दिल्ह्या त्या आणून वाचून पाहिल्या तेव्हा खरे मनसुबीचे निर्गलितार्थ पाहाता जाखोजी पाटील वाघ लोणारी निमे मोकदम वडिल याजवरी कसाला बजावाचा वस्तभावे.....त्याचा लोप गंगाजीचे वेळा वस्त भात्र पारनेरी मोतली दिवाण होता त्याणे नेली बजावास गावकरी गावकरी व खंडोजी सेलका येकत्र होऊन सभापत्र करुन बाहीर घातले अेसे बाजोलीस निवाडा होऊन खत व निवाड पत्रे जाले त्यास खंडोजी + + + + + + + + + यैशास खतावरी निवाडपत्रावरी बाजोलीचा कुलकर्णी त्रिंबक पुरुषोत्तम याचे बिकलम आहे ते खरे केली याने

गावकरी खोटे बाघ लोणारी खरे ऐसे जाले तेव्हा खंडोजीचा व गावकरी याचा मुचलका लिहून घेतला वाजोलीचा कुलकर्णी त्रिंबक पुरुषोत्तम याचे खरे जाले म्हणजे तुम्ही खोटे जालेस सारा वेहार तुमचा लटका लोणारी खरे तैसेच लोणारी ये गोष्टीस राजी आहेत म्हणून मुचालका व दोघाचे खत व गावकरी यांचे राजीनामे लिहून घेऊन गांवकरी आज्ञा दिल्ही त्रिंबक पुरुषोत्तम खरे अक्षर खरे करावयाची पत्रे वाजोलीस पाठविली त्रिंबक पुरुषोत्तम कुलकर्णी वाजोलीस आपले वतनाचे गांवचे कागद दप्तर यास हुजूर आले कागद पत्र होते त्यास पूर्वील हकीकत विचारीली त्याणे उतर दिल्हे की आपण लहान होतो तेव्हा वाजोलीस निवाडा जाला गंगाजी जवल खत आहे ते खंडोजीने व गावकरी याने काढून घ्यावे व जाखोजी वाघ यास खंड रुपये ६५० पडिले ते खंडोजीचे व गावकरी याने द्यावेसे जाले आपणास हकीकत ठाऊकी आहे खत व निवाडपत्र पाहिली यावर अक्षर वलखून सांगोन म्हणून त्यावरून त्रिंबक पुरुषोत्तम यांचे हाताचे दस्तुर आधी लेहून घेऊन साडेसासे रुपयाचे खत निवाडपत्र वाजोलीस जाले होते ते (पृ. ४) आणून दाखविले तेव्हा त्याणे अक्षर खरे म्हणून साक्ष दिल्ही मग खंडोजी सेलका यास हुजूर आणून विचारिले त्रिंबक पुरुषोत्तम कुलकर्णी वाजोलीचा होता तो आपले बिकलम खरे आहे अक्षर आपले म्हणोन दोन कागद वलखोन अर्ज करितो हे कैसे तेव्हा खंडोजी सेलका याची त्याणी रुबरु केली मग त्रिंबक पुरुषोत्तम कुलकर्णी याणे खंडोजीस परिछिन सांगितले की ये गोष्टीस तेवीस चोवीस वर्षे जाली तुम्ही खत लिहून दिल्हे वाजोली करानी हरदू जणाचा निवाडा केला आणि नाही कैसे म्हणतोस त्यावरून खंडोजी सेलका लाईनी होऊन कबूल जाला की आपण खोटा जालो या उपरी आपणास जो हुकूम करितील त्यास राजी असणे म्हणून राजिनामा लेहून देऊन सातारा अर्ज केला कीं खतात गावकरी यांचे नावे समस्त मायेवत (की किंवा मी ? = की) येकटाच आहे तरी गावकरी यांस फिरान आणून ते आपण येकत्र होऊन जो अर्ज करणे तो करून मग आपण निवाडा करावा त्याजवरून गावकरी यास तलब रोखे पाठऊन श्री मुकाम जेजुरी येथे आणिले वाटमे + + + + मनसुफी फावली नाही मग कसबे पुणे येथील मुकामी छ २० जिल्हेज सन.....मजालस करून गाव-गनाचे पाटील व अणखी मातबर र ॥ बापूजी श्रीपत व संताजी धायेभर व तुकोजी पवार व जानोजी ढमढेरे वगैरे मोकदम बैसऊन ताा....(—प्रांत पुणे पैकी निरनिराळ्या गांवच्या १३ मोकदमांचीं नांवें दिली आहेत.....

....)

(पृ. ५) येणेप्रमाणे पाटील मातबर व मातबर मजालसीचे लोक राजश्री बापुजी श्रीपत व संताजी धायेभर व तुकोजी पवार व जानोजी ढमढेरे वगैरे मुकादम बैसऊन तुजला व तुझ्या बहिणी कुसाई व कासाई यास व खंडोजी सेलका यास व गावकरी हुजूर आले त्यास सदरहू हकिकत इस्तकबील विचारिली तेव्हा तुम्ही व गावकरी खंडोजी सेलका याणी मान्य केले की आपणास पांचजण सांगतील त्यास राजी आहो धर्मता निवाडा करावा खंडोजीस गावकरी यानी कबूल केले कीं जाली हकीकत खरीच आपण पहिली उडवा उडीव केली खरीच परंतु

वाजोलीचे कागदपत्र खरे जाले म्हणून आपण खोटे जालो पुढें साहेबी इनसाफ रास्ती करावा त्याप्रमाणे राजी असो आज्ञा करनेल त्याबर हुकूम वर्तणुक करून म्हणून कबूल जाले तुमचा व खंडोजी सेलके याचा राजीनामा लेहून घेतला तैसेच मौजे मजकूरचे गावकरी हुजूर आले होते नावनिसी वि ॥ तपसील.....
....(एकूण १६ नांवांचा उल्लेख आहे)..... ...
यांचा राजीनामा हुजूर घेऊन तुम्हास व खंडोजी सेलका व गावकरी यास निराळे निराले बैसावयाचे आज्ञा केली आणि मजालसीचे लोक त्यास व मातबर पाटील वतनदार होते त्यास आज्ञा केली कीं करीना ये जातीचा आहे त्याचा निवाडा आपले सत्य स्मरोन करणे ते समई सर्वांनी पूर्व हकीकत व तकरीरा तुम्हा दोघांच्या व गावकरी यांच्या पहिले निवाडे जाले त्याचा मोझा चीत्तांत आणून ईनसाफ केला जे जाखोजी पाटील वाघ लोणारी याचे घर बजावाचे व-स्तभाचे मुले बुडाले गंगाजी बजाबाचा लेक (पृ. ६) याणे दावे दंद करून वस्तभाव पाहाता मोगलाई दिवाण पारनेरी होता त्याणे नेली हे वाजोलीच्या निवाड्यावरून खरे जाले आंबगावी इनसाफ होता येकदो पाटिलानी खंडोजी सेलका याची पाठी राखोन उठोन गेले तेथे इनसाफ वाजोलीचे निवाडी यावर चौघानी आणिला होता सा (क्ष) मोझा बाजी पाटील जांबगावकर याचे तकरीरेने आला निघोजेचे मनसुफी जाली तेव्हा पांढरीने क्रिया जाकईचे देवलात केली (त्या) तून येकदोघास क्रिया लागली कानूरकराचा कागद तो पहिले नवगावकर जांबगावी मनसुपीस बैसीले होते लबाड म्हणून त्यांचे ते मान्य होऊन राजिनामे लिहून दिल्हे ईतक्या गोष्टी जालियावर वाघ लोणारी याचे वतन खंडोजीनें व गावकरी यानी पैका न दिल्हा बजावाचे वस्तभावे मुले बजावास बाहेर घातले ते वाघानींच घातलेसे नाही खंडोजी व गावकरी या सर्वांनी समापत्र करून बाहेर घातले ते समापत्र ही खरें आहे यास्तव आपले विचारे नीवाडा केला बी ॥ तपसील...
.....(निवाड्याचा तपशील विस्तृत दिला आहे)..... .....
.....(पृ. ७ वर) येणेप्रमाणे निवाडियाचा तह करून तहनामा गोपाळ रामाजी देशपांडिये प्रा पुणे याचे हाते लेऊन हुजूर अर्ज केला व तहाचा कागद आणून दाखविला सदरहू प्रा वाचास व सेलके यास व गावकरी यास व कुलकर्णी यास (आ) ज्ञा करावी म्हणून त्यावरून तहनामा ध्यानात आणून तुम्हास व खंडोजीस व गावकरी याणी राजिनामा लेहून दिल्हा त्यास उभे करून तहनामा लेखकांनी वाचून दाखविला त्यास व सेलके गावकरी सदरहू तहनामे प्रमाणे राजी होऊन वर्तीयास मान्य जालेस खंडोजी सेलका याणे ते समई + + पाटीलकी ते दोघाची थोरात येक तक्षीम व जांबेऊन बाकी दोनी तक्षी राहिली त्यास निमे मुकादमी वडिलपण पुरातन तुमचे चालत आले आहे त्याप्रमाणे तुम्ही करणे निमे आपण करून म्हणून आपले येजीत पत्र साक्षी मोझ्या निसी अबाजी शंकर कुलकर्णी मौजे मजकूर याचे अक्षरानिसी तुम्हास लेहून दिल्हे अैसा निवाडा धर्मता न्याये जाहालिया वरी खंडोजीचे येजीजखत पंडित मशारनिले याने आणून पाहून निवाडपत्र तुम्हांस करून दिल्हे आणि स्वामी सनिध सविस्तर विदीत केले त्याजवरून स्वामी तुजवरी कृपालू होऊन तुजला वतनपत्र करून दिल्हे आहे तर तू मौजे

मजकूरचे मुकादमीचे वतनात सुलतानजी थोरात या घडी येक तक्षीम वजा होऊन बाकी दोन तकसीमा मुकादमी राहिली त्यास निमे मोकदमी वडिलपण पुरातन चालत आले याप्रमाणे अनभऊन सुखरूप राहणे. खंडोजी शेलका दोन तक्षीमा निमे तक्षीम मोकदमानी.....अनभविली या उपरी तुझे तिसरे तकसील मोकदमी वडिलपण पुरातन चालत आले आहे त्याप्रमाणे तूं करी त्यास त्याचे वंशाचा जो कोणी कथला करतील त्यास कथला करायास अर्थाअर्थी समध नाही तरी तू मौजे मजकूरची मोकदमी तिसरी तकसांम वडिलपण पुरातन चालत आल्याप्रमाणे पुत्र पौत्रादि वंशपरंपरेने अनभऊन सुखरूप राहाणे खंडोजी सेलका (पृ. ८) याजपासी पूर्वील कागदपत्र थलो थलचे अगर हुजूरचे असतील ते व बजावच्या वौशा वल जे कागदपत्र वस्ता भावेचे या लिगाडाचे जे असतील ते रद असेत बजावाच्या वंशास तुम्हासी कथला करायास गरज नाही तुम्ही सदरहूप्रमाणे तिसरी तक्षीम वडिलपण मुकादमी पुरातने तुझे चालत आसेल त्या प्राा अनुभवणे याची पत्रें..... ..

१ विठोजी बिन जाखोजी याचे घतनपत्र

१ देशमुख देशपांडे पाा पारनेर.

१ देशाधिकारी व लेखक व प्रांताधिकारी

.....

पत्रे अश्विन बहुल दशमी रविवासरे —.

क्रमांक १२— सु. ११२७ रबिलाखर ६

पे. द. शा. रो. रु. नं. २ श. १६४८ मार्ग. शु. ७

पुडकें नं. ३ पृ. ८. इ. १७२६ नोव्हें. २०

सुाा रबिलाखर छ ६ सबा अशरीन मया व अलफ

मौजे पिंपलगांव ताा सांडस प्राा पुणे या गांवचे पाटिलकी विषयीं थोरात आणि पगडे यामध्यें वाद लागला. त्याचा निवाडा बाजीराव पंडित प्रधान यांनी केला. उभय पक्षाकडून लेखी पुरावा न आल्याने वतन सारखे विभागण्यांत आले. ..... कित्येकांनी तुमची गोही दिल्ही परंतु गोताची कागदपत्रें कोणाजवळही नाही येसे जाले ..... पंतप्रधान याचें निवाडपत्राप्रमाणें छत्रपति शाहूराजे यांनीं हे वतन पत्र दिले आहे.

क्रमांक—१३ सु. ११३४ जमादिलाखर १
पे. द. शा. रो. रु. नं. ४ श. १६५५ कार्ति. शु. ३ सोमवार
पुडकें नं. १ पु. ८१ इ. १७३३ आक्टो. २९

राजमंडळ

माहे जमादिलाखर कार्तीकमास रोजकीर्द
तेरीख १ रोज (श्रुतृतीया) सुरु आबा सलामीन
इंदुवासर मुकाम शाहू नगर (मया व आलफ)
ताा छ ४ मीनहू * १।१०

संताजी बिन मकाजी व सयाजी बिन हिरोजी व सीवाजी बिन पुंजाजी व केरोजी बिन सखोजी (पाटील) आटोळे...फाटले...(तक्षिम तिसरी) मौजे सिरसोफळ पाा सुपे यासी दिल्हे वनतपत्र ऐसेजे तुम्ही साताराचे मुकामी स्वामी संनिध विनंती केली की मौजे मजकूरची मोकदमी तिघा भावाची वडिल बजाजी बिन तुकोजी आटोळे त्या धाकटे आपण आपणा धाकटे सीरसोजी बिन अबाजी आटोळे ऐसी यास आपले तक्षिमेमधे आपण वडिल त्यास आपला धाकटा भाऊ माणकोजी बिन मेऊजी आटोळे आपणासी (पु. १ मागील बाजू)-वडिलपणाचे भाऊपण भांडीत आहे तरी साहेबी त्यास हुजूर आणून आपला इनसाफ केला पाहिजे म्हणून विदीत केले त्यावरुन माणकोजी मजकुरास हुजूर आणून तुम्हा हरदुवादी यांच्या तकरीरा घेतल्या बी ताा

तकरीर कर्दे दाा केरोजी बिन सखोजी पाटील आटोळे तकरीर केली आहे ऐसीजे आपला मूळ पुरुष.....(वंशावळ दिली आहे).....(पृ. २) माणकोजी पाटील याणे कटकट केली म्हणून काकोजी व माणकोजी पाटील माहादाजी पाटील याचे पिंपरीस गोतात गेला तेथून गोताने गावास सडी पाठविली की श्रीच्या देवळात विहीर आहे तेथे स्नान करुन श्रीच्या देवली रंग सिलेवरी बैसोन वडिल कोण धाकटा कोण लिहोन पाटविणे त्यास गांवकरी यानी विहरीत स्नाने न करिता देवली न बैसता गांवाबाहेर मालावरी बैसोन लटकी सडी लिहोन पाठविली त्यावरुन पिंपरीचे निवाडपत्र व ठाण्याचा महजर माणकोजीने करुन घेतला.....
.....पृष्ठ...३...वर... ही.....
तकीर.....संपते.....
....हे तकरीर सही.

तकरीर कर्दे बाो माणकोजी बिन मेरुजी पाटील आटोले तकरीर केली ऐसीजे.....
.....(पृ. ४ वर संपते).....हे तकरीर सही—

* ही तारीख मागून घातली असावी

सदरहूप्रमाणें हरदो जणा तकरारी घेऊन वर्तोवयाचे जमान घेतले बी–तपसील.....
.....येणेप्रमाणें वर्तावयाचे जमान घेऊन हरदोजणास पुरसीस केली की तुम्ही कोणे गोष्टीस राजी आहा ते सांगणे त्यावरुन हरदोजण बोलिले की तक्षीमदार (पृ. ४ मागील बाजू) भाऊ व समाकुल पांढर सांगेल त्यास राजी असो म्हणोन हरदो जणानी राजीनामे लिहोन दिल्हे त्यावरुन तक्षीमदार भाऊ व समाकुल पांढर हुजूर आणिली बी तपसील—

भाऊ आटोले किता आसामी बलुहते

..... (तपसील) .....

(पृ. ५)—येणेप्रमाणें भाऊ व समाकुल पाढरी आणून त्यांच्या माथा सत्यसकृत बेतालीस पूर्वजाची शफत घालून नरककुंड वोढून त्यात उभें करुन पुथुकाकारे पुसीले की वडिल कोण धाकटा कोण हे सांगणे त्यावरुल त्यानी पृथकाकारे सांगितले त्यास अवधीयाची साक्ष येकच गुदरली जे.....(पृ. ५. मागील बाजू-).....
... .काकोजी व माणकोजी दोघेजण भांडत ठाणीयास आले ठाणाहून महादाजी पाटीलाचे पिंपरीस गोत दिल्हे त्यावरी दोघेजण गोतात गेले तेथे तकरीरा व जमान व राजी नामे देऊन हरदूजण पांढरीस सडी घेऊन आले सडिमध्ये लिहिले होते की श्रीच्या देवलांत विहीर आहे ती मधे स्नान करुन रंगसिलेवर बैसोन वडिल कोण धाकटा कोण हे लिहोन पाठविणे म्हणून सडी आली त्यास माणकोजीचे भाऊ रेखोजी आटोळे वगैरे भाऊ (पृ. ६.) राजुश्री रंभाजी निंबाळकर यापासी चाकर होते त्याच्या चित्तांत आले की आपण धाकटे ऐसी सडी देतील याकरितां त्याणी गावावरी दावे केले गावच्या मीरासदाराचे व भावाचे कान कापले गुरेढोरे नेली दहशत घातली याकरिता देवलात न बैसता वेगले मालावरी बैसोन वडिल धाकटे न लिहिता भोगवटीयाची सडी काळ्या माणकोजीची दिल्ही त्यावरुन पिंपरीचे निवाडपत्र आले त्यावरी केरोजीचा चुलता हिरोजी आटोळे याणी सुप्यास दलसिंग फौजदार याकडे जाऊन माहाद पाटलाचे पिंपरीचे वर्तमान सांगितले होत्याचे नव्हते जाले तरी साहेबी आपले तक· सीमदार भाऊ श्री च्या देवलांत घालून..... ..पुसिले पाहिजे म्हणोन सागितले त्यावरुन तुलाजी पवार नायेब फौजदार व देसमुख देसपांडे कुरकुंबास घेऊन येऊन दो तक्षिमातील साता भावास (पृ. ७)–श्रीच्या देवलात घालून वडिल धाकटा कोण म्हणून पुसीले त्याणी सांगितले की गोरा हिरोजी वडिल काला हिरोजी धाकटा त्यावरुन कुरकुंबाचा महजर केरोजीच्या वडिलास करुन दिल्हा केरोजीचे घर व इनाम उजवेकडे आहे माणकोजी घर इनाम डावेकडे आहे सांप्रत साहेबी शफत घालून पुसिले तर केरोजीचे घर वडिल माणकोजीचे धाकटे म्हणून समाकुल पांढर व भावानी साक्ष दिल्ही सदरहू साक्ष मनास आणता माणकोजी आटोळे यास पुसिले की भावानी व पांढरीने साक्ष दिल्ही त्यामध्ये तू धाकटा म्हणून सांगितले या उपरी आपले वडिलपण कैसे खरे करुन देतोस ते सांगणे त्यास माणकोजी बोलिला कीं या उपर साक्ष तो पुरत नाही पूर्वी गावाची वाटणी करुन तिघा तक्षीमदार भावाची समजावीस केली ते वेळचे

कागद तिघा भावाजवळ तीन आहेत त्यास आपल्यापासी कागद होता तो गेला (पृ. ७ मागील भाग कोरा) पृ. ८ —त्याची नक्कल आहे ती आणून दाखविली त्यावरी बजाजी आटोळे यास पुसीले की तुम्हापासी असल पत्र आहे ते दाखवणे त्यास बजाजी आटोळे बोलिले की आपणापासी कागद नाही यावरी सीरसोजी बिन आबाजी आटोळे यास म्हटले की आपला असल कागद दाखवणे त्यावरुन त्याणे आपला असल कागद आणून दाखविला तो मजालसीने चौकसीने पहाता त्यातील कलमे बी तपसील--

काजीच्या सिक्यात ..... फलाणा
काजी ऐसे सर्वत्र त्याहावयाची पधत
आणि या सिक्यात दादेवरगाह
असमुला म्हणून लिहिले या वेगले
काजीचे दस्तक करावयाची पधत
मजमुनमत नवयान वा मैस्त, असे
दस्कत मोहरे ग्वालते करावे त्यास
या कागदास दस्कत नाहीं.

(पृ. ८ मागील बाजू)
— मोहरे वरते बहजूर काजी हेदरशा
म्हणोन लिहिले आहे व तें दस्तकात
नाव येक मोहरेत नाव दुसरे व
पारसी दस्तकात काजी आपले नांव
लिहित नाही. मोहरेत मात्र नांव
असते आणि येथे दस्तकात नाव
लिहिले आहे व महजर पाहाता
चौऱ्याहातर वरसाचा काजी हैदर
मेले त्यास चौऱ्याहातर वरसापेक्षां
वरसे फार जाली आहेत व मोहर
तगलुफी नाव तगलुफी हे जाबी
ता कलम १

दुसरे कलम महजगत सदरी
नाव मेरुजी विघन हिरोजी
ग्वालते निवाडा करून
सिरसोफळ चाहक तिघानी
ग्वाणे म्हणूनेत लिहिले तेथे
नावे बकोजी १ हिरोजी १
पालबाजी १ यामध्ये हिरोजी
म्हणून लिहिले असे यामुळे बातल
दिसते..... कलम १

तिसरे कलम महरजात मजकूर
रायाराव याचे वेलेचा अमल
सिदी हकीम गावास आला व
देशमुख व देसपांडे गावास आले
म्हणून लिहिले त्याचे नावे
नाहींत कलम १
चौथे कलम सदरी नावे बकोजी
व येऊजी वा माल्होजी या
तिघांची लिहिली आहेत आणि
मजकुरात जागा जागा लिहिले
की याच्या मुलानी गरगशा
केला व मुलानी समाजोन ग्वाणे
ऐसे लिहिले त्यास ज्याची नांवे
वरती लिहिली आहेत तेच मज-
कुरात असावी त्यास मुले
त्याहावयास कारण काय यामुले कृत्रीम
..... कलम १

येकून चौकल मानी खीरसोजी-जवळ महजर होता तो कृत्रीम जाला त्यावरी माणकोजीस पुसीले की सिरसोजी पासील तुझे नकलेचा असल महजर (पृ. ९) होता तो खोटा जाला पांढरीचे साक्षीनेहि तू धाकटा जालास या उपरी विचार काये तेव्हां माणकोजी बोलिका की पांचजण सांगतलेल त्याप्रमाणें आपण वर्तणुक करून त्यास पांचाच्या विचारें जाले की भावाची व पांढरीची साव पुरली जे केरोजीचे घर वडील माणकोजी धाकटा सिरसी फला खेरीज बाहेरील वतनाचें गांव गोजेवावीकराजीच्या वडिलाची जोडवृत्ती व रावणगाव माणकोजीच्या वडिलाची जोडवृत्ती गोजे बावीस माणकोजीस समंध नाहीं रावणगावास केरोजीस समंध नाही मूलपुरुषाचे वतन सीरसोफल त्यामध्ये वडिल बजाजी बिन तुकोजी आटोले त्यामागे मधील तक्षिमेत वडिल संताजी बिन मकाजी व सयाजी बिन हिरोजी व सिवाजी बिन पुजाजी व केरोजी बिन सखोजी यामागे सेवटील तक्षीम सिरसोजी बिन अबाजी आटोले येकून तीगई तीन तकसिमा तिघानी खाव्या मधील तक्षिमेच्या वडिलपणाचे मानपान नाव नांगर तश्रीफटिला विडा होलीची पोली व सिरालेसेट व पोल्याचे बैल व दसरीयाचे वाजवणे दिपावलीचे वोवालणे व सेवधर संताजी व सयाजी व सीवाजी व केरोजी आटोले याणी घेत जावे जमा माणकोजी आटोले याणी मधील तक्षिमेत निमे भाऊपणा ईनाम व बाबे जमा घुगरी निमे घेत जावी व निमे इनाम व बाबेजमा घुगरी केरोजी आटोले याणी घेत जावी ऐसा विचार पांचानी करुन हुजुर विदित केले त्यावरुन मनास आणून मौजे मजकूरचे मधील तिसरी तकसीम पाटिलकीचे वतनाचे वडिलपण तुमचे खरे ऐसे जाणोन स्वामी तुम्हावरी कृपाळू होऊन हे वतनपत्र करून दिल्हे असे..... (पृ. १०) तुमचे माथा वतन समंधे शेरणी रुपये ५००० पांच हजार दुतर्फा कुलबाब करार केले असेत याचा वसूल देऊन जाब देणे येविसी पत्रें अश्वीन बहुल चतुर्थी इंदुवार प्रभादी संवत्सर.

क्रमांक १४
पे. द. शा. रो. रु. नं. ५
पुडकें नं. ४ प. ८१

सु. ११३७ साबान ७
श. १६५८ मार्ग शु. ९ मंगळवार
इ. १७३६ नोव्हें. ३०

राज मंडल रोजकीर्द

माहे साबान मार्गशीर्ष माम नलसंवत्सरे

सुा सबा सलासीन
१।४ (मया व आलफ)

तेरीख छ ७ रोज माहे मजकूर शुध नवमी
भौमवासरे मुकाम शाहूनगर दोन प्रहरा उपरांतीक राजश्री
स्वामी फसटणचे स्वारीस गेले छ मजकूर शु नवमी उपरांतीक दशमी

वतनपत्रे नरसिंगराव बिन सोन ठाकूर ईबिन संभ ठाकूर जगथाप चौगुले मौजे वाल्हे ता। निरथडी पा। पुणे यास दिल्ही वतनपत्रे ऐसीजे तुम्ही साताराचे मुकामी स्वामी संनिध येऊन विनंती केली की मौजे मजकूरचे चागुलकीचे आपले वतन त्यास आपले वडीली वतनाचे मुतालकीस पूर्वी मराळ चाकर ठेविले होते ते मुतालकी करीत असता आपले बाप सोन ठाकूर लाहानपणापासून महाराज राजश्री थोरले कैलासवासी स्वामी संनिध हुजूर सेवा करुन राहिले त्यास दुसरा भाऊबंद कोणी वतनावर राहावयास नव्हता मराळ वतन चालवीत असता पातशाहा औरंगजेब तुलापुरास आले येवनाक्रान्त राज्य जाले महाराज रायगडीहून मोगलाईत गेले ते समई आपले बाप सोन ठाकूर माहाराजसमागमे गेले पुन्हा महाराज स्वराज्यास आलियानंतर सोन ठाकूर याणी मरालास बोलाऊन आणून चौगुलकीचा हकलाजीमा मागो लागले त्यास मरालानी रेटाईची गोस्टी सांगितली त्यावरुन आपण मरालास बोलिलो जे तुम्ही आपले मुतालीक येसे असता रेटाई काये निमित्य करीता त्यावरुन जावजी व माणकोजी मराळ हे राजश्री बाजीराव पंडित प्रधान याजकडे पुणाचे मुकामी जाऊन (पृ १ मागील बाजू)—फिर्याद जाले आणि आपणास तलब करुन वाल्हाहून पुण्यास नेले तेथे राजश्री प्रधानपंती पुरसीस.....(लागत नाहीं).....(काळे झाले)...

.....लिहून घेतल्या आणि गोही साक्षी कोणी आहेत ऐसे आपणासविचारले त्यास आपण बोलिलो जे आपले कारकीर्दीचे कोणी गोही साक्ष नाहीत कागदपत्र आपणा पूर्वील जवल होते ते राजक्रान्तीमुले गेले परंतु आपले वतन खरे येविसी आपण दिव्यास मान्य असो त्यावरुन सभा नाईक बोलिले जे मौजे मजकूरची समाकुल व पांढरी व भोवरगावीचे गोत अणून पीर मेख़सला मुकाम कसबे पुणे याचे दरगाहमध्ये घालून त्याचे माथा पिराची उदी ठेऊन पुसावे जे वदतील त्याप्रमाणे उभयतानी वर्तावे यैसा सिद्धांत करुन उभयेता.....लेहून घेतले आणि दशरात्र पंचरात्र नेम करुन उभयतास वर्तावयाचे जामीन मागीतले त्यावरुन आपण रा। पिलाजी जाधव मोकदम मौजे वाघोली ता। हवेली पुणे यास जामीन दिल्हे व मरलास जामीन सिंदे मोकदम मौजे पांगोरी तर्फ नीरथडी हे जाहाले उभयेतानी जामीनदाराचे कतबे लेहून देऊन समाकुळ पांढर मौजे वाल्हे व भोवर गावचे गोत आणून छ २० मोहरम शके १६५३ विरोधीकृत संवत्सर आषाढ बहुल सप्तमी बुधवारी पीराचे दरगहा मध्यें गोत घालून त्यांचे माथा पिराची उदी ठेऊन पुरसीस केली ते समई गोतानी मरालाची गोही दिल्ही त्यावरुन मरालास येजीदखत लेहून द्यावयाविसी प्रधानपंती आपणास आज्ञा केली तेव्हां आपण बोलिले क्रियेचे दिवपासून दशरात्र पंचरात्र अवधी गुजरल्यानंतर जो सिघात होईल त्याप्रमाणे वर्तणुक करुन परंतु त्या प्रसंगी आपली गोस्टी न चालिली प्रसंगानुरुप आपण येजीद खत लिहून दिल्हे आणि बोलिलो जे गोहीदारास दशरात्र पंच रात्रीचे अवधी मध्यें काही खताख्यानत जाली म्हणजे पुन्हा आपला इनसाफ करावा लागेल यैसे समस्त सभा व गोत यांचे समक्ष आपण बोलिलोन येजीत खत दिल्हे त्या उपरी क्रियेच्या दिवसापासून दशरात्र पंचरात्र पर्यंत आपण चौकसी करीत असता पधरा दिवसा मध्ये गोहीदाराकडे येणेप्रमाणे मुदे साबूत केले वि तपसील.

म्हालोजी दात्यार रया मौजे वाल्हे याचा भाऊ येदाजी दात्या (र) याचा लेक..... .....येच्या दिवसापासून दाहावे दिवसी मगलवारी मयत जाहाला विद्यमान मकाजी तोडकरी दि ।। रा येसाजी गायकवाड मोकासदार खासगी मुदा १ मकाजी रण नवरे पाटील मौजे राला कर्यात सासवड ई।। पासून तेरावे दिवसी श्रावण शुध्द (त्रीतीया) बुधवासरी मयत जाहाला मुदा १ याम गोही सिदोपंत कुलकर्णी मौजे मजकूर.

येणेप्रमाणे दोन खून जाहाले तहकीक करुन आपण पुणाचे मुा। प्रधानपंताकडे जाऊन हे वर्तमान विदीत केले.....गोहीदार दशरात्री पंच रात्रीचे अवधी मधे क्रियेस खरे उतरले नाही..... या उपरी आपला इनसाफ येथान्याये करावा त्यावरुन पंडित मशारनिलेनी आपण (पृ. २ मागील बाजू)—स मरालास आज्ञा केली की तुम्ही हरदूजण वादे श्री कृष्णेच्या दिव्यास रजावद होऊन राजीनामे व जामीन देणे.....(लागत नाहीं काळें झालें)..... पेशजीचे हरदोजण जामीन कारार करुन राजीनामे लेहून दिल्हे त्यावरी प्रधानपंती आज्ञा केली जे प्रस्तुत दसरा करावयास हरदूजण आपलाले घरास जाणे दसरा करुन अश्वीने पूर्णिमेकारणे हाजीर होणे त्यावरुन घरास गेलो दसरा धरी करुन हरदोजण पुण्यास हाजीर जालो तेथे येकदोन रोज जाले पुढें कृष्णेच्या दिव्यास आज्ञा घेऊन जावे तो मरल गैरहाजीर जाले त्या उपर आपण अर्ज केला जे वादे गैर हाजीर जाले पुढे आपणास काये आज्ञा त्यावरून मरलास मागती तलब करुन आणिले आणि श्री कृष्णेचे दिव्य मरलाने करावे दशरात्र पंचरात्रीचे अवधींत क्रिया लागली अथवा न लागली तरी जे आज्ञा करणे ते करावी यैसा सिद्धांत केला तो मागती मरलानी पंधरा रोजाचा निरोप घेऊन आपल्या घरास गेले परंतु केल्या नेमास न आले मागती तलब केली परंतु हाजीर न जाले आपण पुण्यातच राहिलो तेव्हा रा अंबाजी त्रिंबक पुरंधरे आपणास बोलिले जे तुम्ही आपणा समागमे राजश्री स्वामीकडे हुजूर येणे तुमचा व मरलाचा इनसाफ हुजूरच होईल यैसे बोलोन पुण्याहून माहाराजा सनिध घेऊन आले (आणी) सदरहू जालाकरिना महाराजास निवेदन (केला) .... हुजूर अर्ज केला की आपला वादी हुजूर आणून बरहक इनसाफ (पृ. ४) करावा त्यावरुन स्वामीनी प्रधान पंतास आज्ञा करुन मरालास तलब करुन हुजूर अणविले आणि विज्या दशमीचे दिवसी श्री कृष्णेचे दिव्य करावयास जावयाची आज्ञा केली जावयाचा करार जाहला यैसे असता अश्वीन शुध नवमीचे दिवसी मरल आज्ञा न घेता पलोन गेले ते वाड्यास जाऊन रातोरात आपली (मुले मानसे) तेथून काढून मौजे मालसीरस पा। सुपे येथे ठेऊन आपण पलोन गेले मागे माणकोजी मरलाची बायको मृत्य पावली हे वर्तमान हुजूर विदीत केलें या उपर मरलाचे जामीन दारासी मोकदम मौजे पांगोरी यास तलबकरुन हुजूर आणले आणि मरलास हाजीर करणे म्हणून आज्ञा केली (त्यावरून) मरल आगोठीस हाजीर करतो म्हणून पागोरीकरानी मुदत केली तेहि मुदत टलोन गेली त्यावरुन मागती पागोरकर तलब करुन आणीले अैशाच च्यार मुदती पागोरीकरानी मागीतल्या परंतु मरल त्याच्याने हाजीर न जाले तेव्हा पांगोरीकराने अर्ज केला जे आपण मरलाचे निसबतीचा बेदावा लेहून देतो (दिव्य कबूल

करुन) मरल आपणास जामीन देऊन.....(दोन ओळी काळे झाले).....त्यावरून पूर्वांतर मनास आणिता मरलानी प्रधान पंतापासी (पृ. ३ मागील बाजू)–दिव्य मान्य केले आणि मुदतीस हजीर न जाले.....(सुमारे ७ ओळी काळ्या झाल्या)..... चौगुलकीचे वतन पुरातन तुमचे खरे यैसे जाणोन पांगोरकर मोकदम सिंदे यास आज्ञा केली जे मरलास तुम्ही जामीन असता मरल हाजीर होत नाही तेव्हा मरल खोटे आहेत त्याचे निसबतीचे खत नरसींगराव जगथाप चोमले यानी लिहून देणे त्यावरुन पांगोरीकरानी आपले रजाबंदीने नरसींगराव यास येजीद खत लेहून दिल्हे की ..... तपसील ..... (पृ. ४)—येतीज खत तुम्हापासून घेतले ते रद असे व तुमचे तुम्हास अणून देऊन या उपरी मरलास वतनासी समंध नाही म्हणून येजीद खत लेहून दिल्हे त्यावरी स्वामीनी पसदकरीता (?).....(नेहमीप्रमाणे मजकूर).....तुमचे माथा वतन समंधी सेरणी दुतर्फा कुलबाब कुलकानू मोकरर रुपये ३००० तीन हजार करुन हुजूर व जिल्हेकडे वसूल घेतला असे येविसी पत्रे चिटनिसी.....पत्रे जेस्ट बहुल प्रतिपदा रविवासर नलसंवत्सर—

१३ जून १७३६; जेष्ठ व।। १ रविवार १६५८

क्रमांक—१५
पे. द. शा. रो. रु. नं. ६
पुडकें नं. ३ पृ. १०५/२

सु. ११४२ जमादिलावल ११
श. १६६३ अधि. श्रावण
शु. १२ मंगळवार
इ. १७४१ जुलै १४

श्री

कीर्दीस वार छ ११ जमादिलोवल सु।। ईसने आर्बेन मया व अलफ

सुभ
१३/३
यो। तीन बदरास

यादी सिदोजी बिन जोगोजी ईब्न नारायणजी रणनवरे मोकदम मौजे मलद ता। पाटस प्रा। पुणे यासी दिल्हे वतनपत्र येसे जे शाहूनगर नजीक किले सातारा येथील मुकामी येऊन विनंती केली जे गोदजी फडतरा राजेश्री बाजीराव पंडित प्रधान याजकडे कसबा पुणे येथे फिराद होऊन आपल्या वतनास मुजाईला होतो त्यास पूर्वील पत्रें आपणापासी आहेत महाराज स्वामीनी फडतरे यास हुजूर आणून इनसाफ मनास आणून निवाडा केला पाहिजे म्हणऊन विनंति केली त्यावरुन राजश्री पंत प्रधान यासी आज्ञा करुन गोंदजी फडतरा हुजूर आणून हरदूजणास हकीकत पुसिली—

गोंदजी फडतरा याणे तकरीर केली जे सिदोजी बिन बकाजी रणनवरा निमे मोकदम मौजे मजकूर याची बाईको पुताऊ इणे आपला वाडिल कृष्णाजी पालक पुत्र घेतला आणि

आपले निमे वतन त्यास दिल्हे त्याचें संतान आपण आहे निमे वतन आपणास यावे त्यास आपला दाखला गांवावरी होऊ देत नाही त्यास महाराजानी इनसाफ मनास आणून निल्हे लाविले पाहिजे म्हणऊन हकीकत केली.

सिदोजी बिन जोगोजी ईब्ना नारायेणजी रणनवरे मोकदम मौजे मजकूर याणे तकरीर केली जे आपला मुलपुरुष बकाजी रणनवरा त्यास दोघे पुत्र—

येकपुत्र बजजी त्याचा पुत्र बाजी — दुसरा पुत्र सिदोजी त्याचा
त्याचा पुत्र बजजी त्याचा नारायण — पुत्र येसाजी तो मृत्यू पावला
जो त्याचा जोगोजी त्याचा पुत्र — पोटी संतान नाही
आपण सिदोजी

त्यास सिदोजीची बाईको पुताई आऊ होती तिजपासी फडतरे याचा मूल कृष्णा चाकर होता त्याणे पुताऊस अर्जऊन पुण्यास धेऊन गेला आणि आपल्या वडिलास नकलत राजश्री दादाजी कोंडदेव यास द्रव्य देऊन निमे वतनाचा महजर करुन धेतला आणि गावास आला वर्तमान कलल्यावरील आपले वडिल बाजी बिन बजजी रणनवरे महाराज राजश्री शाहाजी महाराज याकडे जाऊन वर्तमान विदीत केले त्यानी करिना मनास आणिला जे पुत्र संतान वारलेवर पालक पुत्र घ्यावा तो आपले दाईंज स्वगोत्रज असतील तो पुत्र साक्ष मोजेने घ्यावा तेव्हा वतनास अधिकारी होता घरच्या चाकरावर मेहेबीन होऊन वतन दिल्हे तरी दायाद कैसे देऊ देतील चाकरास वतनास समंध नाही पुताई जिवंत आहे तो वतन पुताईने खावे पुताई माघे अवघे वतन बाजी रणनवरा याणे अनभवावे फडतरे यास समंध नाही यैसा इनसाफ मनास आणून देशमूख व देशपांडिये पा पुणे यास पत्र दिल्हे जे अवघे वतन बाजी रणनवरा याचे दुमाला करणे फडतरे यास महजर करुन दिल्हा आहे तो रद आसे म्हणऊन पत्र दिल्हे ते घेऊन गावास येऊन अवघे वतन अनभविले ते हाकालपर्यंत आपण अनभवीत आहे फडतरे याचा दाखला गावावर हाकाल पर्यंत नाही हे माहाराजानी मनास आणून ईनसाफ केला पाहिजे व शाहाजी महाराजाचे पत्र आपणापासी आहे तेहि पहावे म्हणऊन तकरीर केली.

येणेप्रमाणे हरदू जणानी तकरीरा करुन सिदोजी बिन जोगोजी रणनवरा याजपासी शाहाजी माहाराजांचे पत्र देशमूख देशपांडे पा पुणे यासी होते ते मनास आणिता मौजे मजकूरच्या मोकदमीच्या वतनास फडतर याम समंध नाही दरोबस्त मोकदमी सिदोजी बिन जोगोजी रणनवरा याणे अनभवावी यैसा पत्राचा दाखला पुरला गोंदजी फडतरा यासी पुसीले जे कृष्णाजी पासून तुजपावेतो दाखला गावावरी असला तरी गोही साक्ष दाखवणे म्हणऊन आज्ञा केली दरबारी मनसुपीस सदरहूजण उभे राहिले होते ते समई गोंदजीस काही जोबसाल रुजु मोजा न होये दाखला पुरत नाही यैसें जाहलीयावरी गोदजी त्रीमीर येऊन भूमीवरी पाडिला इनसाफ मनास आणिता गोंदजी फडतरा खोटा जाला आणि पलोन गेला रुजु मोड्या पाहतां गोंदजी खोटा त्यास वतनास समंध नाहीं यैसे मनास आणून स्वामी तुजवरी कृपालू होऊन तुझे वतन मौजे मजकूरची मोकदमी तुजे कुली दरोबस्त पूर्ववत प्रमाणे तुझे दुमाला केले असे.....

.....

गोंदजी फडतरा याजकडून येजीदखत तुज लिहोन देविले आहे तो हाजीर होऊन येजीदखत लेहोन देईल जे आपन तुम्हासी भांडत होतो त्यास इनसाफामुले खोटा जाहालो आपणास मुकदमीच्या वतनासी काही सबंध नाही तुम्ही दरोबस्त मुकदमीचे वतन वंशपरंपरेने अभनवणे येणे प्रमाणे त्याजकडून येजीदखत लेहून घेऊन त्यास मौजे मजकूर पैकी सेत चावर येक व दहा हात घर देऊन त्या सेताचा हक तुम्ही न घेणे येविसी पत्रे–

१ वतनपत्र
१ देशमूख देशपांडे
१ पंत प्रधान
१ देशाधिकारी

४

येकूण चार पत्रे देणे.

क्रमांक १६ सु. ११४९
पे. द. घडणी रु. नं. ४३ इ. १७४८-४९

राजमंडळ.

स्वारी राजश्री पंत प्रधान सुा तिसा (आर्बेन मया व अलफ) जमा किरकोल दफाते पत्र-

सु १२ जिलहेज यादो मोरेश्वर बिन बापुजी रामाजी उपनाम उपासनी गोत्र सैधवायन शाखा वाजश्री देशमूख चौदा गाव पाा कोतूल व मुकदम व देशमूख का। मजकूर येथील चौथी तक्षीम + + + + + + + येथील देशमूख याचा व भागीजी बिन रगोजी येबिन सूर्याजी सगे देशमुख पाा मजकूर याचा सदरहू वतनाचा कजिया होता तो हुजूर राजश्री स्वामीनी निवडीला सगे खोटे जाले यादो मोरेश्वर खरे जाले त्यावरुन राजपत्र करुन दिल्ही तो मनास आणून सरकारचे पत्र करुन दिल्हे याणे मोरेश्वर याचे नावचे.....पत्र १

सदरहू पत्र फडणिसाचे व चिटाणिसाचे हाते लिहून राजश्री भाऊनी आपले हाते तारीख घातली असे त्याची नकल अलाहीदा तपसीलवार दफ्तरी करुन ठेविली असे.

क्रमांक—१७ सु. ११५३ जमादिलाखर २४
भा. इ. सं. मं. पुणे श. १६७५ चै. व. ११
सं. ग. जोशी संग्रह; इ. १७५३ एप्रि. २९
रु. नं. २५/२०

श्री

गोतकासीचे सेवेसी

दुसरी फुरसीस दाा बेा संतजी बिन रखमाजी मांडरे व बगोजीबिन रत्नोजी मांडरे व दादजी मांडरे व समस्त आपले विभागी भाऊ मांडरे मौजे मांडार देऊ सुा सलास खमसैन

मया आलफ कारणे कागद लेहून दिल्हा यैसाजे गोत कासीने तकरीद झाडपछाड करतां पुरसीस केली की तुम्ही तकरीर लेहून दिल्ही आहे तीच दाखला सत्य श्रुकृताचा पांढेर मुखे व भोवरगा ३ तिघे मा (वा) च्या मुखे गोतमत जो निकाल निघेल गोतमते जे ठरविल व गोताने आगदी भांडारदेवी आपले काही नाही कड्याखाली जावे यैसा गोतमताचा हुकु (म) जोईल त्यास आपण भाऊ समेत रजावंद आसो नवदीगर करु तरी गोत कासीची शफत व अन्याई व अन्याई व दिवाणचे गुन्हेगार हे पुरसीस पत्र लेहून दिल्हे सई छ २४ जमादिलाखर

वि।। मध्वाजी राम कुलकर्णी नि।। नांगर

माजे मार

क्रमांक—१८ सु. ११५३ जमादिलाखर २५

स. इ. सं. मं. पुणे. श. १६७५ चै. व. १२

भा ग. जोशी-संग्रह. इ. १७५३ एप्रि. ३०

रुमाल नं.२५।२०

श्री

राजेश्री पांच परमेश्वराचे सेवेसी.

दा॥ बो कान्होजी बिन येमाजी ना॥ व सतजी वि बिन रखमाजी ना॥ व जोगोजी बिन अबाजी ना॥ समस्त भाऊ आपलाले विभागी मांढरे मौजे मांडार देव सा॥ हवेली प्रा॥ वाई सु॥ सलास खमसैन मया अलफ कारणे कागद लेहून दिल्हा यैसा जे गोतकासीने आम्हा त्रि वर्गास पुरसीस केली की रखमाजी बिन बकाजीमांडरे मौजे मार याच्या आमच्या वडिलाचे कजिये होऊन वाटे जाले ते समईचे तुम्हापासी कांही कागदपत्र आसीले तरी गोता पुढे टाकणे तरी ते वेलचे कागदपत्र आपणापासी कांही नाही अथवा आपल्या वडिली काहीं साही सांगितले नाही कीं वाटे होऊन कागद झाले होते परंतु गमावले यैसेहि सांगितले नाही आपण यैकीले नाही जबाजाबीच मजकूर सांगितले तेणे प्राच लेहून दिल्हे त्या प्रा॥ हालीबादपेडोले आहेत ते मोडिले नाहीत हे सत्य योलेरीज (ज) कागदपत्र आसोन मावमकर गौत यासी करु पेश आदेश निघाले तरी ते रद असेत आपण सर्वस्वे खोटे हे कागद लेहून दिल्हा सई

छ २५ माहे जमादिलाखर

नि।। नांगर

नि।। मध्वाजी राम कुलकर्णी.

क्रमांक–१९
भा. इ. सं. मं. पुणें,
स. ग. जोशी-संग्रह.
रुमाल नं. २५।२०

सु.११५३ जमादिलाखर २५
श. १६७५ चै. व. १२
इ. १७५३ एप्रि. ३०

श्री

गोतकासीचे सेवेसी––

द॥ बो रखमाजी बिन बकाजी मांडरे मौजे भांडार देऊ सा हवेली प्रा वाई सु॥ सलास खमसेन मया आलफ कारणे कागद लेहून दिल्हा यैसाजे गोत कासीने हुकूम केला की तुमच्या महजराबरावरी आर्णाक कांही कागदपत्र कजीयाच्या अभ्यचे असीले तरी गोतापुढे टाकणे गैनकरणे तरी गोतकामीचे सेवेसी लेहून दिल्हे की दोही महजराखेरीज आपणापासी कांही दुसरा कजियाचा कागद नाही पेश आदेशा निघाला तर तो रद असे गोतकामीस भावमर यैसा करु तरी सर्वस्वे खोटे हे कागद लेहून दिल्हा सही छ २५ माहे जमादिलाखर

नि॥ नांगर

वि॥ मध्वाजी राम कुलकर्णी
मौजे म॥र

क्रमांक–२०
भा. इ. सं. मं. पुणे
स. ग. जोशी-संग्रह;
रुमाल नं. २५।२०

सु. ११५३ जमादिलाखर २५ (?)
श. १६७५ चै. व. १२ (?)
इ. १७५३ एप्रि. २० (?)

श्री

कलम डाग जबानी रखमाजी बिन बकाजी मांडरा लेहून दिल्ही यैसी जे गोत कासीने पुरसीस केली की तुम्ही मागे गांवच्या नागवणा देत आला आहा त्या कितवे तक्षिमे प्रा देत आला आहां तो तपसीलवार लेहून देणे तरी गोत कासीचे सेवेसी सत्यच लेहून देतो बी॥ ता॥ पहिली नागवण चौथ्या वाट्याचे नेतोजी पालकराची अपल्या विभागास घेतले होन ३७॥ त्या अगोदर नागवणेचे चौथ्या वाट्याने घेतले...यासी सिवेची नागवण मोघम अपणा पासून घेतले रु॥ ४० व सामान अडचा मणाचे–कोंडजी मांडव्याची नागवणेचे (मो) घम आपल्यापासून घेतले रु॥ १७ निरगुड बोद्याची नागवण घेतले चौथ्या वाटेयाने घेतले रु॥ १६॥ पडसरीचे संभर रु॥ पडिले त्याचा चौथा वाटा म्हणून घेतले राजगडाखाली होतो तेव्हा कनंवडिस.. ... सिंदोजीपासून घेतले रु॥ २५ हे रु॥ चौथा.....म्हणून घेतले चाकर मान्याचा चौथ्या वाट्याने आठे तालसा पैकी बारा रुपये साल दरसाल देतो.

(हस्ताक्षर मध्वाजी राम कुलकर्ण्याचेच दिसतें. तारीखहि तीच असावी.)

क्रमांक – २१
पे. द. कोंकण जमाव,
रुमाल नं. ४९०

स. ११५८ जमा दिलोवल २०
३१ जानेवारी १७५८
पौष वा ७ मंगळवार १६७९

तालीक

निवाडपत्रश्री कुसमेश्वर देवालय स्थान मौजे कोतवडे का॥ नेवरे वि॥ समस्त पंचाईत –

वेदशास्त्र संपन्न	देसक कस नेवरे
१ वे॥ गणेश भट आ (गा) शे मौजे राहाटागर.	१ शिवाजी बलाल देसाई
१ वे॥ कृष्णभट दिक्षित मौजे राहाटागर.	१ महादाजी बलाल देसाई
१ वे॥ मोरभट साठे	१ गणोराम देसाई
...	१ आपाजी गोपाळ देशकुलकर्णी
३	१ शंकराजी केशव मुकादम
कि॥	
१ नारो राम देशकुलकर्णी ता॥ केळ्ये – माजगांव	१ बालाजी कृष्ण कुलकर्णी
१ परशराम कृष्ण खोत मौजे राहाटागर का॥ नेवरे	१ मौजे कोतवडे का॥ नेवरे
१ नारमानी खोत मौजे करेले का॥ नेवरे	..... ६ मौजे कोतवडे का॥ नेवरे
१ दाद सावंत खोत मौजे राडगांव का॥ नेवरे	१ अंताजी कृष्ण खोत
१ गोपाळ दादाजी खोत मौजे वेतोसी का॥ केल्ये माजगांव.	१ रामाजी आपाजी खोत
१ नारो हरी खोत मौजे जावरुण ता॥ केल्ये माजगाव	१ कुलकर्णी खेर
१ रामाजी विष्णु खोत मौजे निंवली व मौजे भाले ता केल्ये माजगांव	..... ३ वाडा लावगन मौजे कोतवडे का॥ नेवरे.
	१ वो॥ कृष्णभट मोने खोत मौजे मार
	० लंग
..... ७	..... १

येणेप्रमाणे हाजीर (मजालसी) पंचाईत.

याचे विद्यमान निवाडा XXXX जे बालाजी हरी खोत मौजे केल्ये व रामाजी बलाल देसाई ता॥ केल्ये माजगांव व खोत मौजे मार या उभयतांत खोतीचा कजिया लागला सा॥

+ + + + + + + (वसूर लावगन) मौजे माार येथील असता रामाजी बलाल देसाई याचे निसबतीचे हे लावगन बाठार खोती खेरीज आपलें खलीद अैसे म्हणोन आलाहिदा तेथील कमाविस चालवीत होते त्या बालाजी हरी खांत मौजे माार व बाठार लावगत केल्ये माारचा लावगत बाठार खेरीज गाव येक असता असा मौजे माारचे खोत तिघे तक्षिमदार भाऊ असोन देसाई माार आलादा करून आपले म्हणोन जमीन जुमला कमावीस करून काये निमित्य चालवितात आपला हक्क मानपान अलाहीदा काय निमित्य घेतात म्हणोन जंजिरे रत्नागिरीचे मुक्कामी राजश्री मोरारजीबाबा सिदे सुभेदार जंजिरे माार याजसी जाऊन बाळाजी हरी खोत मौजे माार याणी जाऊन हकीकत जाहीर केली व श्रीमंत राजश्री पंत प्रधान याचे पत्र आणिले जे बालाजी हरी याचा व देसाई माार याचा खोतीबाबत कजिया आहे तरी मौजे कोतवडे येथे श्री कुसुमेश्वर स्थानी पंचाईत मते साक्षी सडी मनास आणून येथान्याय निवडलेल्या प्रो निवडून लेहुन पा। असे पत्र आणून दिले त्यावरून राजश्री सुभेदार याही समस्त पंचाईत श्री + + + + + येथान्याय निबाडा + + + (आ) ज्ञा केली त्यावरून श्रीच्या देवालई सदरहु पंचाईत बैसोन उभयता वाद्यापासून राजिनामा ज्या प्रो श्री चे स्थानी पंचाईत मते न्याय निवडले त्या प्रो वर्तावें नवदीगर न करावी अैसे मान्य करून उभयताचे राजिनामे लेहून घेऊन ग्रामस्त व सिबबडे व वतनदार यांच्या साक्षी सड्या घेतल्या होत्या श्री देवासन्नमुख बैसोन खन्या आहेत अैसे सत्योत्तर बलाऊन दाखला घेतला व कागदपत्राचा दाखला मनास आणिला. व भोग भोगवटेयाचा दाखला मनास आणिला. येकून साक्ष व लिखित मुक्त यातिही प्रकारे निवडेले अैसे जे मौजे देखील बाठार लावगन येथील खोती व जोतीप व उपाधिक अनुक्रम वडिलभाऊ बाळाजी हरी त्यापेक्षा धाकटा भाउ राजाजी बलाल त्यापेक्षा धाकटा सिवाजी बलाल व हे तिघे तक्षीमदार भाऊ त्यास खोती व जोतीस व उपाधिक व मानपान कार्यप्रस्था (ना) चा निरोप हे वतनदारीचे कायदे तिघानी चालबावे सदरहू मानपान आधी बाळाजी हरी वडिडभाऊ याणे घ्यावा बरकड भाऊ याणी अनुक्रमाणे घ्यावा खेरीज बाठार लावगन गाव मौजे केल्ये येक सदरहु लावगन बाठार देसायाकडे आलाहीदा नाही अैसे समस्त पंचाईत मते जाहाले खोतीचा कारभार तिघा भावा + + + क्रमे चालवावा अैसे जाहाले. + + + + पत्र येणे प्रमाणे समस्त पंचायताचे मते श्रीचे देवलाई निवडले असे छ २० माहे जोबल सुा। समान खमसेन मया व अलफ बीा। बा (ळा) जी कृष्ण देस कुलकर्णी काा नेवरे सदरहु न्यायास सरकारातून बाळाजी रंगनाथ सुभाहून देश कुलकर्णी ताा महमदाबाद ऊर्फ सेतवडे प्रांत राजापूर मामले प्रभावली न्यायाधीश यासी रवाना करून श्रीचे देवलाई समस्त पंचाईत बैसोन न्याय निवडला असे सदरहू लिखित व भुक्त व साक्ष याचा कलमझाडा तपसीलबार अलाहिदा असे सदरहु बिा। बाळाजी कृष्ण देश कुलकर्णी काा नेवरे.

क्रमांक – २२ श. १६८३ आश्वि. व. ३
भा. इ. सं. मं. पुणे, इ. १७६१ आक्टो. १६
स. ग. जोशी संग्रह;
रुमाल नं. २५।२०

श्री*

१६ आक्टो. १७६१

श्री शके १६८३ वृषानाम संवत्सरे अश्विन वद्यतृतिया तदिनी वासुदेव जोशी बिन लिंग जोशी कसबे वाई व जोहोर खोरे व जांबूल खोरे वगैरे याचा जोतिषाचा वृत्तिचा कलह लागला गोविंद बिन शामजी यजुर्वेदी याचा व आपला यामुळे श्रीमंत प्रधानपंत यानी स्थळ साक्षी घेयासू श्री धोम धूतपाप तीर्थ येथे राजेश्री धोंडो बलाळ भिडे दिमत राजेश्री रामशास्त्री बाबा यासी श्री संनिध । अश्विन शुध द्वितिया तदिनी साक्षीस प्रारंभ केला. गोताची साक्षच जाहाली कार्तिक सुध पंचमी पावतो, साक्षीगोताच्या जाहाल्या या उपरांतिक देशपांडे व कुलकर्णी व चवघे धर्माधिकारी व कसबे बावधन येथील कुलकर्णी याची साक्ष स्वामी संनिध होणे आहेत.

क्रमांक—२३
पेशवे दफ्तर दक्षिण कोंकण, सु. ११६७
रत्नागिरी रुमाल नं. ५९८ इ. १७६६/६७

श्री

नंबर ३०

यादी तालुके जंजीरे विजयदुर्ग निा नारो त्रिंबक सुरु सबा सीतैन मया व अलफ सन मजकूरचा हिसेब हुजूर दफ्तरी विल्हेस लाऊन घेता रुजुवातीमुले जुजुसी कलमे· .काडिली त्याचा फडशा होणे—

मुलकी महाला निहाये पैकी

....

..... (सर्व कलमवार तपसील दिला आहे) .....

*हा असल कागद बालबोधींत आहे.

मुलकी कलमे १०

खेरीज माहाल पैकी कलमे

नारायेण भट व माहादेव भट बिन विश्वनाथ भट बापट वा मौजे कुवेसी याचा विश्वनाथ भट बिन रघुनाथभट बापट याचा ठिकाणा विसी कजिया लागला त्यास नारायेण भट खरे जाहाले सा हर्की रु॥ ५ जमा आहेत आणि विश्वनाथ भट खोटे जाहाले याज पो॥ गुनेगारी जमा असावी कलम १

मादेभट खाजणे व जानो नारायेन खाजणे गाडगील मौजे अणसुरे का॥ मीठगवणे याचा ठिकाणाविसी कजिया होता त्यास जानो नारायण खरा जाला त्या पासून हरकी रु॥ १५ घेतले आहेत मादेभट या पो॥ गुन्हेगारी जमा येणे ते..... .....कलम १

गोविंदभट जोसी वा॥ कसबा आचरे ता॥ सालसी याजकडे वृधीक्षयाचा निर्णये होये पावेतो कोणी भोजन करु नये अैसे असता जे ब्राह्मण जोसी याचे घरी जेवीले त्यापासून मसाला रु॥ ३ घेतले ते जमा आहेत परंतु जोसी याबाबत फडशा काय जाहला याची चौकसी होणे आसे कलम १

सावित्री आडिवरेकर ईजकडे बद अमलाचा आरोप आला सा॥ राजदंड घेतले सा॥ रु॥ ४० चालीस जमा आहेत परंतु बद अमल कोणापासून जाहाला त्याची चौकसी होऊन राजदंड जमा येणे आसे कलम १

कासी आडिवरेकर बद अमली सासउ गुदस्ता सरकारात कोठीस आणिली ते साल मजकुरी जमा आहे कुणबीण बद अमली म्हणोन जमा आली परंतु बद अमल कोणापासून जाहला याची चौकसी होऊन गुन्हेगारी येणे..कलम १

तैनद मुसलमानीन वस्ती जैतापूर ईजपासून बद अमलाचा आरोप आला जीव जमाफीक राजदंड रु॥ ३० घेतले परंतु बद अमल कोणापासून जाहला याची चौकसी होऊन राजदंड जमा... येणे कलम १

बाबत नेतोजी भुसेकर वा॥ मौजे जामसंडे ता॥ मालसी याचे लेकीने बद अमल केल्याचा आरोप आला पथा न लागे यास्तव जीवनमाफीक खंड सरकारांत साडेतीन तश्रीभा खंड करार करुन घेतले रु॥ २१ सदरहू जमा आहेत, ज्यापासून बदमाल जाहाला त्यापासून खंड घेतला नाही त्याची चौकसी करुन खंड घेणे आसे सा॥ कलम १

भागी गीरकरीण रांडक हिचा दादला भिकाजी गीरकर मृत्यु पावला त्याजवर भागी मार ईजकडे बद अमलाचा आरोप आला सा॥ बाईकोपासून खंड करार करुन नारोजी आहरा खासवारदार याचे स्वाधीन केली आणि राजदंड रु॥ ४० चालीस रु॥ वसूल घेतले ते जमा आहेत परंतु बद अमलाचा पथा लागोन ज्याणे केला त्याजपासून खंड घेतला नाही त्याची चौकसी करुन खंड जमा येणे आसे...कलम १

किता लो।

(निरुपयोगी म्हणून हे कलम वगळलें आहे.)

कलम १

कृष्ण जोसी राथे पाटणकर वा मौजे मजकूर ता राजापूर व नारो पाध्ये वगैरे गुर्जर जोतीसी ता मार याचा जोतीप उपाध्यपण व धर्माधिकारण याविसी कजिया लागला त्यामुले वतन अमानत आहे त्याचे उत्पन्न सालोसाल जमा आहे साल मजकुरी उत्पन्न जमा नाही याचा फडसा कसकसा जाहाला तो समजवावा फडशा न जाहाला तरी उत्पन्न अमानताचा अैवज हिशेबी जमा धरावा....

.....कलम १

वको पाथरवट याणे कशेलकर ब्राह्मणाची कुणबीण मारिली सा पाथरवट मार यासी धरुन आणून बंदीखाना ठेविला यासी साल मारी आडिसेरी खर्च गला कैली ८३८१।।८ तीनमण दिडपायीली निटवे खर्च जाहाला आहे परंतु याचा फडशा काय जाहाला तो समजवावा फडशा जाहाल्यास चौकसी होऊन खंड व पोट-खर्च जमा येणे असे कलम १

अमानत ठिकाणे व वतने कजियामुले वगैरे आहेत कोणा सालापासून अमानत त्याचे कारण व त्याचे फडसे कसकसे जाहाले त्याचा झाडा समजवावा कलम १

....

.....कलम १

.....

.....

....

कलम १

गोपालभट माहणकर वा खारेपाटण हे तुलाजी आंगरे याचे फीतुरात होते सबब सरकारात अटकेत ठेविले होते त्यास हे अपराधी याजपासून काही गुन्हेगारी घेऊन सोडावे त्यास याजवल व्यावयासी नाही यास्तव याचे वतन कसबे मजकुरी निमे जोतिषपण आहे ते सरकारात जप्त करावयाचा करार करुन यापासून हाजीर जामीन घेऊन अटकेंतून सोडिले आसेत तरी याचे जोसी-पण निमे का। मारचे आहे ते तुम्ही सरकारात जप्त करुन वतन समंधे अैवज आकारेल तो सरकारचें हिशेबी जमा करीत जाणे म्हणोन छ ९ राखरची सनद आहे परंतु सन मजकुरीचे हिशेबी जप्तीचा अैवज जमा नाही याची चौकसी होऊन सदरहू प्रा अमानताचा अैवज हिशेबी जमा करावा कलम १

(महत्त्वाचा भाग घेतला आहे.)

क्रमांक—२३ (अ)
पेशवे दप्तर, दक्षिण कोकण,
रुमाल नं. ५९९

नंबर १५२ श्री

श्रीमंत राजश्री पंत

प्रधान स्वामीचे सेवेसी—

आशाधारक नारी त्र्यंबक मु॥ जंजीरे विज्यदुर्ग चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ १७ मोहरम पावेतो स्वामीचे कृपावलोकने करुन आज्ञाधारकाचे व प्रांत मजकूरचे वर्तमान येथास्थित असे विशेष हुजुरुन आज्ञापत्र छ २९ जिलकादचे सादर जाहाले तेथें आज्ञा की तुम्ही विजयदुर्गप्रांते मामल्यात गेल्या पासून मुलकातील इनसाफ व वतनी निवाडे व वृती इनामती याची चौकसी कोणे प्रकारे केली असेल त्याचे बयाजवार वर्तमान हुजूर कलले पाहिजे यास्तव हे पत्र सादर केले असे तरी तुमचे पैवस्तगिरीपासून मनसुब्या निवाडे कोणाचे कसकसे केले त्यात हुजूरचे आज्ञेने किती व + + + + + तशाच वृत्ती इनामती धर्मादाये याचा बयाजवार जाबता लेहून हुजूर पाठवणे व यापुढेहि वरचेवर वर्तमान हुजूर कलले पाहिजे तर दोन महिनीयाचे अंतरी याने सदरहू लिहिले प्रमाणे जाबता लेहून पाठवीत जाणे म्हणऊन आज्ञा त्यास प्रांत मजकुरी आल्यावरी वतनी व किरकोळ निवाडे जाहाले—

४ हुजूरचे आज्ञेप्रमाणे गांवगना जाऊन येथास्थित निवाडा मनास आणून तकरीरा व वादी सेवेशी पेशजी रवान केले आहेत

३ मौजे आडिवरे

१ अंताजी नारायण व विसाजी नारायण खोतीविसी

१ बालंभट दात्ये व रामदे माहाजनी ठिकाणाविसी.

१ मादो विस्वनाथ काला व कृष्णंभट दात्ये ठिकाणाविसी

..

३

१ गावखाडी येथील माहादाजी बर्वा व बाल माजनी ठिकाणाविसी

.....

४

१२ किरकोली कजिये सुमास आले त्याची चौकसी करुन जाहाले त्यासी पत्रे करुन दिल्ही

.....

१६

याचा झाडा नावनिसीवार लेहून अलाहिदा सेवेसी सादर केला आहे त्यावरुन सेवेसी निवेदन होईल व किरकोल गावगनाचे कजिये आगराचे व ठिकाणाविसी वगैरे यैसे कजिये करुन सुभा आले त्याची चौकसी मनास आणून व चिटी मसाले जाहाले त्याचा विस्तार ल्याहावा तरी बहुत आहे सेवेसी आल्यावरी सर्व निवेदन होईल. ईनामवृत्ती धर्मादायेयाची चौकसी करावी त्यासी साल गुदस्ता वसाल माारी पाहाणीमुले व जमा बंदीमुले चौकसी करावयासी राहिली अखेर साली करावी त्यास ब्राह्मण पुणे यासी गेले त्याहीमध्ये काही ब्राह्मण पत्रे घेऊन आले त्याची चौकसी मनास आणून खर्च घातल्यामुळे राहील्या ब्राह्मणाची चौकसी करुन पत्रे पाहोन जाबता लेहून मागाऊन सेवेसी रवाना करुन पुढे आज्ञेप्रमाणे तालुके मजकूरचे वर्तमान वरचेवरी सेवेशी लेहून पाठऊ वतनदार प्रांत मजकूर यांची हके व ईनामती रा तुलाजी आंगरे याचे कारकिर्दीस काही वतनदाराची हके व इनामतीचा वसूल सरकारात घेतला त्याचा दाखला कागद-पत्र मनास आणून हक व इनामती पेशजी चालत आल्याप्रमाणे चालती केली काही राहिले त्याची चौकसी करुन जाबता लेहून मागाहून सेवेशी रवाना करुन काही जमीदारानी हुजूरची आज्ञापत्रे आणिली तेथे आज्ञा की पुरातन चालत आले असता राजश्री तुलाजी आंगरे याणीच अनामत करुन यैवज वसूल घेतला त्याची चौकसी मनास आणून पेसजी चालत आल्याप्रमाणे चालवणे म्हनोन आज्ञा त्याजवरुन दुसरे जमीदार सुभा ये (ऊ ?) न आपले वृत निवेदन करुन दाखलेही दाखविले त्याजवरुन चालवावे लागले *सेवेशी विदीत व्हावे हे विज्ञप्त.

क्रमांक—२४
पेशवे दप्तर, उत्तर दक्षिण कोकण,
रुमाल नं. ६५१, दफाते नकला.

सु. ११६६ रजब २९
श. १६८७ पौष व. ३०
इ. १७६६ जाने. ११

राजमंडळ

रोजकीर्द
सुासीत सीतैन मया
व अलफ

स्वारी राजश्री पंतप्रधान
छ २९ रजब दफाते पत्रे मुा पुणे
विा राजश्री बालाजी जनार्दन फडणीस

कृष्णाजी विश्वनाथ तालुके अजणवेल यास सनद कीं वो शंकरभट बिन विसाजी कृष्ण खरे उपाध्ये धर्माधिकारी मौजे हेदवी ता ग्वाहागर ता माार याचा व शंकर दिक्षित बिन गोविंद भट खरे उपाध्ये धर्माधिकारी मौजे मजकूर याचा वृत्तीचे विभागाविसी कजिया लागला होता त्याची मनसुबी हुजूर होऊन शंकरभट खरे निमे वतनाचे विभाजी खरे जाले त्या प्रमाणे शंकर दिक्षितानी येसीतखत लेहून दिल्हे यैशास मौजे मजकूरचे सडिदारापैकी ज्याणी अप्रमाण घीरुतर दोषी सब्या दिल्या आहेत सा गुन्हेगारी जीवन माफक रुपये

* हें अक्षर वेगळें वळणाचें आहे.

२५ रामचंद्र हरी महाजन याणे श्रीचे देवलात सडि दिल्ही आणि बाहेर येऊन कांहीं दिवसी लेहून दिल्हे की भिडेने सडि देवलांत दिल्ही ऐसे लेहून दिल्हे सबब

२५ भिकाजी विश्वनाथ जोगलेकर माहाजन याणे अंगारकाचे वेलेस सडि दिल्ही व हाली सडी दिल्ही दोन सड्यात दोन प्रकारचे लेहून दिल्हे सबब

४० बापूभट बिन गणेशभट खरे याणी हरभट खरे याची सडी लेहून दिल्ही त्यास त्याणी सांगितले येक आणि याणी लिहिले दुसरे याजकरितां—

१०

येकूण तीन असामीस नवद रुपये गुन्हेगारी करार करून हे सनद तुम्हास सादर केली असे तरी या त्रिवर्गास बोलाऊन आणून त्याचे दोष सडिचे निवाडपत्रात लिहिले आहेत ते त्यास समजऊन सदरहू रुपये त्याजपासून घेऊन तालुके मजकुरीचे हिसेबी जमा धरुन हुजूर लेहून पाठवणे म्हणोन छ ३ रोज सनद १

श्री रसानगी यादी

क्रमांक—२५
पे. द. घडणी रुमाल नं. ३७४

सु. ११७९ सवाल २५
श. १७०० कार्ति. व १२
इ. १७७८ नोव्हें. १६

सुा तिसा सबैन (मया व अलफ)

छ २५ सवाल माणीकराव चिमणाजी घोडके याणी हुजूर विनंति केली की मौजे कर्जवाडी ता॥ निरथडी प्रात पुणे येथील निमे पाटिलकीचे वतन आपले तीर्थरुप चिमणाजी माणकेश्वर व चुलते त्रिंबकराव माणकेश्वर याणी पेशजी खूप खरेदी केले त्याचे खरीदखत व राजपत्रे व श्रीमंत कैलासवासी बाजीराव साहेब याची पत्रे करून घेतली ती व जमीदारास महजर करुन द्यावयाविसी सरकारचे पत्र करुन घेतले ते या प्रमाणे कागद आपल्या जवळ नवते आपले भावजईपासी होते

ते आपणाजवळ आल्यावर महजराविसीचे पत्र जमीदारास दाखविले त्याणी बहुता दिवसाचे पत्र म्हणोन दिकत केली आहे याजकरिता स्वामी कृपाळु होऊन महजर करुन द्यावयाची आज्ञा केली पाहिजे म्हणोन त्याजवरुन सनद सादर केली असे तरी मशारनिले पासून सरकारची नजर रु॥ २०० दोनशे रुपये घेऊन प्रांत पुणे येथील हिसेबी जमा करणे आणि मौजे मजकूरचे निमे पाटिलकीचे वतन याचे बडिलानी खूष खरेदी केले त्याचे खरेदीखताप्रमाणें व येविसी सरकारची पत्रे पेशजीची आहेत त्या बमोजीब सदरहू निमे पाटिलकीचा महजर जमीनदाराकडून करुन देवणें म्हणोन रामचंद्र नारायेण याचे नांवे सनद—१

रमानगी यादी

क्रमांक — २६
भा. इ. सं. मंडळ,
स. ग. जोशी संग्रह.
रुमाल नं. ५।२०

सु. ११९४ जिल्हेज २२
श. १७१५ आषाढ व. ९
इ. १७९३ जुलै ३१

श्री

राजश्री मोकदम मौजे खानापूर ताा उत्रोली साहेबाचे सेवेसी.

मा॥ बा॥ बालाई वि॥ जानाई नाईक बेरड मौजे मजकूर सु॥ आर्बा समानीन मया अलफ (१) साहेबाचे सेवेसी वायदे रोखा लेहून दिल्हा ऐसाजे. मौजे मजकुरी चोऱ्या जाल्या आपली गुरं व बैल व बीभरणे वगैरे डागिण गेले आहेत. त्याचा तपसील नावनिसीवार कुल आणून श्री सिधे स्वराजे देवली ईमान घेऊन करार केला त्याची यादी अलाहिदा लेहून ठेविली आहे. कुलाची समज..... दी ॥।

आषाढ व॥ ९ तागाईत कार्तिक अखेरीस झाडा करुन देऊं हा वायदे रोखा (क) रुन दिल्हा सही शके १७१५ प्रमादी नाम संवछरे अशाढ व॥ ९ वायदेरोखा लिहून दिल्हा सही. साक्षे.

मढाजी बि॥ तावजी
पा॥ मगजे मौजे कानवडी
१ राघोजी बि॥ जानोजी
मगजे मौजे मजकूर.

बा॥ नारी शामराज
कुलकर्णी मौजे मजकूर

निशाणी तिरकमटा.

क्रमांक – २७
पे. द. स..नि. कागद
रु. नं. ५२

पा॥ बाई

अग्रवादी संभाजी अनंत पछेवादी लहमाजी दताजी

हे दोघे उभेवर्ग स्थळ मो॥ आले होते तेथे माहाजर लेहुन दिला संभानायेकी येसाजे. साक्ष आणिली विसो बलाल व रुद्रभट देउलाती. श्री. पिंपलेश्वर माहाघंटिकास्थानी बेलाचे माळ गळा घालुन स्नान करुन श्री पिंडीवरील बेल आणिला साक्ष करुनु मौजे उंबरजे मधे माहाज लेहून दिल्हे व (प) ही लीलपण तत्रीफ पाने वा कसबाचे कुलकर्ण येसे दिले नाहीं हे खरे म्हणोऊन साक्ष दिल्हे मग तेणे प्रमाणे माहाजर लेहून दिला जे विसो बलाला चे वैसी वडिलपण खावे हे ..... म्हणोऊन साक्ष दिली स्यानी उभे वर्गाना छ १

क्रमांक – २८
पे. द. कोंकण जमाव.
रुमाल नं. ४९०.

इनाम कमिशनचा शिका
पार्शी शिका
पंधरा ओळी फारशी मजकूर.

आसल बमोजीव नकल पारसीची हिदवी

श्रीईस्वर

आलादस आला
(सीका)

अज दिवाण मामले प्रभावली ता॥ रयानी मौजे राहाटागर कर्यात नेवरे मामले मजकूर सु॥ समान आर्बा समानीन मया बालमानी पेट्या खोत मौजे मजकूर व कृष्णाजी बेडेकर रयान दोघे काही मानापाना करिता झगडत साहेबा बंदगीस गेले तेथे निवाडा जाहाला सारा अधिकारी पेटया बडेकर खोटा जाहाला रजा घेऊन गावास येता वाटेस बेडेकराने जहर चालऊन खोत मजकुरास मारिले येसे दिवाणास जाहीर जाले यावरी बडेकराची भिरासीचे आगर सेत आसल ते दूर करुन खोताचे मुलाचे चालवावयास इनाम अगर व सेत देविले आहेत कीर्दी पो .....

(तपसील)

खोताचे लडके उमेदवार होऊन ईनाम आनभऊन सुबरोप असोत प्रस्तुत मुले धाकटी या करिता गावचा कारभार नारायेणभट मायदेव थोरल्या मुलाचा सासरा यास सांगितला असे. खोताची मुले आपले खातर जमेले गावी राहून बेवस वास आसावे कोणे विशई शंका आदेशा न धरीत ये बाबे ताकीद जाणे छ ४ साबान कलम सुद.

क्रमांक – २९ २ (पहिला बंद उपलब्ध नाहीं)
भा. इ. सं. मं. पुणे,
ग. ह. खरे संग्रह.

काा मजकुरु

रो नरहरी हवालदार पार्सी सिका गोल
नरसोजी मलोजी देसाई चौकोनी पार्सी सिका
सावाजी नागोजी देसकुलकर्णी

रो नरसाह मजमुदार
विकलमहु
तुवाजी संताजी व बालाजी तिमाजी
.....साकोजी नाईकवाडी

मोकदमानी देहाथे काा मजकुरु

मोकदमानी कसबे मजकुरु
दरगाजी भलोजी
भीउजी निसबत
कोयाजी देसाई
नांगर
जाखोजी पटेल मौजे सेडफल
नांगर
बहीरजी पटेल व दावलजी पटेल मौजे कोटली
नांगर
मलारजी ब्रह्मजी वाडग्योत व अवाजी कुलकर्णी मौजे नेल करंजी
नांगर
सोनजी पोळ मौजे पिपरी बुदरुक
नांगर
विरोजी पटेल मौजे बिजलितीवाड
नांगर
केदारजी पटेल मौजे पळसखेल
नांगर
लखमोजी व ताहोजी पटेल

मोकदमानी मौजे करगणी १
नांगर
सिदोजी पटेल मौजे दिघंची
नांगर
ळखोडी व संताजी पटेल मौजे माडगोल
नांगर
सुभानजी पटेल मौजे गोभेवाडी
नांगर
सादोजी पटेल मौजे दर्णिकी
नांगर
सिदोजी पटेल मौजे घाणंद
नांगर
नागोजी पटेल व तिमाजी कुलकर्णी मौजे झरे
नांगर
विठोजी पटेल मौजे निदवडे
नांगर
बहीरजी पटेल मौजे विठलापूर
नांगर

मौजे अवळाबी
नांगर

देऊजी पटेल व जाखोजी पटेल
मौजे बोळवण
नांगर.

या विदमाने जाहाला माहाजर येसाजे मौजे मजकुरामधे व मौजे चिंचालेमधे सिवेचा गरगशा लागले होते यावदल दिवाण व देसमुख व पटेलानी काा मजकुरु व हकजवारी मिलोन जाऊन दुदेहे मजकुरीचे पटेलाची उतरे व सिवेचे हदमहदूद मनासी आणून चिंचालेचे पटेलासी विचारीले की गोताचे गोस्टी अईकसी किंवा रवा घेसी म्हणऊन त्यासी चिंचालेचे पटेल बहीरजीने रवेसी राजी जाहाला त्याप्रमाणे नेम उतरे लेहून बहीरजी पटेल चिंचाले व खेत्रीजी बिन सिदोजी पटेल वा जाखोजी बिन जानोजी पटेल मौजे खर्सोडी या दोघासी खेचे जागायासी व चिचालेचे पाटीलाने जेथे हदमहदूस होते म्हणऊन उभा राहिला तेथे दोघा पटेलानी दिवाण व देशमुख व हक जवार देखता तकरीरा केले बिा ताा

खेत्रीजी बिन सीदोजी पटेल मौजे खरसोडी याने केली तक (रीर) येसे जे मळो

(यापूर्वी कांहीं मजकूर गेला आहे) अगर त्यासी रवा लागली याने आपला भोगवटा सदरहू प्रमाणे आहे तेणेप्रमाणे हद घालून दुमाला करणे यासी हारी जीती जिति लियाने होन २५ पंचवीस व हारविली याने होन ५० पनास भैरजीने रवा काढावा खेत्रीजीने साउली करावे हे तकरीर सही.

बहीरजी बिन विठोजी पटेल मौजे चिंचाले काा माा केली तकरीर यैसे (यापुढें कांहीं मजकूर गेला आहे) —— ळेतरी खरसोडीकर आपले हरागिरीचे मागील डावे सोड कुके पटलाचे खडवाटेसपादुका खाली ते मेडसिगाचे डेराड (?) महालक्षुमी तेथून हर घालून देणे आपण राजी असो हारजिती हारविलीयास होन ५० पनास व जिंतली यास होन २५ पंचवीस आपण रवा काढावा खेत्रीजीने साऊली करावी हे तकरीर सही.

दोघांचे तकरीरा लेहून घेऊन समानाईकी बहीरजी बिन विठोजी पटेल मौजे चिंचाळे करासी रवा दिला छ १३ माहे जमादिलावल रोज दुरोबे खेचे मुस्तैदी मसका वजन ८८१। व तेल वजन ८८१।· यैसे अणून तपेळ्या (म) धे घालून.....ताऊन मंडले लिहिले..... जागां रवा पात्र आणून ठेऊन दोघास अघोळीस पाटवीता दख्ती समानाईकी बोलिले की सिवेचे कामास खासा पाटील रवा घेऊं नये मिरासी माहार असतीलत्या——(अपूर्ण)

(अक्षर शिवकालीन असून कागद जीर्ण झाला आहे व तत्कालीनच आहे.)

APPENDIX—B

Section—II

Extracts from the Nivādpatras granted by the Peshwa with the help of a Panchayat from 1750 *to* 1818 A.D.

पेशवे दप्तर–वडणी विभाग.

रुमाल नं. ४५

निवाडपत्रें.....वतनपत्रें

(यांतील महत्त्वाच्या निवाडपत्रांच्या नकला व इतर निवाडपत्रांचा सारांश.)

पत्रांक–१ ५ डिसें. १७४८

(सुा तिसा आर्वैन) छ २४ जिलहेज. राजाराम बुंधले पैठणकर वाणी हुजूर येऊन विनंति केली कीं आपले कर्ज लोकाकडे आहे. त्यास खतपत्र असतां रुपये देत नाहींत. तरी त्यास ताकीद करुन खताप्रो येवज देवावा आणि सरकारची चौथाई घेऊन तीन तक्षिमा राजाराम वाणी यासी देणे म्हणून.....पत्रें

.....

५

पत्रांक–२ ७ मे १७५१

" राजमंडल सुा इहिदे खमसैन–

छ २१ जमादिलाव्वर कृष्णाजी येकनाथ कुलकर्णी मौजे डोंगरगांव व नलवंड पा अकोले याचा व विठल मोरेश्वर कुलकर्णी याचा नलवडच्या कुलकर्णीचा कजिया होता. त्यास वीठजी थोरात याणी गोतपत श्री पाताळगंगा येथे जमा करुन इनसाफ करुन विठल मोरेश्वर खोटा जाहाला " २०० रुपये नजर घेऊन सरकारने जिवाजी गणेश यास निवाडपत्र दिले.

पत्रांक–३ १५ आगस्ट १७५१

सुा इसत्रे खमसैन छ ४ सवाल.

का बोतूर ता मजकूर आणि उदापूर ता मजकूर या दोन गावांमधील शिवेचा तंटा' " उदापूरकरास तलब करुन हुजूर आणिले त्यास याचे व त्याचे वर्तमानामनास आणीले त्यास

हरदू गांवकरी भोंवर गावीच्या गोतास राजी जाले त्यावरुन सुभ्यास पत्र सादर करुन भोवर गांवीचे गोत जमा केले...येणेप्रमाणें दाहा गावचे गोत जमा केले त्याणी मनास आणून सिवेचा निवाडा केला वोतूरकराची खरी जाहली परंतु रुबरु सांगोन हदमहदूद दाखविली नाही याजकरितां फिरोन उदापूरकरानी हिला हरकतीच्या गोष्टी सांगितल्या यास्तव हाली चिंतो कृष्ण कारकून पाठवून फिरोन...गांवीचे गोत जमा केले.....त्याप्रमाणे हदमहदूद हुजूर निवाडपत्र लिहून पाठविले त्याप्रमाणे उदापूरकरास ताकीद करुन काा मजकूरास कौल लेहून दिल्हा त्याची नकल ताा वार आलाहिदा पाठविली असे–१

पत्रांक–४ ९ नोव्हें. १७५४

सुा खमस खमसैन छ २३ मोहरम–

बालाजी व दताजी बिन पुंडलीक सिंपी सुपेकर विरुद्ध खंडोजी बिन राजजी व पदाजी बिन कुकाजी सुमेर परगण्ये सुप्याच्या शिंपी वतनाचे सेटेपणाबद्दल वाद. हुजूरच्या आज्ञेप्रमाणें गोतानी निर्णय केला. बाळाजी व इतर तदपक्षीय खरे झालें. " खंडोजी व पदाजीस मसाला करुन आणून पुरसीस केली आणि पुण्याचे गोताकडे मनसुफी दिल्ही. "

पत्रांक–५ २४ नोव्हेंबर १७६४

" सुा खमस सीतेन छ २९ जमाविलोवल. रघुनाथ कृष्ण व शंकर कृष्णानंद मूर्ती संस्थान ब्रम्हनाल याचा व नरसापागोसावी याचा कजिया वडिलपणाचा कजिया लागला होता. त्याचा निवाडा करुन रघुनाथ कृष्ण व शंकर कृष्णानंद मूर्ती संस्थानचे वडिलपणास खरे जाहाले. त्यास निवाडपत्र करुन दिल्हे. त्याजकडे शेरणी रुपये १००१.....करार केले असत पुण्यांत वसूल द्यावे. "

पत्रांक–६ जून १७६५

राजमंडल.....सुा खमस सितेन...दफाते पत्रे निवाडपत्रे लिहून दिल्ही.

छ १३ जिल्हेस अखेर स्वारी राजश्री दादासाहेब प्रा सदाशिव भट बिन रघुनाथभट व गिरीभट बिन सिवभट मुले जोसी कसबे तिसगाव पो सेवगज याचे निवाडपत्र की सन ११७४ कारणे निवाडपत्र करुन दिल्हे ऐसीजे तुम्ही चावडसेची मुकामी हुजूर येऊन वर्तमान विदित केले की मोरभट बिन विद्याधरभट व रगभट बिन रघुनाथ भट गर्गे वगैरे गर्गे को मजकूर हे पेशजी अम्हासी जोशपण व धर्माधिकारीपण व ग्राम उपाधीक यासी कजिया करीत होते त्याची मनसुबी श्रीमंत राजश्री भाऊसाहेबी केली गर्ग्या खोटा जाहाला आम्ही खरे जाहालो....वतण अणभऊ लागलो त्या उपरी मागती गर्गे मजकूर याणी सरकारातून गैरबाका समजऊन आमचे

वतन जप्त केले त्यावरुन आम्ही श्रीमंत राजश्री भाउसाहबोकडे हिंदुस्थानास जाऊन वर्तमान सांगितले की स्वामीनी (बंद २) मनसुबी केली असता मागती गर्ग्यानें गैरबाका समजवून आमचे वतन जप्त केले म्हनोन त्याजवरुन भाऊसाहेबानी श्रीमंत कैलासवासी नानासाहेबास पत्र दिल्हे की मुल्याची व गर्ग्याची मनसुबी करुन गर्ग्या खोटा जाहाला .....मुल्यास अभयपत्र करुन दिल्हे आहे त्याप्रो मुल्याचे वतन चालवावे असे पत्र घेऊन पुण्याचे मुकामी आलो तो नाना-साहेबास देवआज्ञा जाहाली मग पत्रे स्वामीनी पाहून कमाविसदारास येकपत्र व गावकऱ्यास पत्र येक दोन पत्रे दिल्ही की गर्ग्या खोटा जाहाला असता गैरबाका सरकारांत समजऊन वतन जप्त करविली ते मोकले असे मुल्या खरा असे याचे वतनाचा को (ल) देणे त्या वरुन आम्ही वतन अनभऊ लागलो तो फिरोन गर्ग्या राजश्री माहादाजी सिंदे याजपासी फिर्याद होऊन मोधाजी पाटील लवाडे याजला (बंद ३) मसाला रुपये २०० दोनसे केला...तो मसाला गावकरी यानी आम्हापासून देविला पुडे गर्गे आम्हास सिंद्यापासी नेऊन जबरदस्तीकरुन सरकारचे पत्र आम्हापासी आहे तो घेणार म्हणोनवर्तमान सरकारांत निवेदन केले त्याजवरुन सिंदे याचा दिवाण अबाचितराव गणेश होते त्याजला सरकारातून आज्ञा जाहाली की गर्ग्या खोटा (असोन ?) तो त्याचे बोले पाटलास मसाला का केला व तो मसाला मुल्यापासोन का घेतला तो परतून देणे त्याजवर गर्ग्या चावडेसेचे मुकामी उभा राहिला जे मी दिव्ये करितो...दिव्य गंगातीरीकरावे तो मागती गर्ग्याने सरकारांत विनंती केली की माझ्याने दिव्य करवेना मुले यासी येकदोन वेळा भाडलो तेथे खोटा जाहाला आताही खोटा होईल लटके कज्याचे दिव्य करवत नाहीं (बंद ४) विजितखत लेहून देतो येसे म्हणून विजित खत लेहून दिल्हे परंतु ते (साला सुरत परनवत ?) म्हनोन गर्ग्या बोलला की मसुदा करुन घ्यावा त्या प्रो लेहून देतो माझा कागद घेतला असे तो परतोन द्यावा त्यावरुन मसुदा करुन दिल्हा व गर्ग्याचा कागदही दिधला तो गर्ग्याने फाडून टाकला.....धटाई करु लागला येजीतखत देईना शासन करुन पत्र घ्यावे तरी ब्राह्मण याज करिता सिक्ष्याही करिता न ये हे जाणोन पांढर व गर्ग्याचा जामीन हुजूर टोक्याचे मुकामी आणून पांढरीस शप्त पूर्वक पुसिले की तुमचा पुरातन जोसी कोण त्यावरुन त्याणी...लेहून दिल्हे की आमचा वतनदार मुल्या खरा गर्ग्या भांडतो तो खोटा असे अैसा कागद (बंद ५) सरकारांत लेहून दिल्हा व गर्ग्याचे जामीनास विचारले की तू जामीन वर्तणूकचा आहेस गर्ग्या खोटा होऊन धटाई करितो याचा विचार काये त्याजवरुन जामीनाने लेहून दिल्हे जे गर्ग्या धटाई करतो हे कार्याचे काये जोशीपण व धर्माधिकारी पणास व ग्राम उपाधिक हे वतन मुल्याचे खरे.....गर्ग्या खोटा असे अैसे लेहून दिल्हे त्याजवरुन पेशजी पचाईत जाहाल्या त्याची + + + + करीता व सरकारची पत्रे तुम्हाजवळ आहेत ते मनास आणिता व तुमचा भोगवटाही चालत असता विसोन आले की ... ..तुमचे (बंद ६ वा) वतन होये गर्ग्या धटाई करुन पेशजी-पासून मांडत होता तो खोटा म्हणोन हे निवाडपत्र तुम्हास करुन दिल्हे.....चिटणीसी निवाड-पत्र छ १ रजब.....पत्र १ येविसी साहित्य पत्र....."

.....

पत्रांक—७ २२ जानें. १७६७

(सुा सन सबा सितैन) छ २१ माहे साबान देशमुख व देशपांडे पाा संगमनेर सरकार मजकूर याचा भाऊबंधामध्ये वतनाचे वाटणीविसी कजिया लागोन हुजूर फिर्याद आले त्यास याची मनसुबीचा पवाईतमते इनसाफ होऊन जमीदार मजकूर याचे वतनाचे पाा मजकूरचे गावची वाटणी करुन देऊन भोगवटीयास चिटनिसी निवाड.....पत्रे—

१२ देशमुख याचे विभाग वडील धाकुटपणाविसी कजिया होता तो विलेस लाऊन पत्रे—

६ म्हसके देशमूख तुलसाजी व लक्ष्मण व दुर्गाजी याचा व गमाजी म्हसके..... याचा कजीया होता त्याचा निवाडा होऊन तुलसाजी (वगैरे).....याची वाटणी करुन दिल्ही.

३ तुलसाजी वलद नवलोजी हा देशमुखीचे वतनास वडील खरा जाहला व वाटणीचे देहे २६ येविसी

१ नावाचे निवाडपत्र १ मोकदम देहाये पाा

मजकूर

१ देशाधिकारी पाा मजकूर

.....

३

३ लक्ष्मण वलद वडोजी व दुगर्जी वलद सूर्याजी याचे वाटणीचे गांव ८१ येकासी येविसी—

१ नावाचे १ मोकदम देहाये १ देशाधिकारी

.....

३

६ शेलके देशमूख अवचितराव व संताजी याचा व शंकराजी शेलके देशमुख याचा व शंकराजी शेलके देशमूख याचा कजिया होता त्याचा निवाडा होऊन अवचितराव संताजी याची वतणी गांवची व वडिल धाकुटपणाचा निवाडा करुन पत्रे करुन दिल्ही.

३ अवचितराव वलद खडोजी हा देशमुखीचे वतनास वडिलपणास खरा जाहाला वाटणीचे देहे १ ७५ देखील कसबा समाईके मिलोन येविसी पत्रे १ नावाचे मोकदम देहाये प्राा मजकूर १ देशाधिकारी

.....

३

३ संताजी वलद मल्हारजी सेलके याचे वाटणीचे देहे ३६ येवेसी—१ नांवाचे,

निवाडपत्र १ मोकदम देहाये १ देशाधिकारी

.....

३

U ६

U १२

१५ देशपांडे बेंदरे व पोटे याचे विभागाचे वाटणिविसी ३ बेंदरे देशपांडे हरी बापूराव व शंकराजी लिंबक बेंदरे देशपांडे याचा कजिया होता त्याचा निवाडा होऊन हरी बाबूराव याची वाटणी करुन दिल्ही देहे २५।। येविसी

१ नांवाचे १ मोकदम देहाये १ देशाधिकारी

.....

३

१२ पोटे देशपांडे त्रिंबक नरसी व अवदूत चिमणाजी दयाराम रघुनाथ व भास्कर यादव याचा व राहूजी सिवाजी याचा विभागाचे वाटणीचा कजिया होता त्याचा निवाडा होऊन त्रिंबक नरसी व अवधुत चिमणाजी व दयाराम रघुनाथ व भास्कर यादव याची वाटणी करुन पत्रें करून दिल्ही—

३ त्रिंबक नरसी देह १२

१ नांवाचे १ मोकदम १ देशाधिकारी

.....

३ सा क।। समाईक

३ अवधुतराव चिमणाजी.....देहे २४ .....का समाईक

१ नावचे १ मोकदम १ देशाधिकारी

.....

३

३ दयाराम रघुनाथ.....देह २४ खेरीज १ कसबा समाईक

१ नांवचे १ मो १ देशाधिकारी

.....

३

३ भास्कर यादव याचे वाटणीचे देहे २४ खेरीज १ कसबा

समाईक १ नावचे १ मोकदम देहाये १ देशाधिकारी

.....

३

U
१२

U
१५

U
२७

येकूण सतावीस पत्रे सदरहू विभागाचे वाटणीचा तपसील करून देऊन सरकारची नजर करार .....रो... .....सो.

६०००१

यासी मुदती

२०००० साल मजकूर फाल्गुन अखेर घ्यावे

४०००१ पेस्तर साल सन समान

२०००० भाद्रपद अखेर

२०००० फाल्गुन अखेर

.....

४०००१

.....

६०००१

तपसील

१२००० पत्रांत बेरजा लिहिल्या.

८५०० देशमूख

३००० लक्ष्मण वलद वाडोजी व दुर्गाजी वलद सूर्याजी म्हसके.

१००० तुलसाजी वलद नवलोजी म्हसके.

३००० अवचितराव वलद खंडोजी सेलके.

१५०० संताजी वलद मल्हारजी सेलके.

.....

८५००

३५०० देशपांडे

१००० हरी बाबुराव बेंद्रे.

१००० दयारांम रघुनाथ पोटे.

५०० त्रिंबक नरसी पोटे.
१००० भास्कर यादव पोटे.
.....
३५००

U १२०००

४८००१ किता करार.....
४७००१ देशमूख व देशपांडे मिलोन मोघम करार केले ते—
१००० दारकोजी सोनाजी देशपांडे बेंद्रे याचे पत्र होणे आहे त्यांत जमा व्हावयाचे.

U ४८००१

U ६०००१

येकूण साठ हजार येक रुपाया करार केले असेत यासी वायदे (वायदे ?)
५०००० रामाजी नाईक भिडे सावकार याणी हवाला घेतला आहे.....शो
२०००० फाल्गुन अखेर साल मजकूरचा
३०००० पेस्तरसाल सनसमानांत घ्यावे
२०००० भाद्रपदं अखेर
१०००० फाल्गुन अखेर
.....
३०००० .

U ५०००० .

१०००१ देशमूख देशपांडे याचा कागद लेहून घेतला आहे.
फाल्गुन अखेर समानचा हवाला आहे त्यापैकीं
.....
६०००१

पत्रांक—८ ७ मार्च १७६८

सु॥ समान सीतेन*छ १७ सवाल देवजी व॥ ठेमाजी व गंगाराम व राणोजी मोजाडे याचा व आजोजी व॥ मेवजी मोजाडे याचा परगणे नासीक सरकार संगमनेर येथील दरोबस्त पैकी चौथी तक्षिमेस देशमुखीचे वतननिमे व मौजे भोगुरे पो मजकूर येथील दरोबस्त पाटीलकी

निमेनिम प्रो हरदुजणाचे वतनास असता आजाजी मजकूर देवजीचे नाही म्हणोन कजिया लागोन मनसुबी हुजूर पडली होती त्यास मनास आणित देशमुखीचे चौथेतक्षिमेत दरोबस्त पाटिलकीचे वतन निमेनिम यो प्रो पंच्याईतमते होऊन देवजी मजकूर सदरहू प्रो निमे वतनास खरा जाहाला सा सरकारची हरकी रु।। ५००० पांच हजार करार करून सन इहिदे सीतेनात पत्रे भोगवटीयास दिल्ही होती ती पत्रे गोविंद हरी याजवल सरकारचे येवजा बा गाहाण टेविली होती ती पत्रे त्याजवळून गमाविली यास्तव पत्राचा दाखला दप्तरी पाहून पेशजी प्रो हाली पत्रे करून दिल्ही.....पत्र..... ..

.....

४

पत्रांक–९ ८ मार्च १७६८

(सु।। समान सितेन) छ १८ सवाल खंडो बाबूराव ता हवेली सगमनेर यांचे नावे पत्र की मौजे जोखे ता मजकूर येथील मोकादमीचा तुकोजी ढाणे पा व जोराजी इंगळा लोणे पा व जिवाजी शिवराम पा दिघे व मावजी थोरात याचा कजिया लागला होता त्याचा निवाडा हुजूर होऊन वाटण्या जाल्या त्या प्रो सदरहू जणास सरकारातून वाटण्या ठरऊन देऊन तुकोजी ढोणे याच्या नावे निवाडपत्र करून दिल्हे आहे तरी तुम्ही जमीदारास ताकीद करून सरकारच्या निवाडपत्राप्रमाणे महजर करऊन देऊन त्याजवर सरदेशमुखीचे दसकत व सिका करून देणे म्हणून

चिटणिसी.....पत्रे १

येविसी.....पत्र २

१ जमीनदार पा मजकूर यासी महजर करून देणे म्हणऊन

१ सेखोजी मुले यासी की निवाड पत्राप्रमाणे यास व याचे सदरहू तक्षिमदारास वर्तवणे व जमीन व घरवाडे ज्याचे त्याजकडे वाटणी प्रो (दुरका?) होत ते करणे म्हणऊन

....

२ ३

पत्रांक–१० १ एप्रिल १७६९

सन तिसा सितेन मया व अलफ छ २३ जिलकाद निंबाजी बिन येमाजी पाटील वाघमोडे मोकदम मौजे लासुर्णे पो इंदापूर याचा व तानाजी बिन बुधाजी याचा भाऊपणाचे वडिलपणाचा कजिया होता. त्याचा इन्साफ हुजूर करून निंबाजी वाघमोडे वडिलपणास खरे जाहाले...निंबाजीचे माथा सरकारची सेरणी रु। ६५०० साडेसहाहाजार करार केले ते सरकारात जमा जाले असेत.....तरी निवाडपत्र १

तानाजी गैरहजर जाला सबब त्याचे खोटपत्र १

येकूण दोन पत्रे चिटणिसी दिल्ही असेत निवाडपत्राची नकल तपशीलवार करून दप्तरी ठेविली असे.

पत्रांक—११ १३ नोव्हेंबर १७६९

सुा सबैन छ १३ रजब लक्ष्मणकासी व बाबुराव राम व शामराव उपनाम मिरीकर गोत्र विश्वामित्र सूत्र आस्वालायेन कुलकर्णी मौजे सिंगणे केशवाचे व मौजे राजेगांव ता। मिरी पा। सेवगांव यांचे निवाडपत्र लेहून दिल्हे की केसो त्रिंबक व त्याचा पुत्र नानाजी केशव डोभे (डोके, डोळे, डोभे?) निमे कुलकर्णी हरदूगांवचे.....तुम्हासि कजिया करून हुजूर मनसुबीस आणिली त्यास तुम्हाजवळचे कागद व डोळ्याचे दाखले मुकाबले पाहाता सारांश... ..... (३ बंद विस्तृत माहिती दिली आहे.) .....त्याजप्रमाणें खरा मजकुर हे जाणोन तुम्ही पेशजीचे ठाणे तिसगांव येथें महजर जाहला तो व पुणेकर जमीदार व मौजे मजकूरचे पाटीलाचे सार्वानि सवादे पत्र जाहाले ते दाखविले त्याजवरून व हली पाटीलाचे क्रिया घेतली त्याजवरून नारो आपाजी निा प्रांत पुणें सुभा याणी पंचाइतमतें निमे कुलकर्णी जाहले आहे त्याजप्रमाणें चालावें आसा सिद्धांत केला यास्तव हरदूगांवचे निमे कुलकर्णी तुम्हाकडे चालावयाची आज्ञा करून निवाडपत्र सादर केले असे.....अनभऊन सुखरूप राहाणें.....या अन्वयें तपसीलवार निवाडपत्र १

येविसी संक्षेप मजकुराचीं पत्रें

१ मोकद हरदूगांवचे १ जमीदार

पत्रांक—१२ २९ नोव्हेंबर १७६९

(सुा। सबैन) छ २९ रजब सदाशिवभट बिन नारायेणभट व रामचंद्र हरी देवधर कसबे मिठगावणे कर्यात मजकूर प्रांत राजापूर याचा व बावदेभट बिन कृष्णभट व गुणभट बिन गंगाधर भट परांजपे याचा कसबे मजकूर येथील ठिकाण वेलशेवडे या-विसी कजिया लागोन मनसुबी हुजूर पडली त्यास तुम्ही लेहून दिल्हे की ठिकाण...शेवड हे आमचे मिरासीबे वडिलेपार्जित आहे तेथे आपले वडिल परागंदा जाहाले तेव्हां कसबे मजकूरच्या देशमुखानी परांजपे यास वृतीत दिल्हे होते हाले हाली आमचे आम्हास परांजपे परत देत नाहीत म्हणोन त्याचा आमचा कजिया सुभा नारो त्रिंबक याजपासी पडला तेव्हां त्याणी ग्रामस्तांच्या सावी घेतल्या याजवरुन ठिकाण आमचे ऐसे आले परंतु पराजपे (न) यैकत याज करिता सुभाहून सडया बरवैर लेहून दिल्ही आहे ती स्वामीनी मनास आणून परांजपे हुजूर आले आहेत त्यास आज्ञा करावी म्हणोन विनंति केली त्यावरून परांजपे यास पुरसीस करितां त्याणी (निदबे?)

दिले की बवजी देसाई का।। मजकूर याणी हे ठिकाण आमचे वडिल विठलभट यास दान दिल्हे मिरास कोणाची हे आम्हास ठाऊक नाही हाली देवधराही सुभाहून ग्रामस्तांच्या सख्या बवखैर सरकारात आणिली त्याजवरुन आम्हीही सुभाचे पत्र गावास नेऊन ग्रामस्ताच्या सख्या घेतल्या त्यात देवधराचे ठिकाण यैसा दाखला पुरला नाही त्यास सख्या व सुभाचे वखैर आम्ही आणली आहे परंतु त्याणी सख्या आणिल्या त्या मान्य नाही याजकरिता दोघा वाद्याच्याही सख्यावर मदार न आणीता मागती त्याच्या आमच्या समक्ष ग्रामस्तांच्या सख्या श्री अंजनेश्वर देव का।। मजकूर याचे देवलाही घ्याव्या त्या सख्यात ठिकाण देवधराचे यैसा दाखला पुरला तरी ठिकाणासी आम्हास समंध नाही म्हणोन लेहून दिल्हे त्याजवरुन त्यासडीदारास तुम्ही मान्य आहा तेव्हा तुम्ही हरदूजणाबरोबर सदरहू प्रा साक्षी द्यावयाविसी सरकारचे पत्र घेऊन नारो त्रिंबक याजकडे सुभा रवाना केले त्याणी दोघा वाद्यांच्या कराराप्रो दाहा आसामी साक्षीदार ग्रामस्तांच्या साक्षी देवलाई घेऊन त्या सख्या व तुम्ही हरदूजणास रवाना केले...हुजूर आले तेव्हां सख्यांतील अर्थ हजीर मज्यालसीस पंचाईत मते मनास आणिता ठिकाण पुरातन देवधराचे ते परागंदा जाले होते म्हणून चालवणुकेस परांजपे यास देसाई दिल्हे त्याज सु।। पाउणसे अैसी वर्षे आजपावेतो परांजपे याजकडे चालत आहे, म्हणोन सख्यातील अन्वये पाहीन परांजपे यास पुसिले की ठिकाण तुमच्या वडिलास देसाई याणी दान दिल्हे अैसा घासला सडीत पुरला नाही ठिकाण देवधराचे म्हणोन सडीदाराही लिहिले आहे पुढें विचार काये तेव्हा त्याणी विनंति केली की या ठिकाणी पोा जमीन आमचे वृत्तीत पूर्वी दिल्ही आहे त्या वृत्ती पत्रात या मिरासदारा वेगळी जमीन अैसे ग्रामस्तांच्या सख्या व खैर दरुन रामाजी अनंत सुरसुभेदार याणी वृत्ती पत्रास लिहिले असता हाली देवघर हे आपली मिरास म्हणतात हे काये अैसे बोलोन रामाजी अनंताचे पत्र त्याहातर वर्षाचे आणून दाखविले यावरुन मनास आणिता देवधर परागंता जाला त्या वर्षे अैसी नबद होत आली त्यास देवघर गावी नसता त्याची जमीन वृत्तीस याजला दिल्ही तो हजीर नवता म्हणोन मिरासदारा वेगळी भुमी अैसे देशमूख खोत याणी लिहिले असेल परंतु वृत्ति पत्रांत दुसरा मिरासदार या जमिनीस लाभला नाही तेव्हा मिरास याची अैसे दिसते परंतु परांजपे हे ब्राह्मण विद्वान् योग्य आणि दिवाणातून मिरासदारा वेगळी जमीन लेहून वृत्तीस याजला दिल्ही त्याप्रमाणे त्याणी घर बांधोन भोगवटा घेत आले याजकरिता निमे ठिकाण परांजपे यास देऊन बाकी निमे ठिकाण व दरोबस्त ठिकाणची सेते... ... ...तुम्हास याप्रमाणे सिद्धांत करुन परांजपे यास आज्ञा केली आणि तुम्हास भोगवटी यास पत्रे करुन दिल्ही तरी... येविसी चिटणिसी पत्रे.

१ ..... (देवघरास) १ जमीनदारास कर्यात मजकर १ महादाजी रघुनाथ तालुके जहागिरी .....

पत्रांक–१३ २० सप्टेंबर १७७०

सुा इहिदे सबैन छ २९ माहे जमादिलोवल.

मौजे घोडे ताा मजकूर साा जुनर व मौजे साल ताा महालुंगे प्राा मजकूर या दोन्ही गांवच्या सिमेचा वाद.

चिंतो कान्हो याणी सन सीतैन निर्णय करून सीमा निश्चित केल्या होत्या. त्यानंतर एक वर्षानें मौजे साल हे वतन म्हणून रामाजी मल्हार यास देण्यात आले तेव्हां सालकरांनीं पुनः रामाजीपंताकडे तक्रार सादर केली. त्यानंतर दोन तीन कारकुनांनी सीमे विषयीं चौकशी केली. त्यावर विसाजी केशव सान्ये कारकून दि॥ सरकार यास चौकशी करण्यास पाठविण्यात आले. त्याने पूर्वी झालेल्या निर्णयांत दोष काढून मौजे घोडे पैकीं कांहीं जमीन जप्त करबिली. त्यावर चिंतो कान्हो आपली तीर्थयात्रा संपवून परत आले. त्यांनीं केलेल्या निर्णयाविषयीं फेर चौकशीं त्यांच्याबरोबर करण्यात आली. परंतु त्यांच्या उत्तरानें विसाजी केशवाचें समाधान झाले नाहीं. तेव्हां बावाजी अनंत दि॥ बाळाजी महादेव मांडवगणे मुख्य करून कार्यात मावल व ताा हवेली पैकी पांच गांवच्या पाटलांची पंचाईत नेमण्यांत आली. चिंतो कान्हो व विसाजी केशवहि तींत सभासद होते. परंतु तिच्या निर्णयाने सान्याचे समाधान झालें नाहीं. व त्याने एकंदर ११ मुद्दे काढले. तेव्हां पंचाईतीमध्ये आणखीन अधिक दुसऱ्या ५ गावच्या पाटलांचा समावेश करण्यांत आला. तेव्हां या नवीन पंचाईतीच्या निर्णयानें विसाजी केशव यांचे समाधान झालें व चिंतो कान्हो याचा निर्णयच प्रमाण ठरला. मौजे घोडे पैकीं जमिनीची जप्ती मोकळी केली.

पत्रांक–१४ ११ आक्टो. १७७०

सुा इहिदे सबैन मया व आलफ छ २१ जाखर.

सुभानजी बिन खंडोजी पाटील रणदिवे मोकदम मौजे रांजणगांव व सांडस ताा कढे सरकार जुनर विरुद्ध संताजी बिन येसाजी पाटील रणदिवे. यामध्ये मौजे मजकूर येथील वडिलपण मोकदमीविसी कजिया पडला.

..... मनसुबी हुजूर पडली त्याजवरुन हरदू जणाजवळील प्राचीन कागदपत्र व सड्या साक्षीवरून हुजूर हजीर मजालसीस पंचाईत मते मनास आणिता वडिलपणाचे संशये तुटेना यामुळें सिद्धांत होऊन निश्चये ठरला नाहीं तेव्हां तुमचे धाकटे भाऊ तुलाजी पाटील याचे त्याचे रजाचंदीनें तुलाजी पाटील वाणी तप्त दिव्य रव्याचे करावे या प्रो सिद्धांत ठरला त्याजवरून साल मजकुरी मौजे पाषाण ताा हवेली प्रांत पुणे येथे श्री सोमेश्वरासनिध वेदशास्त्रसंपन्न रामशास्त्री व थोरथोर ब्राह्मण व सरकारचे कारकून व प्रांत पुणें येथील जमीदार यास दिव्य घ्यावयास पाठविले तेव्हां तुलाजी पाटिल यानी तप्त दिव्य केले दिव्यास खरे निघाले मालोजी व आणसोजी रणदिवे खाटे जाले ..... सुभानजी पाटील मोकदमीचे वडिलपणास खरे जाले ". (नजर रुपये १००१ घेतली आहे.)

पत्रांक–१५ १ मे १७७५

(सुा खमस सबैन) छ ३० सफर.

येकोजी बिन दारकोजी येविन रायाजी पाटील करजुले विरुद्ध दारकोजी बिन माणकोजी व बाबाजी बिन तेजजी जथे (?) थळकरी मौजे मजकूर यामधील मौजे कडूस ता। रांजणगांव प्रांत जुनर येथील मोकदमीचा निवाडा. बाबूराव माणकेश्वर यांच्या पूर्वील निर्णयान्वये हुजूर पंचाईतीने येकोजीसारखा निर्णय केला. येकोजीकडून १३०० रुपये शेरणी घेण्यांत आली.

शक १४९१ मधील दाखल करण्यांत आलेला कागद, शक व संवत्सर बरोबर जमत नाहीं म्हणून पंचाईतीनें बातील ठरविला.

पत्रांक -१६ २६ डिसेंबर १७७५

सुा सीत सबैन छ ३ जिलकाद––

सुभानराव येशवंतराव शितोळे देशमूख पा। पुणे विरुद्ध मोकाजी नाईक यामध्यें सुभानराव हा यशवंतरावाने दत्तक घेतला किंवा नाही याविषयी वाद लागला. कारण मोकाजी नाईकाने सुभानरावास त्याच्या दत्त बापाचा (येशवंतरावाचा) देशमुखी वतनाचा विभाग देण्याचे नाकारलें. कागद अपूर्ण आहे.

.....येणेप्रमाणे तिघा पुत्राची वंशावळ त्यास येशवंतराव यास पुत्र संतान नव्हते याजकरिता त्याना मी पाचासहा वर्षांचा असता भाऊबंद व उपाध्ये व जोसी व पाटील व सेटे व माहाजन व बलुते वगैरे का।। मजकूराचे व राणोजी जगताप देशमूख कर्यात सासवड व पदाजीराव देशमूख ता। पौडखोरे याप्रमाणे येशवंतराव याणी बलाऊन आणून त्याचे समक्ष मजला त्याणी आपले वोटीत घेऊन आपला पुत्र केला साखरपाने लोकास वाटली व पागोटी दिल्ही त्यापासून अद्यापावेतो येशवंतराव याचा पुत्र म्हणोन आलो असता मोकाजी नाईक मजला येशवंतरावाचा विभाग देत नाही...

पत्रांक–१७ १३ सप्टंबर १७७७.

सुा समान सबैन छ १० साबान––

सिदाजी बिन जोगोजी रणनोवरे पाटील मोकदम मौजे मळद ता। पाटस प्रा। पुणे याणी हुजूर किले पुरंदर येथील मुकामी येऊन अर्ज केला कीं मौजे रावणगांव पो। सुपे येथील मोकदम माझे गांवचे जमिनीसी मुजाहीम हाल आपली जमीन म्हणोन मजसी कजिया करू लागले तेव्हां ते व आपण हुजूर फिर्याद आली हुजुरुन सिवेच्या निवाड्याबदल सरकारचा कारकून व स्वार प्यादे देऊन गोत जमा केले तेव्हा आपण माल घेऊन सिवेवर चालावे असे ठरले असतां रावणगांवकरांनी दिकद घेतली कीं डोकीस पागोटे घालून माल घेऊ नये त्याजवरून गोतानी

सरकारचे कारकुनानी रावणगावकरास सांगितले की मौजे करंजे ता। नीरथडी प्रा। पुणे व मौजे वाकी पा। सुपे या दो गांवच्या सिवेचे कजियाची माल करंजेकरानी डोकीस पागोटे असता घेतली. त्या प्रो। हे ही.....ल नाहीं अ (?) तरी तुम्ही माल घेऊन चालवणे त्यास ते वेळेस गाराहण त्याणी अैकीली नाही त्याजवर फिरोन हुजूर आले ते समई सरकारातून पंचाईतास मनास आणावयाची आज्ञा जाली तेव्हा पंचाईत मते श्री जेजुरी येथे कासवावर क्रियेचा निश्चये जाहाला त्यास रावणगांवकरही रजावंद होऊन मजला श्री जवल कासवावर उभे राहावयाची आज्ञा जाली त्याजवरुन श्री जवल आपण करारप्रो। क्रियेस पार पडून खरा जाहालो रावणगांवकर खोटे होऊन.....मजला येजितखत लिहून दिल्हे आहे ते साहेबी मनास आणून मजला भोग-वटीयास सरकारची पत्रे करून दिल्ही पाहिजेत त्याजवरु मनास आणिता मौजेजेजुरी येथील श्री पासील पद्धतीप्रमाणें याजला श्रीमल्हार तीर्थी स्नान करून देवलात श्रीपासी नेऊन गळाफूल माळ व कपाळी भंडार व माथा बेल ठेवून बिंदागेचे उचार मस्तकी ठेऊन श्रीपासी नेले तेथे याणी आपली बिंदाणे.....पावेतो जमीन आपली म्हणून बिंदाणाचा उचार करून बोलिला की माझी बिंदाणी खरी असली तरी पार पडेन नाही तरी खता ख्यानत होईल त्याप्रमाणें बोलिला याची माणसे या सुद्धा यादीत लिहिल्याप्रमाणें जेजुरीस आणिली होती त्यापासी दिवाणचे प्यादे व रावणगावचे दारकोजी व देवजी आटोल व आणीक दोघे त्यांची नांवे म्हसाजी ईश्वराव व म्हालोजी पवार एकूण आसामी च्यार याजपासी ठेवले होते. ते नित्य (प्र) माणेस पाहून सरकारचे कारकूनापासी व जेजुरीचे हकीमापासी व तेथील पाटील थळकरी याजपासी वर्तमान सांगत असत. याप्रमाणें दशरात्र पार पडले खता ख्यानत जाली नाहीं..... आकरावे दिवसी यास व याचे घरचे माणसास सरकारचे कारकुनानी व बापूजी माहादेव कादार मौजे जेजुरी व तेथील पाटील कुलकर्णी याणी आणून पाहून थळचे पत्र व बापूजी महादेव याणी आपले पत्र सरकारात लिहून चिमणाजी निलकंठ याजपासी दिल्हे की.....(तपशील दिला आहे.)..... त्याजवरुन चिमणाजी निलकंठ हुजूर पुरंदरास येऊन सदरहू वर्तमान सरकारात विदीत केले त्याजवरुन हिरोजीस पुरसीस केली की क्रियेस मलदकर पार पडले किंवा काही तुझी दिकत आहे ते सांगणें त्याजवरुन हिरोजीने विनंति केली की..... आपला संशय राहिला नाही..... आपण खोटे होऊन मलदकरास येजित खत आत्मसंतोषे लिहून दिल्हे.....मलदकराची जमीन खरी जाणोन याजवर कृपाळू होऊन मलदकरास निवाडपत्र अलाहिदा करून दिले...तुजकडे सरकारचे हरकीचा यैवजरुो २५००.....करार केला तो सरकारांत जमा असें.

पत्रांक—१८ ११ आक्टो. १७७९.

सुा समानीन छ ३० रमजान

रघोजी बिन अदोजी सालोखे पाटील मौजे नेरल प्रांत कन्हाड याणी हुजूर कसबे पुण्याचे मुकामी येऊन विदीत केले की मौजे मजकुरची पाटीलकी आपली आहे त्यास खत्रोजी बिन गेरखोजी सालोखे आमचे पाटीलकी विसी कजिया करीत होता याजकरिता आपण महादाजी

सिंदे याजकडे गेलो तेव्हां त्याणी सिदाजी भापकर पाटील मौजे लोणी पा सुपे याजकडे पंच्याईत नेमून दिल्ही त्याणी पंच्याईत मते मनास आणिली खेमोजी मजकूर.....खोटा जाहाला आपण खरे जाहालो या करिता त्याजपासून आम्हास यजितखत लेहून देविले त्याजवरून आम्ही पंत प्रतिनिधी याजकडे जाऊन सदरहू हकिकत समजाविली व येजितखत दाखविले ते त्याणी पाहून आम्हास भोगवटीयास पत्रे करून दिल्ही आहेत ती व येजितखत स्वामीनी मनास आणून सरकारातून आम्हास निवाडपत्र करून द्यावयाची आज्ञा केली पाहिजे म्हणोन विनंति केली व येजितखत व पंतप्रतिनिधी याची पत्रे आणून दाखविली त्याजवरून.....म्हणोन चिटणिसी पत्रे.....

पत्रांक–१८ (अ)


मौजे कासुंबे ता। देवरुख प्रां। राजापूर ता। रत्नागिरी या गांवच्या वतनाचा वाद. सरसुभा मार्फत निवाडा झाला. सरसुभाचे निवाडपत्र, खासगत झालेले येजित पत्र व तदनुरूप महिपतगड मार्फत देण्यांत आलेली पत्रे यांच्या आधारानें पुण्याहून हुजुरून भोगवट्यास पत्रे सादर करण्यांत आली हरकी १०० रुपये घेण्यांत येऊन सरसुभ्यास जमा धरण्यांत आली.

पत्रांक–१९ २६ एप्रिल १७८२

सु। इसने समानीन छ १२ जा।वल.

अमृतराव बिन भवानजी जगथाप देशमूख कर्यात सासवड विरुद्ध खंडेराव देशपांडे (पुरंदरे ?) ता। मजकूर याजकडमधील वतनी वाड्या विषयींची मनसुबी पंचाईत मते निवाडा झाला. देशपांडे खोटे झाले. अपुत्र विधवेचा आपल्या पतीच्या मालमत्तेवरील अधिकाराच्या दृष्टीने या वादांतील पुढील उतारा महत्वाचा आहे. उतान्याच्या शेवटी दिलेल्या वंशावळीवरून वादाची विशेष कल्पना येईल.

" .....यास्तव बाजी नारायण यास व बाळाजी खंडेराव यास वाड्यासी संबंध नाही येणेप्रो। पंचाईत ठराव होऊन निवाडपत्र तुम्हास सादर केले असे तरी तुम्ही व राघोजी बिन आपाजी जगथाप याणी बहीरजीच्या वाड्यानजीक समनाई आहे त्यात बहीरजीच्या कुणबिणी व बंदे असतील त्याची राहावयाचा वाड्यास मधे भिंत घालून आपले हिस्यात सोपे काढून वाड्याचा अनभव घेऊन सुखरूप राहाणे बहिरजीचे वंश ज्याच्या बाईका आहेत त्या जिवंत आहेत तो पावेतो तुम्ही उभयेतास वाडा विकावयास संबंध नाही व बाईकासहि तुम्हा दोघाचे इतल्यासिवाय विकावयासी आधीकार नाही म्हणोन निवाड पत्र....."



पत्रांक–२०


३ जून १७८४

सुाआर्बा समानीन छ १४ रजब अखेरसाल.

मौजे सिवणे ताा संगमेश्वर येथील खोती व मुल्येपणाविषयीं वेलंबकर व डिंगणकर याजमध्यें वाद पडला. त्याचे निवाडपत्र.

(सुाा आर्बा समानीन मया व अलफ) छ १४ माहे रजब अखेर साल बावाजी राम व केसो दामोदर वेलंबकर मुल्ये खोत मौजे सिवने ताा संगमेश्वर.....राजापूर याज पो। बाळाजीराम याचा चुलता नागो गोविंद याचा व बालाजी पुतलाजी याचा पिता पुतलाजी केशव व राघो हरी डिंगणकर याचा मौजे मजकूरचे खोतीचे वतनाविशी कजिया लागोन सन तिसा खमसैन मया व अलफचे साली हुजूर पुण्याचे मुकामी मनसुबी पडली तेव्हां उभयता वाद्यापासून तकरीरा व पुरसीसेची उतरे लेहून घेऊन वर्तणुकेस जामीन घेतले आणि हरदू वाद्याचे रजावंदीचे साक्षीदार नेमून हुजूरचा कारकून पाठवून श्री सोमेश्वर देव मौजे धामापूर ताा देवरुख ताा मजकूर याचे देवलाई सन सलास सीतेनांत साक्षीदाराच्या सड्या घेतल्या त्या हुजूर आल्या त्याजवरुन व उभयता वादी यांच्या तकरीरा व पुरसीसाची उतरे व कागदपत्रावरुन हुजूर पंचाइतमते मनास आणिता डिंगणकर याणी लिहून दिल्हे की आपला मूळ पुरुष मौजे डिंगणीचा डिंगणकर तेथील खोती कुलकर्ण ही दोनी वतने आमची त्यास तो गाव बालूल खान वजीर याजकडे मुकासा होता त्याचा हिशेब बारावयास आपले बडिल विजापुरास जात असत ते समई मौजे सिवने येथील मुलचा वतनदार होता तो बुडाला याजमुले ते वतन सरकारात आहे त्यास आम्ही भाऊबंद आहो येका गावावर कालक्षेप होत नाही यास्तव सिवने येथील वतनदारी आपणास करुन द्यावी म्हणोन बालूवान वजीर याजपाशी बोलले तेव्हा त्याणी पातशहापाशी अर्ज करुन बडिलापासून सेरणी घेऊन मौजे मजकूर येथील खोती व मुलेपणाचे वतन करुन देऊन पत्र करुन दिल्हे ते जवल राहिले नाही वतन प्राप्त जहाल्या आगोदरच मौजे माारी आपले

वडिल चारपाच पत्रें येऊन कुणाबावा करुन होते व वलंबकरहि वलंबाहून आमचे वडिलास मागली मौजे मारास आला तो गयाळी आगरावर राहिला त्यास वलंबेकराची व आमचे वडिलाची घरोबा चालत होता याजमुले वलंबेकरास देव देवसकी सांगोन मुलेपणाचे वतन दिल्हे ही गोष्ट दोनशे वर्षा पलिकडील आहे तेव्हापासून खोती आमचे वडिल करित आले व मुळेपण वलंबेकराकडे चालत आले आम्हास वतन साध्य जाल्यापासून आपल्या पिढ्या किती जाल्या हे ठाऊक नाहीं परंतु काही वंशावल ठाऊक आहे.



आहो ..... साहापुरुष मागे आमचे वडिल होते ते खोति करीत आले म्हणोन त्यास येविसीचा कागदपत्र डिंगणकराजवळ कांहीच नाहीं साक्षीदारांचे मुखे पुरवणी करुन देऊन म्हणून डिंगणकर याणी लिहून दिल्ही त्यास सड्यातील अर्थ पहाता .....

..... डिंगणराचे लिहिणे की खोती व मुलेपण ही दोन्ही वतने पातशाहापासून करून घेतल्यावर वलंबेकरास घरोबामुले देवसकीचे कामकाज सांगोन मुलेपणाचे वतन आमचे वडिली त्यास दिल्हे ही गोष्ट दोनसे वर्षा पलिकडील आहे व पुरसीसीत लिहितात की विजापूरकराचे कारकिर्दीस खोतास कमाविसदार म्हणत व श्रींगारपुरकराचे कारकिर्दीस खोतास आधकरी म्हणत खोती हा शब्द आलीकडे शंभर वर्षात जाहाला म्हणोन त्यास येविसीची वतन पुरसीस सडीदार यास करिता काही सडीदारानी लिहिले की विजापूरचे व सींगरपूरकराचे कारकीर्दीस खोतातच मुल्ये म्हणत होते ... कमाविसदार व अधकरी हा शब्द कोणाचे लिहिण्यास नाही व डिंगणकराचे लिहिण्यास ते समई खोती हा शब्द नव्हता तेव्हा बागाईत गावी मुख्य वतन मुलेपणाचे त्याचे अगर व खोतीचा कारभार अैसे असता ते वतन आपलेवडिली वेलबकरास दिल्हे अैसे डिंगणकर म्हणतात

त्याचा दाखला सब्यात कांही गुजरला नाही यास्तव हे बोलणे कल्पनेचे दिसते.....
.....काही साक्षीदार यांचे लिहिण्यातील मार की पंत प्रतिनिधी यांचा कौल जाहाळा ते वेलेस सिरपाव डिंगणकरानी घेतला व आगरे याचे कारकीर्दीत खोतखंड डिंगणकर याणी दिल्हा व कार्तिकी पौर्णिमेच्या त्रीपुर आपले जाणोपरी डिंगणकर पाजलतात परंतु नेम नाही यैसे येकाचे बोलणे.....

.....यैसे आठ जणांचे बोलणे व वेलंबकर सेते करुन डिंगणकरास थल आलीकडे आपले जाणोपरी देतात येसे पांच जणाचे बोलीत व शिवाजी महाराजांचे कारकीर्दीत खोतान मुशाहिरा होता तो डिंगणकर घेत येसे येकाचे बोलणे व आंगरे याचे कारकीर्दीत खोतास खटपटे होते ते डिंगणकरास पावे येसे दोघांचे जवानीत आहे याचा अर्थ पहाता वेलंबकराचे वडिल नातवान खोतीचा कारभार न बोढे याजमुले खोतीचा भोगवटा डिंगणकराकडे सोमाजी डिंगणकरापासून चालत आला इतकेहि प्रकार घडले यावरुन त्या प्रांतातील चाल पहाता ते समई हल्देकरी खोत्या करीत होते त्याणी सिरपाव घेऊन खोत खंडहि दिल्हा असता त्याजकडील खोत्या निघोन दुसरे वतनदार खोत म्हणून खोत्याकडील आहेत अैसे दाखले सरकारात पहाण्यात आले तेव्हां सदरहू मजकूर डिंगणकराचे साधनावर धरावयाचा नव्हे हाली राघो हरी डिंगणकर याचे बोलणे की वेलंबकरानी सडीदारास फितऊन आपले साधन पाडिले येविसीचे पत्री बजीनस पेशजी सरकारात आणून दाखविणे आहे म्हणोन त्यास उभयता वादी याची मनसबी सुबास पडली होती ते समई नारो गोविंद वेलंबकर याणे लक्ष्मण गंगाधर गद्रे महालदार (?) यास पत्र गावकरी याजविसी लिहिले ते डिंगणकर याणी वाटेस धरुन सुभा नेऊन दाखसिले यास्तव तेथे मनसुबीचा फडशा न जाला याजकरता हरदू जण वादी हुजूर आले ते वेळेस सदरहू पत्र डिंगणकरानी आणून सरकारात दिल्हे त्याची चौकशी ते समई मनास आणता नारो गोविंद याजला सुभा आडऊन तोडीचा कतबा घेतला याजमुळे त्याणे भयभीत होऊन पत्र लिहिले होते अैसे ठरले तेव्हां सरकारांतून खोताचे वतनाची जप्ती सन ईहिदे सीतेनात करऊन हरदू जणाचे रजाबंदीचे साक्षीदार नेमून हुजूरचा कारकून पाठऊन श्री सोमेश्वर मौजे धामापूर ..... चे देवलात सन सलास सीतेनांत साक्षीदारांच्या सब्या घेतल्या त्यावरुन निवाडा होईल त्यास मान्य म्हणोन उभयता वाद्यानी राजिनामे तेथेच लिहोन दिल्हे त्या सब्या पत्राचे अन्वये पडला अैसे दिसत नाही व वादी याचा प्रकार तर आपले साधन पडावे म्हणोन उभयता वादी सडीदारास सिकवीत असतील यास्तव श्रीचे पिंडीवरुन (?) सब्या साक्षीदारानी उचलून घ्यावयाचा सिरस्ता सरकारातून चालत आहे त्या प्रो श्रीचे देवलाई सब्या जाहाल्या नारो गोविंद याचे पत्राचा दोष राहिला नाही तेव्हा सदरहू पत्राचे आगोदर सडीदारास फितावल्या या दोष राघो हरी डिंगणकर बोलतो ते प्रमाण नव्हे .. ..

.....वेलंबकर मुल्ये खोत याणी लेहून दिल्हे की आमचे वडिल वेलंबहून मौजे सिवने येथे आले ते समई मौजे मारी देवरुखा ब्राह्मण मुल्या होता तो निपुत्रीक आणि काशीस जाऊ लागला त्या वेलेस त्याणे आमचे वडिलापासून तीनसे लारी घेऊन आपल्या सर्व अधि-

कारास आमचे वडिलास ईदलशाही कारकीर्दीत दिल्ही तेव्हापासून वतन मान पानसुधा आपले वडील अनुभवीत आले सिवाजी महाराजांचे कारकीर्दीत खोती हा शद्ब जहाला त्यास आमचे गावची खोती महाराजानी आमचा पणजा विठलप्रभु मुल्या यास ..... दिल्ही त्या प्रो तो करीत असता काही वर्षे आलीकडे नातवानी मुले ..... खोतीचा कारभार सोमाजी डिंगणकर याजला सांगितला होता ..... म्हणोन वेलंबकर याणीच लिहून दिल्हे आहे..... ....वेलंबकर खोतीचे वादास खरे जाहले. डिंगणकर याणी खोती मुख्येपणाचा आपला आमल लिहून दिल्हा त्याची पुरवणी कागदोपत्री व साक्षी मुखे काहीच जाली नाही सबब डिंगणकर खोटे जाले अैसा पंचाईत मते सिध्धांत जाहाला परंतु खोतीचा भोगवटा डिंगणकराकडे सोमाजी विठल डिंगणकर यापासून चालत आला यास्तव त्याजला कागदी खोतीविशी बेदखल करावे हे ठीक दिसत नाही व डिंगणकरानी दोन वेलेस समजी पत्रे केली त्या प्रो वेलंबकर ही मान्य जाले आणि परस्परे पत्रे जाहाली आहेत या करिता निमे खोतीचे वतन डिंगणकराकडे व निमे खोतीचे वतन वेलंबकर मुल्हे खोत याजकडे या प्रो ठराव करुन मौजे मारचे मुलेपण वतनीचे निमे खोतीचे वतन मानपान सुध्धा वेलंबकर याचे याजकडे ..... चालवणे येविसी . . पत्रे. ''

(बाळाजीराम व इतर याजपासून १०,००१ रुपये हरकी घेण्यांत आली.)

पत्रांक–२१ १९ जुलै १७८५

(मुा सीत समानीन) छ १२ रमजान शके १७०७.

'' राजमंडल स्वारी ..... विा गणेश विश्वनाथ नीवाड पत्रे मोकदम मौजे तलेगी पो सिदनाथयाचे नांवे निवाडपत्र कीं तुम्ही लस्करांत येऊन विदीत केले की ..... ''

यावरून स्वारीवर असतांना सुद्धां निवाडे करीत असे दिसतें.

मोकदम तलेगी पा सिदनाथ विरुद्ध मोकदम गोलसगी पो चिमलेगी यामध्यें उभय गांवातील सीमेवरील आडमार्गाविषयीं, मार्गाचे जकातीविषयीं व सीमेविषयीं कजिया पडला. त्याचें निवाडपत्र—

'' .....त्याजवरून गोलसगीकर मोकदमास मसाला करून सरकारात आणून हरदू वादापासून मुचलके व जामीन घेऊन बाबानी भौवर गांवकरी पंचाईतीस आणावयाविसी नावनिसी लीहोन दिल्ही त्यास आणून हरदू वादापासून राजीनामे लेहून घेऊन पुरसीस केली त्याची उत्तरे हरदू बावानी दिल्यावर बावानी पंचाईतीस सीव दाखविली त्यास गोलसगीकर लिहितात कीं.....त्याजवरून पंचाईत मते मनास आणिता जकातीचा आडमार्ग तलेगी कराचा ठरला..... (हरदूवादी कागदपत्र पुरावा दाखल करूं शकले नाहींत तेव्हां दिव्य द्यावे येसे ठरले) ....

पंचाईत मते ठराव दिव्य घ्यावे ऐसे जाहाले त्यास आमचे वादे तलेगीकर (यानें प्रथम तकरीर सादर केली.)... ....याणी मेंडा (मेंढी ?) घेऊन चालाव त्याचे पाठीमागे आम्ही घोंडे टाकीत जाऊ याप्रो कबूल होऊन राजीनामा लिहून दिल्हा.....गोलसगीकरास आज्ञा केली की तुम्ही कौल जामीन घेऊन सिवेवकर जाऊन तलेगीकर सीवेवर मेंडे घेऊन चालतील त्याचे पाठीमागून तुम्ही दगड पुरणे म्हणोन... . .....गोलसगीकर बोलले की आम्हास कोल जामीन द्यावयास मिळत नाही.....सरकारातून आज्ञा जाली की कोल जामीन मिळत नाहीं तर मेंडा घेऊन.....चालावे तलेगीकर पाठीमागून दगड पुरतील तुम्ही खरें जाहाल्यास हरकी माफ व खोटे जाहाल्यास गुन्हेगारी माफ त्याजवरून गोलसगीकर बोलिले की आम्हास साधन सूत्र नाहीं आमच्याने सिवेवरून चालवत नाहीं आम्ही तलेगिकरास योजित पत्र लेहून देतो....."

तलेगीराकडून १५० रुपये हरकी म्हणून घेतली स्वारीत पोता जमा (झाले असत). जाले असत.

जकात आडमार्ग :— " .....मौजे (तलेगी) मजकूरचे सिवेंतील आडमार्ग मौजे कुडुंगी पा मुलवाड या गांवावरून कसबे चिमलग्याकडे पूर्वापार जात आहे त्यास सिधनाथ परगण्याची माहाल जकात आम्हाकडे चालत असता (= तलेगीराकडे).....मौजे गोलसगी पा चिमलगे येथील मोकदम आपली सीव म्हणोन आडमार्गाचे जकातीस कज्या करून "

पत्रांक—२२ १ मार्च १७८६.

(सुासीत समानीन) छ २९ माहे रबिलाखर.

(सुरु सीत समानीन) छ २९ माहे रबिलाखर सिदोजी बिन गगाजी दगडया पाटील मोकदम मौजे तुलसी पा भोसे याचा व महीमाजी बिन मानाजी गव्हाण्या याचा मौजे मजकूरचे पाटिलकी विसी कजीया लागोन सत्र इहिदे सबैन मया व आलफचे साली हुजूर पुण्याचे मुकामी मनसुबी पडली हरदूजणानी आपलाल्या तकरीरा पुरसीसाचे उत्तरे लिहून देऊन साधकाचे कागद पत्र दाखविले वर्तणुकेस जामीन दगडयानी मुलतानजी पाटील मौजे बोडले पो अकलूज यास गव्हाणे याने लक्ष्मण वा पिराजी पाटील मोकदम मौजे खेड पा भोसे यास दिले उपरांत साथीदाराच्या सडया घ्यावयाकरिता सरकारातून लक्ष्मण रुद्र कारकून नेमून दिल्हे त्याचे विधमाने सडीदारानी क्षेत्रनीस नरसीपूर येथे श्री देवलाई सत्योत्तर सड्या लेहून देऊन त्रीरात्रीचे नेमास छत्तीस आसामी पार पडिले त्यापैकी वजा क्रियाबाल आसामी दाहा बाकी आसामीसर्वास यांच्या सड्या व सदरहू सड्या जाल्याचे..... लक्ष्मण रुद्र कारकून यास समजल्यावर त्याणी चौकसी करिता तेरा आसामी गावकरी याणी सभा केल्याच्या जबान्या लिहून दिल्या त्याजवरून पेशजी मोरोहरि याणी मनास आणून दगड्या खोटा....ठरऊन गव्हाणे या सन सीत सबैन मया व अलफचे

साली सरकारचे निवत पत्र करून देविले परंतु दरोबस्त मोकदमी आमची दगड्याची असता आमचे साधन सूत्राचा लोप करुन गव्हाण्यास निवाडपत्र करुन देविले याची चौकसी पुनः जाली पाहिजे म्हणून दगड्या आजपर्यंत नेहमी हुजूर फिर्याद करीतच आहे यास्तव मनसुबी प्रगरणी पेशजीचे कागदपत्र हुजूर दसरी आहेत ते पाहता दगड्याचे लिहिण्यात.....मोकदमी पुरातन आपली.

.....रत्नोजी गव्हाणीत जाहाला तेव्हांपासून गव्हाणे आडनाव पडले
(११ बंद विस्तृत माहिती.)--(सारांश : —) गव्हाण्यास पुरातन आपले मोकदमी ऐसे म्हणावयास समध नाही पुरातन मोकदमी दगडथाची म्हणून हाली दरोबस्त मोकदमी दगडथाकडे चालवावी तरी रत्नोजी पासून महीमाजी बिन मानाजी गव्हाण्या पावेतोच्यार डोया मोकदमी गव्हाणे याणी चालऊन कस्त मेहनत करुन पांढरीची चाकरी केली यास्तव वडिलपण आधी दगडथाची व याचे मागे निमे पाटीलकीचे वतन धाकुलपण गव्हाण्यानी व याच अन्वये मानपान उभयतानी घ्यावयाचे. ..... येणेप्रमाणे ठराव केला त्याप्रमाणे गव्हाणे याणी सवादपत्र लेहून देऊन वर्तावे ते न करिता गैर हाजीर जाहाले सबब त्याचा जामीन लक्षुमण.....मोकदम मौजे खेड.....याजला हुजूर आणून गव्हाणे याजला हाजीर करुन त्याचे वर्तणुकेचा जाब करणे म्हणोन आज्ञा जाहाली त्यावरुन लक्ष्मण मजकूर गव्हाणे याच्या शोधास गेला परंतु गव्हाणे याचा शोध न लागे यास्तव गव्हाणे पाटील याचे वर्तणुकेविसीचे येजीत पत्र सदरहू ठरावाचे दगडथाचे नावे शेलका मजकूर याजकवीं लेहून देवून व पेशजीचे... .....निवाडपत्र सरकारातून गव्हाणे याचे नावे जाहाले आहे तें रद करुन ही नीवाडपत्रे सादर केली अमेत....."

पत्रांक २३ ८ मार्च १७९२

(सुा इसने तिसेन) छ १४ माहे रजब —

रामचंद्र सिवाजी व महिपत नारायण कुलकर्णी मौजे चिंचोडि पो। नेवासे यास निवाडपत्र करून दिले की तुमचा व गोपालजी निवाजी व निंबाजी अनंत कुलकर्णी मौजे मजकूर याचा भाऊपणाविसी मौजे मजकूरचे कुलकर्णाचे विभागाविसी कजिया लागोन मनसुबी हुजूर पडली त्यास हरदू वाद्यात आपल्याला तकरीरा व पुरसीसा लेहून देऊन साधनाचे कागदपत्र दाखविले व मौजे मजकूरचे पांढरीच्या सडया श्री जेजुरीच्या कासवावर पंचरात्रीचे नेमाने घेतल्या त्याजवरून मोरो हरी याणी अनाजी सिवाजी व महिपत नारायण याचे हातास टिपऱ्या लाऊन बहूत तसदी दिल्ही याजमुळें महिपत नारायण याच्या हाताच्या शिरा आखडून बोटे वाकडी जाली ती अद्यापवर तसीच आहेत या प्रो तुम्ही वर निग्रह करून निबाजी विठ्ठल व निंबाजी अनंत याजला दरोबस्त वतनाचीं पत्रें सन तिसा सबैनचे सालीं करून देविली सबब तेव्हापासून तुम्ही हुजूर फिर्याद करून नेहमीं राहून लिहून दिल्हे की श्री जेजुरीचे कासवावर सडीदाराच्या सड्या

घेतल्या त्यापो बेवीस असामी आम्हाकडील व पंधरा असामी वाद्याकडील अशी निवड सडिदाराची करून याज पो ज्यास क्रिया लागेल त्याचा पक्ष खोटा अशा करार करून पंचरात्रीचे नेमानें सडीदाराकडून क्रिया करविली त्यास दोहोकडील सडीदार नेमास पार पाडिले असे. आम्हा हरदू वाद्यापासून लेहून घेतले तेव्हा जेजुरीकर थळकरी शेला पागोटे मागो लागले याजला आम्ही दोघे वादी खरे जालो याजकरिता आम्हा दोघाकडून शेले पागोटी मोरो हरी याणी देविली असता पुढें महादाजी सिंदे याजकडील बाळाजी गोविंद यांचे भिडेमुळें मोरो हरी याणी वाद्याचे अगत्य धरून हरदू निंबाजी याचे वडिलाची तीन जींत येजीत पत्रे व सरकारचे निवाडपत्र वगैरे आमची साधने बहूत असता त्याचा लोप करुन वाद्यापासून मनस्वी पैका खाऊन आम्हावर जबरदस्ती केली आणि हरदू निबाजी याजला सरकारची निवाडपत्रे करुन देविली त्याची पुन्हा वाजवीचे रुईनें चौकशी करुन फडशा केला पाहिजे म्हणोन या अन्वये तपसीलवार मजकूर लेहून दिल्हा त्याजवरुन मागणी दरोबस्त कुलकर्ण हरदू निंबाजी याजकडे चालत होते त्याची जप्ती सन सलास समानीनचे साली करून पूर्वी घाटसीरसचे पारी व नारो बाबाजी व मोरो हरी याचे विद्यमाने येकूण ३ वेळा निवाडे जाहल्याचे कागदपत्र सरकारदप्तरी आहेत त्याची चौकशी पंचाईत मते करिता.....

.....या प्रो सब्यांत दाखला गुजरला असता पंधरा असामीनी अनाजी सिवाजी व महिपत नारायेण हे हरदू निंबाजीचे वंशभाऊ नव्हते जडे खरे म्हटले हेच बलवतर धरावे तर कांही सडीदारास निंबाजी विठल याणी पैका देऊन आपलेसे केले आहेत असे तुमचे बोलणे पडले त्याचा विचार करिता रामचंद्र सिवाजी व महिपत नारायण हे आमचे येकजदी भाऊ नव्हत असी तुम्हीं साक्ष देणे येविसी हरकोणाचा उपद्रव तुम्हास लागल्यास तो आपण निवारु ऐसा मौजे मारचे माहारासी करार करून सदरहू अन्वये त्याचे नावे निंबाजी विठल याणी कागद लेहून देऊन पांचशे रुो त्याजला लाच देऊन त्याचा रोखा कर्जाऊ म्हणोन लौकिकार्य लेहून घेतला त्याची चौकसी करिता महाराचे नावे.....निंबाजी विठल याणी आपले स्वदस्तूरचा कागद लेहून दिल्हा तोच कागद व जीनस.....तो सरकारात दप्तरी आहे तेव्हां बरकड सडीदारास निंबाजी विठल याणी लाच देऊन आपलेसे केले असे तुमचे लिहिणे आहे ते लटके म्हणता येत नाही तेव्हा चौदा आसामीचें बोलणे हरदू निंबाजी साधनास कसे धरावे तथापी चवदा आसामी क्रियेस पार पडिले सबब हरदू निंबाजीचे साधनावर धरावे तर दोघेहि रंगो मुराराचे वंशीचे भाऊ म्हणून बोर गावास येऊन निमे निम कुलकर्ण तुमचे व हरदू निंबाजीचे वडील करीत आले व परस्पर येकमेकाची सुतके धरीत आले आलीकडे हरदू निंबाजी अनाजी कडील धरीत नाही व अनाजी हरदू निंबाजीकडील धरतात त्याप्रो बहुतेक सडीदार याणी लेहून त्या आसामी व सदरहू चवदा असामी हे सर्व सडीदार पंच रात्रीचे नेमास पार पडलेत तेव्हा दोघेहि वादे खरे व्हावे या अन्वये सब्यांतील साधक आहे.....

.....

(पुराव्याचें सूक्ष्म विवरण).....रामचंद्र सिवाजी व महिपत नारायेण हे आपले घरांत चोरुन

स्नानसंध्या करून कपाळाची गंधे पुसुन आम्हाकडील सुतके धरितो असी लटकीच कुभांड करितात..... याजवरुन पहाता लिखित मुक्त साक्षीनसी तुमचा पक्ष बलवतर स्पष्ट दिसतो..... त्याजवरुन पेशजी नारो बाबाजी याणी तुमचे वडिलाचे नावे पत्रे करून देविली ती योग्य आहेत असे जाहाले त्या दिलान्वयावरून रामचंद्र सिवाजी व महिपतराव नारायण हे आपले वंशभाऊ नव्हत असे गोपाळ निंबाजी व निंबाजी अनंत म्हणत होते त्यासी ते खोटे पडले... .. तुम्ही..... मौजे मजकूरचे कुलकर्णाचे निमे वतनाचे विभागी खरे जाहाला यास्तव गोपाल निंबाजी याचा बाप निंबाजी विठल व निंबाजी अनंत याचे नावे पेशजी सन तिसा सबैन मया व अलफचे साली दरोबस्त कुलकर्णीची पत्रे रामशास्त्री याचे संमती सिवाय मोरो हरी याणी करुन देविली याचे संमतीसिवाय मोरो हरी याणी करुन देविली ती रद्द करुन हे पत्र तुम्हास सादर केले असे.....

(विजयी पक्षाकडून ६०१ रुो हरकी घेण्यांत आली)

पत्रांक—२४ १७८५ (?)*

मौजे हेदवी ता॥ गुहागर ता॥ अंजनवेल येथील महाजन जोगळेकर बंधु यामध्यें आपसांत अपुत्र बंधुच्या विभागाविषयीं आणि दाहिजा ठिकाणाविषयीं वाद लागला. सडी घेण्याविषयींचा त्या वादांतील पुढील उतारा महत्त्वाचा आहे. विजयी पक्षाकडून ५०१ रुपये हरकी घेण्यांत आली. " .....कजिया करु लागले यास्तव हुजूर आले या अन्वये लेहून देऊन आपले साधनाचे कागद असल दाहा व नकला तीन एकूण तेरा पत्रे दाखविली नंतर हरदू वाद्यापासून जमान घेऊन दोघा वाद्यांचे रजाबंदीने साक्षीदार आ॥ ३७ सततीस याची यादी लेहून घेऊन साक्षीदारास पुसावयाची कलम बंदीची यादी देऊन सिवाजी गोविंद कारकून व सुभा अंजनवेल येथील कारकून श्री वेलणेश्वरी पाठऊन तेथून सड्याचे वीस आसामीच्या यादी प्रमाणे प्रथकारे घेऊन हुजूर आणिल्या व तेरा आसामी सड्या पुण्यात जाहाल्या त्या सर्व साधनाचा सारांश पहाता.....श्रीमंत कैलासवासी शिवाजी महाराज यांचे कारकीर्दीत दाहीजे जमाबंदीत धरून मुशाहिरा केला..... "

पत्रांक—२५ २१ फेब्रुवारी १७६७

पेशवादप्तर घडणीविभाग.

रुमाल नं. ४३ पैकी वतनपत्रें यांतून पुढील नकल घेतली आहे.

राजमंडल स्वारी राजश्री पंतप्रधान सुरु सबा (सीतेन) मया व आलफ.....

* मूळ दप्तरक्रमावरून असावी.

छ २१ रमजान वेंकाजी सखाजी उपनाम कटारे गोत्र भारद्वाज सूत्र आस्वलायन यास दिल्हे वतनपत्र ऐसे जे. शषो नारायेण याणी हुजूर पुण्याचे मुकामीं येऊन विनंती केली की तुम्ही कुटुंबवत्सल आहा कुटुंबाचे योगक्षेम चालला पाहिजे यास्तव मौजे कोन्हाली पा॥ म्हानवड प्रा॥ विजापूर येथील नाईकीचे वतन प्राचीन कोणाचे नवते गावाची लावणी संचणी पाटील कुलकर्णी याच्याने न होय यास्तव पाटील कुलकर्णी याणी आत्मसंतोषे जमीदाराचे विद्यमानें मौजे मजकूरचे नाईकीचे वतन देऊन महजर करून दिल्हा आहे त्याप्रमाणे सरकारातून करार करून देऊन भोगवटी यास पत्रे करून दिल्ही पाहिजेत म्हणोन त्याजवरून मनास आणिता तुम्ही कुटुंबवत्सल आहा तुमचे कुटुंबाचा योगक्षेम चालिला पाहिजे म्हणोन तुम्हावर कृपाळू होऊन मौजे मजकूर येथील नाईकीचे वतनाचा महजर करून आणिला व तो पाहून त्याप्रमाणें मजमाचा मजमून महजर व तेरीख छ ११ जिल्हेज शके १६८१ प्रमाथीनाम संवत्सरे श्रावण शु॥ त्रयोदसी इंदुवासरे मन ११६९ सीतेन मया व अलफ ते दिनी दर जागा ठाणे तेलसींग पा॥ हानवड सरकार हवेली प्रा॥ विजापूर हजीर मजालसी—

दिवाण

गंगोजी वागमारे सुभेदार
दि॥ श्रीमंत राजश्री पंतप्रतिनिधि.

राजश्री बापुजी मोरेश्वर
मजमदार नि॥ श्रीमंत
राजश्री येमाजीपंत आणा
रा॥ महिपतराव जिवाजी
फडणीस.

जागीर देसाई देशपांडे जमीनदार भोवरगांवकर पाटील व कुलकर्णी समस्त दैव वं बारा बलुते मौजे कोन्हाली प्रा॥ मजकूर,

चैना गौडा पाटील..... विकलम शेषो केशव
.....व कृष्णो कुलकर्णी.....
रखमाजी कुलकर्णी मौजे .....
तेलसंगी निशाण नांगर.....
(गौड पाटील व कुलकर्णी यांचीं
नांवे यापुढें दिलीं आहेत.)
.....
या समस्त विद्यमाने लिहिला' महजर ऐसाजे.....
(नेहमीप्रमाणें महजर लिहिण्यांत आला आहे. शेवटास बलुत्यांचीं नांवें घातलीं आहेत.)
.....
.....येणेप्रमाणें महजराचा मजमून पाहून त्याप्रो॥ मौजे मजकूरचे नाईकीचे वतन करार करून दिल्हे असे..... .....सेरणी रु. १०१ एकसे एक करार केले ते सरकारात पोता जमा जाहले असेत म्हणोन नांवेची.....सनद १.

APPENDIX—B

Section—III

Letters of the Chief Justice Ramashastri.

क्रमांक–१ सु. ११६१
पे. द. सं. नि. कागद, इ. १७६०।६१
रु. नं. ११

श्री

राजेश्री शंकरभाऊ देशमूख व गमाजी देशमूख व रावजी नानाजी व माधवराव देशपांडे पा॥ संगमनेर यासी प्रती रामशास्त्री असीर्वाद सुहूर सन ईहिदे सीतेन मया व अलफ संकराजी बिन सुलतानजी थोरांत मौजे उकलगांव ता॥ बेलापूर याचा वडिल सुभानजी वलद पदाजी यास लाडजी बिन भवानजी थोरात मौजे मजकूर याचा वडिल गणजी वलद सूर्याजी याणे आपले निमे मोकदमीपैकी निमे मोकदमी सवा आठसे रुपयासी विकंत दिल्ही म्हणोन कागद देशमुखाचे सिकेनसी व देशपांडे याचे दस्तक व भवर गांवच्या साक्षीनसी जाहला आहे त्याबद्दल हरदो जणाचा कजिया होऊन मनसुफी हुजूर पडिली आहे त्याचे साक्षीबदल तुम्हास हुजूर यावयाची आज्ञा केली असे तरी येणे तुम्हास यावयासी आट चार दिवस लागत–असीले तरी हा कागद जाहालीयास येकूण हातर वर्शे जाहाली तोपर्यंत कागद होता कोणा जवल संकराजीचे हातास कोणापासून कधी आला रुपये सवा आठसे करारापो लाडजीच्या वडिलास पावले कीं न पावले पत्रापासून आजीपर्यंत वतनाचा भोगवटा कसकसा चालत आला व येविसी कागदपत्र तुम्हाजवल काय कसकसे आहेत ते काकदावर गावच्या बळुतेचे साक्षी व गावच्या कुलकर्णाचे बी कलम व्हावयासी कारण काये हे सविस्तर *येथातत्थ सत्योतर लेहून पाठवणे.

क्रमांक—२ सु. ११७० रजब २७
पे. द. स. नि. कागद. श. १६९१ का. व. १४
रु. नं. ११ इ. १७६९ नोव्हेंबर

श्री

तालीक

वेदशास्त्र संपन्न राजश्री रामशास्त्री

स्वामीचे सेवेसी—

विद्यार्थी माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत असीले पाहिजे विशेष सदासिव नाईक सरदेसाई प्रा॥ राजापूर याणी हुजूर विदीत

* येथून अक्षर निराळ्या वळणाचे.

केले की शामलाकडे आपण कांहीं पत्रे पाठविलीम्हणोन सरसुभाहून हुजूर समजाविले याजकरिता याची पूर्ती चौकसी करावी तोपर्यंत आपण पुण्यातच राहतो म्हणोन त्यावरून हे पत्र आपणास लिहिले आहे तरी येविसींची पूर्ती चौकसी करुन मनास आणोन ठेवणे खासी स्वारी पुण्यास आलीयावर फडशा केला जाईल रा छ २७ रजब सुरु सबैन मया अलफ ×बहुत काय लिहिणे हे विनंति.

क्रमांक—३

पे. द. सं. नि. कागद.

रु. नं. ११

श्रीमंत प्रभुवर्य राजश्री... ..रावसाहेब यासी—

प्रती रामशास्त्री आसीर्वाद विनंति तागाईत छ १० जिल्हेज पावेतो वर्तमान यथास्थित असो विशेष छ २८ सवालचे पत्र पाठवले तेथे (दोन तीन शब्द कागद फाटल्याचे गेलेत) +++याणे सुरापान करून सई देशमुखीण प्रा चिकोडी ईजपाशी बदकर्म केले या प्रो मुद्यास धरिला त्याजवरून तो गुन्हेगारीचे दाहा हजार रु. सरकारात द्यावयास मान्य जाला यास्तव उभयतां तुम्हाकडे पाठविली आहेत तरी याजपासून गुन्हेगारी ज्याजती साधेल तेथवर साधावी न साधे तरी सदरहू दहा हजार रुपयाचा निशा घेऊन कोणास किती ते प्रायश्चित द्यावे म्हणून आज्ञा त्याजवरून बालाजीस आणून रुबरु पुरसीस केली तेव्हां अकर्म केले यैसे कबूल जाला परंतु सुरापान आपल्यास घडले नाहीं सईचे (बाधणे ते माझेही देशी!) माझी फजिती जाहाल्यास आपला वाद सहजच सिद्धीस गेला यास्तव त्याणी आम्हा न कलत +++ सरकारच्या माणसानी आपल्यास धरिलें तेव्हां कटाले जवल आणून ठेविली ते सरकारच्या माणसास सांपडली त्याजवरून मजला मारझोड सरकारातून केली त्या धास्तीने जैसे मागतीले तैसे लेहून दिल्हे परंतु सुरापान मजपासून घडले नाही येविसी मी तप्त दिव्य करितो यैसे बोलला त्याजवर शास्त्रार्थ पाहाता व्यभिचाराचे प्रायश्चित थोडक्यात होईल परंतु सुरपानाचे प्रायाश्चित्य दुर्घट आहे तेव्हां ही चौकशी खातरनिशेची असावी याजकरितां विनंति लिहिली आहे तरी बालाजी सुरापान करितो यैसे मुदे धरावयास सरकारातून जे ग्रहस्त गेले होते ते विश्वासुक दुसरे याचे बोलीने लोभावार न जात आणि मुदेही प्रत्यक्ष हेचे दिकत सापडले अतापर ही चौकशी करावयाचे कारण राहीलेच नाहीं ऐसी स्वामीची खातर जमा जाली असील्यास तैसेच विस्तार लेहावैयाची आशा करावी सुरापानाचे प्रायश्चित कठीण आणि हा जातीचा ब्राह्मण यास्तव चौकसी चांगली असावी श्रुतहोय * हे विनंती.

× अक्षर निराळे माधवरावाचें असावें. * रामशास्त्रींचे हस्ताक्षर.

क्रमांक—४
पे. द. सं. नि. कागद.
रु. नं. ११

वेदशास्त्र संपन्न राजश्री बाळकृष्णशास्त्री यासी प्रती रामशास्त्री नमस्कार विनंति गणेश हरी खांडेकर व त्रिंबक हरी खांडेकर यांचा विचार करावा म्हणोन आपणास सांगितले होते त्यावरून याचे पहिले कागद हरी दामोदर यांकडील आपल्या विचारे जे कागद उभयता बाबांचे जाहाले होते ते मनास आणिले त्यावरून त्रिंबक हरी याचा राजीनामा जाहाला त्याप्रमाणे गणेश हरी याचाहि राजीनामा घेतला ते समई उभयेतांचा विचार विलेस लावावा तरी (उ) भयेतास प्रायश्चितामुले तट पडिला त्यावरी श्रीमंतांचे आज्ञेवरून तुमच्या विच्यारे त्याची शुद्धता जाहाली आलीकडे श्रीमंतांची आज्ञा राजश्री त्रिंबक विनायक यास जाहाली कीं तुम्ही पंचाईतामध्यें बसोन उभयेतांचा मजकूर विलेस लावणे त्यावरून आम्ही व त्रिंबक विनायक रंग महालांत बसोन उभयता बाबास बलाऊन आणिले आणि सांगितले जे तुमचा वाटपाचा कजीया विलेस लावावा लागतो या (स्त) व आपलाल्या यादी करार करून देणे म्हणोन आज्ञा केली त्यास गणेश हरी बोलिले की जुना कर्जबार जाला आहे त्याचा फडशा जाहाल्या वांचून आपण यादी देत नाही त्यावरून राजश्री गंगाधरपंत सर देशमुख या (ही) सांगिले कीं गणेश हरी सुधामत ऐकत नाहीं म्हणोन श्रीमंतास विदीत करणें त्यावरून गंगाधरपंत याणी आम्हास सांगितले जे वेदशास्त्र संपन्न बाळकृष्णशास्त्री हे आपल्यास भेटलें होते आणि बोलिले जे हा न्याये आम्ही तुम्ही बैसोन विचारीला आहे परंतु त्याचे कागदपत्र जे असतील ते आम्हाकडे पाठऊन त्याचा विचार आम्ही विलेस लाऊ म्हणोन सांगितले त्यावरून त्याचे कागदपत्र आम्हापासी होते त्याचे फेरीस्त धालने आपल्याकडेस पाठविले आहेत फेरिस्ताप्रमाणे पाहोन घ्यावे * इत्यलं.

क्रमांक—५
पे. द. सं. नि. कागद.
रु. नं. ११ इ. १७७१ (?)

श्री

तालीक

श्रीमंत प्रभुवर्य राजश्री.....दादा

यासी

प्रति रामशास्त्री आसीर्वाद विनंति ता। छ २२ मोहरमपर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष भडिसवले याचा व कवठेकर याचा मौजे वाटद ता। सैतवडे येथील खोतीच्या वतनाचा कजिया आहे त्याची मनसुफी आम्हापासी आजी दोन तीन वर्षें होत आहे त्यास हरदो बापाही

* रामशास्त्रीचे हस्ताक्षर.

आपले स्वसंतोशे साक्षीदार लेहून दिल्हे व त्यांच्याच राजीमते सरकारचा कारकून कराले पाठऊन तेथील देशपांडे याच्या गुजरातीन श्री कृष्णेत साक्षी घेतल्या त्यात भडिसवले यांचे साधन कमी पडिले त्यावरून कारकुनाने प्रतिपक्षाने सड्या साक्षी घेतल्या यैसे भडिसवले बोलो लागले तेव्हा त्यास सांगितले की कराडिच्या देशपांडे याच्या गुजररातीने श्री कृष्णेत सड्या जाहाल्या आहेत त्यास किमपि गुंता नाही तथापि तुमचा संशय असीला तरी फिरोन साक्षीदार आणून चौकसी करून व तुम्हापासी कागदपत्र प्राचीन असीले तरी आणून देणे त्यावरून येक दोन कागद आणून दाखविले तेव्हा त्यास सांगितले की श्रीमंताची स्वारी पुण्यास आलीयावर ये मनसुफीचा फडशा होईल तूर्त तुम्ही घरास जाणे घरास म्हणून निरोप घेऊन गेलो ते आपणाकडे जाऊन गैरबाका विनंति करून राजश्री संकराजी केशव याजकडे सदरहू मनसुफीचे कागदपत्र बावयाचे पत्र आणिले त्या पत्रावर विनंति आहे ती खाशा दस्तुरची होय किवा नव्हे याचा संदेह पडला यास्तव वजीनस पत्रच पाठविले आहे त्यास आम्हापासी मनसुफीचा फडशा होणे तो कोणाचा संकोच न करिता करीत असतो तेथे मोरो हरी याची गणना काय आहे तथापि ते मनसुफीस संदेह स्वामीस असिला तरी पुण्यास कारभारी व मातबर मुळदी आहेत त्यास आज्ञा जाहाली याने फडशा करतील परंतु हुजूर न्याय पडिला त्याचे कागदपत्र माहाली रवाना करावयाची चाल आजी तागाईत नाही याजकरिता विनंति लिहिली आहे आज्ञा होईल त्याप्रो वर्तणुक करू श्रुत होये.

(पहा निवाडपत्रे क्रमांक ३१; २०—१—१७७३ मधील निर्णय पत्र. याच मजकुराचे नाना फडणविसाच्या नांवचेहि एक पत्र आहे).

क्रमांक—६

पे. द. सं. नि. कागद.

रु. नं. ११

श्री

मसुदा रद अपे.

राजश्री राघोजी आंगरे सरखेल

यासी

प्रती रामशास्त्री आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत गेले पाहिजे विशेष माहादाजी बलाल दांडेकर यांचा कज्या तुम्हा जवळ पडिला होता त्याचा फडशा येथास्थित न होये म्हणून माहादाजी बलाळ अतीताईपणावर येऊन रागे भरून सीखा तोडली आणि धोत्र फाडून कुपीत लावला त्या दोषाचे प्रायश्चीत दिल्याविना त्यासी पंगती व्यवहार करणार नाही म्हणोन कांही ब्राह्मणानी आग्रह केला यास्तव माहादाजीपंत हुजूर फिर्याद आला त्याचे परिहाराविसी पेशजी तुम्हापासी पत्रे लिहिली होती परंतु फडशा न जाला कंठी सूत्र

रागाचे वेलेस त्याग केले असल्यास त्याचा दोश कांही नाही परंतु दंड कमंडल धार केला होता की नाही हे तपसीलवार लिहून पाठवणे.

क्रमांक–७ सु. ११९० मोहरम ७
पारसनीस दप्तर शु. १७११ आश्वि. शु. ९
डेक्कन कॉलेज पुणे. इ. १७८९ सप्टं २७.

पो छ ७ मोहरम आश्वीन तिसैन.

रोजचे वर्तमान रामराव चिटणीस यासी लक्ष्मणराव गोविंद मल्हार रामराव याणी पुणीयाहून लिहिले ते–

पुा सेवेसी विज्ञापना पेणकर ब्राह्मणानी वेदशास्त्र संपन्न शास्त्री बाबांचे घरी उपोषण केले ते परवा लिहून पाठविलेच आहे. राजश्री नानानी व तात्यानी निरोप ब्राम्हणास पाठविला त्याजवरून व चहूं दिवशीं काय ते सांगू म्हणोन सागून पाठविले. त्याजवर शास्त्रीबाबानी आपले घरी त्रिंबकशास्त्री तिमगकच्यार्य दादाशास्त्री व आणखी दोन चार असे बोलाऊन आमचे घरी ब्राह्मणानी उपोषण केले तुम्ही सारे शास्त्री स्वस्थ सरकार स्वस्थ याचे कारण काय आम्ही सायंकाल परियंत उपोषण करावे तुम्ही सर्वांनी मनास येतील तेथे सभा कराव्या वलगना कराव्या हे काय प्रभूचे म्ह(ण)णे आमची ज्ञाती कोण हे म्हणे याचा निश्चय जाला पाहिजे याजवरून दोन च्यार ग्रंथ काढून दादाशास्त्री यास विच्यारिले त्याजवरून ते हेच संस्कारी म्हणू लागले तेव्हा हे चांद्रसेनी दालम्य हे सिध केले दादाशास्त्री याचे तोंडानेहि चांद्रसेनी असे म्हणविले तेव्हां आनाचार यात म्हणूं लागले. त्याजवर शास्त्रीबाबानी उत्तर केले तुम्ही यास म्हणता वेदोक्त करूं नका, शाली ग्राम पूजा करूं नका होम हावन करूं नका तेव्हां करिता मग अनाचार तो कसा तेव्हां कोंकण मावळ बहूत अनाचार त्याजवर पुण्यातच पनास हजार ब्राह्मण आहेत तेहि आचार शुद्ध आहेत की काय, म्हणून ते ब्राह्मण न्हेसेहोत नाही, त्यात त्याणी आनाचार मोडून व्यवहार प्रायश्चित त्याचे ते करितात तुम्हास कोठे विचारतात तेव्हा दादाशास्त्री कुंठीत जाहाले. त्याजवर त्यास विच्यारीले हे चांद्रसेनीय खरे. तेव्हां खरे असें बोलले. याप्रमाणें नानास चिठी लेहून द्या म्हटल्यावर आपण वडील लिहून द्यावे असें बोलले त्याप्रमाणें परवाचे दिवशीं जाहाले तात्या केवल डोईवर घेऊन करा जाता शास्त्री व नाना याजपुढें होत नाही असे तूर्त पडले आहे पुढें होईल ते लेहूं शंकरराव याजकडील प्रती आणून लौकर पाठवावी वरकड शंकराच्यार्य याचे पर्याय स्वामीनी लिहा ते खरेच आहेत येक ग्रंथमात्र योरले जागचा दाखल्यास येईल. वरकड येथे ठरले ते खरे. आपले घरी ग्रंथ आहेत त्यांत कांहीं उपयोगी असतील ते पाठवावे ताडपत्राचे शयाद्री खंडाविसी लिहिले त्यास ते वेलेस ते कांहीं घेतले नाही असें स्मरणांत आहे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

क्रमांक—८ सु. ११९० सफर १
पारसनीस दप्तर, श. १७११ का. शु. ३
डेक्कन कॉलेज, पुणे. इ. १७८९ आक्टो. २१

रोजचे वर्तमान रामराव चिटणीस यासी लक्ष्मणराव गोविंद मल्हार रामराव याणी पुणीयाहून लिहिले ते पत्र ग्रामण्याविषई.

पुा सेवेसी विज्ञापना ग्रामण्याचा जाहाला मजकूर वरचेवर लिहिलाच आहे. आलीकडे पहिली याद जाहली, त्यात एकदोन कलमे उणी करून सांगण्याविसी कलमे कमी करून याद पाठविली, शास्त्री बाबानी पाहूनहिचतरी कशास सांगावी, सांगणेच तरी याप्रमाणे सांगाल म्हणोन त्याच यादीवर पांच सात कलमे आणखी आपले मते लिहून देऊन याद माघारी पाठविली, यादीचे सांगणे माझे नव्हे चार ढलाईत व दोन कारकून घरोघर ताकीद करून करवावे आमचे सांगणे शास्त्राखेरीज नाही शास्त्रारीष्ट असले ते सांगू. त्यावरून ती याद तात्या-कडून नानाकडे आली. नानानी कानावर हात ठेविला याद आम्हाकडे आणावयाचे प्रयोजन नाही. तुमचे चितास येईल त्याप्रमाणे सांगा म्हणोन माघारी पाठविली. नंतर दुसरे दिवशी शरीरास आर्शाचे व्यथेने ग्रस्थ केले आहे. त्याजवरून तात्यास बोलाऊन आणून सांगितले कीं आमचे आंगी स्वामीत्व असता अन्यायें आम्ही शास्त्रारीत्य सांगत नाही म्हणोन दोश आम्हासच बाधला बाधतो की काय न कळे आसे बोलले. त्यावरून हे ही सर्व होऊन बहुत विचारात पडिले. आपा व दादोपंत मराठे व गंगाधर दीक्षित गोडबोले व माहाला दीक्षित बसोन तसे विचार करिता कसे करावे म्हणोन उभयेतास विचारले त्याणीहि सांगावे ते साफ सांगितले या आग्रहात जीव नाही जो जो तुम्ही आग्रह करीता तो तो वेद त्याचे घरात घालता आसे होते याचा विचार करावा पूर्ववत चालते तसे चालवावे असे मोघम परवानगी देऊन चालते करावे वरकड हे च्यांद्रसेनी खरे यास ती कर्माचा अधिकार किंवहुना येक प्रतिग्रह मात्र करून ये वरकड पाचहि कमें यास उक्त आहेत असे बोलल्या नंतर सर्द होऊन विचारात पडले आपा शास्त्रीहि आणून बहुना प्रकारे विचार करिता ज्या तोंडे नका म्हणतो त्या तोंडे करा कसे म्हणावे. हेच अडचण येऊन पडली त्यात आलीकडे शास्त्री बाबासहि समाधान नाही याजमुळे स्तब्द आहे. आज त्रितीयेस गर्भादानाचा सोहाला करून पंचमी सप्तमीस गंगास्नानास जावे असे ठरले, नाना बोलावयास (?) जाणार होते ते हसील. वैशाखमासी जाणार दिक्षीत संबंधी जाबसाल मोघमच बोलल्यावर पडला आहे जाण्याचे गडबडीत काय करणेतेकरा म्हणायचे ते आज उद्या पुसोन घेऊन होईल ते मागाहून लिहू रा छ १ सफर हे विज्ञापना.

क्रमांक--९ सु. ११९० रविलावल २४
पारनीस दप्तर. श. १७११ मार्ग. व. ११
डेक्कन कॉलेज, पुणें. इ. १७८९ डिसें. १२

पो छ २७ रोावल मार्गसीर्ष तिसैन रोजचे वर्तमान रामराव

चिटणीस यासी लक्ष्मणराव गोविंद मल्हार रामराव याणी पुणी-
याहून लिहिले ते प्रभू चांद्रसेनीय ज्ञाती ग्रामण्य चालले ते विसीचे

पुा सेवेसी विज्ञापना शास्त्रीयाचा आधीकार बाबा मागे आपणाकडे असावा म्हणोन आयाशास्त्री याणी पर्याये करून नानाजवल उल्लेख केला व हे प्रकर्ण आपल्याकडे सांगण्याविसी बोलले मध्यस्तरी त्या बोलविले असता रुबरुतर त्यास्पष्टच उतर जाले की हा विषय तुमचा नव्हे तुम्हास समजत नाही मध्यस्ताजवळहि उत्तर जाहाले की हे द्राविड्याचा विशय नव्हे इतकी समजण्यास नाही ते शास्त्राती बोलतात तुम्ही आजचीत सांगणार ते कैसे अेकतील आम्हास गैरवाजवी कर्तव्य नाही. वाईट करीत असेल त्यास चांगले कर मार्गानी करा म्हणोन सांगावे ते चांगले येथाशास्त्रकिरतात त्यास वाईट करा म्हणे आमचे वस्तू होणार नाही आम्हास चार पंडित बसऊन येथाशास्त्र असेल ते सांगणे कोणाचाही धर्म लोप (?) करणे नाही याजमुळे आपले पंग्ती भोजनास अधिकार जाहाले तरी करणे प्राप्त परंतु शास्त्र संमते सांगणे तुम्ही फिरोन गोष्ट काढल्यास माननार नाही असे साफ जाले. स्वारी येताच वाकडे याचे घरी दतजयंती जाली तेथे पंडिताची सभा करून त्याचा समारंभ शास्त्रीबावाकरीत होते तसा आपण करावा म्हणोन आयाशास्त्री याणी वाकडे यासहि सांगोन पाठविले व तात्या नानासहि पुसावयास पाठविले त्यास वाकडे याणी उत्तर केले की तात्यानाना आज्ञा करतील त्या प्रो करून यावरून उभयेताकडे चनीकली केली नानानी हरिपंतावर टाकले तात्यानी निविष्ट सांगितले की शास्त्रीबाबा करीत होते ते श्रीमंताचे आशेने व शास्त्री राजमान्य होते त्याचे विचा (रा) स येत होते ते करीत होते श्रीमंतासहि मान्य होते त्याची योग्यता यास्तव या खटपटीत तुम्ही पडूं नये म्हणोन सांगोन वाकडे यासहि सांगितले की तुमचे घरी सिष्ट येतील त्याचा सन्मान करणे योग्यतेने तुमचा तुम्ही करावा सरकार रीतीचे करणे सरकार आशेसिवाय नाही आसे जाहालेच याचे कारण शास्त्री बाबा देशस्थ असता निर्लोभेकरून बहुत काल सर्वास दाखऊन आपली योग्यता राखिली ते शैल्यच होते आनायासे गेले परंतू सरकाराचे पदरी असा ब्राह्मण होता त्याची योग्यता येणार नाही जाणोन याजकरिता शास्त्रीबाबाचे चिरंजीवास वस्त्रे देऊन स्थानापन्न स्थापना केली आसे राखून त्यास हस्तक सर्व मान्य समंजस चांगला अेही मोठे योग्यतेस आणावा आसा अभिमान पूर्वक आगत्यवाद याजकरिता गंगाधर दिक्षीत व त्र्यंबक शाखी उभयताची जोड देवा (?) नाही त्यात मोठेवाण गंगाधर दीक्षितास; हे वाईस घरास जाऊन येऊन राहाणार, या कामास नेहमी असले पाहिजे तेव्हां याची स्थापना करावी असा बेत आहे. सोनाराचे वगैरे चौकशी करून आयाशास्त्री याची शोभा ठेविली नाहीच तत्रापी सिष्ट म्हणोन.....करोन सरकार किफायेत करितात याजकरिता मात्र नरसिंगराव नारायणराव म्हणोन राघवेंद्र नाईकाचे जमीस पाठविला होता... .....आहे त्यास हाताखाली देऊन सोनार वगैरे याची चौकसी करून चार रुपये मज ध्यावे इतकेच योग्यतेचे जाणोन ते काम मात्र त्याजकडे सांगितले आहे. आजून तात्याची त्याची चुरसहि आहे परंतु उघड नाही एकाकीक आहे. विदीत व्हावे रा छ २४ रोवल हे विज्ञापना.

APPENDIX—B
Section—IV
Orders issued by the Peshwas regarding Crimes and Their Punishments

Classification

			Serial Nos.
I	Offences against State	..	1—5
II	Offences against public interest	..	6—42
III	Offences against persons	..	43—68
IV	Offences against property	..	69—87
V	Miscellaneous	..	88—93
VI	Offences against family, morals and religion	..	94—125
VII	Penance and expiation	..	126—136

१. सुा सीत सीतेन (मया अलफ) १७६५।६६

बा्ा बाबाजी कृष्ण ग्वांडेकर हे तुलाजा आंगरे याचे फितुरास होते सा्ा गुन्हेगारीचा येबज करार

रोा ३५००

गुा्ा लक्ष्मण आपाजी येकबोटे कारकून सिलेदार.

२. सुा सीत सीतेन (मया व अलफ) १७६५।६६

बाबत आपाभट दामले तुलाजी आंगरे याचे फितुरात होते सबब मशारनिलेकडे करार रुपये २१००० पोा सप्रश्ने सोड रुपये ११००० बाकी करार रुपये १००००.

३. सुा सलास (सबैन !) १७७२।७३

बा्ा सिवाजी देशमूख पोा परवणी याणे परगणे मजकूरचें ठाणे बलकाऊन दंगा केला होता. सबब अन्याये माफ करून येबज करार गुनेगारी बा्ा केला त्याचा हवाला सदासिव हरि कमाविसदार पा्ा मजकूर याणी घेतला.

रोा १००००

४. सुा आर्बा (सबैन मया व आलफ) १७७३।७४

बा्ा गोविंदा बिन त्रिंबकजी तेली वस्ती मौजे आंबेड पा्ा आकोले याणी मल्हारजी ढगा देशमूख पोा कोतूल याणी यासी मिलोन मौजे धामणगांव व मौजे आंबड पोा आकोले व मौजे लिंगदेव पा्ा कडें गेथें जळिते केली सबब गुन्हेगारी

रोा ५०

५. पेशवा दप्तर, पुणे.

घडणी विभाग, रु. नं. ४७०

(बंद १) श्री. १३ मे १७८०

हिसेब कमावीस गुन्हेगारीबाा वीरेश्वरभट कर्वे वसूल समानीन मया व आलफ

(बंद २)

राजमंडल स्वारी राजश्री पंतप्रधान) सुा

कमावीस गुन्हेगारी बा। वीरेश्वरभट कर्वे) स

वसूल रुो।) मा

) नी

) न

छ ८ जोावल. वर आहेत. त्यास रोजमरे याचे वाटणी बा। रुो। (तपसील दिला आहे).

४०००

U रुो।

४००० छ ८ जोावल बा। देणे ता।

बाळाजी शंकर कारकून निसबत फरासखाना याजकडे जासुदाचे वगैरे रोजमऱ्याचे वाटणी बदल पा। रुबरुमार निले याणी व वासुदेवभट कर्वे याणी फितूर केला होता. त्यास वीरेश्वरभट यास अन्याय माफ करून च्यार हजार रुो। गुन्हेगारीचा ऐवज सरकारांत घ्यावयाचा करार केला ते देविले. रुो।

II. Offences against public interest.

६. सुा। ईसने खमसैन (मया व आलफ) १७५१।५२

बा। रणसोड नाईक चारण याजडून कोटीचा गला मोगलाचे दंग्यासमई किले सिंहगडास भाड्यानें नेला त्यात चारण मजकुरापासोन कांहीं तफावत पडिली. मा। करार केले गुा। मोरसेट वीरकर बा। जमा ता। खासगी निा। सिवराम कृष्ण १००० रुो।

७. सुा। ईहिदे (सीतेन मया व आलफ) २२ सप्टें. १७६०

बाबत रहिमान प्यादा दिमत पीलखाना याणे सन समानचे स्वारीत हतीचे रतीबात तफावत केली सा। गुन्हेगारी घेतली रुपये ५०

जमा पोता छ. १२ माहे सफर.

८. सुा। सबा सीतेन मया व आलफ १७६६।६७

बा। अबदुल कादर गाडदी याजकडे बंदीवान पांच असामी चोर होते त्या पो। दोन असामी पलोन गेले सबब येक महीना अठेचाळीस असामी बरतर्फ करून गुन्हेगारी

२००० रुो।

९. सुा समान सीतेन (मया व आलफ) २३ जून १७६६

बा्ा गोविंद जगन्नाथ व लक्ष्मण कृष्ण दिमत हुजूर हशम याजकडे सबब कीं फासेपारधी चोर ना (रा) यणगांव येथून धरून सरकारांत आणिले होते. त्यापैकीं रांडा व पोरे मार निलेचे हवाली चौकसीस ठेवली होती. त्यापैकीं तीन पोरे पलोन गेली सा्ा करार केळे बा्ा वसूल छ २५ मोहरम

३५० रुपये

१०. सुा समान सीतेन (मया व आलफ) २३ जून १७६७

बा्ा त्रिंबक गणेश का्ा दार का्ा वामोरी याजकडे का्ा मजकुरीचे मामलत समंधे तफावत निघाली सा्ा गुन्हेगारी करार केली ते जमा छ. २५ मोहरम.

१००० रुपये

११. शके १७०० सुा १७७८।७९

ब।। कासी केशव चिमणाजी बाभल देशपांडे व वेंकाजी गिरमाजी गुमास्ते पा्ा बोतूर पो मा्ा रनिले याणी बाजीराव आपाजी याजवर पा्ा केलेलेरे (!) व खरी बोतूरमाले (!) येथील मामलत बा्ा सन सबैन ता्ा सीत (सालांतील !) तजमरा पनास हजार रुपये लागू करुन देऊ याप्रमाणें लिहून दिल्हे. लागू न जाहाल्यास दाहा हाजार रुपये गुन्हेगारी घ्यावी या प्रो करार करुन वासुदेव नारायण व जगधीश व्यकटेश यास हामीस दिल्हे होते. त्यास करारा प्रो तजमरा लागू जाहाला सा्ा हाली सदरहू ऐवज घ्यावयाचा करार केला ते

सो १००००

१२. सुा समानीन (मया व आलफ) १२ एप्रिल १७८०

बा्ा नरसो श्रीपत कारकून नि।। गाडदी याणी रघुपतराव नारायण यांचे जसींत तफावत केली सा्ा गुन्हेगारीचा ऐवज करार केला तो जमा बा्ा झाडा

३०००

जसींत तफावत करुन सोने
ठेविले तोले २७।। ९।। दर
१५ प्रो ४१२।।

.....

३४१२।।

जमा परभारे रुो छ ६ रा्ाखर ३४१२।।

१३. शके १७०९ सुा समान १७८७

बा्ा सदासीव राम दातार दिा्ा हरि जिवाजी वर्षे निसबत शागीद्र पेशाचे कामावर गुमास्तागिरीन होते तेथे तफावत केली सा्ा गुन्हेगारीचा व तफावतीचा एवज घ्यावयाचा करार बा्ा झाडा रुो ३५००

१४. शके १७०९ सुा समान (समानीन मया व आलफ) ३१ मे १७८८
बा। स्वरुपचंद जोहरी जमा रो। २०००
... (५ ओळी सोडून)—छ २४ माहे साबान ऊर्फ वैशाख मास बा। देणे किले प्रतापगड निा। जयराम कृष्ण याजकडे किले मजकूरचे बेगमीस एवज हुजरून द्यावयाचा तो रसानगी यादी पैकी बलवंतराव गणेश खांडेकर कारकून याणी जवाहिरांत वगैरे तफावत करून जवाहीर विकले. ते जवाहीर जोहेरी मजकूर याणे वेतले त्याची चौकसी जयराम कृष्ण याणी करून गुन्हेगारी घेतली ते जमा खर्च करून देविले रुपये २०००
१५. शके १७०९ सुा समान ३१ मे १७८८
बा। केसो विस्वनाथ टिलक
जमा परभारे.

छ २४ माहे साबान ऊर्फ वैशाख मास बा। देणे किले प्रतापगड निा। जयराम कृष्ण बापट याजकडे किले मजकूरचे बेगमीस एवज हुजूरून द्याययाचा तो रसानगी यादीपैकीं मारनिले याणी बलवंतराव देशपांडये पुणेकर यांचे जप्ताचे दागिने यात जवाहीरखान्याकडील कारकुनासी मिलोन तफावत केली सबब जयराम कृष्ण याणी चौकसी करून पांच हजार गुन्हेगारी घेतली त्याचा जमाखर्च करून देविले.

५००० रो।

१६. शके १७०९ सुा समान (समानीन मया व आलफ) १७८७।८८
बा। आबाजी नारायण गोखले कारकून निा। दप्तर पोतनिसी जमा
१०००० रो।
(११ ओळी सोडून)—मशारनिले याणी जवाहिर-खान्यांत जवाहिरांत वगैरे तफावती करून घेतले व उदमीयास विकत दिल्हे. त्याची चौकसी जयराम कृष्ण याणी करून ठराव करून गुन्हेगारीचा एवज घेतला त्याचा जमाखर्च करून देविले. १०००० रो। (प्रतापगडच्या खर्च बेगमीस जयराम कृष्ण बापट यास दिले.

१७. सुा तिसा (?)

बा। फकीर महमद मण्यार याजकडे मौजे कैम पो। वांगी येथील मामलत होती त्या समंधे तफावत निघाली सा। गुन्हेगारी करार केली रो। १०००० दाहा हाजार रुपये त्याचा हवाला देवशेट बिन महादशेट वीरकर याणी फाल्गुन अखेरचे मितीने वेतला.

जमा परभारे १०००० रो।

१८. सुा इहिदे (सितेन मया व आलफ) २० ऑगस्ट १७६०
बाबत बयाजी महादेव कारकून दिमत पागा हुजूर याणी सालगुस्ता सरकारची आज्ञा नसता पागे पैकी घोडे आपले घरी लग्नास नेली होती सबब सदरहू गुन्हेगारीचा एवज विसाजी केशव यांचे माथी करार केला ४०० रुपये
जमा पोता छ ८ माहे मोहरम गुा। गंगाधर श्रीधर आर्काटी ४००

१९. सुा इहिदे (सीतेन मया व अलफ) २२ नोव्हें. १७६०

बाबत कुकाजी सिवराम याणे अंताजी माणकेस्वर याचे लेकास पालखीची वस्त्रें न विचारता दिली सबब गुन्हेगारी करार १००.

जमा परभारे छ ३ साखर

२०. राजमंडळ १७६४।६५

स्वारी राजश्री पंतप्रधान.....सु।। खमस (सीतेन ?) ब।। पाटील कमावीसदार याजपासून घेतले. गांवावरून स्वारी जात असतां भेटावयी आले नाहींत सा।। रो।

१० मौजे वडगांव पा। सेवगाव येथील पाटलापासून घेतले.

५० पाटील व कमाविसदार का।। मानूर.

७५ पाटील व कमाविसदार कासेगांव याजपासून घेतले.

.....

१३५

२१. ३ जाने. १७६५

सुा खमस सीतैन माहे रजबु. रो।

७५ छ १० रोज बा। पाटील का। कासेगांव याजपासून सा। राजश्री नारायणराव यांची स्वारी का। मजकुरास आली ते समई पाटील मजकूर भेटीस आले नाहींतं. सा। गुन्हेगारी. गु।। महादजी विश्वनाथ जोसी ७५ रो।

२२. सुा सबा सीतेन मया व आलफ १७६६।६७

बा। पुजाजी पाटील मौजे जवले पा। कडेवलीत हा स्वारी आली असता भेटीस न आला. सा। गुन्हेगारी करार. ५०० रुपये

२३. सुा ईसने (सबैन मया व आलफ) १७७०।७१

बा। आपाजी रामचंद्र देशपांडे पो। आकोले याणी साल गु।। मुरारराव घोरपडे याजकडे जरीपटक्याचे निशाण लाविले सा। गुन्हेगारी करार केली ते. ४००० रो।

२४. सुा तिसा सबैन (मया व आलफ) १४ जून १७७८

जमा पोता रो।

१०९३१ छ १८ जोवल अखेर साल जेष्टमास स्वारी कोंकण वि।। बालाजी विस्वनाथ बाबत हक जमीनदार व पाटील पंचोत्र यांचे यैवजी कमाविसदार यास बोलावून आणून खर्चास भागितले तेव्हां सर्वांनीं ठराव केला की जमीनदार व चौधरी व पाटील याणी इंग्रजास माहितगिरी करून कारभार केला सा। गुन्हेगारी हकाचे यैवजी पंधरा हजार रुपये सरकारांत तिजाईचे अज्रमासे घ्यावयाचा ठराव केला त्यापैकी जमा.....

२५. सुा खमस (सलासीन मया व अलफ) १४ जून १७३४

गोधाई अरगडी ईचे लेकीवर बद अंमल केलीयाचा आळ आला होता. साा बंदीखानी होती ते सोडून करार केले. ते रुो ५०

जमा मोता छ २३ मोहरम रु. ५०

२६. सुा सीत (सीतेन मया व अलफ) ११ मे १७६६

बाा रामचंद्र गोपाळ दफाते पत्रे. छ १ जिल्हेज वैशाख मास माारनिले यांचे नावे लेहून दिल्हा की तुम्हावर भोरदेसरहाणा (रानी ?) मद्य प्राशनाचा आळ आणिला येविसी तुम्हास हुजूर आणून वर्तमान मनास आणिता मद्यप्राशनाचा आळ तुम्हावर आल्याचा सर्व अन्याय माफ करून तुम्हाकडे सरकारची नजर रुपये ३००० तीन हजार करार केले ते सरकारांत जमा जाहाले असेत.....

सानगी यादी जाब १.

२७. सुा समान सीतेन (मया व अलफ) २४ ऑक्टो. १७६७

बाा बाजी गणेश कर्वे याजकडे साा की अरमाराचे तजकरी याचे प्रमाणांत कृष्णाजी नारायेण भट कारकून निाा हशम याणी पैका घेतला आहे म्हणोन लटके तुफान घेतले साा गुन्हेगारी करार.

रुपये ५००

जमा पोता छ ३० जमाविलोवल.

२८. सुा समान सीतेन १७६७।६८

बाा तुप्पा साली याजकडे साा की रेवजी साली हा आपले बाईकोजवळ जातो म्हणोन तुप्पा. माार याणे तुफान घेऊन हुजूर आला त्याची चौकसी करितां रेवजीकडे मुदा शाबूत न जाहाला व तुप्पा माार खोटा जाहाला. साा गुन्हेगारी करार केली. त्याचा हवाला बाबाजी महादेव याणी घेतला आहे आहे ते.

जमा रुपये ५०

२९. राजमंडल १७७२।७३ (१)

स्वारी मातुश्री बाई सुा

जमा साल मजकूर खेरीज महालानीहाये स

कमावीस गुन्हेगारी जमा पोता ला

माहे जिल्हेज. स

५. छ. २१ रोज बाा उदाजी भिसा भगत बाा मौजे मजकूर देवजी भावला मौजे मजकूर याचे घर जालाले ते साली पवारीण व परसोजी म्हसका याची स्त्री याणी जालिले म्हणोन सीत चढऊन नांवे घेतली. त्याची चौकसी मनास आणिता

खोटी सीते चढविली सबब गुन्हेगारी घेऊन गावातून काढून दिल्हा. ते गुा सालोजी आलीगरा व खेंडोजी जगथाप.
जमा ५ रुो

३०. सुा सलास (सबैन ?) १७७२।७३ (?)

U जमा पोता

रुपये ४०० छ १९ जिल्हेज कमावीस गुन्हेगारी बा हाय याजकाडून सा की शंकर बिन माणकू गुजर वस्ती नारायेणगांव याची सून वीरेश्वर दिक्षित याजकडे गावची मामलत होती. त्याच्या अमलांत मुत्य पावली. ती विश खाऊन मेली अैसे निमित्य येसू कालवे याचे सांगणी-वरून गुजरावर येएन, राघो नारायण हाली का दार याणी गुजरापासून दोनसे रुपये घेतले त्याची चौकशी करिता आपमरणाने मेली. सा गुजराचे रुा माघारे देवऊन गुन्हेगारी करार केली ते जमा छ १९ जिल्हेज गुा

सदासीव	रुा
२००	बा राघो नायेण कवें चौकशी न केलीसा
२००	येसू कोलंब लटिकी चाहाडी सांगितल्हीसा
०	लग.....
४००	

३१. शके १६०३ (?) सुा ईसन्ने

बा रामाजी आपाजी रामदासी गोसावी वस्ती मौजे मंगरूल ता आले प्रा जुनर याची बाईको माहेरा चुलता बालाजी विठल कुलकर्णी मौजे वडनेर ता मावेर (?) प्रा मार याचे घरी गेली सा गोसावी मजकूर याणे तिणवरी विभिचाराचे तुफान घेतले सा गोसावी कुलकर्णी यास हुजूर आणून मनास आणिता ते बायेकोवर दुरनिमित्ये नाहीसे जाहाले सा गोसावी मार पासून यैवज घेतला ते १५ रुा

छ २३ सफर भाद्रपद मास; गुन्हेगारी घेतली ते जमा रुो १५.

३२. सुा सबा (समानीन मया व अलक) ? ४ जून १७८७ (?)
जमा परभारे.

छ १७ माहे साबान ऊर्फ ज्येष्ट मास अखैर साल बा देणे ता राघो विस्वनाथ गोडबोले याजकडे गाद्दी दीमत हाय याचे आकारा पैकीं रसानगी यादी पो बा हाय गुा मारनिले यानी चौकशी करून घेतले रुा

४० येमाजी माली पुणेकर याजपासून गोमाजी विधाता याणे आपले घरी चोरी जाहाली त्याचे भय येमाजीस दाखऊन चावडीवर नेऊन कागद लिहून घेतला. त्यांत होते याजपासून गुन्हेगारी घेतली ते.....रुा

२५ येमाजी माली याचे आंगी मुदा नसता दागिन्याचा कागद लेहून दिल्हा सबब रुो.
१५ संताजी माली याणे येमाजीकडे बळेच चोरी लाऊन कागद घेवविला सबब.

४०

३३. शके १६८२ (ईहिदे) १४ नोव्हे. १७६०

बाा राधोजी बिन सिवजी गुंजाळ निमे मोकदम मौजे वाल्हे प्रांत जुनर यांच्या आज्यानें काऱ्याचे कुलकर्ण असता, जोशी याचे कुलकर्ण म्हणोन साक्ष दिली. ती लटकी जाहाली साा गुन्हेगारी करार रुा.

२०१

जमा पोता ० ५ रोखर

२०१.....

३४. सुा ईहिदे (सीतेन मया व अलफ) २१ नोव्हें. १७६०

वाबत चिंतामण भट डोंगरे व त्रिंबक महादेव मराठे व भास्कर बापूजी याचा ठिकाण मौजे थोर (?) ताा गुहागार येथील कंजिया होऊन मनसुबी हूजूर आणिले. त्यास चिंतामण भट व त्रिंबक महादेव याचे भाचे याणे बापूजी बाा येसोजी भंडारी साक्षीदार यासी सांगितले की तूं त्रिंबक पंतासारखी साक्ष देऊन दाहापांच रुपये देऊन त्याजवरुन भटजीकडी गुन्हेगारी करार करून घेतले गुाा भवानजी जोगदंड ढालाईत दि॥

सरवरखान छ १२ रविलाखर जमा रुपये २५

३५ सुा इसने (सबैन मया व अलफ) १७७१।७२

बाा बालाजी महादेव याचे रुपये बहीरजी साळोखा याजकडे येणे त्याविसिचा कजिया हुजूर पडिला. त्यास चौकशी करितां विस्णु महादेव सालोख्याकडील याणे येसजी बालाजी महादेव यास कागद लिहून दिल्हा होता त्याची नकल बालाजीने दाखविली त्यांत कागदापेक्षा अधिक अक्षरें आपले साधकाची लिहून दाखविली साा गुन्हेगारी करार केली. ते रुा १०.

३६. सुा खमस तीने (सै. ?) न (मया व अलफ) ५ सप्टं. १७९४
माहे सफर;

रु. ३००० छ १० रोज बाा त्रिंबकर ब्राह्मण व जमीदार व पंचाईत याजपासून घेतली साा की काा मजकुरी वलैकर व महाजन-यांचे घराचे गलीचा कजिया होता. तो साल गुदस्ता केसो गोविंद याणी विल्हेकडील कागदपत्र केले त्याजवरी साक्षी ब्राह्मण व जमीदार व पंचाईत याणी घातल्या त्याची मनसुबी साल मजकुरी मनास आणिता साक्षी अप्रमाण साा गुन्हेगारी घेतली ते जमा रामचंद्र नारायण काादार प्राा त्रिंबक अतकाट गंजीकोटी जावसुद. ३०००

३७. सुा खमस (सलासीन मया व अलफ) २० एप्रि. १७३५

गोविंद वल्लद येशवंत पाटील मोकदम मौजे खुरशदपूर व मौजे फकिराबाद व संत पाटील मौजे वल्लद गावजी पाटील मोकदम मौजे विरगांव व दुर्गाजी वल्लद खेवजी पाटील

मौजे कांगोणी पा॥ वैजापूर याणी हिरु वल्लद बकाजी कोष्टी याजवर तकलुबी रोखे ५ येकूण रुपये ४९००० येकूणपन्नास हजाराचे केले. धनको नाम गावजी पाटील रीणको नाम दिरु कोष्टी येणेप्रमाणे करून सदरहू रोख्यावर बीकलम रघू गुरव मौजे कापूस वडगांव याच्या नांवाचे घालून रुपयाकरितां कोष्टी मजकुरास तगादा केला त्यावरुन हुजूर पुण्यास मनसुबी जाहाली पाटील मजकूर खोटे जाहाले याकरितां पाटील मजकुराकडे घुन्हेगारी कोष्टी मजकुराकडे हरकी.

छ ७ जिल्हेजी करार पैकी गुन्हेगारी पाटील मजकुरबा॥ वायदेबंदी

रुपये	
१३७५	गोविंद पा॥ येशवंत पा॥.
६७५	संताडी वल्लद गावजी पाटील
७७५	दुर्गोजी वलद गावजी पाटील
३७५	रामराव गावजी पाटील.
३०००	

३८. सु॥ ईहिदे (सीतेन मया व अलफ) ६ डिसें. १७६०

बाबत भास्कर बापूजी व त्रिंबक बापूजी मराठे यांचा आवेर त॥ गुहागर येथील ठिकाणाचा कजिया होऊन मनसुबी हुजूर आली. त्यास त्रिंबक महादेव मराठे यास ठिकाणाविसी कागद खोटा करून भंडारी मो॥ र करून दिल्हा स॥ गुन्हेगारी घेतली.

० २७ रबीलाखर रुपये १००

३९. सु॥ सीत सीतैन (मया व अलफ) ८ सप्टं. १७६५

बा॥ वलीखान मुलाणा मौजे आऊंध ता॥ हवेली प्रा॥ पुणे याणे मौजे खडकी व मौजे कात्रज ता॥ मा॥ र येथील वतनाचे कागद खोटे कागद केले. सिके मोर्तब तांब्रपत्रे केली सा॥ गुन्हेगारी करार बा॥ यादी छ २१ रा॥ वल त्याजवरून प्रा॥ मा॥ रचे हिसेबी जमा दिले ते जमा १००० रुपये

४०. सु॥ ईहिदे (सबैन मया व अलफ) १७७०/७१

भिकाजी आबाजी वाड रयत मौजे सालाटुली ता॥ सुवर्णदुर्ग याणे सरकारची म्हणोन खोटी सनद लक्ष्मण बलाल किले मंदगिरी याचे नांवे आसामीविशी केली. त्यास हुजूर आटकेट ठेवला तो पलोन गेला मागती धरून आणून ऐवज करार केला. तो रु॥ १२५.

४१. सु॥ खमस (सलासीन मया व अलफ) १६ नोव्हें. १७३४

बा॥ कमलोजी कुंभार खंडूचा भाऊ हा लबाड बोलला. खंडूचा कागद मकसुदाबादेहून आला असता सांगितले नाहीं सबब गुन्हेगारी घेतली. ते जमा रु॥ ५०

जमा पोता छ ३० जा॥ खर वि॥ जेनार्दन बलाल

रुपये ५०

४२. शके १७०४, सुा सलास (समानीय मया व अलफ) १७८२/८३

बा भास्कर अनंत गोडबोले, अंताजी परशराम यांचे पुत्र याजकडे आबाजी महादेव याचा ऐवज होता. त्यास जयराम कृष्ण बापट याणी माारनिलेस विचारले तेव्हां सांगितले नाहीं. हाली सरकारांत सांगितले सा ऐवज घ्यावयाचा करार केला ते ५६०३॥ रो

जमा परभारे रुपये ५६०३॥

III. Offences against persons.

४३. खमस (सलासीन मया व अलफ) ७ जाने. १७३५

छ २३ साबान अखेर माारनिले (मोरसेट बडका वाणी वस्ती पेठ सोमवार) याणे आपली बायको मारिली म्हणून हुजूर विदित जाले. त्यावरून यास हुजूर आणून पुरसीस केली. मणास आणिता याजकडे मुदा लागला त्याजवरून याणे अर्ज केला कीं मजपासून कर्म जाले खरे. त्यास माझे येणे लोकाकडे आहे. त्याचा हिशेब स्वामीनी मनास जाणून माझे जीवन माफीक गुन्हेगारी करार करून घेऊन मजला पावण करावे म्हणून त्यावरून अर्ज खातरेस आणून तुजकडे सरकारची गुन्हेगारी रो २५०० अडीच हजार करार केले असे याचा वसूल सरकारांत देऊन सुखरूप राहणे रसानगी यादी असे

१.

(पेशवा रोजकीर्द विभाग २, क्रमांक ७३ पहा. सदरील तारीख बरोबर आहे.)

४४. सुा आर्बा सलासीन ते खमसैन (?) १७३३/३४–१७५३/५४

कमावीस खंड गुन्हेगारी निा गोपालजी कुतवाल का सुपे याणे व दुसरे तिघाणी पाटसच्या रानांत खून केला. त्यास खून माफ केला आणि गुन्हेगारी करार केला छ ४ रो खर.

..... रो
१५० सरकारचा ऐवज
१०० समाईक ऐवजा बा पत्र
४५ राजाश्री स्वामींचा
३२॥ सरकारचा
२२॥ मोगलाई
१० सरदेशमुखी.
३२॥
२२॥ श्वराज निा सचीव वगैरे
१००
२५०

यास उगवणीरा खावंद निंबाजी पाटील बिन येसाजी पाटील नागवडे मौजे खांबगांव ता॥ पाटस बा॥ कतबा.

१२५ आशाढ शु॥ ५
१२५ भाद्रपद शु॥ १
२५०

पैकी सरकारचा ऐवज जमा रुपये
१५० किता
३२॥ किता
१८२॥

४५. सु॥ इहिदे सीतेन (श. १६८२) १७६०/६१

बा॥ सिंदु गंगाधर जोसी कसबा खेडे प्र॥ जुनर याणी आपली सून कृष्णाबाई इजवर विभिचाराचा आरोप ठेऊन मौजे वेलू स॥ कोरेगांव प्र॥ वाई येथे आपल्या हाते जिवे मारिली. ती बाईको आपल्या दादल्यापासून गर्भिणी होती. सिदु म॥रने निरपराधी मारिली यैसे खरे जाहाले. सा॥ त्यास बहीशकृत केला. प्रायेश्चित यात्रेस जावयाची आज्ञा जाहाली. त्या अपराधाबा॥ गुन्हेगारी करार

रुपये ३००

४६. सु॥ सीत (सीतैन मया व अलफ) १७६५/६६

बा॥ बाबाजी पा॥ बिन रुंद्राजी पाटील व संभाजी पा॥ बिन धनाजी पाटील व केवजी पा॥ बिन दाजी पा॥ मौजे कोसिंबे पा॥ वण याणी केवजी बिन त्रिंबकजी पाटील मौजे मजकूर याच्या बापाचा व आईचा खून केला सबब गुन्हेगारी करार रु॥ १२००

जमा परभारे १२००

४७. सु॥ सीत सीतेन (मया व अलफ) १७६५/६६.

सु॥ सीत सीतेन (मया अलफ) १७६५/६६ बा॥ दतू चौधरी व सिवाजी कोली याचा लेक बा॥ मौजे चांगदेव पा॥ येदलाबाद दिा॥ नाना पुरंदरे. मौजे मजकुरी शंकर पंड्या गुजराथी ब्राह्मण होता त्याचे बाईकोसी मल्हार दिनकर चाकणकर देसपांड्या कमाविसीस होता, त्याणे पांड्या मजकुराचे बायकोसी अकर्म करुन गुजराथी ब्राह्मण मजकुरास मारेकरी घालून जिवे मारले. त्याचे कुटांत होते. सा॥ गुणेगार बिा॥

रामशास्त्री करार रु॥

१००० दतु चौधरी चांगदेव याजकडे ठाऊक असतां जाहीर न केले.
५०० सिवाजी कोली मौजे मजकूर याचा लेक मारेकरी यात होता सा॥
१५०० (पेशवा रोजकीर्द वि. ७ बर ५९०/९१ पहा.)

४८. सुा सबा सितेन (मया व अलफ) १७६६/६७

बाा तुलोजी भोईटे सिलेदार सरंजामी याणी माणकोजी भोईटे यांचा बारगीर जिवे मारिला सबब गुन्हेगारी करार रुा ७००

४९. सुा इवहदे (सबैन मया व अलफ) ९ सप्टं. १७७०

बाा विठल त्रिंबक पुरंदरे याचा लेक बापूजी याने सदासिव भिकाजी पुरंधरे बाा काा सासवड याची कन्या आठा वर्षांची जिवे मारिली खून लागूं जाहाला सबब ऐवज घ्यावयाचा करार केला तो

रुो २५००

... ..त्याचा हवाला अंतोबा नाईक माराठे याजकडे येणे ते गाडदी मजकूर यास देविले रु. २५००

० १८ जोवल

५०. सुा इहिदे (सबैन मया व अलफ) २१. जाने. १७७१

बाा आवडी तेलीण सातारकर हे सातारियास मराठाची पोर मारीत होती. ते सापडली सबब तिजकडे गुन्हेगारी करार केली.

ते जमा रुो

२५

छ ४ सवाल

५१. सुा इसने (सबैन मया व अलफ) १७७०/७१

बाा सूर्यमान बिन दावलजी पाटील मौजे अजनूज पाा मंगलवेढे याणे मौजे मजकुरहून रुसून जाऊन गांवावर दावा करुन सुलतानजी गाडजाल्या चौगुला मौजे मजकूर याजवर जखमी केल्या त्याणे तो मृत्य पावला साा सुलतानजीची बाइको गंगा इजला सूर्यभान पाटलाची मिरासी जमीन पंधरा बिघे देऊन खुनाबाा गुन्हेगारी सूर्यमात याजकडे करार केले ते रुो १०००

५२. राजमंडल १७७८/७९

स्यारी राजश्री पंतप्रधान सुा तिसा सबैन (मया व अलफ)

जमा साल मजकुरी कमावीस गुन्हेगारी.

बाा ब्राह्मण वगैरे आा ८ आठ आसामी कसबे तिसगांव प्राा सेवगांव याणी रामाजी येलो यास जिवे मारिले. साा त्यास हुजूर आणून त्याजकडे खंडा बाा यैवज करार केला. त्याचा वसूल नरहर लक्षुमणराव पाा मजकूर याजकडे सांगितला आहे ते करारावाा झाडा रुो १०००१ पो रामाजी येल्हो याचे पुत्रास खूनाबाा द्यावे रुो १५०० बाकी सरकारांत घ्यावयाचे रुो ८५०१ रुो

U— जभा परभारे—— रुो

८५०१

बाकी ताा अखेरसाल ० रुो

(पेशवा रोजकीर्द वि. ८ क्र. ८८५)

५३. सुा ईसने ८ मार्च १७८२ (?)

बा्ा कारकून दिमत सुमेरसिंग गाडदी याणे पिस्तोल मारते समयी सरकारच्या कामाठी यास गोळी लागली सा्ा गुन्हेगारी करार केली रु. ५० पनास. वजा कामाठी यास दिल्हे २५ पंचवीस. बाकी करार वसूल मुळे छ. २३ रोवल. रो० २५.

.....जमा पोता छ २३ रोवल

५४. सुा खमस (समानीय मया व अलफ) २५ ऑक्टो. १७८४

बा्ा माहादाजी गोविंद जोशी उरवडेकर यांचे कर्ज सिदमाली याजकडे येणें तो कर्जाच्या तगाद्यामूले मा्ा रनिलेचे घरी मयत झाला सा्ा माहादाजी गोविंद याजकडे गुन्हेगारीचा ऐवज करार केला तो बा्ा करारी याद छ १० जिल्हेज.

U —बा्ा झाडा जमा———— २०००— रो०.

५४. (अ) शके १७१३ सुा्ा ईसने तिसेन (मया व अलफ) २ सप्टें. १७९१

बा्ा त्रिंबक सोमनाथ व गुंडो धोंडदेव यांचे कर्ज गणोबा नाईक कुमदी याजकडे येणे याजकरितां कुमदी मा्ार यास आपले घरी नेऊन बसऊन सख्त तगादा केला तेव्हां त्यास सोडणे म्हणोन सरकारांतून ताकीद जाली असतां सोडिला नाहीं त्याचे घरीं तगाथांत मेला सबब गुन्हेगारी बा्ा सरकारांत घ्यावयाची करार केले ते करारी यादी

छ. १७ सवाल जमा बा्ा झाडा ——— रो०

२०००

यासी मुदती

१०००० आषाढ बा्ा १०

१०००० श्रावण बा्ा १०

U—जमा पोता परभारे छ ३ मोहरम — ———रो०

२०००

५५. शके १७०८ सुा्ा सबा तिसैन (?) (समानीन ?) ४ ऑक्टो. १७८६

बा्ा बकू पेठी कों भगवंत अनंत पेठे वस्ती को नासिक हिणे हुजूर विदित केले की आपला बाप त्रिंबक नारायण मनोहर वस्ती मौजे वेढे पा्ा नासीक याचे घरी मी माहेरीस असता त्याचा दतपुत्र गणपतराव उमर वर्षे सोलाचा होता त्याचा आपला द्वेष पडल्यामुळें त्यास माडीवर नेऊन रामा ब्राह्मण गुजराथी याचे घरां चाकर होता त्यास सांगून माडींचे खिडकींतून त्या मुलास खालीं लोटून देवविला. तो खालीं पडून दोन प्रहरांनी मृत्यु पावला तेव्हां खंडेराव त्रिंबक वेढेकर यांनी चौकसी करून गुजराथी मजकुरास किल्लथावर आटकेंत ठेविला होता. त्यास येथे भाजार जाहल्यामुळें त्याणी सोडून दिल्हा. मी सदरहू हत्येचे दोषामुळें तीन वर्षेपर्यंत बहिष्कृत निराळीच राहिले आहे. येविसीचे प्रायश्चिताची आज्ञा होऊन माझी शुद्धता जाहाली पाहिजे, म्हणोन त्याजवरून बकू पेठी इजला बंधुहत्या ब्राम्हणहत्या घडली त्या दोषाचे प्रायश्चित घ्यावयाचा ठराव करून गुन्हेगारी वगैरे ऐवज करार केला. तो बा्ा करारी याद

छ ११ (२१ ?) जिल्हेज रुो
१००० गुन्हेगारीबाबत
१००० प्रायश्चितास
.....
२०००
पैकी वजा प्रायश्चित रुो
१०००
बाकी सरकारांत घ्यावयाचे ते बाा झाडा जमा रुो
१०००
जमा परभारे ८५९ रुो
बाकी ताा अखैर १४१ रुो.

५६. शके १७०८ सुा सबा (समानीन) १७८६।८७

बाा मल्हार बाळाजी महाजन को नारायणगांव याणी आपले कुणबिणीस मारले यामुले ती दुसरे दिवसी ती मेली त्या दोषाचे प्रायश्चित देऊन महाजन मजकुराकडे गुन्हेगारी बाा घ्यावयाचे करार केले ते जमा २५ रुो

५७. शके १७०९ सुा समान ३१ मे १७८८

कमावीस गुन्हेगारी बाा बापूजी रामचंद्र मोघे पुणेकर जमा परभारे

छ २४ माहे साबान.....(५ ओळी सोडून) माारनिले हे गोविंद विश्वनाथ गणपुले याणी आपली साक्षत्र आई राधाबाई हीस माारावयाचा प्रयोग केसो तोडेकरी वगैरे यांचे हातून केला त्या समंतात माारनिले होते सबब जयराम कृष्ण याणी चौकसी करून पांच हजार रुपये गुन्हेगारी घेतली ते जमा-खर्च करून देविले. ५००० रुपये.

५८. शके १७०९ सुा समान ३१ मे १७८८

काा गुन्हेगारी बाा भिकाजी गोपाल बाा काा बाब जमा परभारे. छ २४ माहे साबान ऊर्फ वैशाख मास.....(५ ओळी सोडून) माारनिले याणी राणोजी माली वस्ती खानगांव यास कोल्याचे मिळणींत होता म्हणोन गुम्हेगारी पंचवीस रुपये घ्यावयाचे करार केले ते माली मजकूरास न मिलत सबब माली याणे आपली बायको माारनिलेजवळ ओलीस ठेऊन आठा दिवसाचा वायदा करून रुो आणावयास गेला तो फिरून आला नाहीं त्यास माली मजकूराची बायको रक्षा करून घरीं ठेविली त्या उपरांतकि तिचे याचे न बने सबब गळ्यास फांस लाऊन ठार मारली हा अपराध लागू जाहल्या सबब जयराम कृष्ण याणी चौकसी करून गुन्हेगारी नऊ हजार रुपये घेतले त्याचा जमाखर्च करून देविले. ९००० रुो.

५९. सुा ईहिदे सबैन (मया व अलफ) १७७०-७१

बा्ा येसवंत सिवाजी सिवणेकर व विश्वनाथ खांडेकर याचे बोलणें होता सिवणेकरानी भटजीची अमर्याद करून तोंडावर मारिले सबब करार केला तो रुो

.....३२५

६०. सुा ईहिदे (सबैन मया व अलफ) १७७०-७१

बा्ा जाणोजी पाटील मौजे काथडी ता्ा खेडेबारे याजकडे गोविंद राम आठवले कारकून दिा्ा वाकनीस वडुतास अनुष्ठानाचे साहित्यास गेले होते ते माघारे येता मौजे मजकूरी कजिया केला मारहाण केली सबब करार रुो

१०

६१. सुा समनीन (मया व अलफ) ३ जून १७८०

का्ा गुन्हेगारी बा्ा वहीरुई नाम्या माली बा्ा का्ा सासवड प्रा्ा पुणे जमा परभारे

छ २९ जोवल अव्वेरसाल बा्ा देणे ता्ा विसाजी धोंडदेव भोगलेकर याजकडे पुण्यांतील प्याघे वगैरे लोक यांचे रोजमरे यांचे वाटणी बा्ा रसानगी पत्र रुो १९३३७। पैकी १८२३ पो भाली मजकूर याणे गरती बायकोस मारिले सा्ा गुन्हेगारीचा ऐवज करार केला तों देविले ५० रुो

६२. २० मार्च १७८७

राजमंडल

सुा सबा (समानीन मया व आलफ)

स्वारी राजश्री पंतप्रधान

जमा साल मजकुरी गुन्हेगारी

बाबात गंगाधर गोविंद साठे याचा व आबाजी दामोदर याचा देण्याघेण्याचा कजियात मा्ारिले याणी आबाजी दामोदर याचे तोंडांत मारिली हें लागूं जाले. सा्ा सरकारचे गुन्हेगारी वा्ा घ्याययाचा करार केला तो बा्ा करारी याद छ २९ जोवल

जमा १५० रुो

६३. सुा आर्बा १७३४-१७५४ (?)

नि्ा कृष्णाजी मेत्रा माली मौजे बाणेर ता्ा हवेली प्रांत पुणे याजकडे गुन्हेगारी करार केली की कृष्णाजी मजकूराचे मुलाची व कुंभार मौजे मजकूर याची कलागत जाली. कुंभारास कुराड मारिली होती सा्ा इनसाफकरून करार केली बा्ा कतबा जमा १७५ रुपये.

६४- शके १७०९ सुा समान (समानीन मया व अलफ) ३१ मे १७८८

का्ा गुन्हेगारी बा्ा अजबराम मारवाडी वामोरीकर

जमा परभारे

छ. २४ माहे सावान ऊर्फ वैशाखमास (सालअखेर)

..... (ओळी सोडून) – बा्ा मार याचा लेक धनबा याणे आपले बायकोस अकरा वर्षांची होती तिचा अपराध नसता डाग दिल्हे. सबब जयराम कृष्ण याणी चौकशी करून बारासे रुपये गुन्हेगारीचे घेतले ते जमाखर्च करून देविले. छापी, सुमखी, चांदवड १२०० रो

६५. सुा सीत सीतेन ६ मार्च १७६६

बा्ा रंगभट ढेकणे वस्ती कसबे पुणे याणे सरकारांत विदित केले कीं आपली सून ठमा ही घरी नाहीसी जाहाली. त्यास शोध करितां तिणे जीवे दिल्हासा जाहाला. त्यास प्रायश्चित देऊन शुद्ध केले पाहिजे म्हणोन त्याजवरून रामशास्त्री आश्रीत याचे विद्यमाने प्रायश्चित्त देऊन राजदंड करार. रुपये १००

छ. ३० रमजान फाल्गुनमास पुणे, विा बालाजी जनार्दन फडणीस मारनिले याणी हुजूर विदीत केले आमची सून सौ. ठमा नाहीशी जाहली याचे कारण येंदा भाद्रपदमासी रात्रौ ग्रहण पडीले तेव्हां स्पर्शस्नानास ठमा आपला पुत्र सहा वर्षांचा घेऊन नदीस जाऊ लागली त्यासमई मूल दुखणाईत आहे याजला नदीस नेऊं नये ऐसे आम्ही बोलिलो. त्यारागाने ती स्पर्श स्नानास गेली तेथे उदकांत आपला प्राणत्याग करू लागली. तेव्हां घरच्या वगैरे बाईका समागमे होत्या त्याणी माघारी घरास आणिली. आम्ही राखणेस बसलो. त्यास मोक्ष स्नानास आम्हाला न कळत बाहेर गेली. कुंभारवेसीपुढें नदीच्या तीरी तांब्या एका ब्राह्मणास दिल्हा. त्या उपरी तिचा थांग लागला नाहीं. आज सहा महिने शोध बहुत केला. तथापि ठिकाण न लागे. याजवरून तिने निश्चये प्राणत्याग केला असे दिसते. त्यास तिची क्रियत होऊन पुढें आमचे घरीं मांगल्यादि कार्ये जाली पाहिजे. येविसीची आज्ञा करावी म्हणोन त्यावरून तिने आपला प्राणत्याग करून आत्मघात केला याचे शास्त्रता प्रायश्चित तुम्हास करवून ब्रह्मदंडहि होऊन तुम्हास शुध केले असे. तरी पूर्ववत्प्रमाणें ब्राह्मणाचीं कर्मे आचरोन सुखरूप राहणे. यासंबंधी तुम्हाककडे राजदंड रुपये १००एकचे करार केले असेत. ते सरकारांत जमा झाले असेत. म्हणोन भटजींचे नांवे चिटणीस छ २४ रमजान. पत्र १

६६. शके १७०७ सुा सीत समानीन (मया व अलफ) (रजब) १८) १७ मे १७८६

बा्ा पांडुरंग बापुजी पराड वस्ती पेठ रविवार शहर पुणे बा्ा झाडा मारनिले याची सून भवानी ईणे घरांत चोरी केली. सा्ा तिचे तोंडावर मारिल्या. त्याजवरून तिणे आफू खाऊन जीव दिल्ह्याचा मुदा पराड माराकडे लागला सा्ा गुन्हेगारीचा ऐवज सरकारांत घ्यावयाचा करार केला ते ५००० रो.

जमा परभारे ५००० रो

२००० छ १८ रजब

३००० छ ३० रजब

.....

५०००

६७. सुा ईहिदे तिसेन (मया व अलफ) १५ जून १७९०

छ १ सवाल बदल देणे जासूद जथे हरजी नाईक यास न्यायाधिशीकडील कामकाजास होते. त्यास बा छ १ जाखर सन ईहिदे समानीन ता॥ प्यादे येा॥ बा॥ चिंतामण रघुनाथ दातार याचे बायकोने जीव दिल्हा याचा लोकापवाद दोष आला सबब प्रायश्चित देऊन घेतले. ते सन ईहिदे समानीन देविले. १०० रुपये

६८. सुा ईहिदे तिसेन (मया व अलफ) १७९०।९१

२५ बा॥ चिमणभट बिन उधोभट हिंगे बा॥ पुणे यांची सून कासीबाई ईजला भटजीचे बायकोने व पुत्राने जाच बहुत केला यास्तव तिने नदीत जीव दिल्हा सबब सन सलास समानीनांत घेतले.

IV Offences against property

६९. सुा आर्बा १७३४–५४

निा॥ मौजे सांवरगांव ता॥ म्हाळुंगे येथे गारुडी उतरले होतें. त्याच्या दोन म्हशी व एक टोणगा चोराने नेला त्याचे ठिकाण न लागले तेव्हां गांवकरी यास तगादा केला तेव्हां एक म्हैस व एक टोणगा चासेचे पागेस आला. एका म्हशीचे ठिकाण नाहीं तेव्हां गांवकरी यापासून रुो ५० पैकी वजा देणे गारुडी म्हैस १ यो २५ बाकी छ १३ रमजान रुो २५

U जमा परभारें छ १३ रमजान

७०. सुा तिसा (आबैन मया अलफ) १७४८-४९

बा॥ खंडो सिवदेव कुलकर्णी मौजे लोणी याणे बाजी गोविंद कुलकर्णी मौचे काकटे याचा यैवज अभिकश करून ठेविला. सा॥ गुन्हेगारी करार केली. त्यापैकीं करार जमा रुो १५०.

७१. सुा तिसा (आबैन मया ब अलफ) १७४८-४९

बा॥ दापराऊत मांग याणे पेसजी चोरी केली. त्यास जान राऊत दिा॥ पागा हुजूर जमान होते त्यास करार. रुो

१००

७२. श. १६८२ सुा ईहिदे २३ आक्टो.१७६०

बा॥ रामचंद्रसींग परदेशी पोरगा याणे रंगमहालात कापडाचे दिंडांतील तिवट चोरुन नेले सा॥ गुन्हेगारी करार रुो १५

जमा पोता छ १३ रोबल.

७३. सीत (सीतेन मया व अलफ) १७६५-६६

२० बा॥ त्रिंबकास तोतया आणावयासी गाडदी बाहादरसिंग याजकडील रवाना केले होते. त्यास वाटेत नदीचे काठीहून बंदुक दोन चोरीस गेल्या त्या चोराचे ठिकाण बाबाजी प्रल्हाद याजकडील प्याद्यास कलल्यावरी त्या चोरास हुजूर आणून हजीर केला. त्यास चौकसी

करिता, न कलिता बंदुका नेल्या साा बंदुका सरकारांत घेऊन गुन्हेगारी चोराकडे करार केली ते माा बाबाजी प्रल्हाद.

७४. सुा सबा (सीतेन मया व अलफ) १७६६-६७

बाा श्वरुपजी खुले याजकडे चोरीचे लाइयामुळे करार केले त्याचा हवाला महादसेट बीरकर याणी घेतला रुो

१०००००

७५. सुा इसने (सबैन मया व अलफ) १७७०-७१

बाा कृष्णा कानडा ब्राम्हण याणे गोसावी याजकडे जेऊन शालजोड्या दोन चोरल्या साा त्याची वस्तभाव सरकारांत घेऊन फरोख्त केली ते

रुो

३०

७६. सुा सलास सबैन (मया व अलफ) १७७२।७३

बाा वगमाली शोभनदास याजकडे सबब की सदासीव बलाल जोग याजबर एक हजार रुपयाची हुंडी वाईचे सिप्याने पुण्याची केली त्यास ती हुंडी बनमाली याचे अडतीने वाईहून माारनिलेकडे पाठविली. त्यास हुंडी गुन्हेगारी जोगास न दाखविता आपले दुकानी जमाखर्च जोगाचे नांवे केला साा गुन्हेगारी करार केली ते १००० सो

जमा परभारे १००० रुो

७७. सुा आर्बा (सबैन मया व अलफ) १७७३।७४

बाा अनसू बिन देवजी सिर्पा याणी कृष्णाजी गोविंद याजपासून सरकारचे जमादार-खान्यापैकी सनगे चोरीली ती घेऊन बाजारांत विकली साा एवज करार केला तो जमा २०० रुो

७८ सुा सीत सबैन (मया अलफ) १७ जुलै १७७५

बाा आनंदराव बोधे याजकडील सिलेदारांनीं रंगारी याची बकरी मारून कापिली त्याजकडे गुन्हेगारी करार केली रुो १५

पैकी रंगारी यास देविले रुो १० बाकी जमा ५ रुो

७९. सुा समान तिसैन (मया व अलफ) १७९७।९८

बाा तिसगांवकर याजकडे, सिवाजी दामोदर याचे घरावर दरोडा पडिला. त्याचा माग काा तिसगांवपर्यंत लागला. पुढें तिसगांवकरांनी काढून दिल्हा नाहीं. साा सिवाजी दामोदर याचे वस्तवानीची किंमत गांवाकडून घ्यावयाची करार करून तिसगांवकराकडे गुन्हेगारी रुो १०००

(पेशवा ' रोकीर्द वि. ८ क्रमांक ६०६ पहा.)

८०. बा। सदासीव बिन भावजी जाधव वस्ती इंदुरी पा। आक्रोले मा।रनिले याणी बालाजी रघुनाथ सखटे याचे मुलाचे गल्यांतील सोन्याची कंठी तोडून घेतली मा।रनिलेस माघारी देऊन जाधव मा।र याजकडे गुन्हेगारी करार केली ते वसूल मुले
जमा ३० रो

८१. सु।। आर्बा सबैन (मया व अलफ) १७७३।७४
बा। कृष्णाजी गोविंद याणी भिवजी जामदार याणे सरकारचे जामदारखान्यांत सन गे चोरून आणिली ती विकत घेतली आणि चोरीची पेसी समजले असतां सरकारांत विदित केली नाहीं सा। एवज करार केला ते १००० रो

८२. शके १७०४ सु।। सलास १७८२/८३
बा। खान माली बा। मौजे मांडकी पो सिखल याणे कोंडाजी बेरड सिखलकर याजपासून चोरीचे बैल विकत घेतले ते ज्याचे त्याणे बोलखून नेले सा। ऐवज जयराम कृष्ण यांचे मारफतीने घ्यावयाचा करार केला ते २५ रो

८३. सु।। तिसैन (मया व अलफ) ४ जून १७९०
बाबत सुकलाल अगरवाल याणे मुंबईची बंदी असतां माल आणिला व चोरीचे जवाहीर खरीद केले याचे दुकानांत माणसामाणसी कजिया होऊन पुर्ध्याने जीव दिल्हा व सरकारचे सांडणीस्वार पंढरपूरानजीक पेंढारी याणीं लुटून नेले त्यांताल दागिने घेतले सबब गुन्हेगारी घ्यावयाची करार केली ते तूर्त घ्यावयाचे जमा बा। झाडा २७००० रो
जमा पोता रो
४००० छ २० रमजान
बाकी तागायत अखेरसाल २३०००

८४. सु।। खमस (सलासीन मया व अलफ) १४ ऑक्टो. १७३४
बा। गाडीवान निा। तोफखाना याणी मिठाईवाल्यास लुटले सा। गुन्हेगारी करार केली रुपये १२ पो हलवई यास हिल्हे रो ६
बाकी जमा ६ रो
जमा पोता छ २७ माहे जा। बल ६ रो

८५. सु।। समान सीतेन (मया व अलफ) १७६७/६८
अमृतराव राम देशमुख ता। नाते याणी सन सीतांत हपसी याचे लोकास सामील होऊन बालाजी माहादेव टकले घाचे घर लुटले सा। सरकारांत अटकेंत ठेऊन देशमुखीची जप्ती केली त्यास हाली रदबदलीमुले जाहाला अन्याय माफ करून गुन्हेगारीचा ऐवज करार केला १०००१ रो

८६. सुा इहिदे (सीतेन मया व अलफ) २९ सप्टें. १७६०

वा कृष्णा सोनार पेठ आदितवार याणे सिलेदाराचे सोन्याचे कड्यांत कांहीं रुपयाची कारागिरी चालविली सबब गुन्हेगारी करार केली.

४० रुपये

जमा पोता छ १९ माहे सफर

८७. वा लावाजी मोरे चाकर निा कृष्णंभट कर्वे याणे लबाडी करुन ठेवणें उकरावयास गेला होता छ २० जिल्हेज

V Miscellaneous

८८. सुा तिसा आर्बैन (भया व अलफ) २४ डिसें. १७४८

छ १४ मोहरम वा गोविंद नाईक देवले हे नवे तकलुबी रुपये पुणीयामधें सोनार करीत होते त्यामधें होते सा करार केले तूर्त घ्यावे येसा करार को रो

२०००

सदरहू दोन हजार रुपये करार करून नाईक माारनिलेस कौल लिहून दिल्हा असे. सदरहू रुपये शंकराजी नाईक भिडे याजपासून घ्यावे.

(पेशवा रोजकीर्द वि. २ क्रमांक ९७)

८९. सुा तिसा (आर्बैन भया व अलफ) १७४८।४९

वा तमाणा व मेलगीर हे खोटे रुपयाकडे सोनारमधें सभत होते सा करार केले त्याचा हवाला सदासीव बलाल वैद्यानें घेतला ते रुपये जमा

१५००

९० सुा तिसा (आर्बैन मया व अलफ) ४ फेब्र. १७४९

छ २६ सफर सोनार मजकूर याणे तलकूबी सिक्के करून खोटे रुपये केले. त्याजवरून सोनार मजकूराचे पारपत्य करून घर सरकारांत ठेविले त्याची किंमत अजमासें वा याद जिवाजी गणेश रो

रुपये ७००

जाजती ४००

....

.....

११००

(पे. रो. वि. २ क्र. ९८)

९१. सुा इहिदे सबैन (मया व अलफ) ३० मार्च १७७१

बा॥ गोकुळदास गुजराथी मुल्हेरकर टंकसालेत रुपया रुलखरा व तोलपुरा करावा, तो केला नाहीं सा॥ टंकसालेचे काम या उपर करुं नये अैसा करार करुन गुन्हेगारीचा करार केला ते बा॥

यादी छ १३ जिल्हेज

३००० रुपये

९२. शके १७०४ सुा॥ सलास

बाबत हाय याणी बुलचंद व त्याचा लेक बालकिसन सोनार हिंदुस्थानी वस्ती औरंगाबाद हाली वस्ती पुणे पेठ रविवार याणे मोहराचे व रुपयाचे सिके खोडून मोहरा व रुपये गैरसील खोटे पाडिले सबब बालकिसन याजपासून गैरसील मोहरा व रुपये याणी घेतले. त्याजपासून गुन्हेगाराचा अैवज सरकारांत घ्यावयाचा करार केला ते

३७५	बा॥ वैजनाथ आगरवाला
३७५	बा॥ भाऊ तांबट वाघोलीवाला
७००	बा॥ गिरमाजी नाईक
११०	बा॥ रामकिसन
१२५	बा॥ मसिराम निर्भेथराम
६०	बा॥ नारायेण गुजराथी
१७४५	जमा परभारे रुो १७४५

९३. सुा॥ आर्बा (सबैन मया व अलफ) १७७३/७४

बा॥ येसाजी थोपटा मौजे सावगांव ता॥ कर्यात मावल याणे कुसाजी थोपटा याचे सेताचे बांधावर बैल चारावयास नेले असता काठी मारली सा॥ गुन्हेगारी येसाजीपासून घेतली ती जमा २० रुो

९३ (अ) शके १७०४ सुा॥ सलास १७८२/८३

बाबत जयराम नाईक ठुसे नारायणगांवकर व काकाजी वरडे व सखाराम आदवाणी व कृष्णाजी देहाडी जुन्नरकर याणी सुरतेची बंदी असता कापड खोा करुन आणिले सबब गुन्हेगारीचा अैवज सरकारांत घ्यावयाचा करार केला ते २१०० रुो

जमा परभारे २१०० रुो

VI Offences against family, morals and religion

९४. सुा खमस (सलासीन मया व अलफ) १९ नोव्हें. १७३४

बा। खंडोजी कुंभार निघोजकर याणे आपली लेक येकास दिली असता दुसरीयास देत होता. सा। गुन्हेगारी.....अर्काटी जमा रुो २५

जमा पोता छ ३ रजब रुपये २५

९५. सुा आर्बा १७३४/५४ (?)

छ ६ रोवल मुकाम पुणे छ २४ जिल्हेज बा। दिमत सेख आली अरब याजकडील, आली ईस्माईल प्यादा याणे मानेखान बारगीर पागा हुजूर याचे बटकीसी तहकीकात न करता निका लाविला याजकरितां नफर मजकुराकडे करार केले रुो ४० पैकी कुणविणीचे अैवज मानेखान यास रुो २०, ते आरबाचे नांवे लिहून बटकीचे यैवज देविले रुो २०, पोता पैकी वीस बाकी नफर मजकुराकडे गुन्हेगारी बाबत देविले सरकारचे येणे ते रुो २०

९६. सुा तिसा (आर्बैन मया व अलफ) ५ जुलै १७४८

बा। देवजी सोनार का। केंदूर ता। पाबल याणे पद्माजी सोनार याची लेक दादला असता पाट लाऊन बाईको केली ता। गुन्हेगारी करार केली.

छ १९ रजब

२५ रुो जमा पोता छ २५ रजब

९७. सुा ईहिदे (सबैन मया व अलफ) २१ जाने. १७७१

बा। लक्ष्मण गोपाळ व राघो माणकेश्वर याजकडे सबब की भीऊबाई कोम हरबाजी भिकाजी ईणे आपले पोरीचे लग्न येकवेले जाले असता लक्ष्मण गोपाल यास दिली ते त्याणी केली व माली याचे कुणबिणीची पोरगी भाऊबाईन विकत घेऊन आपले बहिणीची मूल आहेस म्हणोन सांगोन राघो माणकेश्वर यास दिली. त्याणे केली सबब उभयताकडून दर ७५ प्रो अैवज करार केला तो जमा रुो १५०.....

जमा पोता छ ४ सवाल.

९८. सुा खमस (सलासीन मया व अलफ) २ ऑक्टो. १७३४

नगोजी साटस याणे पाथरवटाची बायको पलऊन नेली सा। त्याजकडे करार केले.

रुो १००

छ १५ जमादिलावल

९९. सुा ईसने (सबैन मया व अलफ) १७७०/७१

बा। बलराम मणीराम कनोजी ब्राह्मण (तेलंग). (फाटले).... ब्राह्मणाची स्त्री चेनापटाहून फुताऊन आणिली सा। अटकेस होता तो सोडून अैकज करार केला.

ते जमा २००० रुो

(पेशवा दप्तर वि., २२ नं १२४ पहा.)

१०० सुा खमस (सलासीन मया व अलफ) १५ डिसें. १७३५

बा्ा भवानी कासार याचा पुतण्या याणे नंदराम चोपदाराची बटीक घेऊन जात होता सा्ा घेतले ते जमा गु्ा चांदखान सलाबत

५० थैन गुन्हेगारी

१६/६६ सीलकावण

जमा पोता छ २९ रजब रुपये ६६.

१०१. सुा आबेंन (मया व अलफ) १७३९।४०

दर्याखान वस्ती मौजे कोरेगांव ता्ा पावळ मा्ा जुन्नर याचे भावाने गोंदजी फडतरे पाटील मजकूर याचे बटकीस बदमल केला सा्ा गुन्हेगारी बा्ा कतबा

रुपये ३००

बाकी तागाईत अखैर साल रो्ा ३००

१०२. सुा इहिदे सीतेन (मया व अलफ) १७६०।६१

बा्ा आदाई पाटलीण मौजे वडगांव का्ा निंबसोड माईंणी ईण झगटपुरी गोसावी बा्ा पुसेसावली यासी बंद अमल केला. सबब हरदू जणाकडे सात हजार रुपये गुन्हेगारी करार केली तिचा हबाला येमाजी सिवदेव याणी घेतला आहे त्यापैकीं देविले.

(पेशवा रोजकीर्द वि. २ क्रमांक १०४)

१०३. सुा समान सीतेन (मया व अलफ) १७६७।६८

बा्ा नथुराम चौधरी याच्या सुनेने पोट वाढविले सा्ा गुन्हेगारी करार केली ते रुपये ९०

१०४. सुा ईहिदे (सबैन मया व अलफ) १७७०।७१

बा्ा विसोबा शेणवी विा्ा गोपालजी भोसले याणे अकर्म केले सबब गुल्हेगारी घ्यावयाची करार केली ते १००० रो्ा

१०५. सुा आर्बा (सबैन मया व अलफ) १७८३।७४

बा्ा अंताजी बिन मुंकदजी गोलक वस्ती मौजे रानवड पा्ा चानवड याणे आपले घरीं मुरार त्र्यंबक कुलकर्णी मौजे कोरेगांव पा्ा जुन्नर याची कन्या जान्हवी विधवा होती तीस नेऊन तिजकरवी केश राखोन तीशी संग केला तीची पोटी पुत्र जाहाला हे वर्तमान हुजूर विदीत झाल्यावर जान्हवतीचा पुत्र अटकेंत ठेऊन, अंताजी मृत्यु पावला त्याचा दोघी बायका पुत्र व भाऊ राजाराम व गंगाराम गोलक अपराधी ठरले सबब यैवज करार केला ते १६००० रो्ा

जमा परभारे १६००० रो्ा

१०६. सुा सीत सबैन (मया अलफ) १५ जून १७७५

बा्ा सटवोबा माहाजन का्ा नारायणगांव याची बहीण विधवा ईणे अकर्म केले. ती बाराणसीस निघोन गेली. त्यास तत्संबंधी गोत्र पुरुस व पितृकुल त्यास संसर्ग दोषास्तव संसर्ग

प्रायेश्चित्त करून शुध्धता करणे पुढे तीर्थयात्राकरून आलीयानंतर तिचा विचार केला जाईल म्हणोन पत्रे

१ नारायणगावचे ब्राह्मणास
१ धौंडो विस्वनाथ यास
येणेंप्रमाणें देऊन करार केले ग्ाा धौंडो विस्वनाथ जोगलेकर ५० रो।
जमा परभारे छ १६ रविलाखर.

१०७. शके १७०४ सुा सलास (समानीन मया व अलफ) १७८२।८३

बाबत चिमणाजी बलाल लेले फडणीस पागा दिमत बाबा माहात यांणी बदकर्म केले सा ऐवज जयराम कृष्ण बापट याचे मारफतीनें घेण्याचा करार ते १५०० रो।

१०७ (अ) शके १७०४ सुा सलास (समानीन मया व अलफ) १७८२।८३

बाबत नवलोजी बिन मल्हारजी ससाणा खिजमतगार वस्ती मौजे आरडे ता। कुडाल यास मौजे मजकुरी ठेवणें सापडिले. म्हणून सरकारांत विदीत जाहाले त्याचे चौकशीकरितां बोलाऊन आणून पुरसीस केली तेव्हां लिहून दिल्हे कीं आपणांस कांहीं सांपडलें नाहीं आणि लागली यास सरकारचा गुन्हेगार या प्रो। लिहून दिल्हे असता चौकशीने ठेवणें लागू जाहाले परंतु ऐवज किती याची साक्ष न पुरे व याणे बदकर्म केले व आपली राख वीष घालून मारिली या प्रो। लागू जाहाले क्षा। सा। जीवन माफक ऐवज जयराम कृष्ण बापट यांचे मारफतीनें घ्यावयाचा करार केला ते ५००० रो।

जमा परमारे ५००० रो।

१०८. सुा। सीत समानीन (मया व अलफ) १७८५।८६

बा। खंडो त्रिंबक कुलकर्णी मौजे सिरोली ता। आले प्रांत जुन्नर बा। झाडा मा। रनिले याणे लक्ष्मण सिंदी मौजे मारचे. बायकोसी बदमल केला सा। गुन्हेगारीचा ऐवज सरकारांत घ्यावयाचा करार केला. तो जमा मुा। आनंदराव वोक कारकून पा। मार ९०० रो।

१०९ शके १७०८ सुा। सबा समानीन १७८६।८७

बाबत कोंडो मल्हार दाणी वस्ती कोा सासवड याची धाकटी भावजायी राधू बाल विधवा विठ्ठल त्र्यंबक पुरंदरे काा मार याची कन्या ईजपासून अपराध कर्म घडलें तें सरकारांत जाहीर जाहाले. सा। दाणी मार याजपासून गुन्हेगारी घ्यावयाचा करार बा। करारी याद छ १४ जिल्हेज रो। ३८००. पो। वजा रामचंद्र नारायेण याणी पेसजी गुन्हेगारी ठरवून पुणे सुभाकडे ऐवज घेतला तो रो। ८०० बाकी सरकारांत घ्यावे ते जमा बा। झाडा रो।

३०००

जमा परभारे रो।

३०००

११०. ३१ मे १७८८

शके १७०९ सुा समान (समानीन मया व अलफ)

काा गुन्हेगारी बाा महादाजी जिवाजी परांजपे वस्ती काा चास, जमा परभारे

छ २४ माहे साबान ऊर्फ वैशाख मास अखैर बाा देणें किले प्रतापगड निाा जयराम कृष्ण बापट याजकडे किले मजकूरचे बेगमीस अैवज हुजरून द्यावयाचा रुपये १०८०२५ प्रो पावले ते रुपये २५००० बाकी रसानगी यादी पैकीं माारनिले याची भावजई हिणे शिवाजी लक्ष्मण रहालकर यासी बदकर्म करून पोट बाढविले. त्यास पाडावें म्हणून महादाजी जिवाजी याचे स्त्रीनें पीतांबर परदेसी चासेत रहात होता त्याजपासून औषधें देविली त्या औषधानें ती मृत्य पावली हे सरकारांत समजलियावर नीलकंठराव रामचंद्र याणी जबान्या लिहून घेतल्या होत्या त्या आणविल्या. त्यांतील चौकसी करीतां माा रनिलेकडे भावजई मेल्याचा अपराध लागला. सबब सिवाजी लक्ष्मण रहालकर सुधा गुन्हेगारी घ्यावयाची ठरविली रुपये १०००१ पो वजा बातमीदारास दर हजारी पन्नास रुपये द्यावयाचा करार केला होता ते दिल्हे रुपये ५०० माारनिलेपासून बाकी जयरामकृष्ण याणी चौकसी करून अैवज घेतला. त्याचा जमाखर्च करून देविले ९५०१ रुपये.

१११. ३१ मे १७८८

राजमंडल

शके १७०९ सुा समान.

स्वारी राजश्री पंतप्रधान

जमा सालमजकूर काा गुन्हेगारी बाा

सिवराम बिन लक्ष्मण गोलक शेट्ये कसबे, पुणें.

जमा परभारें

छ २४ साबान ऊर्फ वैशाखमास (श. १७१० सालअखेर साबान) बाा देणे किले प्रतापगड निाा जयरामकृष्ण याजकडे किले मजकुरी बेगमीस अैवज हुजुरून घ्यावयाचा तो रसानगी यादीपैकीं बाा माार याणे ब्राह्मण बायकोसी बदकर्म केलें सबब जयरामकृष्ण याणी चौकसी करून गुन्हेगारी घेतली तिचा जमाखर्च करून देविले. ६५०० रो

११२. सुा तिसैन (मया व अलफ) ५ मे १७९०

कमावीस गुन्हेगारी

बाा नारो महादेव जोगलेकर बाा कसबे सुपे याणे मोरो सिंपी जुनरकर बाा कसबे मजकूर याचे बाईकोसी बदकर्म केले यामुले त्याणे तिजला जिवे मारिले सा गुन्हेगारीबद्दल घ्यावयाचा करार केला रो २००० पैकीं, मोरो सिंपी यास लग्न करायास दिल्हे रुपये ३०० बाकी सरकारांत घ्यावयाचा करार केले. ते बाा करारी याद छ २० साबान सन मजकूर जमा बा झाडा १७०० रुपये

११३. सुा ईहिदे तिसेन १ जुलै १७९९

छ १७ सवाल बाा देणे हाये यास न्यायाधिसीकडील कामकाजास होते त्यास बाा छ १ जाखर सन ईहिदे समानीन ताा छ ८ रमजान सन तिसा समानीन अखेर साल पावेती रसानगी हिशेब प्यादे यो. बाा भिकाजी विस्वनाथ जकाते पुणेकर याचे मावसीने बदकर्म केले. ती माारनिलेचे घरी होती साा बहिस्कार घातला असता पुरुषानी गंध लाविले व बाईकानी कुंकु लाविले सबब घेतले.

सन ईसने समानीस रुपये

५० प्यादे दिाा देवजी कडू

९ आपाजी सालोखा प्यादा.

.....

५९

११४. सुा इहिदे तिसेन (मया व अलफ) १७९०/९१

३५ बाा नारायेण जोसी बिन माहादेव जोसी बरकेडकर याचे स्त्रीने शुद्रासी विभिचार करून गर्भोक्ती जाली तिचा घटस्फोट केला. त्याज बाा घेतले सन सीत समानीन.

११५. पेशवे दप्तर दफाते रुमाल ५६६ १४ जून १७९४

राजमंडल

रोजकीर्द

स्वारी राजश्री पंतप्रधान

सुा खमस छ १५ जिलकाद
खमस तिसेन
मया व अलफ

छ .....दफातेपत्रे

विाा माधवराव रामचंद्र

नारो कृष्ण जोसी कुलकर्णी मौजे न्यास वगैरे दैह आठ प्राा जुनर याचा लेख विठल नारायण हा ब्राह्मणाचे साता वर्षाचे मुलीवर जबरदस्ती करीत होता. ते मनास आणिता कबूल जाहाला साा त्यास किल्ल्यावर अटकेस ठेऊन नारो कृष्ण याचे हिशाचे जोतिष कुलकर्णीचे

देहे

(तपशील)

येकूण आठ देह येथील माा रनिलेचे प्रत्यक्ष बुंधुसुधा हिशाचे वतनाची जप्ती करून हे सनद सादर केली असे तरी सदरहू प्रो जप्तीकरून उत्पन्न होईल ते प्राा माा रचे हिशेबी जमा करीत जाणे म्हणोन आनंदराव राम कादार प्राा जुनर यांचे नांवे सनद.

सनद १

११६. सुा तिसा (?)

काा गुन्हेगारी बाा छोटा कासी माली बाा पुणे जमा पोता.

१००० छ १३ रजब बाा माली मजकूर याणे कासीदा माली याचे बाईकोस जबरदस्तीने धरून बदमल केला आणि पलोन गेला. साा त्याचे घर जप्त करून त्याचा बाप व आई बाईको व मुले आटकेस ठेविली होती. त्यास छोटा मजकूर पलोन गेला आहे तो सापडल्यावर पारपत्य करावे साा घर व वस्तभाव व मुले व माणसे मोकला करुन नथु कासी छोट्याचा बाप याजपासून गुन्हेगारी घेतली ते जमा. सुा टेकचंद पहिलबापा रांजगांवी रुा

१०००

११७. सुा सबा सीतैन मया व अलफ १७६६/६७

बाा दौलतराव पाटणकर दिमत सटवोजी जाधवराव याजकडे कलाली दारुचे निमित्य बाा गुन्हेगारी करार. रुो

२५००

११८. सुा ईहिदे (सबैन मया बअलफ) १७७०/७१

बाा सेट्या नारो शंकर याचे बाजारांत कलाल राहून दारु करीत होते. ते यास कलाले असता सरकारांत विदित केले नाहीं. साा कलालाची दुकाने जप्त करून सेट्या मजकूरकडे गुन्हेगारी करार केली.

रुो ४००

११९. सुा सीत सबैन (मया व अलफ) १९ मे, १७७६

बाा माहार दारु पिऊन वेडा होऊन बागेत मस्त (!) होता त्यापासी यैवज सापडला छ १० मोहरम

ते जमा रुो

६१

जमा पोता छ ३० रोबल

१२०. सुा खमस समानीन (मया व अलफ) २९ जाने. १७८५

बाबत सगुणाबाई दाभाडे याजकडे दारुचे अमलाचा अपराध लागूं जाहाला सबब गुन्हेगारी घ्यावयाचा करार केला तो जमा झाडा

रुो

४०००

जमा परभारे छ १६ सफर

रुपये ३५३५।

बाकी तागाईत अखेर साल .....

४६४॥

१२१. शके १७०९ सुा समान ३१ मे १७८८.

कमावीस गुन्हेगारी बा सदाशिव बिन पांडोजी लकडे गोलक. जमा परभारे

छ २४ माहे साबान.....(५ ओळी सोडून) हा कलावंतिणीचे घरीं जाऊन दारु प्याला सा जयराम कृष्ण याणी चौकशी करून गुन्हेगारी साडेतीन हजार जमाखर्च करून देविले रुपये

३५००

१२२. सुा तिसा (!)

बा कलाल सखाराम भगवंत याचे बाजारांत राहून दारु करीत होते त्यास धरून आणून गुन्हेगारी करार केली.

५०० रुो

१२३. सुा ईहिदे सीतेन (मया व अलफ)

बा गोविंदा बिन मानाजी सिंपी वस्ती मौजे हेंगाडे तो मुल्हेर याणे यमुनी कलावंतीण मुसलमानीन याचे हातचे हा व चंद्या खाटीक जेविले अैसे शाबूद जाहाले सा त्रिवर्गापासून गुन्हेगारी घेतली ते १०४९ रुो

१२४. सुा सबैन (मया म अलफ) २८ मार्च १७७०

बा लखुजी व देवजी पाटील को भडगांव प्रा खानदेश याजकडे गोवधाचा आरोप आला. सा गुन्हेगारीचा यैवज करार केला तो चैत्र अखैर रुपये

६०००

(जमा छ २९ जिलकाद फाल्गुनमास)

१२५. सुा इहिदे (सबैन मया व अलफ) १३ एप्रील १७७१.

बा शाहागीर व लखमल्या जंगम वस्ती कसबे पुणे याणे लक्ष्मण नारायण धावक ब्राह्मण याजपासून रुद्रपाठ करून वाण्याकडून रुद्राभिषेक करवीत होता. सबब गुन्हेगारीचा ऐवज करार केला.

तो जमा रुपये ७५
जमा पोता छ २७ जिल्हेज

VII Penance and expiation.

१२६. सुा सीत (सीतैन मया व अलफ) १७६५/६६

बा रामचंद्र बाबाजी शेणवी याणी गैरराहा वर्तणुक केली आणि प्रायेश्चित सरकारचे आज्ञेशिवाय घेतले सा येवज करार केला ते रुो ३०००

.... तो गोपाल नाईक तांबवेकर याणी हवाला घेतला तो वैशाख शुा प्रतिपदेस अर्काट गंजीकोट प्रत देखिले. रुो ३०००.

राजमंडल

१२७. सुा तिसा (सबैन मया व आलफ) ¾ १२ आक्टो. १७६८

स्वारी राजश्री पंतप्रधान जमा साल मजकुरी गुन्हेगारी बाा आपाजी राम शेणवी दिमत महादाजी शिंदे याणी गोविंद सिताराम यांचे पंगतीस भोजन केले साा गुन्हेगारीचा ऐवज करार केला रुो २०००

..... छ ३० जमा दिलीवल भाद्रपदमास .... (५ ओळी सोडून) मशारनिलेनी गोविंद सिताराम यांचे पंगतीस भोजन केले. साा गुन्हेगारीचा ऐवज करार केला त्याचा हवाला अबाजी नाईक दिाा पोतदार याणी कार्तिक वद्य प्रतिपदीचे मितीनें घेतला त्या पैकींचे देविले–(१५ सावकारांची नांवे त्यांच्या कर्जास,. तें त्यांचे कर्ज वरील दंडांतून दिले) ..... १५९९०॥≋

छ २२ जमादिलाखर आखीनमास (रोजीं राहिलेला दंडाचा वसूल निरनिराळ्या तीन सावकारांना पेशव्यांनीं आपलें कर्जफेड म्हणून देविलें.)

४०१० तेरीज २०००००॥≋ रुो

१२८. सुा इहिदे तिसेन (मया व अलफ) १७९०/९१

१० बाा कृष्णंभट वैष्णव मठकरी याचा गुमास्ता बाा शहरपुणे याणे वैष्णव ब्राह्मण पानसी याजकडे चाकरीस होता. त्याजकडे अपराध नसता अपंक्त सरकारांत न कळविता करून प्रायश्चित दिल्हे. सबब सन सलास समानीनांत घेतले ३५.

१२९. पेशवा दप्तर कोंकण २१ जुलै १७९३
रुमाल नं. ५९९
कागद नं. ११५ पृ. ५

झाडा आवर्जा ताा विज्येदुर्ग निाा गंगाधर गोविंद सुा आर्वा तिसैन मया अलफ.....

छ १२ जिल्हेज ऊर्फ आषाढमास अन्नपूर्णाबाई कोम गणेशभट बर्वे वस्ती मौजे पाडे ताा खारेपाटण तालुके विज्येदुर्ग ईणे हुजूर विदित केलें कीं मजकडे बदकर्माचा आरोप येऊन घरीं चौकी बसऊन वस्तभाव वगैरे जप्त रुो खंडाचे ऐवजीं गंगाधर गोविंद ताा माा र याणी सुभा जप्त करून ठेविले आहेत. त्यास बदकर्माचे आरोपाची चौकशी मुथापत्यानिसी करून मजकडे दोष लागूं होत नसल्यास चीजवस्त सुभा गुन्हेगारी बाा जप्त केली आहे. ती माघारी देविली पाहिजे म्हणोन त्याजवरून मनास आणिता. अन्नपूर्णाबाई बर्वी इजकडे बदकर्माचा (आरोप) लागू होत नाहीं सबब गुन्हेगारी बाा चीजवस्त सुभा जप्त केली असेल ती माघारी देणे. ईजककडे शब्ददोष आला. याजकरिता मौजे मजकूर व मौजे पेडल व मौजे पुरल येथील सिष्ट ब्राह्मणास ईजला पंचगव्य देऊन सुद्ध करण्याविसी आलाहिदा पत्र सादर केले असे. तरी इजला पंचगव्य देऊन शुध्द करणे म्हणोन गंगाधर गोविंद पो माार यांचे नांवे चिटणीसी पत्र

१

सदरहू अन्वये समस्त सिष्ट ब्राह्मण मौजे साडे (वाडे ?) वगैरे गांव यास चिटणीसी पत्र कीं वर्षी इजला पंचगव्य देऊन शुध्द करणें. पत्र १.

१३०. सुा सीत तिसेन (मया व अलफ)

कमावीस राजदंड बा्ा हाय

जमा पोता रुो

४०० छ २१ जाा्वर बा्ा बाजीराव मोरेश्वर भाव्ये यांचे घरी कुणबीण चांभार जातीची निघाली सा्ा मशारनिलेस प्रायश्चित ध्यावयाचा करार करून बा्ा यज्ञेश्वरशास्त्री यांच्या विद्यमानें सरकारांत अैवज ध्यावयाचा केला ते रुो.

१३१. सुा खसम (सलासीन मया व अलफ) १६ ऑगस्ट १७३४

जवाजी बिन मेगोजी थोरात मौजे हिंगणगांव ता्ा प्रांत पुणे यास पुत्र संतान नाहीं. चवाण कुणबी होता त्याची स्त्री प्रसूत जाली आणि सातो दिवसी शांत जाली तिजला पुत्र जांहाला पालग्रहण करावयासी कोण्ही नाही. मुलाचा बाप त्याग करूं लागला. त्यावरून जवाजी मजकुराने मागोन घेऊन रक्षण केले नांव भागोजीस ठेविले आसे जाणोन गोतास आज्ञापत्र सादर केले कीं भागोजी जवाजी मा्र याचे वोटींत घालून पंक्तीपावन करणें म्हणोन पत्रें येकंदर. .....येकूण चौगांवास आज्ञापत्र सादर करून जवाजी मा्रकडे सरकारची सेरणी करार छ २७ रोवल केली रुपये ७५.

१३२. सुा आर्बा १७३४-५४

छ ७ रोवल सुा पुणे बा्ा जेबी महार व येस महार चव्हाण म्हेत्रा का्ा पुणे लेक सुभान माहार चोर याजबरोबर निघोन गेली होती ते देहूहून धरून आणोन गोतात वर्तावयास आज्ञा करून येशा महार याचे हवाली करून गुन्हेगारी करार केला रुो

२०

१३३. राजमंडल २४ ऑक्टो. १७६७

सुा समान (सीतेन)

स्वारी राजश्री पंतप्रधान

जमा सालमजकुरी कमावीस

गुन्हेगारी बा्ा स्वारी मातुश्री बाई

मुक्काम गंगापूर जमा पोता

बा्ा हाये छ २३ जोवल

१०५० बाा कोष्टी गोपाल येवलेकर व कुशा व धोंड्या व हन्या सुकणेकर याचा व बकाजी व भवाल्या कोष्टी याचा जातीचा कजिया होता त्यास बकाजी म्हणत असे मेल्या माणसाचे सुतक दाहा दिवस धरावे आणि अकरावे दिवशी श्रुध व्हावे गोपाल्या वगैरे कोष्टी म्हणत नवे दिवसी सुतक फेडून श्रुध व्हावे. त्यास सर्वांचे मतें दाहा दिवस सुतक धरून अकरावे दिवशी श्रुध व्हावे यैसे जाहाले. साा धोंड्या व गोपाल्या व कुश्या वगैरे कोष्टी नवा रोज करावा म्हणत. त्याजकडे गुन्हेगारी करार केली रुो

९०० अैन
१५० दरबार खर्च
.....
१०५०

१३४. सुा सबैन (मया व अजफ) ३ जाने. १७७०

बाा सटबाजी बिन सुभानजी कोष्टी वगैरे वस्ती पेठ शाहापूर कसबे पुणे याजकडे सबब की सटबाजी मजकूर जातीचा कडू असता चांगले जातींत मिळाव म्हनोन कोन्हाले व संगम-नेराकडे जाऊन गोताई करून चांगल्या सोयरीका केल्या. हे वर्तमान पुणेकर कोष्टी यास कळले. त्याणी सरकारांत फिर्याद केली याजवरून सटबाजी मजकुरास व आणखी दाहा माहालाचे कोष्टी जमा केले. सर्वांच्या बिचारे सटबाजीस गोतांत घेउं नये, असें जाहले. त्याजवरून सटबाजीकडे व पुणेकर कोष्टी सटबाजीस मिळाले त्याजकडे एवज करार तो जमा १६०० रुो

१६०० रुो
छ ५ रमजान पौषमास

पे. रो. ७.७६३

१३५. सुा सलास (सबैन मया व अलफ) ? १७७२।७३

